पीक संवर्धन विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, विस्तारविषयक सुधारणा करण्याकरिता राज्य विस्तार कार्यक्रमांना सहाय्य (केंद्र पुरस्कृत योजना) (राज्य हिस्सा १० टक्के) या उदिदष्टातर्गत विभागाने पुरवणी मागणी घेतली परंतु मूळ रक्कमच खर्च झालेली नाही. शेतकऱ्यांच्या प्रशिक्षणबाबतचा हा विषय असून यामध्ये काय अडचण होती ? अशी विचारणा समितीने केली असता, याचे दोन-तीन टप्पे झाले. पहिल्या वेळी वित्त विभागाने ४५ लाख रुपयांचा नियतव्यय मंजूर केला, परंतु सांगितले की बजेट ७० टक्क्यांचेच करावे. त्या अनुषंगाने ३१ लाख ५० हजार रुपयांचे बजेट तयार करण्यात आले. त्यानंतर दिनांक ५ जुलै, २०१४ रोजी सांगण्यात आले की, १०० टक्के बजेट करणे शक्य आहे. त्यामुळे पूर्ण ४५ लाख रुपयांचे बजेट करण्यात आले. शेवटी मे महिन्यामध्ये १०.७३, जुलै मध्ये १६.२७ व ३१ मार्च रोजी ६ लाख रुपये असे एकूण ३३ लाख रुपये रिलीज करण्यात आले. १२ लाख रुपये वितरीत करण्यात आले नाहीत. विभागाला १३.३३ लाख रुपये प्रत्यर्पित करावे लागले. त्यामुळे सर्व बीज गुणन प्रक्षेत्रांची मिळून ५६ हजार रुपयांची बचत झालेली आहे. या रकमा छोटया-छोटया आहेत. कारण विभागाकडे तालुका बीज गुणन केंद्र २२ व दुसरी १२० अशी एकूण १४२ केंद्र आहेत. असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

पीक संवर्धन, कृषि अभियांत्रिकी, कृषि अभियांत्रिकीकरणासाठी प्रोत्साहनपर (२५ टक्के) अर्थसहाय्याची (राज्य योजना) उददीष्टाखालील योजना ही राज्य योजना आहे यामध्ये मोठया प्रमाणात रक्कम प्रत्यार्पित झाली आहे. यामध्ये राज्य योजना असल्याचे लिहिण्यात आलेले आहे.यामध्ये नेमकी काय अडचण होती ? अशी विचारणा समितीने केली असता, हा केंद्र शासनाशी निगडीत २५ टक्के हिस्सा आहे.तो २५ टक्क्यांचा राज्यांचा हिस्सा दर्शविण्यात आलेला आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पीक, संवर्धन, तेलबियांचा विकास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ यांच्या कलम १२३ अन्वये जिल्हा परिषदांना अनुदाने (स्थानिक क्षेत्रातील योजना) अर्थोपाय अग्रिमांची समायोजन जिल्हास्तर (केंद्र हिस्सा) ही देखील केंद्र शासनाचीच योजना आहे. असे मत समितीने व्यक्त केले.

पीक संवर्धन, विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, शाश्वत कृषि – पर्जन्याश्रयी क्षेत्र विकास कार्यक्रमासाठी राष्ट्रीय अभियान याशिर्षांतर्गत नोट ऑफ एरर सादर केला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये नोट ऑफ एरर मंजूर करण्यात आलेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कृषि विषयक संशोधन व शिक्षण, पीकसंवर्धन, इतर संस्थांना सहाय्य, महाराष्ट्र कृषि विषयक शिक्षण व संशोधन परिषदेला सहायक अनुदान यामध्ये जास्तीचा खर्च झालेला असून निधी देखील प्रत्यर्पित केलेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, दिनांक ३० मार्च, २०१५ रोजी ही रक्कम चलनाद्वारे खात्यामध्ये जमा करण्यात आलेली आहे. सदर चलनाची प्रत जोडण्यात आली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. त्यावेळी याची नोट ऑफ एरर देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

पीक संवर्धन, तेलबियांचा विकास, तेलबियांबाबत राष्ट्रीय अभियान आणि पामतेल लघू अभियान-तीन (झाडांपासून उत्पादित तेलबिया) (डीएसओ) (केंद्र हिस्सा ७५ टक्के) या उद्दीष्टाखाली ११ हजार रुपये जास्तीचे आहेत. याचा नोट ऑफ एरर दिनांक २९.०२.२०१६ रोजी दिल्याचे सांगण्यात येत आहे.परंतु तो प्रधान महालेखाकार यांच्याकडे पोहचला नाही. त्यामुळे तो पुन:श्च सादर करण्यात यावा. खरे तर, हा नोट ऑफ एरर एवढया उशिरा देऊन काहीही उपयोग नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

कृषि विषयक संशोधन व प्रशिक्षण,पशुसंवर्धन, इतर संस्थांना सहाय्य, मराठवाडा कृषि विद्यापीठाला सहायक अनुदान या उद्दीष्टाखाली २ लाख १ हजार रुपयांचा जास्तीचा खर्च झालेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये शासनाकडे दिनांक ११.०१.२०१८ रोजी निधी जमा करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित विद्यापीठाने इतक्या उशिरापर्यंत पैसे जमा केले तर, You should take action against all the concerned officials. याबाबत समितीची अशी सूचना आहे की, प्रत्येक तिमाही संपल्यानंतर एक महिना सोडून येणाऱ्या महिन्यामध्ये खर्च मेळाचे काम करावे. प्रत्येक तिमाहीच्या ताळमेळामध्ये महालेखापाल यांच्याकडील खर्चामध्ये बदल आढळून आल्यास त्यावेळीच खर्च मेळाचे काम केले तर या अडचणी येणार नाहीत. तसेच आर्थिक वर्ष संपल्यानंतर दोन महिन्यांच्या आत नोट ऑफ एरर दिले पाहिजे. जेणेकरुन, समितीसमोर एवढया मोठया प्रमाणात परिच्छेद उपस्थित होणार नाहीत. यामध्ये कृषि विभागाच्या मोठया प्रमाणावर चुका झाल्याचे आढळून येत आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

पीक संवर्धन, विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, शेतकऱ्यांचे देशाबाहेरील दौरे व(राज्य योजना) याउद्दीष्टामध्ये ३ लाख ७ हजार रुपये जास्तीचे दाखविण्यात आले आहेत.राज्यातील शेतकऱ्यांच्या देशाबाहेरील दौऱ्यांबाबतचा हा विषय आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, मागील दोन-तीन वर्षांमध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर दौरे झालेले नाहीत. कारण दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे बाहेरील दौरे होऊ शकलेले नाहीत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शेतकऱ्यांनी बाहेरील देशांमध्ये जाऊन काही तरी नवीन शिकावे हाच मुळात या दौऱ्यांमागील हेतू असतो. विभागाने दौरे काढले नाही की शासनाने दौऱ्यांना मंजुरी दिलेली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत प्रस्ताव सादर केला जातो, परंतु दुष्काळी परिस्थितीमध्ये बाहेरील दौरे काढण्यापेक्षा ते पैसे इतरत्र कामी आणावेत अशी भावना असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

पीक संवर्धन अन्नधान्य पीके, पिकांवरील किड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (सीआरओपीएसपी) या उद्दीष्टाखाली ३ कोटी ५ लाख रुपये जास्तीचे खर्च झालेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, हे सन २०१३-१४ चे होते व ते या २०१४-२०१५ यावर्षी नोंदविले गेले आहेत. याचा नोट ऑफ एरर सादर करण्यात आलेला आहे. दिनांक ११.०६.२०१५ रोजी नोद चुकीची दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सन, २०१३-१४ चा खर्च चुकून यामध्ये आल्यामुळे ती रक्कम जास्त दिसत होती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पीक संवर्धन, विस्तार व शेतकऱ्यांचे प्रशिक्षण, राष्ट्रीय अभियान-वातावरणातील बदल आणि पोषणात्मक शेती, संनियंत्रण,प्रतिमानकरण व नेटवर्कींग या उद्दिष्टामध्ये केंद्र शासनाकडून कार्यक्रमांना मान्यता न मिळाल्यामुळे ५ कोटी रुपये एवढी रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली आहे असे मत समितीने व्यक्त केल असता, वातावरण बदलाबाबत अभ्यास करण्याबाबत विद्यापीठाचा प्रस्ताव होता. परंतु याबाबत विद्यापीठस्तरावर अभ्यास करण्याऐवजी केंद्र शासनाने केंद्रीय स्तरावर याबाबत कार्यक्रम आयोजित केला व यासाठी मान्यता दिली नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पीक संवर्धन, तेलबियांचे विकास, एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा-७५ टक्के) यामध्ये देखील जास्तीचा खर्च झालेला आहे. यामध्ये ८ लाख २६ हजार रुपये जास्तीचे दिसत आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१३-१४ मध्ये जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांचा ९ कोटी २५ लाख रुपयांचा व्यपगत झालेला धनादेश कोषागार कार्यालय, अमरावती यांच्या आदेशान्वये पारित झाला आहे. प्रत्यक्षात ३३.९३ लाख रुपये खर्च झाले जे ३४.११ दाखविले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याचे मूळ कारण आहे की, ९ लाख २५ हजार सन २०१३-१४ चे होते. ते यामध्ये दाखविण्यात आले व त्यामुळे ८ लाख २६ हजार दिसत आहेत. असे झाले नसते तर ९९ हजार रुपयांची बचत दिसली असती असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

याची नोट ऑफ एरर सादर केला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, एक वर्षापूर्वीचे असल्यामुळे यामध्ये नोट ऑफ एरर चालणार नाही, असे वाटते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यावर Note or error can be given within one year after completion of the accounting year. खर्च मिळाचे करण्याची काळजी घेतली जात नाही, नोट ऑफ एरर वेळेवर केला जात नाही हाच मूळ विषय आहे. तसेच एफ.एम.जी. च्या वेळी सर्व आकडेवारी आपसात कन्फर्म केलेली नाही. हा संपूर्ण विनियोजन लेख्यांचा सारांश आहे. या कार्यपद्धतीला दुरुस्त करावे हीच समितीची अपेक्षा आहे असे समितीने सूचित केले असता, सामान्यत: या विभागाच्या तिजोरीतून सन २००७-०८ पासून पैसे काढल्यानंतर ते खर्च करण्यात आले आहेत, असे दिसते आणि महालेखापालांच्या कार्यालयामध्ये त्या खर्चाची नोंद होत असते. विभागाच्या स्तरावर या सर्व निधीसाठी खाते तयार करुन त्यामध्ये पैसे जमा करावयाचे होते. त्यामागे दोन मुख्य उद्देश होते. पहिला असा की, केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी हा शेवटच्या टप्प्यामध्ये येतो. त्यामुळे तो विभागाला उपलब्ध होत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

We can consider about late receipt of the grants from the Central Government. परंतु विभागाचे इतरही प्रश्न आहेत. त्यामध्ये खर्च मिळाचे काम , नोट ऑफ एरर वेळेवर पाठविण्यात येत नाही. तसेच, विद्यापीठांबाबत विभाग उदासीन दिसत आहे. विद्यापीठांवर व्हाईस चान्सलर यांचे नियंत्रण आहे. ज्यावेळेस बँकेकडून कर्ज घेण्यात येते त्यावेळेस दर वर्षी त्या खात्याचे ऑडीट करण्यात येत असते. त्यामुळे विभाग विद्यापीठांना पूर्णपणे ग्रँट देऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले असता, ज्यावेळेस या खात्यामध्ये काही सुधारणा करण्यात येत होती तेव्हा असे निदर्शनास आले की, त्यावेळेस जवळपास ६०० कोटी रुपये असे आहेत की, ज्यांचा खर्च करण्यात आलेला आहे. त्या खर्चाची नोंद महालेखापालांच्या खात्यामध्ये घेण्यात आलेली आहे. परंतु खर्च करण्यात आलेल्या पैशांचे कॅशबुक उपलब्ध नाही. त्यामुळे सदर ६०० कोटी रुपयांचा तपास करणे फार कठीण काम आहे. प्रत्येक ठिकाणी म्हणजेच उप विभागीय कृषि अधिकारी (एस.डी.ए.ओ.) तालुका कृषि अधिकारी तसेच त्यांचे कनिष्ठ अधिकारी अशा ज्या ज्या अधिकाऱ्यांना पैसे काढण्याचे अधिकार होते ते त्यांनी काढले आणि बँकेच्या बचत खात्यामध्ये ठेवले होते. यासाठी विभागाने एक मोहिम राबविली होती. त्यामध्ये सांगण्यात आले की, दिनांक ३० जून पर्यंत चालू वर्षाचा सर्व खर्च करण्यात यावा. त्यानंतर एक जुलै पासून सर्व खाती बंद करण्यात येणार. तसेच, पब्लिक फायनान्स मॅनेजमेंट सिस्टीम एका सॉफ्टवेअरमध्ये आणली जाणार आहे. सदर कार्यवाही ही जुलै महिन्यामध्ये सुरु केली. त्याचप्रमाणे सर्व अधिकाऱ्यांना सांगण्यात आले की बँक खाती बंद करण्यात येऊन बंद केलेल्या खात्यामध्ये किती शिल्लक बॅलेन्स आहे याची माहिती घेऊन प्रमाणपत्र घेण्यात यावे. तसेच यामध्ये शिल्लक असलेली रक्कम जिल्हा कार्यालयामध्ये जमा करण्यात यावी. जिल्हास्तरावरील कार्यालयामध्ये जमा झालेली रक्कम पुणे आयुक्त कार्यालयामध्ये जमा होईल. परंतु आयुक्तस्तरावर एवढया मोठया रकमेची मोजणी करणे आणि पडताळणी करणे शक्य झाले नसते. त्यामुळे पुन्हा ते जिल्हास्तरावर देण्यात आले. या सर्व जमा झालेल्या रकमेची एकत्रित बेरीज केली तर जवळपास ६०० कोटी रुपये सध्या विभागाकडे आहेत. या ६०० कोटी रुपयांचा खर्च महालेखापालांच्या हिशेबाप्रमाणे करण्यात आलेला आहे. यामध्ये व्याजाची रक्कम आणि मूळ रक्कम किती आहे, तसेच किती रक्कम कोणत्या उद्देशासाठी काढण्यात आली आहे, यासाठीचे कॅशबुक उपलब्ध नाहीत. औरंगाबाद येथील कार्यालयामध्ये पाच कोटी रुपयांचा सेल्फ विड्रॉल चेक होता. त्यासाठी पोलिसांकडे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इतर कार्यालयाची माहिती मिळेलेली नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

It is a sample of one district, what can be the situation in other districts? अशी विचारणा समितीने केली असता यावरुन असे दिसते की, विभागामध्ये बेशिस्त कारभार सुरु आहे. औरंगाबाद येथे पाच कोटी रुपये कोणत्या कारणासाठी काढण्यात आलेले आहेत.अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये जवळपास ५८५ कोटी रुपये शिल्लक आहेत. कृषि विभागाने वित्त विभागाला विनंती केली आहे की, सदर रक्कम ही कोषागारामध्ये सस्पेन्स अकाऊंटमध्ये जमा करु देण्यात यावी.औरंगाबाद येथे संक्षिप्त देयकावर (A.C Bill)सदर रक्कम काढण्यात

आलेली आहे. यामध्ये डी.ए.टी. विभागाच्या आणि महालेखापाल कार्यालयाच्या सर्व अधिकाऱ्यांना बोलविण्यात आले होते. महालेखापाल कार्यालयाने सुरुवातीला फारसा सहयोग दर्शविला नाही. त्यामुळे विभागने सी.ए.जी. यांना सहकार्य करण्यासाठी पत्र दिले. यामध्ये सर्वांना त्रास होणार आहे. त्यामुळे विभागाकडे असलेले ६०० कोटी रुपये सर्वप्रथम शासनाच्या तिजोरीमध्ये जमा करण्यात येतील. मागील वर्षाचे नयेत म्हणून कंप्युटराईज सिस्टीम तयार करण्यात आलेली आहे. यापुढील काळामध्ये खर्च मेळाच्या कामात अडचण येणार नाही. यामध्ये रक्कम आहरित करणे बंद झाले आहे. आता लाभार्थ्यांच्या खात्यावर आधार लिंकद्वारे पैसे जमा होतात. त्यामुळे ज्या ठिकाणी ठिबक सिंचानासाठी विभागाला पैसे कमी पडत होते, त्याठिकाणी आता या कामासाठी विभागाकडे अधिक निधी शिल्लक राहिलेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले व महालेखापालांनी मागील हिशेब निकाली काढण्यासाठी मदत करावी, अशी विनंती केली.

महालेखापालांनी या विषयाबाबत विभागाला आवश्यक ते सहकार्य करावे, असे लोकलेखा समितीमार्फत त्यांना सांगण्यात येईल असे समितीने आश्वस्त केले.

सदर हिशेब हा सन २००७-०८ पासून आहे. बँक अकाऊंटमध्ये असलेल्या खात्याचे कॅशबुक नसल्यामुळे व्याज आणि मूळ रक्कम किती आहे, हे समजत नाही. औरंगाबाद येथे पाच कोटी रुपये सेल्फ ट्रान्सफर केल्याची बाब लक्षात येण्याचे कारण असे की, त्या ठिकाणी बदली होऊन आलेल्या अधिकाऱ्याने कॅशबुकची मागणी केल्यामुळे ही बाब निदर्शनास आली आहे. पाच कोटी रुपयांचे सेल्फ विड्रॉल करण्यात आलेले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

पाच कोटी रुपयांचे काढलेले सेल्फ विड्रॉल, it can be misappropriation also असे मत समितीने व्यक्त केले असता,यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. त्याबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, याबाबतची माहिती सध्या उपलब्ध नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

औरंगाबाद येथील पाच कोटी रुपयांचा हिशेब मिळत नाही. Don't you have internal audit system in your department? अशी विचारणा समितीने केली असता पाच कोटी रुपये काढल्याचा हिशेब मिळतो. परंतु काढण्यात आलेले पैसे कोठे खर्च करण्यात आले याचा हिशेब मिळत नाही.

औरंगाबाद येथील पाच कोटी रुपयांचा हिशेब मिळत नाही. Don't you have internal audit system in your department? अशी विचारणा समितीने केली असता, ज्यावेळेस बँकेचे एस.ई. बील काढण्यात येत होते तेव्हा सहायक संचालक, कोषागार यांना या विषयापासून दूर ठेवण्यात आलेले होते. तसेच, उप विभागीय कृषि अधिकारी (एस.डी.ए.ओ.) यांनाच सदर पैसे काढण्याचा अधिकार दिला होता. प्रत्येक ठिकाणी कोषागार विभागाला बाजूला ठेवण्यात आलेले होते. प्रत्येक वेळेस महालेखापालांचे लेखा परिक्षण करण्यात आलेले होते. परंतु त्यांनी याबाबत बी.डी.एस.वरील आकडेवारीनुसार ऑडीट करण्यात आले होते. यामध्ये प्रत्यक्ष झालेला खर्च दिसून येत नाही. त्यामुळे येथे करण्यात आलेली चर्चा ही अपुरी आहे. पी.एफ.एस.एम. प्रणाली सुरु झाल्यानंतर सर्व गोष्टी ऑनलाईन होतील. त्यामध्ये कोणत्या खात्यावरुन किती खर्च करण्यात आले याची माहिती मिळू शकते असे विभागीय सचिवांनी अवगत केली.

यामध्ये डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर होते. त्यामुळे सेल्फ विड्रॉलची पध्दत बंद करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, जर सिस्टिममधून पेमेंट केले नाही तर ते डी.बी.टी. मध्ये दिसते. परंतु कोणाच्या खात्यावर पैसे गेले आहेत, ते कळू शकत नाही. यामध्ये लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे जाणे महत्त्वाचे आहे. यासाठी योग्यती कार्यवाही करण्याचे काम विभागामार्फत सुरु आहे. यावेळेस खर्च मेळाचे काम राहणार नाही. परंतु यामध्ये ६०० कोटी रुपयांचा मुद्दा पुढे समोर येणार आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१४-१५ च्या विनियोजन लेख्यांचा हा विषय सुरु आहे. यामध्ये ६०० कोटी रुपये विभागाचे लेख्यांच्या बाहेर आहेत. त्यामुळे जो पर्यंत सदर ६०० कोटी रुपये चलनाद्वारे भरण्यात येत नाही, तो पर्यंत सदर लेखे बंद करता येणार नाही. अन्यथा हे लेखे बंद केले तर सदर ६०० कोटी रुपयांची नोंद लेख्याबाहेर राहील.यामध्ये ४० हेड असतील आणि त्या ६०० कोटी रुपयांमधील २०० कोटी रुपये या वर्षाचे असतील तर हे लेखे बंद करता येणार नाहीत.असे समितीने सूचित केले.

यामध्ये जे ६०० कोटी रुपये आहेत, ते सन २००७-०८ पासून आहेत. समितीकडे जी कागदपत्रे सादर झालेली आहेत आणि महालेखापालांनी जी पडताळणी केली आहे, त्यावरुन एक नवीन मुद्दा विभागाच्या सचिवांनी समितीला सांगितलेला आहे. सन २००७-०८ पासून ही रक्कम दिसत आहे. तसेच जिल्हानिहाय खर्च मेळाचे काम विभागामार्फत करण्यात येत आहे. यामध्ये जी व्याजाची रक्कम आहे, ती खर्च मेळाचे काम करुन वर्षनिहाय तपासणी करुन महालेखापालांच्या सहकार्याने या ६०० कोटी रुपयांची पडताळणी करण्यात यावी, अशी सूचना या

समितीनेकेली आहे. तसेच, सन २०१४-१५ चे जे विनियोजन लेखे समितीला प्राप्त झाले आहेत, त्या लेख्यांचा अहवाल विभागाने दिलेले आहे. तो विषय आता संपलेला आहे. परंतु हा जो नवीन मुद्दा उपस्थित केला आहे त्यामागील १० वर्षांच्या ऑडीटची प्रक्रिया महालेखापालांनी सुरु करावी. तसेच, ६०० कोटी रुपये कोणत्या कोणत्या वर्षातील आहेत, याचा अहवाल समितीला देण्यात यावा.असे समितीने सूचित केले ज्यावेळेस सन २००६ पासून महालेखापाल या विभागाचे ऑडीट करीत होते, त्यावेळेस सदर रक्कम त्या ऑडीटमध्ये दर्शविण्यात आली नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जमा खर्चाचे खर्च मेळाचे काम केले म्हणून सदर विनियोजन लेखे तयार झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने जिल्ह्याच्या नावे रक्कम काढली, जिल्हा कार्यालयाने विभागाकडून आलेली रक्कम उप विभागीय कृषि अधिकारी (एस.डी.ए.ओ.) यांना पाठविली, उप विभागीय कृषि अधिकारी (एस.डी.ए.ओ.) यांनी तीच रक्कम तालुका कृषि अधिकाऱ्यांना पाठविली, अशी वस्तुस्थिती आहे. त्यामुळे याबाबतची सखोल चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्या अहवालावर चर्चा करण्यात येईल. तसेच, यासाठी महालेखापालांनी विभागाला आवश्यक ते सहकार्य करावे. The Secretary wants to keep informed the PAC this is the reason he has given this information to us. विभागाने सर्व तपासणी करण्याची आवश्यकता आहे. याबाबतचा अहवाल महालेखापालांना देण्यात यावा. तसेच एक अहवाल समितीला देखील देण्यात यावा, जेणेकरुन समिती महालेखापालांना यासाठी सहकार्य करण्याची विनंती करेल. ज्या ज्या ठिकाणी गैरव्यवहार झालेले आहेत, त्याठिकाणी फौजदारी गुन्हे दाखल करुन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, हा अनियमिततेचा मुद्दा आहे. विनियोजन लेख्यांचा आणि या बाबीचा संबंध नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ही एक प्रकारची अनियमितताच आहे. तसेच यामध्ये निधीचा गैरव्यवहार केला आहे.जर महालेखापालांनी याबाबत आक्षेप काढलाच नसेल तर त्यामध्ये त्यांची भूमिका फारशी राहणार नाही. सदर ६०० कोटी रुपयांची पडताळणी विभागाच्या अंतर्गत लेखा परीक्षकांनी करावयाची असते.यामध्ये असणारी रक्कम ही भरपूर मोठी आहे. यामध्ये जो गैरव्यवहार झालेला आहे, त्याची समितीला माहिती देण्यात यावी. त्यामुळे याची पडताळणी महालेखापालांच्या मदतीशिवाय होऊ शकणार नाही असे समितीने सूचित केले.

अभिप्राय व शिफारशी :-

मागणी क्र. डी-३

अभिप्राय :-

२.३ कृषि व पदुम (कृषि) विभागाच्या सन २०१४-२०१५ च्या मागणी क्रमांक डी-३ मध्ये प्रधानशीर्ष २४०१-पीक संवर्धन, २४०२-मृद व जलसंधारण व २४१५-कृषि विषयक संशोधन व शिक्षण या तीन लेखाशीर्षाखाली मिळून रुपये ३८,५८,५१,१८ हजार (रुपये तीन हजार आठशे अठ्ठावण्ण कोटी एकावन्न लक्ष अठरा हजार फक्त) एवढी तरतूद मंजूर करण्यात आली होती व रुपये १०,६८,७६,७३ हजार (रुपये एक हजार अडुसष्ट कोटी शहात्तर लक्ष त्र्याहत्तर हजार) एवढी पूरक मागणी घेण्यात येऊन अंतिम तरतूद रुपये ४९,२७,२७,९१ हजार (रुपये चार हजार नऊशे सत्तावीस कोटी सत्तावीस लक्ष एक्याण्णव हजार) एवढी झाली होती. तथापि, या शीर्षाखाली खर्च अपेक्षेपेक्षा कमी होऊन रुपये ८३९,७९,७९ हजार (रुपये आठशे एकोणचाळीस कोटी एकोणऐंशी लक्ष एकोणऐंशी हजार फक्त) एवढी बचत झाली आहे. सदर बचतीचा विचार करता रुपये १०,६८,७६,७३ हजारांची पूरक तरतूद आनावश्यक होती, असा महालेखापालांनी आक्षेप घेतला होता.

२.४ या संदर्भात समितीने विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्यावेळी प्रधानशीर्ष २४०१-पीक संवर्धन याबाबतचा मुद्दा चर्चेस आला असता त्यामध्ये खर्च मेळा वेळेवर झालेला नाही, असे समितीच्या निदर्शनास आले तसेच केंद्र शासनाकडून जो निधी प्राप्त झाला नाही, त्यासंबंधीत विभागाकडून काही बाबींची पूर्तता करावयाची राहीली होती का ? याबाबत देखील समितीने विचारले असता मागील वर्षीचा निधी देखील खर्च न होता शिल्लक राहीला होता, असे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत समितीस माहिती देताना केंद्र शासनाच्या कृषि मंत्रालयाने तीन हप्त्यामध्ये निधी दिला होता. त्यापैकी पहिला हप्ता ४ ऑगस्ट रोजी, दुसरा हप्ता २८ जानेवारी रोजी व तिसरा हप्ता १८ मार्च रोजी प्राप्त झाला त्यामुळे रुपये ४ कोटी ५७ लक्ष इतकी रक्कम खर्च न होता शिल्लक राहीलेली दिसते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शिफारस :-

२.५ विभागाने वार्षिक लेख्यांचा खर्चमेळ विहित वेळेत न केल्याचे साक्षीच्यावेळी निदर्शनास आले. महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियमपुस्तिका यातील नियम १५७ मध्ये शासकीय खर्चाचा एकूण मेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी घालण्याबाबत सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे, असे असले तरी विभागाकडून करण्यात आलेला खर्चाचा मेळ महालेखापालांच्या पुस्तिकेत नोंदविलेल्या खर्चाशी वेळच्यावेळी बिनचुकपणे व योग्यरित्या घालण्यात येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. परिणामी एकूण विभागाच्या नोंदवहीप्रमाणे होणारा खर्च व महालेखापालांच्या पुस्तिकेप्रमाणे नोंदविलेला खर्च यात तफावत आढळते. त्यामुळे विभागाने खर्च मेळाच्या कामात कामचुकारपणा केल्यामुळे महालेखापालांना त्यांच्या लेखापरिक्षणात आक्षेप घ्यावे लागतात. या प्रकरणी देखील खर्चमेळ न केल्यामुळे खर्चात तफावत आढळली आहे. त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी खर्चाचा ताळमेळ तसेच चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव विहित मुदतीत महालेखापाल कार्यालयास सादर केलेला नाही, त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये याबाबतची नोंद घेण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

२.६ विभागाकडील रिक्त असलेल्या विविध संवर्गातील पदांमुळेदेखील निधी शिल्लक राहिला आहे, असे साक्षीच्यावेळी समितीच्या निदर्शनास आले. सदरहू पदे किती कालावधीपासून व कोणत्या विशिष्ट संवर्गातील आहेत, याबाबतची माहिती समितीस प्राप्त झालेली नाही. कृषि विभागाचा व्याप व विस्तार पाहता त्याच्या अधिपत्याखाली असलेली पदे बराच काळ रिक्त ठेवणे संयुक्तीक नाही. विभाग सक्षम व कार्यक्षम करण्याकरीता विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ असणे अत्यंत आवश्यक आहे तसेच या विभागाचा ग्रामीण जनतेशी व विशेषत: बळीराजाशी संबंध असल्यामुळे विभागाने त्यांच्याकडे रिक्त असलेल्या पदांचा आढावा घेऊन सदर पदे भरण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावी व विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस ३ महिन्यात अवगत करण्यात यावे.

प्रधानशीर्ष-२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण :-

महात्मा फुले कृषि विद्यापीठास सहायक अनुदान –

अभिप्राय :-

२.७ या शीर्षाखाली मूळ अनुदान रुपये २७५.७० कोटी एवढे होते. रुपये १४.५० कोटी पुरवणी मागणीच्या माध्यमातून घेतले व त्यापैकी रुपये ३७.५४ कोटी प्रत्यार्पित करण्यात आले आहेत, अशी समितीस माहिती प्राप्त झाली. विभागास या शीर्षाखाली रुपये २५२.६५ कोटी एवढी रक्कम प्राप्त झाली होती. त्यापैकी प्रत्यक्षात रुपये २४२ कोटी एवढी रक्कम खर्च झाली. उर्वरित रुपये १० कोटी एवढी रक्कम ही विभागाकडेच पडून होती. विभागाने सदरहू रुपये १० कोटी रक्कम ही माहे ऑगस्ट मध्ये प्रत्यार्पित केल्याचे समितीच्या निदर्शनास आले. वास्तविक पाहता मार्च महिना संपण्यापूर्वी सदरहू रुपये १० कोटी एवढी रक्कम शासनास प्रत्यार्पित करणे आवश्यक असताना रुपये १० कोटी एवढी रक्कम उशिरा का भरण्यात आली, याबाबत प्रश्न निर्माण झाला. येथे देखील सदरहू रक्कम ही प्रत्यार्पित झालेली आहे परंतू खर्चमेळा वेळेवर न झाल्यामुळे रक्कम लक्षात आलेली नाही असे अभिप्राय महालेखापालांनी नोंदविले. याबाबत महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडून खुलासा मागवून समितीस सादर करावा, असे समितीने सूचित केले.

शिफारस :-

२.८ महालेखापालांनी कृषि विभागांच्या वार्षिक लेख्यांचा खर्चमेळ न केल्यामुळे विभागाच्या नोंदवहीत होणारा खर्च व महालेखापालांच्या पुस्तिकेप्रमाणे नोंदविलेला खर्च यात तफावत आढळून आल्याचे निदर्शनास आणले. यापूर्वीच्या मुद्दावर देखील कृषि विभाग वार्षिक लेख्यांचे खर्चमेळ करण्यात गांभीर्य दर्शवित नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव देखील विहित मुदतीत महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत नाहीत. **खर्चमेळ व चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित मुदतीत न केल्यामुळे रुपये १० कोटी एवढ्या रक्कमेची तफावत आढळून येत आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाकडील जे अधिकारी / कर्मचारी यांचेकडे खर्चाचा ताळमेळ तसेच चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव याचे काम सोपविलेले होते व ते पूर्ण करण्याची त्यांची जबाबदारी होती त्यांचे प्रस्ताव विहित मुदतीत सादर केलेले नाहीत, त्यांच्याकडून कृषि विभागाने तात्काळ खुलासा मागवावा व हे अधिकारी / कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

तसेच या संदर्भात समिती असे सुचविते की, खर्चमेळ व चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव इत्यादीबाबत सर्व समावेशक सूचना कृषि विभागांतर्गत येणाऱ्या सर्व कृषि विद्यापीठे व कार्यालयांना निर्गमित करण्यात याव्यात. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीता लेखाविषयक बाबींसंदर्भात व विशेषत: लोकलेखा समितीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या बाबींसंदर्भात महालेखापाल कार्यालयाच्या समन्वयाने प्रशिक्षण कार्यक्रम आखण्यात यावेत जेणेकरुन पुढील काळात खर्चमेळ, हस्तांतरण नोंद, चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव याबाबत लोकलेखा समितीत आक्षेप उपस्थित होणार नाहीत अशी शिफारस समिती शासनास करीत आहे. या शिफारशीच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती ३ महिन्यात समितीस अवगत करावी.

प्रधानशीर्ष-२४१५ कृषि विषयक संशोधन व शिक्षण :-

०१-पशुसंवर्धन, १२० इतर संस्थांना सहाय्ये, मराठवाडा कृषि विद्यापीठास सहायक अनुदान -

अभिप्राय :-

२.९ 'मराठवाडा कृषि विद्यापीठास सहायक अनुदान' या खाली रुपये २००.८९ लाख एवढा अधिक खर्च झालेला दिसत आहे. तथापि, साक्षीच्यावेळी सदरहू खर्च हा अधिक खर्च झालेला नाही, असे समितीस अवगत करण्यात आले. याचे कारण सांगताना सेवानिवृत्तीचे वय वाढल्यामुळे तसेच पदे रिक्त असल्याने बचत झाल्याचे स्पष्ट करण्यात आले. परंतू येथे देखील विभागाने चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव बिलंबाने सादर केल्याचे दिसून येते. त्यामुळे विद्यापीठाकडून विहित कालावधीत खर्चमेळाचे काम झालेले नाही, असे लक्षात येते. खर्चमेळाच्या कामाची जबाबदारी निश्चित करण्याचे अधिकार हे कुलगुरुंना असल्यामुळे त्याचेकडून विभागाने खुलासा मागवून घ्यावा तसेच संबंधित लेखा अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई प्रस्तावित करावी, असे समितीने सूचित केले. या संदर्भात विभागाने कारवाई प्रस्तावित केल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

शिफारस :-

२.१० कृषि विभागाच्या घेतलेल्या साक्षींच्या अनुषंगाने समितीस असे निदर्शनास आले आहे की, कृषि विभागांतर्गत असणारी विविध कृषि विद्यापीठे ही त्यांच्याकडे शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानाबाबत विशेष गांभीर्याने पाहत नाहीत. या प्राप्त झालेल्या अनुदानाचा लेखाजोखा ठेवणे हे संबंधीत विद्यापीठातील लेखा नियोजन अधिकाऱ्याची जबाबदारी असून सदरहू अधिकारी लेखा विषयक बाबींवर व्यवस्थित नियंत्रण ठेवीत नाहीत. अत:, यापूर्वीच सूचित केल्याप्रमाणे कृषि विभागाने खर्च मेळ्याचा कामासंदर्भात सर्व विद्यापीठांना मार्गदर्शक सूचना तातडीने निर्गमित कराव्यात तसेच अनुदान ज्यांच्या नियंत्रणाखाली दिलेले आहे त्या नियंत्रण अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवून प्राप्त झालेले अनुदान व प्रत्यक्ष झालेल्या खर्चाचा तिमाही अहवाल कुलगुरुमार्फत मूळ विभागास सादर करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करावी व त्याचे योग्य ते पालन होईल याबाबत दक्षता घेण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. त्याचप्रमाणे खर्चमेळाच्या कामात दिरंगाई केल्यासंदर्भात संबंधित लेखा अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई प्रस्तावित करून केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यांत कळविण्यात यावी अशी देखिल समिती शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष-२४०१ पीक संवर्धन :-

११४-तेलबियांचा विकास, एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ७५ टक्के) -

अभिप्राय :-

२.११ एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ७५ टक्के) यामध्ये ८.२६ लक्ष एवढा अधिकचा खर्च झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू खर्च अधिकचा होत नसून जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी यांचा रुपये ९.२५ लाख रुपयांचा व्यपगत झालेला धनादेश कोषागार अधिकारी यांचेकडून पारित झाल्यामुळे अधिक खर्च दिसून येत आहे. सदरहू चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव देखील विभागाने सादर केला नाही. तसेच खर्चमेळयाची कार्यवाही देखील विभागाकडून झालेली नाही, असे समितीच्या निदर्शनास आले.

२.१२ विभागाच्या साक्षीच्यावेळी असेही निदर्शनास आले की, ज्यावेळेस खात्यामध्ये काही सुधारणा करण्यात येत होती त्यावेळी खर्च केलेल्या रुपये ६०० कोटीची नोंद महालेखापालांच्या खात्यामध्ये आहे परंतू विभागाकडे यांची रोखवहीच उपलब्ध नाही. या संदर्भात स्पष्टीकरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, प्रत्येक ठिकाणी म्हणजेच उप विभागीय कृषि अधिकारी **(S.D.A.O.)**, तालुका कृषि अधिकारी व त्यांच्या कनिष्ठ अधिकारी अशा अधिकाऱ्यांना पैसे आहरीत करण्याचे अधिकार होते. त्यांनी ते आहरीत केले व बँकेच्या बचत खात्यात ठेवले होते. दिनांक १ जुलै पासून सर्व खाती बंद करण्यात येणार असल्याने सदरहू रक्कम जून अखेरपर्यंत खर्च करावयाची होती. बँक खाती बंद केल्यावर बंद केलेल्या खात्यांमध्ये किती रक्कम शिल्लक आहे याबाबत प्रमाणपत्र देणे सर्व अधिकाऱ्यांना बंधनकारक केले होते व रक्कम शिल्लक असल्यास, ती जिल्हा कार्यालयामध्ये जमा करावयाची होती व त्यानंतर ती पुणे आयुक्त कार्यालयामध्ये जमा होणार होती. तथापि, आयुक्त स्तरावर एवढ्या मोठ्या प्रमाणावरील रक्कमेची पडताळणी करणे शक्य होणार नसल्याने ते अधिकार पुन्हा जिल्हा स्तरावर देण्यात आले होते. या रक्कमेची एकत्रित बेरीज केली तर ती रक्कम रुपये ६०० कोटी एवढी होत असून त्यामध्ये व्याजाची रक्कम व मुद्दल किती व रक्कम कोणत्या उद्देशाने काढण्यात आली आहे, याबाबतची रोख नोंदवही उपलब्ध नसल्याचे साक्षीच्यावेळी सांगण्यात आले.

२.१३ विभागाची वरील व्यवस्था बघता कृषि विभागाकडे सध्या बेशिस्त कारभार सुरु आहे, असे समितीने अभिप्राय नोंदविले. त्याचप्रमाणे औरंगाबाद येथे संक्षिप्त देयकावर रुपये ५ कोटी रक्कम काढल्याचे निदर्शनास आले. सदरहू रुपये ५ कोटीची रक्कम सेल्फ ट्रान्स्फरद्वारे काढली असल्यामुळे या रक्कमेच्या नोंदीसंदर्भात रोख नोंदवहीची मागणी संबधित अधिकाऱ्याकडून आल्यामुळे या रुपये ६०० कोटी रक्कमेची नोंद नसल्याची बाब विभागाच्या लक्षात आली. रोख नोंदवहीच उपलब्ध नसल्यामुळे रुपये ५ कोटी कोठे खर्च करण्यात आले याचा हिशोब देखील लागत नाही. सदरहू रुपये ६०० कोटी सध्या विभागाच्या लेख्यांबाहेर आहेत त्यांचा संपूर्णत: हिशेब जोपर्यंत जुळत नाही तो पर्यंत हे लेखे देखील बंद करता येत नाहीत.

२.१४ सन २००७-०८ या वर्षापासून या रुपये ६०० कोटी रक्कमेचा हिशेब दिसून येत नाही. म्हणजेच जवळजवळ गेल्या १० वर्षापासून रुपये ६०० कोटी एवढ्या रक्कमेच्या नोंदी उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे गेल्या १० वर्षात अंतर्गत लेखापरिक्षण देखील कशाप्रकारे झाले असेल, याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. त्यामुळे गेल्या १० वर्षातील लेख्यांचे लेखापरिक्षण महालेखापाल कार्यालयाने लवकरात लवकर करुन त्याबाबतचा अहवाल तसेच या संदर्भातील चौकशीचा अहवाल देखील समितीस सादर करावा, असे समितीने सूचित केले. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर समिती त्यावर बैठकीत विचार विनिमय करणार आहे.

शिफारस :-

२.१५ एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम केंद्र पुरस्कृत योजना (केंद्र हिस्सा ७५ टक्के) यामध्ये रुपये ८.२६ लाख इतका दर्शविण्यात आलेला अधिकचा खर्च हा वास्तवित पाहता अधिकचा खर्च नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. परंतू या प्रकरणी देखील विभागाने खर्चमेळ, चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव विहित कालमर्यादेत करण्याची दक्षता घेतली नाही याचा असा परिणाम झाला की, अंतिम सुधारित अनुदान निश्चित करताना लेख्यांच्या आकडेवारींची पडताळणी व्यवस्थितरित्या केली नसल्याचे दिसून येते. विभागाच्या आतापर्यंत घेतलेल्या साक्षीमध्ये कृषि विभाग हा त्यांच्या लेखा विषयक बाबींसंदर्भात कोणतीही गोष्ट गांभीर्याने घेत नाही असे दिसून येत आहे. वारंवार विविध उदिष्टांखालील खर्चाचा ताळमेळ व त्यानुषंगिक करावयाची कार्यवाही याबाबत विभाग अनभिज्ञच असल्याचे दिसून येते. यात फार मोठ्या प्रमाणात सुधारणा होणे आवश्यक आहे असे समितीचे ठाम मत झाले आहे. केवळ विभागातील अधिकाऱ्यांची खर्चमेळ विहित वेळेत न करण्याची प्रवृत्तीच यामध्ये दिसून येत आहे. चुकीच्या नोंदीचे प्रस्ताव आणि खर्चमेळ ही कामे विभागाने विहित वेळेत व नियमितपणे पार पाडली असती तर महालेखापालांनी घेतलेल्या बऱ्याच आक्षेपांचे त्वरीत व त्यांच्याच स्तरावर निराकरण झाले असते व लोकलेखा समितीच्या बैठकीत पुढे या विचारार्थ बाबी उद्भवल्या देखील नसत्या.

२.१६ खर्चमेळ्याचे काम विहित कालावधीत न करणे, त्याकडे पूर्णत: दुर्लक्ष करणे, कामात निष्काळजीपणा दर्शविणे ही बाब अतिशय गंभीर असून या प्रकरणी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन त्यांनी कामात दर्शविलेल्या कुचराईबाबत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समिती ३ महिन्यात देण्यात यावी. त्याचप्रमाणे आगामी कालावधीत लेखा विषयक काम विहित कालावधीत होण्यासाठी या कामाकरीता कृषि विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी व त्या अधिकाऱ्यावर या सर्व बाबीची जबाबदारी सोपवून त्यास या कामास उत्तरदायी करण्यात यावे, अशी समितीची शिफारस आहे.

२.१७ विभागाच्या साक्षीच्यावेळी जवळपास रुपये ६०० कोटी एवढ्या रक्कमेच्या खर्चाची नोंद उपलब्ध नाही, अशी माहिती समितीस प्राप्त झाली. सदरहू रुपये ६०० कोटी रक्कम ही सन २००७-०८ पासून विभागाच्या लेख्याबाहेर आहे. त्यामुळे ही रक्कम शासनाकडे जमा होत नाही तो पर्यंत लेखे देखील बंद करता येत नाही. या रुपये ६०० कोटी रक्कमेमध्ये मूळ मुद्दल व व्याज किती याचा देखील हिशेब नाही. सदरहू रक्कम ही लेख्याबाहेर असण्याची बाब औरंगाबाद येथील कार्यालयामध्ये रुपये ५ कोटी सेल्फ ट्रान्स्फर केल्याचे विभागाच्या अधिकाऱ्यांने रोख नोंदवहीची मागणी केल्यामुळे अपघातानेच निदर्शनास आल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. या रुपये ६०० कोटीची रक्कम जिल्हा कार्यालये, उप विभागीय कृषि अधिकारी (S.D.A.O.), तालुका कृषि अधिकारी यांच्याशी संबंधित आहेत. त्यामुळे या रक्कमेची व्याप्ती देखील फार मोठ्या प्रमाणावर आहे. सन २००७-०८ या वर्षापासून म्हणजेच जवळजवळ १० वर्षापर्यंत ऐवढी मोठी रक्कम कशी, कोणी, केव्हा, कोणाच्या आदेशाने खर्च करण्यात आली व या खर्चाची नोंद देखील कोणत्याच स्तरावर झाली नाही, हे एक प्रकारचे आश्चर्यच आहे. ही एक प्रकारची अनियमितता तर आहेच परंतू यात निधीचा गैरव्यवहार झाल्याची शंका समितीस वाटत आहे. गेल्या १० वर्षात झालेली विविध अंतर्गत लेखा परिक्षणे, लेखा परिक्षणे, खर्चमेळे हे करताना ही बाब निदर्शनास आली नाही की, निदर्शनास येऊन देखील त्या गोष्टीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात आले, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

२.१८ या सर्व बाबींचा तपास करण्यासाठी व रुपये ६०० कोटी हे शासनाच्या तिजोरीत पुन्हा आणून याचे लेखे बंद होण्याच्या दृष्टीने विभागाकडून झालेली अनियमिता शोधून काढण्यासाठी महालेखापाल कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक समिती तात्काळ स्थापन करुन या समितीस सन २००७-०८ या वर्षापासूनचे विभागाचे लेखापरिक्षण अत्यंत काटेकोरपणे करण्यास सांगून त्याचा अहवाल लोकलेखा समितीस विहित मुदतीत सादर करण्यास कळविण्यात यावे. महालेखापाल कार्यालयाने गठीत केलेली समिती, समितीची कार्यकक्षा व समितीस अहवाल सादर करण्याची दिलेली मुदत याबाबतची माहिती लोकलेखा समितीस कळविण्यात यावी. महालेखापाल कार्यालयाने नियुक्त केलेल्या समितीस विभागाने विहित कालावधीत काम पूर्ण करण्यास सहकार्य करावे अशी समिती शिफारस करीत आहे. त्याचप्रमाणे या गैरव्यवहारामध्ये दोषी आढळणाऱ्या सर्व तत्कालिन व विद्यमान अधिकारी / कर्मचारी यांचेवर आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशीही समिती शिफारस करीत आहे. महालेखापाल कार्यालयाने लेखापरिक्षण करुन केलेला अहवाल व या अहवालाच्या अनुषंगाने विभागाने दोषींवर केलेल्या कारवाईची माहिती महालेखापाल कार्यालयाने त्यांचा अहवाल विभागास सादर केल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत विभागाने समितीस द्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

नियोजन विभाग

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील नियोजन विभागांतर्गत अनुदान क्रमांक ओ-१७-जिल्हा रायगड, ओ-२० जिल्हा पूणे, ओ-२१ जिल्हा सातारा व ओ-३८ जिल्हा नागपूर यामधील शिर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

नियोजन विभाग

विनियोजन लेखा, सन २०१४-१५

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०१४-१५, मागणी क्र. ओ- १७ जिल्हा :- रायगड

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च (रु. हजारात)	अधिक खर्च (+) बचत (-) (रु. हजारात)	विभागाचे अभिप्राय
	पृ.क्र. ४२९ व ४३० मागणी क्र. ओ - १७ महसुली विभाग (दत्तमत):- मूळ ८८,८०,७५ पुरक १ वर्ष भरात परत केलेली रक्कम (मार्च, २०१५) भांडवली विभाग (दत्तमत) :- मूळ ४६,१९,२५ पुरक - वर्ष भरात परत केलेली रक्कम (मार्च,२०१५)	८८,८०,७६ ४६,१९,२५ ---	९१,९२,५२ ३७,०९,३९ ----	(+) ३,११,७६ २,४७,५२ (-) ९,०९,८६ ३,५२,०९	विधानसभा निवडणूक आचारसंहितेमुळे भांडवली विभागात रुपये ९०९.८६ लक्ष एवढी बचत झाली त्यापैकी महसूली क्षेत्रातील कामासाठी नियोजन विभाग यांचे दिनांक २५/०२/२०१५ चे आदेशान्वये रुपये ५५९.०९ लक्ष एवढा निधी पुर्नविनियोजित करणेत आला. महसूल विभागातील काही योजनेची कामे आचारसंहितेमुळे पूर्ण न झाल्याने दिनांक ३१/०३/२०१५ चे आदेशान्वये २४७.५२ लक्ष निधी शासनास समर्पित करणेत आला. विधानसभा निवडणूक आचारसंहितेमुळे भांडवली विभागात रुपये ९०९.८६ लक्ष एवढी बचत झाली त्यापैकी महसूली क्षेत्रातील कामासाठी नियोजन विभाग यांचे दिनांक २५/०२/२०१५ चे आदेशान्वये रुपये ५५९.०९ लक्ष एवढा निधी पुर्नविनियोजित करणेत आला. पुर्नविनियोजित नतर शिल्लक निधी रुपये ३५०.५७ लक्ष एवढा निधी दिनांक ३१/०३/२०१५ चे आदेशान्वये शासनास समर्पित करणेत आला. महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही : वरीलप्रमाणे
	टिपा व भाष्य : १.) महसूली विभागात रुपये ३११.७६ लक्ष इतका अधिक खर्च रू.३,११,७६,४३४ नियमात बसविणे आवश्यक आहे. अंतिम खर्च अधिक असतांना रू. २४७.५२ लक्ष इतकी परत करण्यात आलेली तरतूद अनावश्यक असल्याचे सिद्ध झाले. २.) भांडवली विभागात रू.९०९.८६ लक्ष इतकी अंतिम बचत असतांना वर्षभरात केवळ रू.३५२.०९ लक्ष इतकी तरतूद परत करण्यात आली.				

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०१४-१५, मागणी क्र. ओ- १७ जिल्हा :- रायगड (रु. लाखात)

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
	3.) महसुली विभागातील अधिक खर्च पुढील शिर्षाखाली झाला.				
१)	पृष्ठ क्र. ४३० मागणी क्र. ओ- १७ २२१७- नगरविकास ८०— सर्वसाधारण १९२- नगरपालिका/नगरपरिषदांना सहाय्य (३४) जिल्हा योजना — रायगड १९२ (३४)(०२)महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियानांसाठी महानगरपालिकांना अनुदाने मूळ :- ७,००.०० पुनर्विनियोजन :- ३,७८.०८	१०,७८.०८	१०,७८.०८	----	जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीनुसार या योजनेसाठी ३७८.०८ लाख रुपये उपलब्ध करण्यात आले. तथापि नगरपालिकांचे सदस्यांच्या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात प्रस्ताव प्राप्त झाला असल्याने, या कामांसाठी अतिरिक्त निधी इतर योजनांची बचत पुर्नविनियोजनाचे मार्गाने देण्यात आले. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ११-२- २०१५ आणि १७-०३-२०१५ प्रत यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८, पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :-** No Remark **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
२)	पृष्ठ क्र. ४३० मागणी क्र. ओ- १७ २४०३- पशुसंवर्धन १०१. पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य (३४) जिल्हा योजना — रायगड १०१ (३४)(०८) पशुवैद्यकीय दवाखान्यांचे/प्रथमोपचार केंद्रांचे बांधकाम करणे. मूळ :- ४०.०० पुनर्विनियोजन :- ५६.७२	९६.७२	९६.७२		एजन्सीच्या डिमांडवर जिल्हा नियोजन समितीच्या मंजुरीनुसार या योजनेसाठी ५६.७२ लाख रुपये उभारण्यात आले. तथापि योजनेच्या अंतर्गत मिळणाऱ्या मोठ्या संख्येने प्रस्तावित योजनांमध्ये याकरिता इतर योजनांची बचत पुर्नविनियोजन मार्गाने देण्यात आली. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ११-२- २०१५ आणि ३०-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८, पृ. क्र. २४) **महालेखापालांचे अभिप्राय :-** Additional Fund of Rs. ५६.७२ lakh obtained though re-appropriation is more than original grant amount Rs. ४०.०० lakh. It indicates improper budgeting. It may be explained in PAC. **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** रायगड जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन विभागाच्या अतिरिक्त मागणी प्रस्ताव प्राप्त. दोन पशुवैद्यकीय दवाखान्यांना X-Ray मशीन बसविण्याची (प्रत्येकी रुपये २६.०० लक्ष) मागणी होती (पशुवैद्यकीय दवाखाना चौक व नागोठणे) त्यामुळे इतर योजनेतून होणारी बचत पुनर्विनियोजन करण्यात आली. याबाबतचे कारणे लोकलेखा समितीसमोर स्पष्ट करण्यात येतील.
	जिल्हा नियोजन समितीने यथोचितरित्या मंजुर केलेल्या अतिरिक्त निधीचा मागणी अभिकरणाने केल्यामुळे वर नमुद केलेल्या शिर्षाखाली मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रु. ४३४.८७ लाख एवढया अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली				
३)	पृष्ठ क्र. ४३० मागणी क्र. ओ- १७ ३०५४ — मार्ग व पूल ०४-जिल्हा व इतर मार्ग ८०० इतर खर्च ८०० (३४)(०२) ग्रामीण रस्त्यांचा विकास व मजबुतीकरण यासाठी जिल्हा परिषदेला अनुदान मूळ :- ४,६६.०९ पुनर्विनियोजन :- २,८१.८५	७,४७.९४	७,४७.९४	----	जिल्ह्यातील खेड्यांमधील गावे रस्ते दुरूस्तीसाठी मागणी होती, या योजनेसाठी ठेवण्यात आलेले निधी अपूरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने वंत्रणाची अतिरिक्त मागणी करीता इतर योजनांच्या बचतीतून अतिरिक्त २८१.८५ लाख रुपये पुर्नविनियोजन द्वारे उपलब्ध करणेत आला. पुर्नविनियोजन आदेश दिनांक ११-३-२०१५ आणि १७-३-२०१५ ची प्रत यासोबत जोडली आहे. (पृ. क्र. १८, पृ. क्र. २२) **महालेखापालांचे अभिप्राय :-** No Remarks **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
	ग्रामीण रस्त्यांच्या बांधकामासाठी मार्च २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.२८१.८५ लाखांची तरतूद करण्यात आली				

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
४)	पृष्ठ क्र. ४३१ मागणी क्र. ओ- १७ २४०६ — वनीकरण व वन्यजीवन ०१ वनीकरण ०७०दळणवळण व इमारती ०७०(३४)(०१) वनांमधील मृद व जलसंधारणाची कामे मूळ :- १.२०.०० पुनर्विनियोजन :- २,७०.६४	३,९०.६४	३,९०.६४	----	या योजनसाठी उपलब्ध तरतूद अपुरी होती. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजने अंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने यंत्रणेची अतिरिक्त मागणी करीता इतर योजनांच्या बचतीतून अतिरिक्त २७०.६४ लाख रुपये वळून केले गेले. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ११-२- २०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८) **महालेखापालांचे अभिप्राय :-** Additional Fund of Rs. २७०.६४० lakh obtained though re-appropriation is more than original grant amount Rs. २७०.६४ lakh. It indicates improper budgeting. It may be explained in PAC. **स्वानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** या योजनेसाठी उपलब्ध तरतूद अपुरी होती. सन २०१४-१५ पासून जलयुक्त शिवार योजना वन विभागातील साम्य कामांस (जलयुक्त शिवार अंतर्गत गावात) यंत्रणेने अतिरिक्त मागणी केली होती. इतर योजनेतून होणाऱ्या बचतीतून अतिरिक्त रु. २७०.६४ लाख रुपये उपलब्ध केले गेले. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ११-२- २०१५ यासोबत जोडलेले आहे. यावाबतची कारणे लोकलेखा समितीसमोर स्पष्ट करण्यात येतील.
अभिकरणांकडून मंजुर बांधकामांसाठी करण्यात आलेली अतिरिक्त निधीची मागणी भागविण्यासाठी, मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.२७०.६४ लाख रक्कमेची अतिरिक्त निधीची तरतूद करण्यात आली.					
५)	पृष्ठ क्र. ४३१ मागणी क्र. ओ- १७ २५१५ — इतर ग्रामविकास कार्यक्रम १९८ — ग्रामपंचायतींना सहाय्य १९८(३४)(०१) ग्रामपंचायतींना जन सुविधासाठी अनुदाने मूळ :- ४.५०.०० पुनर्विनियोजन :- २,२५.००	६,७५.००	६,७५.००	---	प्राथमिक शाळेतील मैदाने बांधकाम, ग्रामपंचायत कार्यालयांचे बांधकाम इत्यादीसाठी उपलब्ध तरतूद अपुरी होती. अतिरिक्त मागणीचा विचार करता जिल्हा नियोजन समितीने सदर योजनेचे अंतिर्गत कामांवर इतर योजनेचे बचतीतला निधी २२५.०० लाख उपलब्ध करण्यात आला. पुनर्विनियोजन आदेशाची प्रत दिनांक १७-३-२०१५ यासोबत जोडलेले. (पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
विकास कामांसाठी मोठ्या ग्रामपंचायतींना अतिरिक्त निधीची केलेली मागणी भागविण्यासाठी, मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनद्वारे रू.२२५ लाख इतक्या रक्कमेच्या अतिरिक्त निधी ची तरतूद करण्यात आली					

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
६)	पृष्ठ क्र. ४३१ मागणी क्र. ओ- १७ २७०२ — लहान पाटबंधारे ०१-भूपृष्ठ जल ८००-इतर खर्च ८०० (३४)(०१) लघुपाटबंधारे योजनांचे सर्वेक्षणाचे काम (१०१ ते २५० हेक्टर) मूळ :- २५.०० पुनर्विनियोजन :- १.४२.९६	१.६७.९६	१.६७.९६	----	जलसंधारण विभागातील अतिरिक्त गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने अतिरिक्त कामांवर १४२.९६ लाख निधी इतर योजनेच्या बचतीतून पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध करणेत आला. पुर्नविनियोजन आदेश दिनांक ११-०२- २०१५ व १७-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८, पृ. क्र. २२) **महालेखापालांचे अभिप्राय:**-Additional Fund of Rs. १४२.९६ lakh obtained though re-appropriation is more than original grant amount Rs. २५.०० lakh. It indicates improper budgeting. It may be explained in PAC. **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :-** जलसंधारण विभागातील अतिरिक्त गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने अतिरिक्त कामांवर १४२.९६ लाख निधी इतर योजनेच्या बचतीतून पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध करणेत आला. पुर्नविनियोजन आदेश दिनांक ११-०२-२०१५ आणि १७-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. याबाबतची कारणे लोकलेखा समितीसमोर स्पष्ट करण्यात येतील.
	जलयुक्त शिवार अभियानाशी संबंधित कामाचे सर्वेक्षण करण्यासाठी मार्च, २०१५ मध्ये पुर्नविनियोजनाद्वारे रू.१४२.९६ लाख इतक्या रक्कमेच्या अतिरिक्त निधी ची तरतूद करण्यात आली				
७)	पृष्ठ क्र. ४३१ मागणी क्र. ओ- १७ ३४५२ — पर्यटन ०१ — पर्यटनासाठी पायाभूत सुविधा १०१ — पर्यटन केंद्रे १०१ (३४)(०२) विविध ठिकाणी पर्यटन विकासासाठी मूलभूत सुविधा पुरविण्याकरीता अनुदाने मूळ :- ८०.०० पुनर्विनियोजन :- १.३९.८८	२.१९.८८	२.१९.८८	----	रायगड जिल्ह्यात खूप प्रसिद्ध समुद्रकिनारा आहे आणि मोठ्या संख्येने पर्यटक या ठिकाणास भेट देतात. तथापि शौचालय, चेंजिंग रूम, कॉमन एरिया, पार्किंग शेड, पिक्निक पॉईंट इत्यादी समुद्रकिनाऱ्यावर पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध नसल्याने आणि ग्राम पंचायत हे समुद्रकिनाऱ्यावर या सुविधा पुरवू शकत नसल्याने, एजन्सीकडून निधीची अतिरिक्त मागणी होती. या सुविधा प्रदान करण्यासाठी इतर योजनांच्या बचतीमधून पुर्नविनियोजनाने उपरोक्त कामांसाठी १३९.८८ लाख रुपये देण्यात आले. पुर्नविनियोजन आदेश दिनांक ११-२-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १९) **महालेखापालांचे अभिप्राय :-** Additional Fund of Rs. १३९.८८ lakh obtained though re-appropriation is more than original grant amount Rs. १३९.८८ lakh. It indicates improper budgeting. It may be explained in PAC. **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** रायगड जिल्ह्यात २२४ कि.मी. चा समुद्रकिनारा आहे आणि मोठ्या संख्येने पर्यटक या ठिकाणास भेट देतात. तथापि शौचालय, चेंजिंग रूम, अल्पोपहार गृह व बिच सुरक्षा यासाठी, प्रसिध्दी, जनजागृती, जिल्हयातील (मुरुड) समुद्रकिनारी बिचेसवर सुरक्षेसाठी जनजागृती व चौपाट्यांवर जॉगिंग इत्यादी समुद्रकिनाऱ्यावर पायाभुत सोयीसुविधा कमी प्रमाणावर उपलब्ध असल्याने आणि ग्राम पंचायत हे समुद्रकिनाऱ्यावर या सुविधा पुरवू शकत नसल्याने, एजन्सीकडून निधीची अतिरिक्त मागणी होती. या सुविधा प्रदान करण्यासाठी अतिरिक्त रू. १३९.८० इतर योजनेच्या बचत पासून पुर्नविनियोजन करुन उपरोक्त कामांसाठी रु. १३९.८० लाख रुपये देण्यात आले. पुर्नविनियोजन आदेश दि. ११-२-२०१५ ची प्रत यासोबत जोडलेले आहे. याबाबतची कारणे लोकलेखा समितीसमोर स्पष्ट करण्यात येतील.
	कोणतेही योग्य कारण न देता मार्च, २०१५ मध्ये पुर्नविनियोजनामार्फत रू.१३९.८८ लाख इतक्या रक्कमेच्या अतिरिक्त निधी ची तरतूद करण्यात आली.				

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
८)	पृष्ठ क्र. ४३१ **मागणी क्र. ओ- १७** **२८१०-अपारंपरिक ऊर्जा साधने** ६०- इतर ८०० इतर खर्च ८००(३४)(१०) अपारंपारिक उर्जा विकास मूळ :- १०.०० पुनर्विनियोजन :- ११६.०० **जिल्हातील नुतनीकरण करण्याजोगे उर्जा विकासाची कामे करण्यासाठी मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.११६ लाख इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली**	१,२६.००	१,२६.००	---	जिल्ह्यातील अपारंपारिक ऊर्जा विकासाच्या कामांसाठी मार्च २०१५ मध्ये ११६ लाख रुपयांचा पुनर्मूल्यांकन करण्यात आले. या सुविधा पुरवण्यासाठी एजन्सीकडून निधीची अतिरिक्त मागणी होती. सदर मागणी पुनर्विनियुक्तीद्वारे इतर योजनांच्या बचतीमधून वरील कामासाठी ११६ लाख रुपये देण्यात आले. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-३-२०१५ सोबत जोडलेले आहेत. (पृ. क्र. २२) **महालेखापालांचे अभिप्राय :-** Additional Fund of Rs. ११६.०० lakh obtained though re-appropriation is more than original grant amount Rs. १०.०० lakh. It indicates improper budgeting. It may be explained in PAC. **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही:-** अतिरिक्त तरतूद जिल्ह्यातील अपारंपरिक ऊर्जा विकासाच्या कामांसाठी मार्च २०१५ मध्ये ११६.०० लाख रुपयाचा पुनर्विनियोजन करण्यात आला. मूळ आराखडा तयार करताना कृषी विभाग जिल्हा परिषद यांचेकडून मागणी अप्राप्त असल्याने योजनेसाठी निधी रु.१०.०० लक्ष ची तरतूद करण्यात आली. तथापि, कृषी विभागाने रु.११६.०० लक्ष मागणी केल्याने अतिरिक्त रु.११६.०० लक्ष पुनर्नियुक्तीद्वारे इतर योजनांच्या बचत वासून वरील कामासाठी निधी देण्यात आला. पुनर्विनियोजन आदेश दि.१७-३-२०१५ ची प्रत सोबत जोडलेली आहे. वाढाबतची कारणे लोकलेखा समितीसमोर स्पष्ट करण्यात येतील.
९)	पृष्ठ क्र. ४३२ **मागणी क्र. ओ- १७** **२२०४-क्रीडा व युवक सेवा** १०४ क्रीडा व खेळ १०४(३४)(०७) व्यायामशाळांना सहायक अनुदान मूळ :- ५०.०० पुनर्विनियोजन :- ५०.५० **या योजनेसाठी तरतूद आपुरी होती.**	१,००.५०	१,००.५०	---	या योजनेसाठी ठेवण्यात आलेली उपलब्ध तरतूद आपुरी होती. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेच्या बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी ५० लाख ५० हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत २१-२-२०१५ अन्वये १७-०३-२०१५ सोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८, पृ. क्र. २२) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
१०)	पृष्ठ क्र. ४३२ **मागणी क्र. ओ- १७** **२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य** ०३-ग्रामीण आरोग्य सेवा — विषमचिकित्सा ८०० इतर खर्च ८०० (३४)(१३) प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदीसाठी जिल्हा परिषदेला अनुदान मूळ :- २९.४० पुनर्विनियोजन :- २०.०० **कोणतेही विशिष्ट कारण न देता वर नमूद केलेल्या शिर्षाखाली मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.७०.५० लाख इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली**	४९.४०	४९.४०	---	या योजनेसाठी ठेवण्यात आलेले उपलब्ध तरतूद अपुरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेचा बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी २० लाख रु खर्च करण्यात आले होते. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-०३-२०१५ सोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे

अ. क्र.	विनियोजन लेख्यातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
११)	पृष्ठ क्र. ४३२ **मागणी क्र. ओ- १७** **२४२५-सहकार** १०७, सहकारी पत संस्थांना सहाय्य १०७ (३४)(०२) डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना मूळ :- ९२.०० पुनर्विनियोजन :- ४७.९३	१.३९.९३	१.३९.९३	---	या योजनेसाठी ठेवण्यात आलेले उपलब्ध तरतूद अपुरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेचा बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी ४७.९३ लाख खर्च करण्यात आले होते. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत ११-२- २०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. १८) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
१२)	**पृष्ठ क्र. ४३२ मागणी क्र. ओ- १७** **३०५१- बंदरे आणि दीपगृहे** ८०, सर्वसाधारण १९० सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमांना सहाय्य १९० (३४)(०२) प्रवाशांसाठी सुखसोयी व इतर स्थापत्यविषयक अभियांत्रिकी कामे मूळ :- १.२५.०० पुनर्विनियोजन :- २३.४८	१.४८.४८	१.४८.४८	---	या योजनेसाठी ठेवण्यात आलेले उपलब्ध तरतूद अपुरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेचा बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी २३.४८ लाख रुपये खर्च करण्यात आले पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. २२) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
१३)	**पृष्ठ क्र. ४३२** **मागणी क्र. ओ- १७** **२४०६- वनीकरण व वन्यजीवन** ०१— वनीकरण १०१ — वन संरक्षण, विकास व पुनर्निर्मिती १०१ (३४) (०६) संयुक्त वन व्यास्थापन मूळ :- २.५३.८१ पुनर्विनियोजन :- ६.७६	२.६०.५७	२.६०.५७	---	या योजनेसाठी ठेवण्यात आलेले आलेल्ले अपुरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीन या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. या योजनेसाठी ठेवण्यात आलेल्ले उपलब्ध तरतूद अपुर होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेचा बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
	प्रत्यक्ष खर्चावर आधारीत वर नमुद केलेल्या शिर्षाखाली मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.७८.१७ लाख इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली				

अ. क्र.	विनियोजन लेखयातील पृ.क्र. , मागणी क्र. व लेखाशिर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे अभिप्राय
१४)	**पृष्ठ क्र. ४३२** **मागणी क्र. ओ- १७** **२२०४ — क्रीडा व युवक सेवा** १०४ -- क्रीडा व खेळ १०४ (३४)(०३) क्रीडांगणाचा विकास मूळ :- २५.०० पुनर्विनियोजन :- २५.०० जिल्हा नियोजन समितीने मंजुर केलेल्या जिल्हा क्रीडा संकुलला पाणीपुरवठा करण्यासाठीचे काम करण्यासाठी मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.२५ लाख इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली	५०.००	५०.००	---	जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या जिल्हा क्रीडा संकुलात पाणीपुरवठा करणे ही योजना अपूर्ण होती. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. या योजनेसाठी ठेवण्यात आलेले उपलब्ध तरतूद अपुरे होते. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्याअनुषंगाने अतिरिक्त इतर योजनेचा बचतीतून उपलब्ध राहिलेला निधी २५ लाख रु. खर्च करण्यात आले होते. पुनर्विनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-०३-२०१५ यासोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
१५)	**पृष्ठ क्र. ४३३** **मागणी क्र. ओ- १७** **२२०२ — सर्वसाधारण शिक्षण** ०१, प्राथमिक शिक्षण १९६, जिल्हा परिषदाना/जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य १९६ (३४)(०७) जिल्हा परिषदांना प्राथमिक शाळांच्या इमारतीच्या विशेष दुरुस्तीसाठी अनुदान मूळ :- १०.०० पुनर्विनियोजन :- ६.०० दुर्गम क्षेत्रातील शाळेचे बांधकाम करण्यासाठी मार्च, २०१५ मध्ये पुनर्विनियोजनाद्वारे रू.६ लाख इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात आली	१६.००	१६.००	---	दुर्गम भागातील शाळांची संकल्पना या योजनेसाठी ठेवण्यात आलेली तरतूद अपुरे होती. गरज लक्षात घेता जिल्हा नियोजन समितीने या योजनेअंतर्गत जादा कामे मंजूर केली आहेत. त्या अनुषंगाने इतर योजनांतील बचतीचा निधी ६ लाख रुपये पुर्नविनियोजनाद्वारे उपलब्ध करणेत आला. सदर पुर्नविनियोजन आदेश दिनांक ची प्रत १७-०३-२०१५ सोबत जोडलेले आहे. (पृ. क्र. २१) **महालेखापालांचे अभिप्राय :- No Remark** **त्यानुषंगाने विभागाने केलेली कार्यवाही :** वरीलप्रमाणे
2210D882-31Construction Of Ayurved And Unani Hospitals	1000	1000	8500	1000	100%	0
2210D891-31Maintanance And Repairs Of Ayurvedi And Unani Hospitals	2500	2500	7725	2500	100%	0
2210D908-21Grant To ZP For Medicines Of Primary Health Centre/Sub Centre	5400	5400	42590	5400	100%	0

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
2210E553-31Purchase Of Medicines,Machinery And Equipments For Health Sub-Centres	2900	2900	20300	2900	100%	0
2210E562-31Purchase Of Medicines, Machinary And Equipments For Rural Hospitals	3500	3500	18446.38	3500	100%	0
2210E571-31Purchase Of Medicines,Machinery And Equipments Sub-District Hospitals	14000	11400	60951.56	13995	99.00%	5
22111225-21(District Plan-Nagpur)School Health Check- Up- Programme	675	675	4600	675	100%	0
22155446-31Grants To Village Panchayats/Zilla Parishads For Piped Water S(Adjusted With Ways And Means Advances	90756	90756	570954.1	90756	100%	0
22159621-31Installation Of Power-Pumps, Conversion Of Hand-Pump Into Power-Pump And Their Maintenance And Repairs	0	1	0	0	0.00%	0
22172658-31Grant-In-Aid To Municipal Council For Implementation Of Development Plans.(District Plan-Nagpur)	11500	9000	56127	12334	107%	-834
22178941-31(55)(08) Maharashtra Nagaruthhan Abhiyan(2217****)31, Grants In Aid	75000	60000	438602.2	74990	99.00%	10
22200974-21Strengthening Of Dist.Information Office	1500	1500	4947	1491.957	99.00%	8.043
22259438-31State Government Post Matrics Scholarships.(District Plan-Nagpur)	0	1	7650	0	0.00%	0
22259438-34State Government Post Matrics Scholarships.(District Plan-Nagpur)	20000	20000	54238.34	19997.8	99.00%	2.202
22259447-31Scholarship To Students Studying In High Schools.(District Plan-Nagpur)	0	1	9340	0	0.00%	0
22259465-34Payment Of Tuition Fees/Examination Fees.(District Plan-Nagpur)	6795	7800	20925.2	6795	100%	0
22259527-31Payment Of Tuition Fees And Examination Fees For Other Backward Classes Student .(District Plan-Nagp	2500	2500	11263.5	2500	100%	0
22259527-34Payment Of Tuition Fees And Examination Fees For Other Backward Classes Student .(District Plan-Nagp	30000	30000	126486.6	29995.8	99.00%	4.205

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
2225C344-27(District Plan-Nagpur) Extension Of Village Gaothan Due To Population Pressure.	195	100	196	196	100%	-1
2225D019-31(55)(01)Tanda Vikas Yojana(2225****)	100	100	11500	0	0.00%	100
2225D028-31(55)(01)Training For VJNT;SBC And OBC(2225****)	100	100	0	0	0.00%	100
22303914-52Expansion Of Technical And Vocational Training Of Craftsmen(District Plan-Nagpur)	20000	20000	62032.86	15685.88	78.00%	4314.121
22356846-31Grant In Aid To Zilla Parishad Under Section 187 Of Maharashtra Zilla Parishad And Panchayat Samiti(	0	1	1000	0	0.00%	0
22361221-31Plan Grant To Aganwadi Construction Under Section 187 Of Mah. ZP And Panchayat Samiti Act 1961	90000	90000	392250	110000	122%	-20000
24017112-33cereal Development Programme.(District Plan-Nagpur)	0	417	2506.605	0	0.00%	0
24017132-33Intensive Cotton Development Programme.(District Plan-Nagpur)	0	128	241	0	0.00%	0
24017141-33Sugarcane Development Programme In Vidarbha, Marathwada And Khandesh Region.(District Plan-Nagpur)	0	45	738.998	0	0.00%	0
24017159-33Integrated Pulses Production Programme.(District Plan-Nagpur)	0	1	0	0	0.00%	0
24017168-33Scheme For Micro Irrigation.(District Plan-Nagpur)	3597	3597	22489.97	3597	100%	0
24017177-33Intensive Oil Seeds Development Programme.(District Plan-Nagpur)	4810	8541	52251.77	4257.69	88.00%	552.31
24017186-33Subsidy For Plant Protection.(District Plan-Nagpur)	2000	2000	21438.84	2000	100%	0
24017195-21Establishment/Strengthening Of Horticultural Nurseries(District Plan-Nagpur)	14175	14112	49343.3	14175	100%	0
24018638-33(55)(01)Support To State Extension Programme For Extension Reformes(2401****)	5408	6123	42634	5408	100%	0
24018647-33(55)(01)Strengthing Of Agro-Polyclinic(2401****)	6000	6000	24992.51	6390	106%	-390
24037862-13State Plan Scheme - Expansion And Modernisatoon Of Veterinary Polyclinic(District).(District Plan-Na	0	1	600	0	0.00%	0

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
24037862-21State Plan Scheme - Expansion And Modernisatoon Of Veterinary Polyclinic(District).(District Plan-Na	2550	2000	6916.133	2549.98	99.00%	0.02
24037862-31State Plan Scheme - Expansion And Modernisatoon Of Veterinary Polyclinic(District).(District Plan-Na	11300	11300	46458	6000	53.00%	5300
24037862-52State Plan Scheme - Expansion And Modernisatoon Of Veterinary Polyclinic(District).(District Plan-Na	1250	1250	5607.356	1249.974	99.00%	0.026
24037931-31Supply Of Medicines To The Veterinary Institutions(District Plan-Nagpur)	6000	6650	28500	6000	100%	0
24038025-31Fodder And Feed Development - Grants To Zilla Parishads(State Plan)(District Plan-Nagpur)	1500	1500	9800	1500	100%	0
24038052-31Plan Grants To Zilla Parishads.(State Plan)(District Plan-Nagpur)	500	500	5393.75	500	100%	0
2403C045-31Kamdhenu Dattak Gram Yojana	9760	10218	49972.5	10217.5	104%	-457.5
24043732-52Integrated Dairy Development Project.(State Plan)(District Plan-Nagpur)	0	1250	1846.144	0	0.00%	0
24053691-21Fish Seed Farms - State Plan Scheme.(District Plan-Nagpur)	225	200	1201.555	180.234	80.00%	44.766
24053708-21Fish Farming In Impounded Water. (State Plan Scheme)(District Plan-Nagpur)	100	200	629.497	95.192	95.00%	4.808
24053708-31Fish Farming In Impounded Water. (State Plan Scheme)(District Plan-Nagpur)	350	250	2751.053	349	99.00%	1
24064556-02Reafforestation Of Degraded Forest.(District Plan-Nagpur)	1266	532	13992.63	1266	100%	0
24064556-21Reafforestation Of Degraded Forest.(District Plan-Nagpur)	316	200	3784.124	316	100%	0
24067297-21(55)(09)Joint Forest Management(2406****)02 Wages 21 Supplies And Materials	500	500	2173.75	500	100%	0
24252032-33Dr. Panjabrao Deshmukh Interest Rebate Scheme.(District Plan-Nagpur)	30000	65000	294313.3	29999.85	99.00%	0.149
25011545-31Training Of Rural Youths For Self Employment By TRYSEM And Industrial Training Institutes(State Plan	0	1	0	0	0.00%	0

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
25011554-31Drought Prone Area Development Programme(District Plan-Nagpur)	0	1	672	0	0.00%	0
25011563-31Grant To District Rural Development Agencies/Other Agencies-State Share.(District Plan-Nagpur)	0	1	1118.125	0	0.00%	0
25011572-33Swarna Jayanti Gram Swarojgar Yojana(District Plan-Nagpur)	0	1	12161	0	0.00%	0
25051312-31General Plan Indira Awas Yojana(District Plan-Nagpur)	45312	72906	225753	45312	100%	0
25151793-31(55)(01)Special Grants To Village Panchayats For Civic Facilities(2515****)31 Grants In Aid	130000	120000	765069	154295	118%	-24295
25151801-31(55)(02) Special Grants To Big Village Panchayats For Providing Civic Facilities(2515****)31,Grant In Aid	100000	100000	397381.6	85705	85.00%	14295
25152225-31Grant In Aid To DRDA For Establishment Expences (2515 ****)	7515	7515	36529	6515	86.00%	1000
25152225-36Grant In Aid To DRDA For Establishment Expences (2515 ****)	0	1	0	0	0.00%	0
27026541-31Minor Irrigation Works- General Plan (Adjusted With Ways And Means Advances).(District Plan-Nagpur)	26900	26900	503033.3	26900	100%	0
27026552-31General Plan (Kolhapur Type Weirs)(Adjusted With Ways And Means Advanes)(District Plan-Nagpur)	76184	95000	443501.6	76184	100%	0
28100582-31(55)(01)Maharashtra Energy Development Authority(2810****)	0	100	72000	0	0.00%	0
28513092-34Scheme For Providing Stipends To Entrepreneurs.(District Plan-Nagpur)	4000	4000	20500	4000	100%	0
28513127-31Development Of Sericulture Industry And Village Industries, Khadi And Village Industries.(District	600	1000	4350	600	100%	0
30541664-31(District Plan-Nagpur) Plan	20000	20000	92018	20000	100%	0
30542203-31(55)(02) Development And Strengthing Of Village Roads (3054****) 53 Major Works	130000	130000	691926	130000	100%	0
30542203-53(55)(02) Development And Strengthing Of Village Roads (3054****) 53 Major Works	0	1	127000	0	0.00%	0
34511893-20Innovative Schemes (3451 ****)	2000	2000	0	0	0.00%	2000
34511893-21Innovative Schemes (3451 ****)	5000	5000	0	0	0.00%	5000
34511893-27Innovative Schemes (3451 ****)	19000	19000	30521.61	23122.18	121%	-4122.18
34511893-28Innovative Schemes (3451 ****)	1000	1000	0	0	0.00%	1000

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
34511893-31Innovative Schemes (3451 ****)	21000	21000	555932.3	67695	322%	-46695
34511893-33Innovative Schemes (3451 ****)	1000	1000	0	0	0.00%	1000
34511893-52Innovative Schemes (3451 ****)	50000	50000	27441.45	8182.824	16.00%	41817.18
34512174-13Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	100	100	200	0	0.00%	100
34512174-16Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	100	100	0	0	0.00%	100
34512174-20Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	1500	1500	0	0	0.00%	1500
34512174-21Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	9000	9000	0	0	0.00%	9000
34512174-28Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	200	200	0	0	0.00%	200
34512174-31Evaluation, Monitaring And Dtata Entry Of Schemes (3451 ****)	100	100	29707.22	11000	110%	-10900
34512648-13(55)(01)Strengthing Of District Planning Committee(3451****)	100	100	376	375.872	375%	-275.872
34512648-21(55)(01)Strengthing Of District Planning Committee(3451****)	400	400	343	340.424	85.00%	59.576
34512648-27(55)(01)Strengthing Of District Planning Committee(3451****)	500	500	1075.652	0	0.00%	500
34512648-31(55)(01)Strengthing Of District Planning Committee(3451****)	900	900	5516.24	1480.992	164%	-580.992
34512648-50(55)(01)Strengthing Of District Planning Committee(3451****)	300	300	0	0	0.00%	300
34512657-20(55)(04)Other District Scheme(3451****)	0	500	0	0	0.00%	0
34512657-21(55)(04)Other District Scheme(3451****)	0	2000	5208.532	0	0.00%	0
34512657-27(55)(04)Other District Scheme(3451****)	16150	15000	60232.89	16151.25	100%	-1.252
34512657-28(55)(04)Other District Scheme(3451****)	0	500	0	0	0.00%	0
34512657-30(55)(04)Other District Scheme(3451****)	0	1	0	0	0.00%	0
34512657-31(55)(04)Other District Scheme(3451****)	155004	111828	998116.9	155995.6	100%	-991.573
34512657-33(55)(04)Other District Scheme(3451****)	0	1400	13157.86	0	0.00%	0
34512657-50(55)(04)Other District Scheme(3451****)	0	1000	0	0	0.00%	0
34512657-53(55)(04)Other District Scheme(3451****)	1250	5000	263750	1250	100%	0
34522482-31Grants For Basic Facilities For Tourism Development At Various Places.(District Plan-Nagpur)	50000	50000	270512.1	50000	100%	0

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
36040808-50Special Programme For Development Of Pilgrimage Places (Plan)(District Plan-Nagpur)	50000	50000	316914	50000	100%	0
40591973-53Major Works-District Administration(District Plan-Nagpur)	83480	83480	269960.3	90351	108%	6871
40591982-63Establishment Charges.(District Plan-Nagpur)	11603	11603	31700.22	6733	58.00%	4870
40591991-63Tools And Plant Charges.(District Plan-Nagpur)	917	917	2510.925	535.828	58.00%	381.172
40592782-53Construction Of Protection Wall To Prevent Encrochment On Public Lands	4000	4000	55730	4000	100%	0
42101511-52(District Plan-Nagpur) Puechase Of Machinery And Equipment For Hospital	81681	84600	409844.4	9379.958	11.00%	72301.04
42101511-53(District Plan-Nagpur) Puechase Of Machinery And Equipment For Hospital	0	1	57196.15	0	0.00%	0
42501291-53(55)(02)Land Acquisition And Construction Government ITI,S (4250****)21,Supplies And Materils53 Major Works	43478	43478	99566.26	25433.87	58.00%	18044.13
42501308-63(02)(55) Establishment Charges(4250****) 63 Inter Accout Transfer	6522	6522	14202.68	3390.234	51.00%	3131.766
42501317-53(55)(02)Construction Of Hostels For ITI Students And Providing Facilities(4250****)21 Supplies And Material 53 Major Works	13043	13043	22307	7913	60.00%	5130
42501326-63(03)(55) Establishment Charges(4250****) 63 Inter Accout Transfer	1957	1957	3346	1187	60.00%	770
42501335-53(07)(55) Construction Of Government Technical School(4250****) 53 Major Works	10870	10870	59390.53	3478	31.00%	7392
42501344-63(08)(55) Establishment Charges(4250****) 63 Inter Account Transfer	1630	1630	8909.467	522	32.00%	1108
44022126-53(District Plan-Nagpur) Land Development Through Soil Conservation Measures	30000	30000	292951.7	29936	99.00%	64
44031231-53Major Works.(District Plan-Nagpur)	15218	15218	29435.15	14762.8	97.00%	455.2
44031249-63Establishment Charges.(District Plan-Nagpur)	2115	2115	4090.504	2052	97.00%	63
44031258-63Tools And Plant Charges.(District Plan-Nagpur)	167	167	324.348	163.2	97.00%	3.8

SCHEME-CODE	BUDGET	RECEIVED	DISTRIBUTED	EXPENDITURE	EXPND %	BALANCE BUDGET
44031721-63(55)(01)Construction,Strengthing And Modernization Of Veternity Hospital And Despensaries(4403****)53 Major Works	0	2	0	0	0.00%	0
44062038-53Forest Buildings(District Plan-Nagpur)	2200	2200	17983.93	1941.412	88.00%	258.588
44063464-53Development In Forest Tourism(4406****)	29086	29086	129406	29085.91	99.00%	0.087
45150772-52(55)(01)Other District Scheme(4515****)	0	100	48950	0	0.00%	0
45150772-53(55)(01)Other District Scheme(4515****)	50500	52400	656206.6	50500.27	100%	-0.265
47112865-53(55)(01)Fllod Control Project(4711****)	30000	30000	125750.9	28374.44	94.00%	1625.563
50544711-53(55)(05) Development And Strengthing Of Other District Roads (5054****) 53 Major Works	188725	188725	1051501	188725	100%	0
50544729-63(55)(06) Establishment Charges (5054****) 63 Inter Account Transfer	26233	26233	146155.7	26232.8	99.00%	0.2
50544738-63(55)(07) Tools And Plant Charges (5054****)63 Inter Account Charges	2076	2076	11567.04	2076	100%	0
62170607-55Loans To Muncipal Corporation For Implimentation Of Development Scheme	5500	3000	46330	5500	100%	0
62500682-55Loans To Educated Unemployed By Way Of Seed Money.(District Plan-Nagpur)	4500	4500	24350	4500	100%	0
68010531-55(District Plan-Nagpur) Loans To Mah State Electricity Distribution Company Ltd	56246	55000	241649.4	56246	100%	0
68510896-55Loans For Rural Industrial Project Programme In The District Industries Centres(District Plan-Nagpu	300	300	1350	300	100%	0
TOTAL	**2250000**	**2250000**	**13383798**	**2229141**	--	**20858.94**

सर्वसधारण जिल्हा वार्षिक योजना 2014-15
अर्थसंकल्पिय तरतुदीचे वाटप
दुग्धव्यवसाय

जिल्हा नियोजन समिती
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर
क्र. जिनिस/कार्या-37/जिवायो/का-9/ 2045 /2014-15
दिनांक : 03 / 12 /2014

वाचा- 1.महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444 दि.16/02/2008
2. जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. जिदुविअ/नाग/ब-2/जि.वा.यो./मंजुरी/2014/ 518 दिनांक 21/07/2014
3. उपआयुक्त (उ व प्रा.) दुग्धव्यवसाय विकास विभाग, आयुक्त दुग्धव्यवसाय विभाग कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र. आदुवि-6/जिवायो/भाग-3/2014-15/218/1671 दि. 17/07/2014
4) जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. जिदुविअ/नाग/ब-2/जि.वा.यो./मंजुरी/2014/544 दिनांक 02/08/2014

उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 नुसार सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थाकडील योजना/कामे वगळुन या निधीतील कामांना प्रशासकिय मान्यता देण्याचे व निधी वितरणाचे अधिकार जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, यांना प्रदान केले आहेत.

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. 2 व 4 अन्वये जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, नागपूर यांचेकडुन एकात्मिक दुध उत्पादन कार्यक्रम (शासकीय दुग्ध योजना) या योजनेअंतर्गत शासकिय दुध योजना नागपूर येथिल परीसरातील गोदामाच्या बाजुला असलेली सुरक्षा भिंत दुरूस्ती बांधकामाचे रू. 1250000/- अंदाजपत्रक अ.क्र.3 वरील संदर्भिय पत्रानुसारच्या राज्यस्तरीय मान्यता व तांत्रिक मान्यतेसह प्रशासकिय मान्यता व निधी मागणीस्तव प्राप्त झाले आहे.

त्यासअनुसरून उपरोक्त शासन निर्णय क्र. 1 च्या अधिन राहुन सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना 2014-15 करीता शासकिय दुध योजना नागपूर येथिल परीसरातील गोदामाच्या बाजुला असलेली सुरक्षा भिंत दुरूस्ती बांधकामाचे रू. 1250000/- च्या कामास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात येत असुन खाली दर्शविल्यानुसार निधी रू. 6.50 लक्ष (अक्षरी सहालक्ष पन्नास हजार फक्त) जिल्हा दुग्ध विकास अधिकारी, नागपूर यांना वितरीत करण्यात येत आहे.

एकात्मिक दुग्ध उत्पादन कार्यक्रम या योजनेचा निधी 24043732 या लेखाशिर्षावर उदिष्ट क्रं 52 यंत्रसामुग्री व साधनसामुग्री वर रू 12.50 लक्ष निधी अर्थसंकल्पीत झालेला आहे. परंतु सन 2014-15 अंतर्गत या योजनेमधुन सुरक्षा भिंत बांधकामाचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे. त्यामुळे 52 उदिष्ट संकेतांकावर सदर निधी देता येत नसल्यामुळे लेखाशिर्ष 34512657 अंतर्गत 27 या उदिष्ट संकेतांकावर पुनर्विनियोजीत करण्याचे प्रस्तावित आहे.

विवरणपत्र

रू.लाखात

अ. क्रं.	योजनेचे नाव	लेखाशिर्ष	मंजुर व अर्थसंकल्पिय तरतुद	बि.डी.एस. संगणक प्रणालीद्वारे प्राप्त तरतुद	या आदेशान्वये वितरीत निधी
1	एकात्मिक दुध उत्पादन कार्यक्रम	मागणी क्र. ओ. 38 मुख्य लेखाशिर्ष-3451 सचिवालयीन आर्थिक सेवा 101 नियोजन आयोग-नियोजन मंडळ, (55) जिल्हा योजना नागपूर (55) (03) इतर जिल्हा योजना (34512657) 53 मोठी बांधकामे	12.50	6.50	6.50

स्वा/-
(अभिषेक कृष्णा)
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत)

अटी व शर्ती :

1. योजनेबाबत शासनाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शकसुचना, निकष तपासणी सुची, अटी व शर्तीनुसार योजनांवर/कामांवर खर्च करणे बंधनकारक राहील
2. खर्चाची बाब शासन मान्य असल्याची खात्री केल्यावरच योजनांवर खर्च करावा.
3. सन 2014-15 मधील या योजनेच्या कामावर मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच प्राप्त निधी चालु वित्तीय वर्षातच खर्च करण्यात यावा.
4. जिल्हा योजनांकरीता वितरीत केलेले अनुदान ज्या योजनेकरीता/प्रयोजना करीता मंजूर करण्यात आले आहे. त्याच योजनेवर/ प्रयोजनांसाठी खर्च करणे बंधनकारक राहील.
5. कामाचे वेगवेगळे पातळीचे छायाचित्र काढुन वेळोवेळी सादर करावे व अभिलेख्यासाठी संग्रही ठेवावे.
6. सदर काम अथवा कामाचा भाग या कार्यक्रमाव्यतीरीक्त इतर कोणत्याही योजनांतर्गत अथवा योजनेतर कामात अंतर्भुत नाही याची खात्री करूनच कामास सुरूवात करावी.
7. सदर योजनेसाठी आपल्या प्रशासकिय विभागाने दिलेल्या सुचनानुसार/लेखापद्धतीप्रमाणे या कार्यक्रमाचा हिशेब योजनानिहाय स्वतंत्र ठेवावा.
8. तांत्रिक मंजूरी सक्षम अधिकारी यांनी दिली आहे या अटीवरच प्रशासकिय मान्यता व निधीचे वितरण करण्यात येत आहे.
9. सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनांच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र, काम पूर्ण झाल्याबरोबर काम पुर्णत्वाचे दाखले, खर्चाचा ताळमेळ व विनियोजन लेखे इत्यादी बाबतची माहिती आपल्या मंत्रालयीन प्रशासकिय विभागास व कार्यालयास सादर करावी. यासंबंधिची जबाबदारी संबंधित प्रशासकिय विभागाची राहील.
10. योजनापुर्ण होण्यास एकापेक्षा अधिक वर्षाचा कालावधी लागणार असल्यास त्यायोजनांच्या पुर्ततेबाबत वेळोवेळी सनिरीक्षणाद्वारे योजना वेळेतच पुर्ण होण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

11. अपुर्ण कामे पुर्ण करण्यास आवश्यक निधीची पुर्ण तरतुद केल्यानंतरच नविन कामे घेता येईल.
12. योजना पुर्ण झाल्यावर त्यावर पुन: तरतुद केली जाणर नाही याची दक्षता घेण्यात यावी.
13. कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबंधित कार्यान्विती यंत्रणेची राहील.
14. योजना राबविण्याची सनियंत्रण व देखभाल दुरूस्तीची जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेची किंवा शासकिय अभिकरणाची राहील.
15. शासनाचे प्रचलीत नियम विहीत कार्य पद्धतीनुसार निविदा व खरेदी प्रक्रिया पुर्ण करणे आवश्यक राहील.
16. मंजुर करण्यात आलेल्या कामांची निविदा प्रक्रिया विहीत मापदंडास अनुसरून इ-टेंडरीग (E-tendering) द्वारे करण्यात यावी.
17. नविन योजनांच्या बाबतीत संबंधित मंत्रालयीन विभागांची तांत्रिक व प्रशासकिय मान्यता प्राप्त झाल्याशिवाय निधी खर्च करता येणार नाही.
18. जिल्हा वार्षिक योजनेच्या अंमलबजावणीतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती आणि विधीमंडळ कामकाज इत्यादी बाबींसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकिय विभाग जबाबदार राहील.
19. जिल्हा योजनेसंबंधी विधी मंडळास माहिती सादर करणे तसेच विधीमंडळाच्या मागदर्शक सुचनांचे पालन करणे, अर्थसंकल्पिय नियमावलीच्या तरतुदीनुसार विविध बाबीसंबंधी कार्यवाही करण्याची जबाबदारी प्रशासकिय विभागाची राहील.
20. सदर योजनेत समाविष्ट असलेले काम/कामे अन्य कोणत्याही योजनेतुन घेण्यात आलेली नाहीत, याबाबतची खात्री करावी व कामाची द्विरूक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. अन्यथा याबाबतची संपूर्ण जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.
21. जिल्हा वार्षिक योजनेतुन प्रस्तुत करण्यात आलेली कामे अनधिकृत/बेकायदेशिर/वादातीत अशा जागेवर होणार नाहीत याची दक्षता घ्यावी
22. या योजनेअंतर्गत पुर्ण करण्यात आलेल्या कामांची नोंद मालमत्ता नोंदवहीत करून त्या कामाचे परीरक्षण करण्याची खबरदारी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेने घ्यावी.
23. कार्यान्वयीन यंत्रणेने योजनांच्या मासिक खर्चाचे अहवाल दरमहा 5 तारखेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.
24. या कार्यक्रमावर होणारा खर्च रोखप्रवाहानुसार करावा.

प्रति, जिल्हा दुग्धविकास अधिकारी, नागपूर

प्रत - माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह सादर/अग्रेषित

8. मा. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-32
9. मा आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य, मुंबई-32.
10. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर
11. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, नागपूर
12. महालेखापाल महाराष्ट्र-2 नागपूर (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता)
13. वरिष्ठ जिल्हा कोषगार अधिकारी, नागपूर
14. लेखा अधिकारी, जि.नि.स. नागपूर

(मुळ प्रत मा. जिल्हाधिकारी द्वारा स्वाक्षरीत)

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती, नागपूर करीता

कार्यालय जिल्हा परिषद, नागपूर
दिनांक :- 29-12-2012

मा.आयुक्त पशुसंवर्धन,
नागपूर विभाग, पुणे-०१

मार्फत :- योग्य मार्गे

विषय :- जिल्हा परिषद अंतर्गत पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जा वाढीचा प्रस्ताव सादर करण्याबाबत.

संदर्भ:- १) मा.जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नागपूर यांचे पत्र क्रमांक/जिपउआ/नियो./दर्जावाढ /२७००-२७०१/१२ दिनांक ०४/०६/२०१२
२) दिनांक १६/०५/२०१२ रोजी मंत्रालय,मुंबई येथे मा.राज्यमंत्री पशुसंवर्धन यांचे दालनात झालेली दर्जावाढ संबंधी सभा
३) महाराष्ट्र पशुवैद्यक परिषद, नागपूर यांचे पत्र क्रमांक/एमएसव्हीसी/तांत्रीक/४९५-५३६/११ दिनांक १७/०२/२०११
४) जिल्हा परिषद, नागपूर ची सर्वसाधारण सभा दिनांक २१/०८/२०१२

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस सविनय सादर करण्यात येत आहे की, संदर्भ २ अन्वये दिनांक १६/०५/२०१२ रोजी मा.राज्यमंत्री, पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांचे दालनात मा.आमदार श्री.चंद्रशेखरजी बावनकुळे यांचे उपस्थितीत पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ दर्जावाढ श्रेणी-१ मध्ये करण्यास सभा घेण्यात आली. सदर बाबीबर जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दिनांक २१/०८/२०१२ मध्ये विषय क्रमांक ५ (३) व ठराव क्रमांक ७ नुसार सदर प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव पाठविण्याचे सुचविलेले होते. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेत खालील नमुद केल्याप्रमाणे एकुण ३५ पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करण्यास सभेत विषय क्रमांक ५(३)व ठराव क्रमांक ७ अन्वये मंजूरी मिळालेली आहे.

अ.क्र	पंचायत समितीचे नाव	प्रस्तावित पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे नाव
१	मौदा	१) आजनगाव, २) रेवराळ
२	हिंगणा	१) कवडस, २) हळदगाव
३	कळमेश्वर	१) गोंडखैरी, २) कोहळी
४	सावनेर	१) खुबाळा, २) बिचवा, ३) खापरखेडा
५	कामठी	१) भुगाव, २) गुमथळा, ३) महालगाव, ४) टेमसना
६	पारशिवनी	१) साटक, २) दहेगाव (जोशी)
७	काटोल	१) दिग्रस (बु.), २) भोरगड, ३) डोरली
८	उमरेड	१) पाचगाव, २) ठाणा, ३) चारगाव, ४) बोरगाव (क.), ५) सुरगाव
९	भिवापूर	१) जवळी, २) पुल्लर, ३) मेढा
१०	नागपूर	१) विहीरगाव, २) गोधनी, ३) बोरखेडी
११	कुही	१) साळवा, २) गोठणगाव
१२	रामटेक	१) उमरी, २) महादुला
१३	नरखेड	१) लोहारी सावंगा, २) मोवाड

वरीलप्रमाणे १३ पंचायत समिती अंतर्गत एकुण ३५ पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-२ चे श्रेणी-१ मध्ये दर्जावाढ करण्यास्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सविनय सादर करण्यात येत आहे.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

सहपत्र :-१) विहीन नमुन्यात
एकुण ३५ प्रस्ताव (विद्प्रतीत)

प्रतिलिपी :-

१. मा.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना ३ प्रतित माहितीस तथा पुढील कार्यवाहीस सादर [illegible] विद्प्रतीत पाठविण्यात यावा ही विनंती.

साक्ष--

नियोजन विभाग

जिल्हा योजना

नागपूर (मागणी क्र. ओ-३८)

३.११ यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग याची साक्ष घेतली.

३४५१ सचिवालय, आर्थिक सेवा १०१ नियोजन आयोग/नियोजन मंडळ इतर जिल्हा योजना ज्या अंतर्गत १९ लाख रुपयांचा अधिकचा खर्च झाला आहे बाबत खुलासा करावा असे निदेश समितीने दिले असता, नागपूर जिल्ह्यातील १८ मंजूर जिल्हा योजनांना स्वतंत्र लेखाशीर्ष नाही म्हणून त्या योजना इतर जिल्हा योजनेत समाविष्ट केल्या. डीपीसी करिता या वर्षी १३६ शासनाच्या मंजूर आहेत त्यापैकी ज्या योजनांना स्वतंत्र लेखाशीर्ष नाही त्यांचा समावेश इतर जिल्हा योजनेत केला आहे. मूळ तरतूद १३ कोटी ७२ लाख रुपये असून ३ कोटी ४१ लाख रुपयांचे पुनर्विनियोजन झाले. दि. ३१ मार्च रोजी २० लाख रुपयांचे पुनर्विनियोजन झाले. पुनर्विनियोजनासह १७ कोटी १४ लाख रुपये व १७ कोटी ३३ लाख रुपयांचा खर्च झालेला आहे. १७ कोटी १४ लाख रुपयांमध्ये पुनर्विनियोजनाचा एक आदेश समाविष्ट झालेला नव्हता. इतर जिल्हा योजनांमध्ये महसुली व भांडवली असे दोन लेखाशीर्ष आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

पोस्टींगमध्ये चूक झालेली आहे. कमी खर्च झालेला आहे. १७ कोटी ३३ लाख रुपये खर्च झालेला आहे. १९ कोटी रुपयांची ग्रँट आहे काय ? असे समितीने विचारले असता, ग्रँट तिकडे कमी झालेली आहे. पोस्टींगमध्ये चूक झालेली आहे. या बाबत अनुक्रमांक ३४ मध्ये खुलासा केला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लेखाशीर्ष उपलब्ध नसल्यामुळे इतर लेखाशीर्षामध्ये समावेश केला गेला आहे. इतर जिल्हा योजनेमध्ये कोणत्या योजनांचा समावेश करावा हे निश्चित केलेले आहे काय ? असे समितीने विचारले असता, सन २००८ पासून डीपीसीचा प्लान तयार केला. त्यावेळी सर्वच जिल्हा योजनांना लेखाशीर्ष मिळू शकले नाही. यंदा १३७ योजना मंजूर आहेत. ज्या योजना मंजूर आहेत त्यापैकी काही योजनांना स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध होऊ शकले नाही. ती रक्कम इतर जिल्हा योजनांच्या लेखाशीर्षामध्ये अर्थसंकल्पात समाविष्ट केली आहे. हे इतर सर्व जिल्ह्यांमध्ये देखील केले जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

स्वतंत्र लेखाशीर्ष नाही अशा कोणत्याही योजना असू नयेत. आपण ठोक अनुदान देऊ नका. ज्या योजनांना शासनाने मान्यता दिलेली असेल, त्या करिता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडले पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता, ज्या जिल्ह्यांमध्ये इतर जिल्हा योजनांमधून निधी खर्च होत आहे, जेथे मागणी आहे तेथे स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यास हरकत नाही. त्या करिता प्रस्ताव लवकरात लवकर पाठवावे व लेखाशीर्ष तयार करावे अशी पद्धत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जो पर्यंत आपण ही पद्धत बंद करणार नाही तोपर्यंत स्वतंत्र लेखाशीर्ष तयार होणार नाही असे समितीने मत व्यक्त केले असता, आपल्याला जिल्हा योजना बंद करता येणार नाही. ते फेज वाईज करावे लागेल. इतर जिल्हा योजनेच्या माध्यमातून ज्या जिल्ह्यांमध्ये निधी खर्च केला जात आहे, त्यांनी स्वतंत्र लेखाशीर्ष घ्यावे. त्या करिता विभागाने प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

ज्या जिल्ह्यात आवश्यकता आहे त्यानुसार योजनांकरिता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडावे, अशी समितीची भूमिका आहे असे समितीने मत व्यक्त केले.

०२, नागरी अरोग्य सेवा इतर वैद्यकीय पद्धती १४१ आयुर्वेदीक, आयुर्वेद/युनाची दवाखाने बांधणे या जिल्हापरिषद अनुदानातून २० लाख रुपये जादा खर्च करण्यात आले, याबाबत खुलासा करावा असे समितीचे निदेश दिले असता, आयुर्वेदिक दवाखान्याकरिता क्रॉस एन्ट्री झालेली आहे. दवाखान्याच्या बांधकामाकरिता मूळ तरतूद १० लाख रुपयांची होती. तसेच आयुर्वेदिक दवाखान्याची दुरूस्ती या करीता २५ लाख रुपयांची तरतूद होती. मात्र खर्च ५ लाख रुपये दाखवलेला आहे. विभागाने टी.ई करावयास हवे होते असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

विभागाने नोट ऑफ एरर या पूर्वीच महालेखापालांना का दिले नाही ? यामुळे समितीचा वेळ वाया गेला. ही आपली जबाबदारी आहे. आपण वेळेवर नोट ऑफ एरर दिले पाहिजे. केवळ पोस्टींगची चूक आहे. वेळेवर रिकन्सिलिएशन होत नाही. ते वेळेवर केले तर अशा चुका टाळता येतील असे समितीचे मत व्यक्त केले असता, मागील वर्षीपासून असा निर्णय घेतला आहे की, जोपर्यंत ३१ मार्च नंतर विभागाकडून रिकन्सिलिएशन स्टेटमेंट येत नाही तोपर्यंत निधी रिलीज करणे थांबवलेले आहे. यामुळे जून पर्यंत तरी सर्वच विभागाचे रिकन्सिलिएशन पूर्ण होईल. आरोग्य विभागाच्या डीएचओ यांच्याकडून रिकन्सिलिएशन वेळेत न झाल्यामुळे हा मुद्दा आला असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

२४०३ पशुसंवर्धन १०१ पशुसंवर्धन सेवा व पशुआरोग्य, पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालयाच्या विस्तार व आधुनिकीकरण अपग्रेडेशनकरिता शासनाची मंजुरी मिळाली नाही, असे नमूद केलेले आहे याबाबत खुलासा करावा असे समितीने निदेश दिले असता, १३ संस्थांच्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे श्रेणीवर्धन करण्यासाठी आयुक्त, पशुसंवर्धन यांना कळवले होते. मात्र मंजुरी न मिळाल्यामुळे ५३ लाख रुपयांची बचत झाली. श्रेणीवर्धनाकरिता बांधकाम, यंत्रसामुग्री व पदांची आवश्यकता असते. औषधांचे देखील नॉर्म्स बदलतात असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

२९१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०२, नागरी आरोग्य सेवा-इतर वैद्यकीय पद्धती १०१ आयुर्वेद, आयुर्वेद व युनानी दवाखान्यांची परिक्षण व दुरूस्ती

४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यांवरील भांडवली खर्च ०३ वैद्यकिय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन १०५ विषय चिकित्सा, रुग्णालयासाठी यंत्रसामुग्री व साधनसामुग्री खरेदी करणे

उक्त दोन्ही अनुदानाबाबत खुलासा करावा असे समितीने दिले असता, सन २०१४-१५ मध्ये राज्यस्तरावरून वैद्यकीय शिक्षण विभागाकडून डीएमआरची खरेदी झाली नाही त्यामुळे मुंबई, नागपूरसह राज्यातील अनेक वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रश्न उपस्थित झाला. या नंतर पुढील वर्षापासून खरेदीचे अधिकार बदलण्यात आले. डीन यांना पूर्वी ३ लाख रुपयांपर्यतच्या खरेदीचे अधिकार होते आता ते २५ लाख रुपयांपर्यंत केलेले आहेत. तसेच सध्या हाफकीन संस्थेलादेखील खरेदीचे अधिकार दिले आहेत. ८ कोटी ४६ लाख रुपये मूळ तरतूद होती, त्यापैकी ५ कोटी २४ लाख रुपये पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध केले व १ कोटी ९८ लाख रुपये व्यपगत झाले. ५५४ लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन झाले व १९८ लक्ष रुपये व्यपगत झाले आहे असे विभोगीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

पुनर्विनियोजनानंतर ९३ लाख रुपये शिल्लक राहिले व १२४ लक्ष रुपये खर्च झालेले आहे, असे नमूद केले आहे. यंत्रसामुग्री योजने अंतर्गत तरतूद ८४६.०१ लक्ष इतकी होती याबाबत खुलासा करावा असे समितीने निदेश दिले असता, एकूण खर्च ९३.८० लाख रुपये एवढाच झालेला आहे. रिकन्सिलिएशन स्टेटमेंट दिलेले आहे पृ.क्र. ८८ वर खुलासा दिलेला आहे. ३४ लाख ८८ हजार ७०० रुपये जीएमसी करीता खर्च झालेला आहे. एकूण खर्च ९३ लाख ११ हजार ८६६ रुपये झालेला आहे. ३४ लाख १ हजार आयजीएमसी करीता खर्च झालेला आहे. तसेच डेंटल कॉलेजकरिता २४ लाख २१ हजार ८२८ रुपयांचा खर्च आहे. एकूण खर्च ९३ लाख ११ हजार ८८६ रु झालेला आहे असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

रुग्णालयासाठी यंत्रसामुग्रीची खरेदी करण्याकरिता ५ लाख ५७ हजार रुपये, २१ लाख ९९ हजार, १४ हजार ६७७ तसेच ४ लाख ५ हजार रुपये अशी ४ बिले आमच्याकडे आहेत. असे १२४ लक्ष रुपये आहेत. ही ४ बिले आपण समाविष्ट केलेली नाहीत. एजींचे असे म्हणणे आहे की, १९८.०३ रुपये लॅप्स झालेले आहेत. ४ इव्हॉइसेस समाविष्ट झालेले नाहीत. ३१ लाख ९ हजार रुपये जास्त खर्च झाला, असा एजींचा आक्षेप आहे. याचा अर्थ जास्तीचा खर्च झालेला आहे. या पूर्वी आपण खुलासा का केला नाही ? असे समितीने विचारले असता, जास्तीचा खर्च झालेला नाही. त्यांचे ऑडीट तपासावे लागेल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ऑडीट आल्यानंतर देखील विभाग काळजी घेत नाही असे समितीने मत व्यक्त केले असता, विभागाने रिकन्सिलिएशन स्टेटमेंटमध्ये दिलेले आहे. विभागाने दिलेल्या माहितीवर आम्ही स्टेबल राहिलो असे विभागीय प्रतिनिधीने समितीस अवगत केले.

महालेखाकारांनी नागपूर जिल्ह्यांचे ऑडीट केले. ३१ लाख रुपये जादा खर्च कसा दाखवला जात आहे, याचे आपण रिकन्सिलिएशन करावयास हवे होते. या पूर्वी देखील आपल्या विभागाची साक्ष लावण्यात आली होती. आपल्याला या बाबत काही काळजीच नाही. आपले म्हणणे असे आहे की, १९८ लाख रुपये सेंडर झाले नसून १६७ लाख रुपये सरेंडर झाले आहे. निधी व्यपगत झालेला आहे. तो का लॅप्स केला गेला ? आपण विभागाला विचारत नाही काय, की निधी खर्च का केला जात नाही असे समितीने विचारले असता, हा निधी विभागाकडून आपल्याकडे परत आलेला नाही त्यांना बीडीएसमधून दिलेला आहे त्यामुळे तो आता शून्य झालेला आहे. या संबंधी डीपीसीमध्ये बरीच चर्चा झाली होती. या बाबत डीन यांना देखील शो कॉज नोटीस दिली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१९८ लाख रुपये वापरले नाहीत असे त्यांनी सांगितले आहे. प्रत्यक्षात ३१ लाख रुपये वापरले असतील तर त्यांनी केवळ १६७ लाख रुपये वापरले नाहीत, एवढाच हा मुद्दा आहे. ७ कोटी ५२ लाख रुपये सरेंडर झाले का ? असे समितीने विचारले असता, मंजुरी मिळाली नसल्यामुळे एकूण खर्च कमी झाला आहे. ८ कोटी ४६ लाख रुपयांपैकी बाकी सर्व यामध्ये खर्च झाला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

८ कोटी ४६ लाख रुपयांपैकी फक्त १ कोटी २४ लाख रुपये खर्च झाले आणि बाकी ७ कोटी रुपये सरेंडर करण्यात आले, जे रिॲप्रोप्रिएट करुन दुसऱ्या कामासाठी खर्च करता आले नाहीत अशी समितीने विचारणा केली असता, त्यापैकी ५ कोटी ५४ लाख रुपये रिॲप्रोप्रिएट केले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१ कोटी ६७ लाख रुपये अखर्चित राहिले आहेत. यासाठी दोन्ही यंत्रणा जबाबदार आहेत असे समितीने मत व्यक्त केले.

४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च

४५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रमांवरील भांडवली खर्च

उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांमध्ये दोन ठिकाणी बचत झाली आहे तर एका ठिकाणी जास्तीचा खर्च झाला आहे. याबाबत खुलासा करावा असे समितीचे सांगितले असता, ४०५९ हे सार्वजनिक बांधकाम - इमारत बांधकामाचे लेखाशीर्ष आहे. आपण ४०५९ मध्ये ३ ठिकाणी बजेट करतो. ५३ - मोठी बांधकामे ८५ टक्के, ६३ आस्थापना १३.९ टक्के, ६३ टूल्स ॲण्ड प्लॅन १.१ टक्के असे आहे. यामध्ये असे झाले होते की, ५२.२५ लाख रुपये इतका मोठ्या बांधकामांवर अतिरिक्त खर्च झाला होता, १३.९ टक्क्यांमधून ४८.६८ लाख रुपये वजा झाले आहेत. त्याच लेखाशीर्षामध्ये व त्याच क्रमांकामध्ये हे आहे.

५३ - मोठ्या बांधकामांवर त्याच योजनांवर खर्च झाला आहे. ४८.६८ लाख रुपये वजा झाले आहेत. बाब क्रमांक ३५ मध्ये ५२ लाख रुपये जास्तीचे आहेत. ही योजना एकच आहे. बांधकामेही तीच होती. ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम होते. डागा हॉस्पिटलमधील बांधकाम होते. शासकीय इमारतीचे बांधकाम होते असे विभागीय प्रतिनिधीने समितीला अवगत केले.

This lacuna has come before this Committee because the department has not submitted Note of Error. ४८ लाख रुपये इकडे कमी केले असते तर ५२ लाख रुपयांची चूक ४ लाख रुपयांवर आली असती असे समितीने मत व्यक्त केले असता, हत्यारे व साहित्य यांमध्ये ३ लाख ८१ हजार रुपये वजा झाले आहेत. ५२ लाख रुपये बरोबर मॅच होतात. हत्यारे व साहित्य यांमध्ये ३ लाख ८१ हजार रुपयांचा खर्च कमी झाला आहे. परंतु तो यामध्ये आलेला नाही. पण त्यावरील खर्च कमी झालेला आहे.

३ लाख ८१ हजार रुपये खर्च झाले नाही, याला आधार काय आहे ? I can understand about ४८ लाख, ३ लाख ८१ हजार कुठून दाखवित आहात, आपण ते कोणत्या हेडमध्ये दाखवित आहात ? असे समितीने विचारले असता, २० सी मध्ये आहे. बाब क्रमांक ३३ मध्ये याची फोड ३ ठिकाणी झाली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाची चूक अशी आहे की, You have not bothered about the A.G.'s remarks. नोट ऑफ एरर सादर करुन रेकॉर्डवर सर्व दुरुस्ती करणे आवश्यक होते. आपल्याकडे एजींच्या रिमार्कनंतर रिकन्सिलिएशनच्या संदर्भात फॉलोअप करण्याची पध्दत नाही का ? आपण हे सर्व केले पाहिजे होते. आपण असे केले असते तर हे सर्व विषय उपस्थितच झाले नसते. एका ठिकाणी ३ लाख रुपये, एका ठिकाणी ४८ लाख रुपये तर एका ठिकाणी ५२ लाख रुपये असे आहे. आपण सर्व बाबींच्या संदर्भात रिकन्सिलिएशन केले असते तर विषयच संपला असता, हे समितीपर्यंत आलेच नसते. रिकन्सिलिएशन बंधनकारक नाही का ? बंधनकारक आहे तर मग का होत नाही ? अशी समितीने विचारणा केली असता, रिकन्सिलिएशन होणे बंधनकारक आहे. जिल्हा स्तरावर या संदर्भात थोडे दुर्लक्ष होत होते. त्यामुळे आम्ही दिनांक २८ डिसेंबर, २०१७ ला विभागीय आयुक्तांना या संदर्भातील स्पेसिफिक जबाबदारी दिली आहे. परिपत्रकही काढले आहे. आता यामध्ये हळुहळू सुधारणा होत आहे. साधारणत: रिकन्सिलिएशन जूनच्या शेवटपर्यंत झाले पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

रिकन्सिलिएशन करण्यात आले नसेल तर रक्कम द्यायची नाही, असे शासन निर्णयामध्ये आहे का? असे समितीने विचारले असता, विभागाने असा शासन निर्णय काढला आहे की, सदर बाबतीत विभागीय आयुक्तांना जबाबदारी दिली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

The grant cannot be stopped, मात्र त्यांनी तसे फॉलो केले पाहिजे. शेवटी जबाबदारी जिल्हा नियोजन अधिकाऱ्यांची आहे, त्यांना सर्व व्यवस्था सरळ करायची असेल तर त्यांनी तसे बंधन आणून दुरुस्ती करता येईल असे समितीने मत व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी

जिल्हा योजना नागपूर मागणी क्रमांक ओ-३८

प्रधानशीर्ष ३४५१-सचिवालय-आर्थिक सेवा, १०१-नियोजन आयोग, नियोजन मंडळ, इतर जिल्हा योजना

अभिप्राय :-

३.१२ याखाली रुपये १३.७२ कोटी एवढ्या रक्कमेची मूळ तरतूद होती त्यात रुपये ३.४१ कोटींचे पुनर्विनियोजन करण्यात आले होते. या योजनेतंर्गत रुपये १९.९३ लाखाचा अधिक खर्च झालेला आहे. याबाबत साक्षीच्यावेळी खुलासा करण्यास समितीने सांगितले असता अधिकचा खर्च झाला नसून खर्चाची नोंद करताना चूक झालेली आहे, असे स्पष्ट करण्यात आले. या बाबीकरीता लेखाशीर्ष उपलब्ध नसल्यामुळे इतर लेखाशीर्षामध्ये समावेश करण्यात आला. सन २००८ पासून जिल्हा नियोजन समितीचा आराखडा तयार करण्यात आला त्यावेळी सर्वच जिल्हा योजनांना लेखाशीर्ष मिळू शकले नाही. ज्या योजनांना लेखाशीर्ष नसतो अशा सर्व योजनांचा समावेश इतर जिल्हा योजना लेखाशीर्षा अंतर्गत करण्यात येतो, अशी माहिती समितीस प्राप्त झाली.

शिफारस :-

३.१३ ज्या योजना मंजूर आहेत त्यापैकी काही योजनांना स्वतंत्र लेखाशीर्ष उपलब्ध झालेले नाही. ही रक्कम इतर जिल्हा योजनांच्या लेखाशीर्षामध्ये अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आली आहे. समितीचे असे मत झाले की, स्वतंत्र लेखाशीर्ष नाही अश्या कोणत्याही योजना असू नयेत. कोणत्याही लेखाशीर्षामध्ये ठोक अनुदान असता कामा नये. ज्या योजनांना शासनाने मान्यता दिलेली आहे त्या योजनांकरीता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडले गेल्यास, त्या खर्चाचा मेळ करणे शक्य होते. यादृष्टिने ज्या जिल्हांमध्ये इतर जिल्हा योजनांमधून निधी खर्च होत आहे व त्या जिल्द्यामध्ये मागणी आहे तेथे त्या योजनांकरीता स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यात यावे व याकरीता विभागांनी लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावेत अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०२-नागरी आरोग्य सेवा-इतर वैद्यकीय पध्दती, १०१-आयुर्वेदीक, आयुर्वेद/युनानी दवाखाने बांधणे यासाठी जिल्हा परिषदांना अनुदान

अभिप्राय :-

३.१४ या लेखाशीर्षाखाली अनुदानातून रुपये २० लाख जास्तीचा खर्च करण्यात आला आहे. दवाखान्याच्या बांधकामाकरीता मूळ तरतूद १० लाख रुपयांची होती असे असताना देखील ३० लाख रुपयांचा प्रत्येक्ष खर्च दर्शवून अधिक खर्च झाल्याचे दिसून येत आहे. साक्षीच्यावेळी असे निदर्शनास आले की, विभागाने चुकीची नोंद केल्यामुळे ती दुरुस्त करण्याकरीता चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास वेळेत सादर केलेला नाही तसेच खर्चमेळा देखील वेळेवर केलेला दिसत नाही.

शिफारस :-

३.१५ समितीपुढे हा मुद्दा उपस्थित होण्याचे कारण असे दिसते की, विभागांनी त्यांच्या लेख्यामध्ये चुकीची नोंद केल्यामुळे अधिक खर्च केलेला दिसत आहे. वास्तविक पाहता विभागाकडून ज्यावेळेस खर्चमेळ करण्यात येतो त्यावेळेस ही बाब त्यांच्या निदर्शनास येणे आवश्यक होती. खर्चमेळ विहित कालावधीत न केल्यामुळे केलेली चुकीची नोंद देखील विभागाच्या लक्षात आली नाही. त्यामुळे त्यांनी हस्तांतरण नोंद व चुकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर केला नसल्याचे दिसून येते. विभागाच्या अधिकाऱ्यांनी खर्चमेळ, हस्तांतरण नोंद तसेच चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव विहित मुदतीत केला असता तर या शुल्लक बाबीकरीता समितीचा वेळ वाया गेला नसता. ही विभागाची अक्षम्य चुकच आहे. त्यामुळे ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी खर्चाचा ताळमेळ तसेच चुकीच्या नोंदीचा प्रस्ताव महालेखापाल कार्यालयास सादर करण्यास हलगर्जीपणा केला आहे त्यांचेवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०२-नागरी आरोग्य सेवा, इतर वैद्यकीय पध्दती, १०१-आयुर्वेद व युनानी दवाखान्यांची परिक्षण व दुरुस्ती

प्रधानशीर्ष ४२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च, ०३-वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन, १०५ विषम चिकित्सा, रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री खरेदी करणे

अभिप्राय :-

३.१६ उपरोक्त दोन्ही अनुदानाबाबत खुलासा करताना सन २०१४-१५ मध्ये राज्य स्तरावरुन वैद्यकीय शिक्षण विभागाकडून डीएमआर ची खरेदी झाली नाही. त्यामुळे मुंबई, नागपूरसह राज्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये प्रश्न उपस्थित झाला. त्यानंतर खरेदीचे अधिकार बदलण्यात येऊन डिन यांना रुपये ३ लाखाऐवजी रुपये २५ लाखापर्यंतचे खरेदीचे अधिकार देण्यात आले. या अनुदानामधून रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री खरेदी, डेंन्टल कॉलेज व आयजीएमसीकरीता खरेदी करण्यात आली. रुपये ३१.९ लाखांचा जास्तीचा खर्च झाल्याचा महालेखापालांचा आक्षेप होता. तथापि, जास्त खर्च झाला नसल्याचे विभागाने समितीस सांगितले. या साक्षीच्यावेळी विभागाने खर्चमेळ केलेला नसल्याचे निदर्शनास आले. यापूर्वी देखील या विभागाची साक्ष घेतली असता खर्चमेळ न केल्याची बाब देखील समितीच्या निदर्शनास आली होती.

रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री खरेदी करण्यासाठी प्राप्त झालेला निधी विभागास खर्च करता आलेला नाही. त्यामुळे रुपये १.३७ कोटी एवढा निधी अखर्चीत राहिला आहे.

शिफारस :-

३.१७ विषम चिकित्सा रुग्णालयासाठी यंत्र सामुग्री व साधन सामुग्री खरेदी करण्याकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (जीएमसी), आयजीएमसी व डेंन्टल कॉलेजकरीता जेवढी तरतूद करण्यात आली होती तेवढी तरतूद देखील विभागास उपरोक्त कामाकरीता खर्च करता आली नाही. वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य या सारख्या सामाजिक महत्वाच्या विभागांनी त्यांना शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान योग्य कारणाकरीता खर्च करता येऊ नये यामध्ये विभागाची अकार्यक्षमता दिसून येते. यास विभागाची सर्व यंत्रणा जबाबदार आहे. यापुढील काळात सामाजिक महत्वाच्या बाबीकरीता प्राप्त झालेला निधीचा योग्य विनियोग होईल याबाबत विभागाने दक्षता घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

प्रधानशीर्ष ४०५९-सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, कार्यालयीन इमारती, ५१-बांधकाम खर्च, आस्थापना खर्च,

प्रधानशीर्ष ४५१५-इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, इतर जिल्हा योजना,

अभिप्राय :-

३.१८ उपरोक्त अनुदानाच्या मागण्यांमध्ये दोन ठिकाणी बचत व एका ठिकाणी अधिक खर्च झाल्याचे निदर्शनास आले. ५३-मोठ्या बांधकामांवर त्याच योजनांवर खर्च झाला आहे. त्यासाठी रुपये ४८.६८ लाख खर्च झाल्याचे दिसून येते. हत्यारे व साहित्ये यामध्ये रुपये ३.८१ हजार एवढा कमी खर्च दाखविण्यात आला आहे. समितीने विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता विभागाने चूकीच्या दुरुस्तीचा प्रस्ताव सादर करुन लेख्यात झालेल्या खर्च मेळासंबंधीच्या कामाचा आढावा घेतल्याचे दिसून आले नाही. विभागाने वेळोवेळी खर्चमेळ्याचे काम विहित वेळेत पूर्ण केले असते तर महालेखापालांचे आक्षेप आले नसते. खर्चमेळाचे काम करणे बंधनकारक असतानाही विभागाकडून ही बाब दुर्लक्षित केली गेली.

शिफारस :-

३.१९ **सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च, कार्यालयीन इमारती, ५१-बांधकाम खर्च, आस्थापना खर्च व इतर ग्रामविकास कार्यक्रमावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, इतर जिल्हा योजना या खालील तरतूदीमध्ये झालेला अधिक खर्च तसेच काही उद्दिष्टांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या निधीमध्ये बचत झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याबाबत महालेखापालांनी आक्षेप घेतले आहेत. विभागाने खर्च मेळ्याचे काम विहित वेळेत न केल्याने तसेच महालेखापालांच्या आक्षेपानंतरही त्यांची पूर्तता करण्याबाबत आढावा न घेतल्याने लोकलेखा समिती समोर खर्चमेळा संबंधात काही मुद्दे उपस्थित झाले. खर्चमेळाचे काम होणे बंधनकारक असतानाही जिल्हा स्तरावर याबाबत दुर्लक्ष होत आहे. यासंदर्भात विभागीय आयुक्तांवर खर्चमेळाच्या कामाची जबाबदारी सोपविण्यात आली असून त्याबाबतचे परिपत्रकही निर्गमित करण्यात आले आहे. त्यामुळे विभागीय आयुक्तांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी यथायोग्य पार पाडावी व यापुढील काळात खर्च मेळा वा चुकीच्या नोंदीच्या प्रस्तावाबाबत कोणताही आक्षेप येणार नाही, याची दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

गृहनिर्माण विभाग

४.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाच्या **अनुदान क्र. क्यु-३** यामधील शीर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२४ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०६) (०३) राजीव आवास योजनेसाठी तरतूद ५ लाखाहून अधिक लोकसंख्येच्या शहरांसाठी प्रति डी यु ५० टक्के केंद्र हिस्सा मुळ- ३०००० .०० पुनर्विनियोजन (-) ३०००० .००	--	--	--	योजना प्रत्यक्ष अमलात आली नाही.

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(रूपये लाख)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ क्र.६२५ मागणी क्र.क्यु-३ २२१६-गृहनिर्माण ८०- सर्वसाधारण १०३-गृहनिर्माण मंडळे,महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३(०१)(०६) झोपडपट्टी स्वच्छता कामे झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचीत जातींना नागर सुविधा पुरविणे (२२१६ २६२८) मुळ अनुदान - ५०,००.०० प्रत्यार्पित रक्कम (-)५०,००.००	५०.००	--	५०.००	सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात या लेखाशिर्षाखाली रु.५०.०० कोटीची तरतूद होती. तथापि, म्हाडाकडून याबाबत सविस्तर प्रस्ताव (प्रशासकीय मंजूरीसह) प्राप्त न झाल्यामुळे तसेच मागील वर्षाची उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे, निधीस वित्त विभागाची मान्यता मिळू शकली नाही.

गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

(3)

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२५ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०५) (०२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान-एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (सर्वसाधारण योजना) (केंद्र शासन हिस्सा) (८०%) मुळ- ३०००.०० पुनर्विनियोजन (-) २२५२०.२१	७४७९.७९	७४७९.७९	-	जे.एन.एन.यु.आर.एम / आय.एच.एस.डी.पी. योजना ही मार्च,२०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष होते. सन २०१४-१५ मध्ये प्रगतीपथावर व पूर्ण होणाऱ्या घरकुलांसाठी फक्त खर्च करण्यात आलेला आहे. आणि त्यानुषंगाने उदिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. उद्दिष्टाचे - १.९१ टी - २५%

गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२५ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०५) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान-शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे (सर्वसाधारण योजना) (केंद्र शासन हिस्सा) (५०%) मुळ- २००००.०० पुनर्विनियोजन (-) १६१११.५७	३८८८.४३	३८८८.४३	-	जे.एन.एन.यु.आर.एम / आय.एच.एस.डी.पी. योजना हि मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष होते. सन २०१४-१५ मध्ये प्रगतीपथावर व पूर्ण होणाज्या घरकुलांसाठी फक्त खर्च करण्यात आलेला आहे. आणि त्यानुषंगाने उदिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. उद्दिष्टाचे १. वाढी २० १.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

(5)

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२५ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०४) (०१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान- शहरी गरीबांना मूलभूत सुविधा पुरविणे (सर्वसाधारण योजना) (केंद्र हिस्सा) (२५%) मुळ- १००००.०० पुनर्विनियोजन (-) ८४६६.८६	१५३३.१४	१५३३.१४		जे.एन.एन.यु.आर.एम / आय.एच.एस.डी.पी. योजना हि मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष होते. सन २०१४-१५ मध्ये प्रगतीपथावर व पूर्ण होणाज्या घरकुलांसाठी फक्त खर्च करण्यात आलेला आहे. आणि त्यानुषंगाने उदिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. 15 %

(५)

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(रूपये लाख)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ क्र.६२६ मागणी क्र.क्यु-३ २२१६-गृहनिर्माण ८०- सर्वसाधारण १०३-गृहनिर्माण मंडळे,महामंडळे इत्यादींना सहाय्य १०३(०१)(०१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण व (०४) गृहनिर्माण योजनेला सहाय्यक अनुदान (पायाभूत सुविधा) (२२१६ ०८१५) मुळ अनुदान - १००.०० मान्य - १,२५,००,०० 12600.00 प्रत्यार्पित रक्कम ४५,००.००	१२६.००	८१.००	४५.००	शासनाने म्हाडास दोन टप्प्यात रू.८१.०० कोटी व रू.४५.००कोटी असे निधीचे वितरण केले.पहिला टप्प्यातील निधी खर्ची पडला तथापी, दुस-या टप्प्यात म्हाडाचा प्रस्ताव(प्रशासकीय मान्यतेसह) शासनास उशिरा म्हणजे दि.२७/०३/२०१५ च्या पत्राने प्राप्त झाल्यामुळे रू.४५.०० कोटी निधीचे वितरण म्हाडास दि.३१/०३/२०१५ रोजी करण्यात आले.मात्र वेळे अभावी,सदर निधी म्हाडा कडून खर्च होवू शकला नाही.यास्तव म्हाडा प्राधिकरणाने रू.४५.०० कोटी एवढी रक्कम प्रत्यार्पित केली आहे. 125

(6)

(६)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र.

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ.क्र. प्रधान शिर्ष, मागणी क्रमांक इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	स्पष्टीकरण
पृष्ठ क्रमांक ७४५ मागणी क्रमांक क्यू-३ "२२१६ गृहनिर्माण-३१-साहाय्यक अनुदाने (०३) (०६) नवीन चंद्रपूर शहराचा विकास (२२१६ ११०२). (पंचवार्षिक योजनांतर्गत)" मूळ ७५.०० पुनर्विनियोजन - ३४.५९	७५.००	४०.४१	(-) ३४.५९	नवीन चंद्रपूर शहराचा विकास या योजनेअंतर्गत आवश्यक निधी प्रथम म्हाडाने खर्च करावा व त्या खर्चाची प्रतिपुर्ती शासनाकडून केली जाईल, असा निर्णय शासन स्तरावर दिनांक ६ ऑगस्ट, २००८ रोजीच्या शासन पत्रानुसार घेण्यात आला आहे. दिनांक ३१ मार्च २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार म्हाडाने खर्च केलेली रक्कम रु.४०.४१ कोटी सन २०१५-२०१६ मध्ये म्हाडास देण्यात येऊन रु.७५.०० कोटी एकूण अर्थसंकल्पित तरतुदीपैकी उर्वरित रु.३४.५९ कोटी तरतूद प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(7)

(८)

गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२६ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०४) (०२) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (सर्वसाधारण योजना) (राज्य हिस्सा) (१०%) मुळ-५०००.०० पुनर्विनियोजन (-) ४१६७.६८	८३२.३२	८३२.३२	-	जे.एन.एन.यु.आर.एम / आय.एच.एस.डी.पी. योजना हि मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष होते. सन २०१४-१५ मध्ये प्रगतीपथावर व पूर्ण होणाज्या घरकुलांसाठी फक्त खर्च करण्यात आलेला आहे. आणि त्यानुषंगाने उदिष्ट पूर्ण होऊ शकले नाही. अनुदान 16 %

(४)

(८)

गृहनिर्माण विभाग/गृनिधो-२

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२६ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण १०३ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०३ (०४) (०४) जेएनएनयुआरएम - जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (सर्वसाधारण योजना) (राज्य हिस्सा) (१०%) मुळ - २५००.०० पुनर्विनियोजन (-) १६३६.६२	८६३.३८	८६३.३६	(-) ०.०२	जे.एन.एन.यु.आर.एम / आय.एच.एस.डी.पी. योजना हि मार्च २०१५ पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष होते. सन २०१४-१५ मध्ये प्रगतीपथावर व पूर्ण होणाज्या घरकुलांसाठी फक्त खर्च करण्यात आलेला आहे. आणि त्यानुषंगाने उदिष्ट पूर्ण होऊ शकले नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखा अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे स्पष्टिकरण दर्शविणारे विवरणपत्र

(10)

रुपये लाखात

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ. क्र. प्रधान शीर्ष, मागणी क्र. इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे स्पष्टिकरण
पृ. क्र. ६२७ क्यू-३ २२१६, गृहनिर्माण ८० सर्वसाधारण ८०० इतर ,खर्च (००) (०५) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला उपकराच्या वसुलीची रक्कम देणे. मूळ ५०,००.०० पुनर्विनियोजन (-) ७,५०.००	४२,५०.००	४२,५०.००	०.००	मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना निधीत जमा करण्याकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाला उपकराच्या वसुलीची रक्कम देण्याबाबत ५०,००.०० लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. त्यापैकी वित्त विभागामार्फत निधी वितरणाच्या मर्यादेमध्ये १५ % रक्कम कपात करण्यात आली असल्याने रु. ७,५०.०० लक्ष इतकी रक्कम पुनर्विनियोजित दर्शविण्यात आली आहे.

५४५

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र

(११)

लेखाशिर्ष	एकुण अनुदान	प्रत्यक्ष खर्च रु.लक्षात	अधिक खर्च (+) बचत (-)	शेरा
पृष्ठ क्रमांक -६२७ मागणी क्रमांक क्यू-३ २२१६ गृहनिर्माण ८० सर्वसाधारण ८०० इतर खर्च ८०० (०१) (०९) महाराष्ट्र निवारा निधीकरीता अंशदान मुळ - १५००.०० पुनर्विनियोजन (-) ३००.००	१२००.००	१२००.००	-	महाराष्ट्र निवारा निधीबद्दल शासनाचे योगदान १००.०० कोटी आहे. सदर योगदान पुढीलप्रमाणे प्राप्त झाले.रु.४०.०० कोटी (२०१२.१३) रु.४८.०० कोटी (२०१३-१४) रु.१२.०० कोटी (२०१४-१५) सन २०१४-१५ मध्ये शासकीय अनुदान महाराष्ट्र निवारा निधीसाठीची तरतूद अतिरिक्त झाल्याने रु.३.०० कोटी अतिरिक्त दिसत आहे.

(११)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र.

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबीचा संदर्भ, पृ.क्र. प्रधान शिर्ष, मागणी क्रमांक इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	स्पष्टीकरण
पृष्ठ क्रमांक (७४७) मागणी क्रमांक क्यू-३ "२२१६ गृहनिर्माण-८०-सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महापालिका इत्यादींना सहाय्य, १०३ (०३) (१२) केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाकडून राज्यातील विडी कामगारांना संघटित करण्यासाठी अनुदान (२२१६ २७१७)"	२,००.००-		(-) २,००,०००	वर्ष २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्याने अर्थसंकलिपत तरतूद खर्च होवू शकली नाही. सबब रु.२,००.०० कोटी अर्थसंकलिपत तरतूद संपूर्णत: प्रत्यार्पित करण्यात आली.
मूळ २,००.०० पुनर्विनियोजन -२,००.०० १२				

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र.

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ.क्र. प्रधान शिर्ष, मागणी क्रमांक इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	स्पष्टीकरण
पृष्ठ क्रमांक (७४७) मागणी क्रमांक क्यू-३ "२२१६ गृहनिर्माण-८०-सर्वसाधारण १०३, गृहनिर्माण मंडळे, महापालिका इत्यादींना सहाय्य, १०३ (०३) (०८) विडी कामगारांना घरकुलासाठी अर्थसहाय्य (२२१६ १२०२)" मूळ १,००.०० पुनर्विनियोजन -१,००.०० (13)	१,००.०० (33)	---	(-) १,००.००	केंद्र शासनाच्या श्रम मंत्रालयाव्दारे ज्या विडी कमगारांच्या घरकुलासाठी अनुदान वितरीत केले जाते त्या घरकुलांना राज्य शासनाकडून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणामार्फत निधीच्या उपलब्धनेनुसार टप्प्या-टप्प्याने अर्थसहाय्य वितरीत केले जाते. वर्ष २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाकडून राज्यातील विडी कामगार घरकुलासाठी अनुदान वितरीत न झाल्याने राज्य शासनाकडून अर्थसंकल्पित तरतूद खर्च होवू शकली नाही. मागणी अभावी सदर संपूर्ण रक्कम रु.१,००.०० कोटी प्रत्यार्पित करण्यात आली.

* केंद्राकडून या प्रकारात १ UC's १.

२४६

गृहनिर्माण विभाग / गृनेधो-१

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र.

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ.क्र. प्रधान शिर्ष, मागणी क्रमांक इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	स्पष्टीकरण
पृष्ठ क्रमांक ६२७ मागणी क्रमांक क्यू-३ "२२१६ गृहनिर्माण-३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (०१) (०१) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक २ अंतर्गत लाभार्थ्यांनी (सर्वसाधारण) घेतलेल्या कर्जावरील व्याजाचे प्रदान करण्यासासाठी सहाय्य (२२१६ २६५५). (पंचवार्षिक योजनांतर्गत)" मूळ १०.०० पुनर्विनियोजन -१०.०० (14)	१०.००	--	(-) १०.००	मागणी अभावी मार्च, २०१५ मध्ये रु.१०.०० लाख इतका संपूर्ण निधी प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

(14)

(३५)

(34)

५४९

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगर)

(रूपये लाखात)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ.क्र. ६२८ **मागणी क्र.क्यु-३** २२१६-गृहनिर्माण ०२-नागरी गृहनिर्माण ८००-इतर खर्च ८००(०३)(०७) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन) पूर्व उपनगर (२२१६ १३२७)				सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये अपर जिल्हाधिकारी,पूर्व उपनगरे कार्यालय व या कार्यालयाच्या अधिनस्त उपजिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रिक्त पदे न भरल्यामुळे,तसेच कार्यालयातील गाड्या निर्लेखित केल्यामुळे दुरूस्ती खर्चात तसेच पेट्रोल डिझेल खर्चात बचत झाल्याने, माहे मार्च २०१५ मध्ये रू. २८४.१५ लाख -एवढी रक्कम अपर जिल्हाधिकारी (अति /निष्का) पूर्व उपनगरे या कार्यालयाने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.
मुळ अनुदान - ९६५.७७ प्रत्यार्पित रक्कम (-) २८४.१५	९६५.७७	६८१.६२	-----	

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पूर्व उपनगर)

(रूपये लाखात)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ.क्र. ६२८ **मागणी क्र.क्यु-३** २२१६-गृहनिर्माण ०२-नागरी गृहनिर्माण ८००-इतर खर्च ८००(०३)(०७) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन) पूर्व उपनगर (२२१६ १३२७)				सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये अपर जिल्हाधिकारी,पूर्व उपनगरे कार्यालय व या कार्यालयाच्या अधिनस्त उपजिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रिक्त पदे न भरल्यामुळे,तसेच कार्यालयातील गाड्या निर्लेखित केल्यामुळे दुरूस्ती खर्चात तसेच पेट्रोल डिझेल खर्चात बचत झाल्याने, माहे मार्च २०१५ मध्ये रू. २८४.१५ लाख -एवढी रक्कम अपर जिल्हाधिकारी (अति /निष्का) पूर्व उपनगरे या कार्यालयाने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.
मुळ अनुदान - ९६५.७७ प्रत्यार्पित रक्कम (-) २८४.१५	९६५.७७	६८१.६२	-----	

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगर)

(रूपये लाखात)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ.क्र. ६२८ मागणी क्र.क्यु-३ २२१६-गृहनिर्माण ०२-नागरी गृहनिर्माण ८००-इतर खर्च ८००(०३)(०६) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन) पश्चिम उपनगर (२२१६ १३०९) मुळ अनुदान - ७५९.१९ प्रत्यार्पित रक्कम (-) १६६.५९	७५९.१९	५९२.६०	-----	सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये अपर जिल्हाधिकारी,पश्चिम उपनगरे कार्यालय व या कार्यालयाच्या अधिनस्त उपजिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रिक्त पदे न भरल्यामुळे,तसेच कार्यालयातील गाड्या निर्लेखित केल्यामुळे दुरूस्ती खर्चात तसेच पेट्रोल डिझेल खर्चात बचत झाल्याने, माहे मार्च २०१५ मध्ये रू.१६६.५९ लाख -एवढी रक्कम अपर जिल्हाधिकारी (अति /निष्का) पश्चिम उपनगरे या कार्यालयाने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

५५२

परिशिष्ट

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या विनियोजन लेखे अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे विवरणपत्र -

(अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर) (रूपये लाखात)

बाबींचे संक्षिप्त	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च(+)/ बचत (-)	अभिप्राय
पृ.क्र. ६२८ मागणी क्र.क्यु-३ २२१६-गृहनिर्माण ०२-नागरी गृहनिर्माण ८००-इतर खर्च ८००(०३)(०५) अपर जिल्हाधिकारी (अतिक्रमण/ निष्कासन) मुंबई शहर (२२१६ १२८३) मुळ अनुदान - २०७.२८ प्रत्यार्पित रक्कम (-) ३५.८६	२०७.२८	१७१.४२	-----	सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये अपर जिल्हाधिकारी,मुंबई शहर कार्यालय व या कार्यालयाच्या अधिनस्त उपजिल्हाधिकारी कार्यालयामध्ये रिक्त पदे न भरल्यामुळे,तसेच कार्यालयातील गाड्या निर्लेखित केल्यामुळे दुरूस्ती खर्चात तसेच पेट्रोल डिझेल खर्चात बचत झाल्याने, माहे मार्च २०१५ मध्ये रू.३५.८६ लाख -एवढी रक्कम अपर जिल्हाधिकारी (अति /निष्का) मुंबई शहर या कार्यालयाने प्रत्यार्पित करण्यात आली आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-१५ च्या विनियोजन लेखा अहवालातील गृहनिर्माण विभागाशी संबंधित बाबींचे स्पष्टिकरण दर्शविणारे विवरणपत्र

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ. क्र. प्रधान शीर्ष, मागणी क्र. इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे स्पष्टिकरण
पृ. क्र. ६२८ क्यू-३, २२१६, गृहनिर्माण, ८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, ८०० (०४) (०१) महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, २०११ अंतर्गत गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण मूळ १,२५.०१ पुनर्विनियोजन (-) १,२५.०१	१,२५.०१	००.००	१,२५.०१	महाराष्ट्र गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरणासाठी रुपये १,२५.०१ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. परंतू वर्ष २०१४-१५ मध्ये न्यायाधिकरणाची स्थापना होऊ न शकल्याने हा निधी परत करण्यात आला.

बाबींचे संक्षिप्त वर्णन, बाबींचा संदर्भ, पृ. क्र. प्रधान शीर्ष, मागणी क्र. इत्यादी	एकूण अनुदान किंवा विनियोजन	प्रत्यक्ष खर्च	अधिक खर्च (+) बचत (-)	विभागाचे स्पष्टिकरण
पृ. क्र. ६२९ क्यू-३, २२१६, गृहनिर्माण, ८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, (०४) (०२) महाराष्ट्र गृहनिर्माण अधिनियम, २०११ अंतर्गत गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरण मूळ १,२५.०१ पुनर्विनियोजन (-) १,२५.०१	१,२५.०१	००.००	१,२५.०१	महाराष्ट्र गृहनिर्माण अपिलीय न्यायाधिकरणासाठी रुपये १,२५.०१ लक्ष इतकी तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आली होती. परंतू वर्ष २०१४-१५ मध्ये न्यायाधिकरणाची स्थापना होऊ न शकल्याने हा निधी परत करण्यात आला.

(मु.उ. भरोसे)
कक्ष अधिकारी,
गृहनिर्माण विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

साक्ष :-

मागणी क्रमांक- क्यू-३ – गृहनिर्माण विभाग

४.२ मागणी क्रमांक क्यु-३ संदर्भात समितीने दिनांक २२ जानेवारी २०१८ रोजी गृहनिर्माण विभागाच्या सचिवांनी तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

"२११६ गृहनिर्माण",८० सर्वसाधारण,१०२ गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य १०२ (०६)(०३), या शिर्षांतर्गत विभागाच्या बँक खात्यामध्ये पार्किंग झोन दिसत असून. यामध्ये ९० टक्के रक्कम समर्पित करण्यात आलेली आहे. नियोजन नसताना तरतूद करण्यात येते आणि नंतर पुन्हा तरतूद केलेली रक्कम समर्पित करण्यात येत आहे. विभागाने ट्रिब्युनलची स्थापना केलेली नसताना पैशांची तरतूद केली आहे अशा प्रकारचे अनेक मुद्दे समितीपुढे आलेले आहेत. त्यामुळे समितीचे असे मत आहे की, यामध्ये निधीची तरतूद करण्याचे कारण काय आहे ? तसेच जरी तरतूद केली तर त्यामधील काही रक्कम खर्च व्हावयास पाहिजे होती. अशा प्रकारची रक्कम खर्च न करता ती संपूर्णपणे समर्पित करण्यात आली आहे याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने विभागास सूचित केले असता रिअल इस्टेट ट्रिब्युनलसाठी प्रोव्हिजन करण्यात आली होती. यामध्ये जो ॲक्ट आहे त्याला प्रेसिडेंशिअल ॲसेट मिळेल परंतु त्या ॲक्टला ॲसेट मिळाली नाही. कारण मध्यंतरीच्या काळामध्ये रेरा कायद्याचा विषय समोर आला. त्यामुळे त्यासाठी करण्यात आलेली तरतूद समर्पित करावी लागली काही ठिकाणी वेतनाची तरतूद समर्पित करावी लागली. तसेच जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी नवीकरण अभियान- एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (सर्वसाधारण योजना)(केंद्र शासन हिस्सा ८०%) या उप शिर्षाअंतर्गत बी.एस.यु.पी. आणि आय.एच.एस.डी.पी. च्या योजना आहेत. या योजनाचे उद्दिष्ट सन २०१४ मध्ये पूर्ण झालेले नव्हते त्यामुळे त्या योजना रद्द करण्यात आल्या होत्या त्यानंतर काही नवीन योजना आल्या होत्या. तसेच ज्या योजना सुरू होत्या त्या योजनांचे काम करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली होती. परंतु ज्या ठिकाणी योजना सुरू करण्यात आलेली नव्हती त्या ठिकाणची तरतूद समर्पित करावी लागली असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

"मागणी क्रमांक १०३ (०१)(०६) झोपडपट्टी स्वच्छता कामे झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे" या शिर्षांतर्गत ५० लाख रुपयांच्या कामाचा प्रश्न असून ५० लाख रुपयांच्या जबाबदारीचा प्रश्न आहे हे काम स्वच्छतेचे आहे. यामध्ये युसी दिली नाही म्हणून फायनान्स रिलीज केला नसल्याचे नमूद केले आहे तर यामध्ये युसी न देण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता युसी देण्यामध्ये जी तत्परता दाखवायला पाहिजे होती, ती दाखविली नाही. कार्यक्रम पूर्ण करण्यासाठी ते ऑन गोईंग प्रोजेक्टवर खर्च करता आले नाही त्याची युसी आली पाहिजे होती, ती आली नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

युसी न देणा-यावर कारवाई करण्यात आली का ? आयएचएसडीपीमध्ये मोठया प्रमाणावर प्रत्यार्पित केले. ऑन गोईंग प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणात तरतूद केली होती. नियोजन नसताना कामाला सुरूवात नसताना त्याकरिता मोठया प्रमाणावर तरतूद केल्यावर त्याचे पैसे प्रत्यार्पित करण्याची वेळ येते असे मत समितीने व्यक्त केले.

"लेखा शिर्ष १०३ (०१)(०१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण व (०४) गृहनिर्माण योजनेला सहाय्यक अनुदान (पायाभूत सुविधा)" यामध्ये दोन टप्प्यांमध्ये निधीचे वितरण झाले होते. पहिल्या टप्प्यात १.८१ कोटी रुपये वितरित करण्यात आले असून दुस-या टप्प्यात ४५ लाख रुपये निधी वितरित करण्यात आला होता. विभागाकडे हा निधी २७ मार्च रोजी आला, म्हाडाला तो निधी दिनांक ३० मार्च रोजी वितरित करण्यात आला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले असता निधीची मागणी कधी केली असून १२६ कोटी रुपयांचे नियोजन नव्हते का ? विभागाला खर्च करण्यासाठी तरतूद केली, पुरवणी मागण्यांमधून १२६ कोटी रुपयांचा निधी मागितला त्यापैकी ८१ कोटी रुपये खर्च केले असून ४५ कोटी रुपयांचे नियोजन नव्हते का अशी पृच्छा समितीने केली. यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, नियोजन केले होते त्यातून लोकप्रतिनिधींकडून कामाच्या सूचना येत होत्या, त्याप्रमाणे कामही करीत होतो.

म्हाडाला आपण ३१ मार्च रोजी पैसे दिल्यानंतर ते प्रत्यार्पित करणारच ना ? ते पैसे खर्च करू शकत नाहीत. दिनांक २७ मार्च रोजी तुम्हाला पैसे मिळण्याचे कारण काय, आपण वित्त विभागाकडे मागणी केली होती काय असेही समितीने विचारले असता त्यावेळी सन २०१४-२०१५ च्या निवडणुकीपूर्वीचा आचारसंहितेचा कालावधी होता. याबाबत समितीला सर्व खातेनिहाय, स्मरणपत्रे, प्रस्तावाचा दिनांक अशी सविस्तर माहिती देण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

दिनांक ०१ नोव्हेंबर २०१५ रोजी नवीन शासन आले. दिनांक ३० मार्च रोजी म्हाडाला पैसे दिल्यानंतर हे पैसे खर्च करण्याकरिता हेल्पलेस होते, ते या निधीचे युटिलायजेशन करू शकले नाहीत. १२६ कोटी रुपयांपैकी ८१ कोटी रुपये खर्च झाले. ४५ कोटी रुपये ३० मार्च रोजी मिळाल्यामुळे अखर्चित राहिले. अखर्चित राहिल्यामुळे तो निधी म्हाडाला सरेंडर करावा लागला. आपण प्रस्ताव सादर कधी केला ? आपण वेळेवर प्रस्ताव सादर केला आणि त्यांनी पैसे रिलीज केले नाही तर तुमचा दोष नाही असे समितीने विदित केले असता याबाबतची सर्व सविस्तर

माहिती समितीला सादर करण्यात येईल.पहिल्या टप्प्याचे सर्व पैसे खर्च केले असून यापुढे याची काळजी घेतली जाईल. बिल टाकून सुद्धा त्यांना पैसे काढता आले नाहीत असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

याची मागणी कुठेतरी एकत्रितपणे केली असणार, एकत्रितपणे मागणी केल्यानंतर जर दोन टप्प्यात फंड मिळत असेल तर त्याचा योग्य पद्धतीने योग्य वेळेवर पाठपुरावा केला होता का तसेच १२६ कोटी रुपये एकत्रित मागितले होते काय अशी विचारणा समितीने केली. पहिल्या आणि दुस-या टप्प्यात फायनान्सने त्यांना निधी उशिरा दिला का, तसेच जे म्हाडाने खर्च केले त्याचा परतावा होणार. ७५ कोटी रुपयांची तरतूद होते आणि खर्चाचे नियोजन ४० कोटी रुपयांचे करतो. दुस-या टप्प्यात म्हाडाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे उशिरा म्हणजे २७.३.२०१५ च्या पत्राने प्राप्त झाल्यामुळे ४५ कोटीचा निधी वितरणास म्हाडाला दिनांक ३१ मार्च हा दिवस उजाडला असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता स्लम बोर्डाची जी कामे आहेत, ती सर्व आमदार महोदयांची असतात, आमदार महोदयांकडून यादी घेऊन त्यांला प्रशासकीय मान्यता देणे हे सगळे त्यावेळी मार्च महिन्यापर्यंत यादीच झाली नव्हती. यादी आल्या आल्या म्हाडाने त्याला प्रशासकीय मंजूरी देऊन शासनाला पाठविली. त्या प्रक्रियेमध्ये मार्चमध्ये निवडणुका झाल्यानंतर या पाच महिन्यांमध्ये मार्चपर्यंत कोणतीही यादी प्राप्त झाली नाही असा खुलासा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी समितीस सांगितले.

दिनांक २७ मार्च रोजी शासनाला प्रस्ताव पाठविला दिनांक ३१ मार्च रोजी म्हाडाला शासनाने लगेच पैसे रिलीज केले आणि तो प्रस्ताव तुम्ही जेव्हा पाठविता तेव्हा पैसे खर्चायची तयारी असली पाहिजे पैसे खर्च करण्याची जबाबदारी म्हाडाची असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता प्रशासकीय मान्यता देऊन दिलेल्या प्रस्तावानंतर पैसे आले, तसी गरज पडल्याशिवाय ते खर्च करणे देखील योग्य नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा यांनी विदित केले.

दिनांक २७ मार्च रोजी प्रस्ताव दिल्यानंतर पैसे दिले तर ते खर्च होतील का याचा विचार करणे आवश्यक होते असे समितीने विदित केले असता प्रस्ताव अगोदरच तयार करतो त्यावेळी नवीन आमदार महोदय माहे नोव्हेंबरमध्ये आले असे मुख्य कार्यकारी अधिकारी,म्हाडा यांनी अवगत केले.

दिनांक २७ रोजी प्रस्ताव पैसे घेऊन सरेंडर करायला दिला का अशी पृच्छा समितीने केली तसेच त्यांनी एक दिवस आधी प्रस्ताव दिला असता तर दिनांक ३१ रोजी ॲडव्हान्स काढता आला असता असे समितीने विभागास अवगत केले.

"२२१६ गृहनिर्माण -३१ सहाय्यक" अनुदाने (०३) (०६) नवीन चंद्रपूर शहराचा विकास (पंचवार्षिक योजनांतर्गत)" या शीर्षांतर्गत नवीन चंद्रपूरकरिता विभागाने ७५ कोटी रुपयांची तरतूद केली असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता ३४,५९,००० रुपये सरेंडर करण्यात आलेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

रुपये ३४,५९,००० सरेंडर केलेले आहेत. ७५ कोटी रुपयांचे नियोजन करीत असताना आपल्याकडे खर्च होणार की नाही होणार याचे काही नियोजन नव्हते का ? विभागाच्या मागणीप्रमाणे गृहनिर्माण विभागाकरिता ७५ कोटी रुपयांची तरतूद झालेली आहे. म्हाडाला हे काम करायचे होते काम करतील त्याप्रमाणे विभागाने निधीचे नियोजन केले पाहिजे. तरतूद असतानाही त्यांनी केवळ ४० कोटी रुपये खर्च केलेले आहे याचे कारण काय आहे अशी समितीने विचारणा केली असता नियोजन केले होते. तसेच त्याच्यामध्ये एक पाणीपुरवठा योजना होती. त्या योजनेची अंदाजित किंमत ३५ कोटी रुपये होती. त्याच्यामध्ये जो भूसंपादनाचा मेजर कम्पोनंट होता ते भूसंपादन पूर्णपणे झाले नाही. त्यामुळे त्याकरिता असलेला निधी अखर्चित राहिला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. तसेच ३५ कोटी रुपये पूर्ण भूसंपादनाची नसल्याचेही अवगत केले.तसेच २४ कोटी रुपये पाणीपुरवठा योजनेसाठी खर्च झाले पाहिजे होते दहा कोटी रुपये जे आहेत ते भूसंपादनाचे होते. मार्चनंतर अहवाल पास झाल्यामुळे ते झाले असून ते दोन्ही मिळून ३५ कोटी रुपयांचे होते. भूसंपादन झाले नाही, त्यामुळे पाणीपुरवठा योजनेकरिता असलेला निधीही खर्च झाला नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

पाणीपुरवठा योजनेकरिता जमीन अधिग्रहित करायची होती का ? तसेच म्हाडाला प्रथम खर्च करायचे आहे, नंतर रिएम्बर्सड करावयाचे म्हाडाकडे. समितीच्या माहितीप्रमाणे निधीची कमतरता नाही. अगोदर तरतूद करून ठेवली असून जागेचा ठिकाणा नसून, पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सुरूवात नाही तरीही आधीच निधीची तरतूद करावयाची गरज नाही. आपल्याकडे तीन-तीन पुरवणी मागण्या मांडण्याची संधी मिळते. मूळ तरतूद केली हीच चुकीची असल्याचे मत समितीने व्यक्त केले. यावर विभागीय सचिवांनी मागणीप्रमाणे तरतूद करणे आवश्यक नव्हते असे विदित केले.

निधीसाठी काम थांबत नाही म्हाडाला रिएम्बर्समेंट करावयाचे आहे. म्हाडाला स्वत: खर्च करायचे आहे हे सर्व होणार आहे. समितीची भूमिका अशी आहे की, एक्स्पेक्टेड एक्स्पेंडिचरला इतकी मोठी अमाऊंट आपण पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून मान्य करून घ्यावी असे समितीने विभागास अवगत केले असता यापुढे याबाबत काळजी घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

२२१६ गृहनिर्माण, ८० सर्वसाधारण, ८०० (०१) (०९) महाराष्ट्र निवारा निधीकरिता अंशदान या शिर्षांतर्गत ३ कोटी रुपये सरेंडर केले का अशी विचारणा समितीने केली असता निवारा निधीमध्ये १०० कोटी रुपये शासनाकडून अपेक्षित होते. सन २०१२-२०१३ मध्ये ४० कोटी रुपये मिळाले. २०१३-२०१४ मध्ये ४८ कोटी रुपये मिळाले होते. २०१४-२०१५ मध्ये १२ कोटीची तरतूद केली असती तर १०० कोटी रुपये झाले असते. त्याला कपात लागल्यामुळे तेवढे मिळाले असते आता मात्र ते १०० कोटी रुपये मिळालेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

रुपये १२ कोटी, रुपये ४० कोटी, रुपये ४८ कोटी रुपये विभागाला मिळाले होते. ३ कोटी रुपये अतिरिक्त होते, असे समितीचे म्हणणे असल्याचे समितीने विदित केले असता रुपये १०० कोटी पूर्ण झाले म्हणून ३ कोटी रुपये सरेंडर केले असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

"२२१६ गृहनिर्माण मंडळे, महापालिका इत्यादींना सहाय्य, शासनाच्या श्रम मंत्रालयाकडून राज्यातील विडी कामगारांना संघटित करण्यासाठी अनुदान" या शिर्षांतर्गत केंद्र शासनाकडून अनुदान अद्याप प्राप्त न होण्याचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली असतान प्रस्तावच आला नाही तसेच यामध्ये विडी कामगारांसाठी डायरेक्ट ते प्रपोजल द्यायचे आणि त्यांनी तयार करून पाठवायचे असते. ही केंद्र शासनाची मूळ योजना असून यामध्ये राज्याचे २० टक्के अनुदान आणि केंद्राचे ४० टक्के गुंतवणूक असते. या योजनेंतर्गत ५७००० घरे बांधून झालेली असून याबाबत लोकांना माहिती होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

५७००० घरे झाली असे सचिव सांगत आहेत.त्यानंतर आता प्रस्ताव का आले नाही, लोकांना माहिती होते तर त्यावेळी जसे प्रस्ताव आले आता तसे प्रस्ताव का येत नाहीत व पैसे परत का करावे लागले अशी पृच्छा समितीने केली असता लोकांना माहिती होते विडी कामगारांनी सोसायटया तयार करून प्रस्ताव पाठवायचे आहेत. विडी कामगार चंद्रपूर, भंडारा, सोलापूर या भागात असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

एवढा निधी आलेला असून तो परत जात आहे, विभागाने जाहिरात केली पाहिजे. विडीकामगार हे सामान्य लोक असून अशिक्षित आहेत विभागाने प्रचार केला आहे का अशी विचारणा समितीने केली असता ही योजना कामगार विभागाची होती. कामगार विभागाने प्रचार केला की नाही याबाबत कल्पना नसल्याचे तसेच गृहनिर्माण विभाग नोडल एजन्सी म्हणून आपल्या माध्यमातून काम होत होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जाहिरात का केली गेली नाही ? आपण नोडल एजन्सी म्हणून गृहनिर्माण विभागाकडून जाहिरात होणे आवश्यक होते असे मत समितीने व्यक्त केले.

"२२१६ गृहनिर्माण-३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) (०१) (०१) राजीव गांधी ग्रामीण गृहनिर्माण योजना क्रमांक २ अंतर्गत लाभार्थ्यांनी (सर्वसाधारण) घेतलेल्या कर्जावरील व्याजाचे प्रदान करण्यासाठी सहाय्य (पंचवार्षिक योजनांतर्गत)" या शीर्षांतर्गत राजीव गांधी गृहनिर्माण योजना क्रमांक टप्पा ०२ याच्या व्याजाची जबाबदारी विभागाने म्हाडाला दिली होती का अशी विचारणा समितीने केली असता इंटरेस्ट सबमिशन म्हणजे १० टक्क्यापर्यंत व्याजाची जबाबदारी सन २००८ च्या जीआरनुसार दिली असून ५७ कोटी रुपयांचा निवारा निधी शासनाकडे असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच टप्पा -२ निवारा निधीतून ही योजना आहे. ५७ टक्के इंटरेस्ट कंपोजिशन सबमिशन केलेले असून त्याचा फायदा ५६ हजार घरकुलांकरिता झालेला आहे. पीएमएवायमध्ये आता जसे सगळे आहे तो देखील आपण निवारा निधीतून पीएमएवाय, इडब्ल्यूएस, एलआयजी दीड लाख रुपये केंद्र शासन एक लाख राज्य शासनाची सबसिडी दिलेली आहे. एक लाख रुपये तुम्ही तुमच्या निवारा निधीतून व्हायेबिलिटी गॅपसाठी असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी ,म्हाडा यांनी समितीस अवगत केले.

हे तर पीएमएवायचे आहे पण राजीव गांधी टप्पा क्रमांक दोन अंतर्गत हे कर्ज होते. टप्पा क्रमांक १ चे अनुदान होते यावरील व्याजाचे भुगतान विभागाला करायचे आहे असे समितीने सांगितले. तसेच दोन लाख रुपयांच्या कर्जासाठी दहा लाखाची जमीन कशाला गहाण ठेवतील, राजीव गांधी टप्पा- २ मध्ये पूर्ण कर्जही मिळत नाही. ९०,००० रुपयांसाठी आता ते त्यांची जमीन शासनाच्या नावावर का करेल ? तारण का ठेवत बसेल ? याबाबत कायद्यात दुरुस्ती केली पाहिजे अन्यथा हे कर्ज कोणी घेणार नाही. जमिनीएवढी किंमत कर्ज मिळत असेल तर ठीक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता आता पंतप्रधान आवास योजनेमध्ये ही पद्धत नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

टप्पा क्रमांक दोन आला त्यावेळी वाल्मिकी आवास योजना व इंदिरा आवास योजना होती. त्यावेळी राजीव गांधी टप्पा-१, बीपीएल टप्पा-२ हा सर्वसाधारण लोकांसाठी होता त्यामुळे ते आकर्षक होते यापुढे कोणी कर्ज घेणार नाही असे समितीने अवगत केले असता समितीचा मुद्दा रास्त असून तो आपली १० लाख रुपये किंमतीची जमीन गहाण टाकणार नाही असे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच आता व्याजाची रक्कम वाढली असून १० कोटी रुपयांपर्यंत गेली आहे. कर्जाची रक्कम १०० कोटी रुपये असून आपण बँकेला रिईम्बर्स करत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.तसेच जे डिफॉल्टर आहेत त्यांचे पेमेंट करत नसल्याचेही सांगितले.

If the installment is not regular, then you cannot give the interest on the balance amount अशी पृच्छा समितीने केली असता Yes, we cannot because that will be the penalty असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

That will be the fault on the part of beneficiary. जे लोक पहिला हप्ता वेळेवर भरतात त्यांच्या कर्जावरील १० टक्क्यापर्यंतचे व्याज तुम्ही दिले पाहिजे, हे बरोबर आहे का अशी विचारणा समितीने केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी यास सहमती दर्शविली.

जे डिफॉल्टर आहेत त्यांच्याबाबत काय भूमिका घेतली जाते? १ लाख रुपये कर्ज घेतले असेल आणि दरवर्षी १० हजार रुपये मुद्दलाची परतफेड केली जात असेल तर त्या प्रपोर्शनेटमध्ये व्याज दिले गेले पाहिजे. तुम्ही दरवर्षी १० कोटी रुपये सबसिडी देत आहात त्याबद्दल सुद्धा चौकशी करण्यात येते की नाही, दिवसेंदिवस रक्कम कमी झाली पाहिजे, ती वाढली कशी अशी विचारणा समितीने केली असता डिफॉल्टर यांच्याबाबतीत बँक कारवाई करते. तसेच दिवसेंदिवस लाभार्थ्यांची संख्या वाढली असून मुद्दल कमी होत जाईल त्याप्रमाणात व्याज कमी झाले पाहिजे हे समितीचे म्हणणे योग्य असल्याचेही विभागीय सचिवांनी विदित केले.

राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना टप्पा क्रमांक २ करिता लाभार्थी मिळत नाही का अशी पृच्छा समितीने केली असता लाभार्थी संख्या पिकवर पोहोचली असून सुरूवातीला १० हजार होती ती २० हजारपर्यंत पोहोचली आता ती हळूहळू कमी होईल. पंतप्रधान आवास योजना सुरू झाल्यानंतर राजीव गांधी ग्रामीण निवारा योजनेमध्ये कोणी सहभाग घेत नाही. इंटरेस्ट सबव्हेन्शन स्कीम आहे, त्या अंतर्गत एनएचबी, हुडको यांच्याकडून अपफ्रण्ट मिळतो, त्यांचा पूर्ण इएमआय रिकॅल्क्यूलेट होतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना टप्पा क्रमांक २ कालबाहय झाली असून आपली इंटरेस्ट लायबिलिटी ग्रॅज्युअली कमी झाली पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले असता जे डिफॉल्टर आहेत, त्यांच्या दंडात्मक रक्कमेची भरपाई शासन करणार नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ढोबळमानाने अधिक आर्थिक तरतूद विभागाने करू नये तीन वेळा विभागाला पुरवणी मागण्यांची मुभा आहे. आवश्यकता भासली तर पुरवणी मागणी मांडता येईल असे मत समितीने व्यक्त केले.

अभिप्राय व शिफारशी

मागणी क्रमांक क्यु-३ :- गृहनिर्माण विभाग

४.३ २२१६-गृहनिर्माण, ८०-सर्वसाधारण, १०३-गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य, झोपडपट्टी स्वच्छता कामे-झोपडपट्टी क्षेत्रफळात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे (विशेष घटक योजना)

अभिप्राय :-

या संदर्भात समितीच्या साक्षीपुढे असे निदर्शनास आले की, या शीर्षातंर्गत रुपये ५० कोटींचा कामांचा प्रश्न होता व सदरहू काम हे स्वच्छतेसंदर्भात होते. म्हाडाकडून प्रशासकीय मान्यता तसेच उपयोगिता प्रमाणपत्रे प्राप्त झाली नाहीत म्हणून निधी मुक्त केला नसल्याची माहिती प्राप्त झाली. वास्तविक पाहता प्रशासकीय मान्यता व उपयोगिता प्रमाणपत्रे ही विहित मुदतीत प्राप्त होणे आवश्यक होते या तांत्रिक कारणांमुळे वित्त विभागाने निधी मुक्त न केल्याचे दिसून येत आहे.

शिफारस :-

४.३ झोपडपट्टी क्षेत्रात राहणाऱ्या अनुसूचित जातींना नागरी सुविधा पुरविणे हा या योजने मागील मुख्य उद्देश होता.त्याकरीता शासनाने ५० कोटी रुपये तरतूद केली होती. तथापि, म्हाडाकडून प्रशासकीय मान्यता तसेच यापूर्वी केलेल्या कामाची उपयोगीता प्रमाणपत्रे सादर न केल्यामुळे झोपडपट्टीतील स्वच्छता कामांची योजना शासनास यशस्वीरित्या राबविता आली नाही. या प्रशासकीय दिरंगाईस जबाबदार असणाऱ्या म्हाडातील संबंधीत अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाही चा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

२२१६-गृहनिर्माण, ८०-सर्वसाधारण, १०३-गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आणि गृहनिर्माण योजनेस सहाय्यक अनुदान (पायाभूत सुविधा)

अभिप्राय :-

४.५ या योजनेमध्ये दोन टप्प्यात निधीचे वितरण झाले होते. सदरहू निधी हा विभागाकडे २७ मार्च रोजी प्राप्त झाला व म्हाडास तो दिनांक ३० मार्च रोजी वितरीत करण्यात आला. विभागाने यापैकी ८१ कोटी रुपये खर्च केले असून रुपये ४५ कोटीचे नियोजन नव्हते का ? अशी समितीने विचारणा केली. रुपये ४५ कोटी हे ३० मार्च रोजी मिळाल्यामुळे सदरहू निधी अखर्चित राहिला व तो निधी म्हाडाने प्रत्यार्पित केला. दोन टप्प्यामध्ये निधी मिळाला असेल तर विभागाने निधी मिळण्याकरीता योग्य पध्दतीने पाठपुरावा केला होता का अशी समितीने विचारणा केली असता दुसऱ्या टप्प्यातील म्हाडाचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनाकडे २७ मार्च, २०१५ रोजी प्राप्त झाला. त्यामुळे रुपये ४५ कोटीचा निधी म्हाडास दिनांक ३१ मार्च रोजी वितरीत करण्यात आला. म्हाडाने ज्यावेळेस २७ मार्च रोजी शासनास प्रस्ताव पाठविला त्यावेळेस त्यांचेकडे शासनाकडून निधी प्राप्त झाल्यावर खर्च कशाप्रकारे करावयाचा आहे. याबाबतचा आराखडा असणे आवश्यक होते, असे समितीचे मत झाले.

शिफारस :-

४.६ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या आणि गृहनिर्माण योजनेस सहायक अनुदान यामधून पायाभूत सुविधांची कामे करण्यात येतात. सदरहू कामे विशेषत: झोपडपट्टी सुधार मंडळाची कामे असतात व या कामांच्या शिफारशी मा.आमदार महोदयांकडून प्राप्त होत असतात. या शिफारशी म्हाडास प्राप्त झाल्यावर म्हाडाने त्यांना विहित कालावधीत प्रशासकीय मान्यता देणे अपेक्षित असते. या प्रकरणी देखील म्हाडाने दिनांक २७ मार्च रोजी म्हणजेच आर्थिक वर्ष संपण्याच्या अखेरीस प्रस्ताव शासनास पाठविला. ज्यावेळेस म्हाडाकडून शासनास निधी मुक्त करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला त्यावेळेस तो म्हाडाकडून दिनांक ३१ मार्च पूर्वी निधी खर्च होणार व त्या अपेक्षेने त्यांच्याकडे निधी खर्च करण्याची तयारी आहे असे अपेक्षित धरले जाते. त्यामुळे शासनाकडून जरी ३१ मार्च रोजी निधी प्राप्त झाला असला तरी म्हाडातील जबाबदार अधिकाऱ्यांनी यशस्वीपणे सदरहू निधी प्रशासकीय मान्यता मिळालेल्या कामांवर विनियोग होईल याकडे पाहणे गरजेचे होते. या कामात निश्चितच दिरंगाई झालेली आहे आणि यामुळेच रुपये ४५ कोटी एवढी मोठी रक्कम विनाखर्च शासनास प्रत्यार्पित झालेली आहे, असे समितीचे मत झालेले आहे. या प्रशासकीय दिरंगाईस जबाबदार असलेल्या म्हाडातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची चौकशी करुन दोषी असलेल्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

२२१६-गृहनिर्माण, ८०-सर्वसाधारण, १०३-गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य, नविन चंद्रपूर शहराचा विकास

अभिप्राय :-

४.७ नविन चंद्रपूर शहराच्या विकासासाठी रुपये ७५ कोटी एवढी तरतूद करण्यात आली. तथापि, रुपये ३४.५९ कोटी एवढा निधी शासनास प्रत्यार्पित करण्यात आला. साक्षीमध्ये अशी माहिती प्राप्त झाली की, रुपये २४ कोटीची पाणीपुरवठा योजना होती. या योजनेमध्ये भूसंपादनाचा भाग रुपये १० कोटी एवढा होता. भूसंपादन होऊ न शकल्यामुळे सदर निधी अखर्चित राहिला. या प्रकरणात भूसंपादन न करताच पाणीपुरवठा योजना आखली होती व त्याकरीता निधीची तरतूद देखील केली होती. अशाप्रकारे निधीची केलेली तरतूद मुळातच चुकीची असल्याचे समितीचे मत झाले आहे.

शिफारस :-

४.८ शासनास एखादी योजना हाती घ्यावयाची असल्यास व त्या योजनेमध्ये भूसंपादना सारखा किचकट विषय असल्यास ही योजना यशस्वीपणे मार्गी लावावयाची असेल तर अशा प्रकारच्या योजनांची पूर्णपणे तयारी करताना ज्या ठिकाणी काम करावयाचे आहे त्या ठिकाणचे भूसंपादनाचे काम केव्हा होणे शक्य आहे यांचा सखोल अभ्यास संबंधीत विभागाने करणे आवश्यक होते. भूसंपादनाची प्रक्रिया झाल्यावर अथवा ती पूर्णत्वास विहित कालावधीत पूर्ण होऊ शकते याची खातरजमा केल्यावरच त्यास किती निधी आवश्यक आहे व योजनेस किती निधीची आवश्यकता लागेल याचा अंदाज घेवून शासनाकडे पुरक मागणीद्वारे अथवा अत्यंत तातडी असल्यास आकस्मिक खर्चाद्वारे निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही करता येऊ शकते. या योजनेच्या अपेक्षित खर्चाला पूरक मागणीच्या माध्यमाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे अपेक्षित होते. परंतू या प्रकरणी तशी झालेली कार्यवाही दिसून येत नाही. त्यामुळे या पुढील काळात योजना तयार नसताना अपेक्षित असणाऱ्या खर्चाची तरतूद पुरवणी मागणीच्या माध्यमाद्वारे उपलब्ध करुन घेण्याची दक्षता घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. रुपये ३४.५९ कोटी एवढा मोठा निधी विनाकारण वर्षभर अडकून पडल्याने तो इतर आवश्यकत्या योजनेकरीता देखील वापरता येऊ शकला असता. त्यामुळे सर्वच विभागांनी तरतूद केलेला निधी संबंधित वित्तीय वर्षात वापरला जाईल याची दक्षता घ्यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

२२१६-गृहनिर्माण, ८०-सर्वसाधारण, १०३-गृहनिर्माण मंडळे इत्यादींना सहाय्य, केंद्र सरकारच्या कामगार मंत्रालयाकडून राज्यातील विडी कामगार संघटनेकरीता अनुदाने

अभिप्राय :-

४.९ राज्यातील विडी कामगार संघटनेकरीता अनुदाने ही केंद्र शासनाची मूळ योजना असून त्यामध्ये राज्याचे २० टक्के अनुदान व केंद्राचे ४०टक्के अनुदान असते. या योजनेअंतर्गत ५७,००० घरकुल बांधून झालेली आहेत. सन २०१४-१५ करीता २ कोटीची तरतूद करण्यात आली होती परंतू सदरहू निधी न वापरता परत करावा लागला. विडी कामगार चंद्रपूर, भंडारा व सोलापूर या भागात जास्त प्रमाणात असल्याने या कामगारांनी सोसायट्या करुन प्रस्ताव पाठविणे अपेक्षित होते. परंतू या कामगारांना या योजनेबद्दल माहितीच नसावी, असे समितीच्या निदर्शनास आले. विभागाने देखील या योजनेबाबतची व्यापक प्रमाणात प्रसिध्दी न केल्यामुळे ही योजना सफल होऊ शकली नाही.

शिफारस :-

४.१० राज्यामध्ये विशेषत: चंद्रपूर, भंडारा व सोलापूर या भागात विडी कामागारांची संख्या जास्त आहे. विडी कामगार हे बहुतांश अशिक्षित असतात. या कामागारांच्या घरांसाठी केंद्र शासनाची मूळ योजना असून यामध्ये राज्याचे २० टक्के व केंद्राचे ४० टक्के अनुदान असते. या योजनेतंर्गत ५७ हजार घरकुल बांधून झालेली आहेत. गृहनिर्माण विभाग हा नोडल एजन्सी म्हणून कार्य करत असतो. ५७ हजार घरकुल बांधून देखील या घरांच्या मागणीबाबत विडी कामगारांकडून विभागास प्रस्ताव प्राप्त झाले नाहीत. मुळात ही योजना कामगार विभागाची असून कामगार विभागाने या योजनेचा प्रचार व प्रसार योग्य रितीने केल्याचे दिसून आले नाही. विडी कामगार हे अशिक्षित असल्यामुळे सदरहू योजनेची त्यांना माहिती होण्यासाठी कामगार विभागाने प्रत्यक्ष विडी कामगार कार्यरत असलेल्या परिसरात जाऊन या योजनेची माहिती संबंधितांपर्यंत पोहोचवणे आवश्यक होते. परंतू यात विभागास अपयश आलेले आहे. त्याचप्रमाणे गृहनिर्माण विभाग देखील नोडल एजन्सी म्हणून काम पाहत असल्याने विडी कामागारांच्या उन्नतीसाठी व त्यांना घरकुल मिळावीत यासाठी कामगार विभाग व गृहनिर्माण विभाग यांनी समन्वय साधून ही योजना विडी कामगारांपर्यंत कशी पोहचेल व त्यांचा लाभ त्यांना कसा होईल याबाबत त्यांनी आगामी काळात दक्षता घेणे आवश्यक आहे, असे समितीचे मत झाले. याकरीता कामगार विभाग व गृहनिर्माण विभागाने विविध प्रसार माध्यमे तसेच विडी कामगार कार्यरत असलेल्या क्षेत्रांमध्ये या योजनेची माहिती पोहोचविण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत व याकरीता विशेष मोहिम आखून विडी कामगारांकरीता बांधलेली घरकुल त्यांना कशी उपलब्ध होतील याबाबत उपाययोजना करण्याची समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तसेच विडी कामगारांना किती घरांचे वाटप झाले याबाबतचा तपशिल ३ महिन्यात समितीस सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

५.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या **अनुदान क्र. आर-१** यामधील शिर्षांतर्गत झालेला अधिक खर्च व बचतीवरील खर्चासंबंधी महालेखाकारांनी आपल्या अहवालात पुढीलप्रमाणे अभिप्राय दिल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२	पृष्ठ क्र. ६३१ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर,खर्च ८००(०१)(१७) १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अभर्कांच्या मृत्यूसंख्येत घट करण्यासाठी प्रोत्साहन सहायक अनुदान (२२१० एफ ०७७) मुळ १३१७४.९२ पुरक ९८६६.५८ पुनर्विनियोजन (-) २५००.००	२०५४१.५० (रु. दोनशे पाच कोटी एकेचाळीस लक्ष पन्नास हजार)	२०५४१.५० (रु. दोनशे पाच कोटी एकेचाळीस लक्ष पन्नास हजार)	०	तेराव्या वित्त आयोगानुसार अभर्काच्या मृत्युच्या दरात घट करण्यासाठी रु. १३१७४.९२ लक्ष रकमेची तरतूद करण्यात आली होती. यास्तव रु. ९८६६.५८ लक्ष इतक्या रक्कमेची पुरवणी मागणी मान्य करण्यात आली. अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधी न दिल्यामुळे रुपये २५००.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. राज्य शासनाकडे प्रस्तावित केलेल्या रु. २३०४१.५० लक्ष इतक्या रकमेपैकी रु.२०५४१.५० लक्ष इतकाच निधी वितरीत करण्यात आले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.
कोणतेही विर्निदिष्ट कारण न देता मार्च २०१५ मध्ये वर नमुद केलेल्या शीर्षांतर्गत रु. ३१८१०.९६ लाख एवढी तरतुद परत करण्यात आली.					

-2-

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
३	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(१९) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (२२१०एफ १७५) (राज्य हिस्सा) पूरक ५७२६.०० पुनर्विनियोजन (-)५७२६.०० -	०	०	०	सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या २६ महानगरपालिका,६४ नगरपरिषद,४ कटक मंडळे व १ जिल्हा मुख्यालय (अलिबाग) अशा ९५ शहरांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांमर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत. परंतु नागरी भागातील गरीब व दुर्लक्षित घटक आरोग्य सुविधांपासून वंचित राहत आहे. त्यासाठी केंद्रसरकारने २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान सुरु करण्यात मंजूरी दिली आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ५७२६.०० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. त्यामधून राज्य हिस्सा रु.६८७९.६७ लक्ष चा सा. आ. विभागाकडे अनुदान मिळण्याकरिता दिनांक ११ फेब्रु.२०१५ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू सदर अनुदान राष्ट्रीय आरोग्य अभियानास ३१ मार्च २०१५ पर्यत प्राप्त होऊं शकले नाही. मार्च २०१५ अखेर अनुदान वितरीत नं झाल्यामुळे रु. ५७२६.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
४	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (२२१० ई ४३७) (राज्य हिस्सा) मूळ १००.०० पूरक ८५०३.०० पुनर्विनियोजन (-) ३९७२.८८	४६३०.१२ (सेहेचाळीस कोटी तीस लक्ष बारा हजार)	४६३०.१२ (सेहेचाळीस कोटी तीस लक्ष बारा हजार)	०	गरीब दुर्लक्षित तसेच गरजु ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणा-या महत्वाच्या घटकांच्या (उदा.आहार,परिसर स्वच्छता , सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी) बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला विशेषत : ग्रामीण जनता, गरीब, महिला व मुले यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे या अभियानाचे ध्येय आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु. १००.०० लाख मंजूर करण्यांत आले. मंजूर झालेला निधी कमी असल्यामुळे रु. ८५०३.०० लाख इतकी पुरवणी मागणी मंजूर करुन घेण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३९७२.८८ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. राज्य शासनाकडे प्रस्तावित केलेल्या केंद्र हिश्श्याच्या समरुप राज्य हिश्याची रक्कम रु.४६३०.१२ लक्ष इतकाच निधी वितरीत करण्यात आले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. केंद्रशासनाकडून प्राप्त दुस-या हप्त्याचा समरुप राज्य हिश्श्याकरिता रु.१५७२.६५ लाख रकमेचा प्रस्ताव विभागाकडे सादर करण्यात आला होता परंतू मार्च २०१५ अखेर रक्कम प्राप्त झाली नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(हिवताप व हिवतापेतर) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग					
मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य					
विनियोजन सन २०१४-१५					
अनुदान क्र. R - १		सार्वजनिक आरोग्य विभाग			(रु. लाखांत)
अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
५	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(२१) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० एफ १८४) (केंद्र हिस्सा) मूळ ५६६७.०० पुनर्विनियोजन (-) ३८२४.००	१८४३ (अठरा कोटी त्रेचाळीस लक्ष)	१८४३ (अठरा कोटी त्रेचाळीस लक्ष)	०	सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्रशासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा प्रसार करण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सन १९९८-९९ पासून टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ७९ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत सेवा देण्याच्या कामामध्ये झपाटयाने प्रगती केली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP नुसार रु. ५६६७.०० लक्ष रकमेची तरतूद करण्यात आली होती , परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३८२४.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र हिस्सा प्रस्ताव PHD कडे सादर केला होता, परंतु सन २०१४-१५ चा पहिला केंद्र हिस्सा रु. १८४३.०० लक्ष इतकेच अनुदान प्राप्त झाली व तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. दुस-या हफत्यापोटी रु. ३२००.५७ लक्ष केंद्र हिश्श्याचा प्रस्ताव दिनांक ५ जानेवारी २०१५ रोजी PHD कडे सादर करण्यात आला होता. परंतु मार्च २०१५ अखेर दुस-या हप्त्याचे अनुदान वितरीत झाले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन)पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
४	**पृष्ठ क्र. ६३२** २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(१६) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (२२१० ई ४३७) (राज्य हिस्सा) मूळ १००.०० पूरक ८५०३.०० पुनर्विनियोजन (-) ३९७२.८८	४६३०.१२ (सेहेचाळीस कोटी तीस लक्ष बारा हजार)	४६३०.१२ (सेहेचाळीस कोटी तीस लक्ष बारा हजार)	०	गरीब दुर्लक्षित तसेच गरजु ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणा-या महत्वाच्या घटकांच्या (उदा.आहार,परिसर स्वच्छता , सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी) बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला विशेषत : ग्रामीण जनता, गरीब, महिला व मुले यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे या अभियानाचे ध्येय आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु. १००.०० लाख मंजूर करण्यांत आले. मंजूर झालेला निधी कमी असल्यामुळे रु. ८५०३.०० लाख इतकी पुरवणी मागणी मंजूर करुन घेण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३९७२.८८ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. राज्य शासनाकडे प्रस्तावित केलेल्या केंद्र हिश्श्याच्या समरुप राज्य हिश्याची रक्कम रु.४६३०.१२ लक्ष इतकाच निधी वितरीत करण्यात आले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. केंद्रशासनाकडून प्राप्त दुस-या हप्त्याचा समरुप राज्य हिश्श्याकरिता रु.१५७२.६५ लाख रकमेचा प्रस्ताव विभागाकडे सादर करण्यात आला होता परंतू मार्च २०१५ अखेर रक्कम प्राप्त झाली नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
५	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(२१) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० एफ १८४) (केंद्र हिस्सा) मूळ ५६६७.०० पुनर्विनियोजन (-) ३८२४.००	१८४३ (अठरा कोटी त्रेचाळीस लक्ष)	१८४३ (अठरा कोटी त्रेचाळीस लक्ष)	०	सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्रशासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा प्रसार करण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सन १९९८-९९ पासून टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ७९ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत सेवा देण्याच्या कामामध्ये झपाटयाने प्रगती केली आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP नुसार रु. ५६६७.०० लक्ष रकमेची तरतूद करण्यात आली होती , परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३८२४.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र हिस्सा प्रस्ताव PHD कडे सादर केला होता, परंतु सन २०१४-१५ चा पहिला केंद्र हिस्सा रु. १८४३.०० लक्ष इतकेच अनुदान प्राप्त झाली व तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. दुस-या हफत्यापोटी रु. ३२००.५७ लक्ष केंद्र हिश्श्याचा प्रस्ताव दिनांक ५ जानेवारी २०१५ रोजी PHD कडे सादर करण्यात आला होता. परंतु मार्च २०१५ अखेर दुस-या हप्त्याचे अनुदान वितरीत झाले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
६	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(४१) कर्करोग, मधुमेह, हृदयवाहिका रोग व मस्तिष्घात यांचा प्रतिबंध व नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (२२१० एफ ३८२) (केंद्र हिस्सा) मूळ ४३७५.०० पुनर्विनियोजन (-) ३५९९.०६	७७५.९४ (सात कोटी पंच्याहत्तर लक्ष चौ-यांण्णव हजार)	७७५.९४ (सात कोटी पंच्याहत्तर लक्ष चौ-यांण्णव हजार)	०	भारतात सध्या असंसर्गजन्य आजारांची झपाटयाने वाढ होत आहे. त्यामुळे केंद्रशासनाने एकूण देशातील एकूण १०० जिल्हयांमध्ये प्रायोगिक तत्वावर राष्ट्रीय असंसर्गजन्यरोग नियंत्रण कामाची सुरुवात केली. केंद्र व राज्य शासनाने २०१०-२०१२ मध्ये महाराष्ट्रातील खालील जिल्हयांमध्ये राबविण्यात येत आहे - वर्धा, वाशिम, अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद, परभणी, सातारा, सिंधुदुर्ग, ठाणे, पुणे, नाशिक, जालना, नांदेड व रत्नागिरी. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.४३७५.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३५९९.०६ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. सन २०१४-१५ चा हिस्सा रु. ७७५.९४ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग					
मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य					
विनियोजन सन २०१४-१५					
अनुदान क्र. B - १		सार्वजनिक आरोग्य विभाग			(रु. लाखांत)
अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
७	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(२९) अंधत्व नियंत्रणाकरिता राष्ट्रीय कार्यक्रम (२२१० एफ २६४) (केंद्र हिस्सा) मूळ २०४५.०० पुनर्विनियोजन (-) २०४५.००	०	०	०	राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम १९७६ सालापासुन सुरू करण्यात आला असून ११व्या पंचवार्षिक योजनेचे शेवटी (२०१२) अंधत्वाचे प्रमाण ०.८ आणण्याचे उददीष्ट असून २०२० पर्यंत हे प्रमाण ०.३ पर्यंत आणावयाचे आहे. (२००१-०२ मध्ये अंधत्वाचे ह प्रमाण १.१व २००६-०७ मध्ये हे प्रमाण १ होते.) केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.२०४५.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये २०४५.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. सन २०१४-१५ चा रु. ३६४.२७ लक्ष केंद्र हिश्श्याचा प्रस्ताव दिनांक २२ फेब्रुवारी २०१५ रोजी PHD कडे सादर करण्यात आला होता. मार्च २०१५ अखेर अनुदान वितरीत होऊ शकले नाही.

सार्वजनिक आरोग्य विभाग					
मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य					
विनियोजन सन २०१४-१५					
अनुदान क्र. R - १		सार्वजनिक आरोग्य विभाग			(रु. लाखांत)
अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
८	पृष्ठ क्र. ६३२ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(२३) राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० एफ २०१) (केंद्र हिस्सा) मूळ १९८४.०० पुनर्विनियोजन (-) १६२४.७८	३५९.२६ (तीन कोटी एकोणसाठ लक्ष सव्वीस हजार)	३५९.२६ (तीन कोटी एकोणसाठ लक्ष सव्वीस हजार)	०	राज्यात डासामार्फत प्रसारित होणाऱ्या हिवताप, हत्तीरोग, डेंगीताप, जापनीज,चिकनगुनिया व मार्फत प्रसारित होणारा चंडीपुरा तसेच पिसवां मार्फत प्रसारित होणारया प्लेग या रोगाच्या नियंत्रणासाठी शासन स्तरावरून उपाययोजना राबविण्यात येतात. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.१९८४.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये १६२४.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. सन २०१४-१५ चा हिस्सा रु.३५९.२६ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. केंद्र शासनाकडून प्राप्त दुस-या हप्त्यापोटी रु.१२५.७७ लाख रकमेचा शासननिर्णय निर्गमित करण्यात आला परंतू अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधी न दिल्यामुळे मार्च २०१५ अखेर सदर अनुदान प्राप्त होऊ शकले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग					
मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य					
विनियोजन सन २०१४-१५					
अनुदान क्र. R - १		सार्वजनिक आरोग्य विभाग			(रु. लाखांत)
अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
९	पृष्ठ क्र. ६३३ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(३१) राष्ट्रीय मनोरुग्ण आरोग्य कार्यक्रम (२२१० एफ २८२) (केंद्र हिस्सा) मूळ १४९३.०० पुनर्विनियोजन (-) १४९३.०० ०	०	०	०	समाजात -• मानसिक आजार-• ही एक मोठी समस्या आहे. सामाजिक समस्येचे गांभिर्य जाणून केंद्र शासनाने ऑगस्ट १९८२ मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमाची सुरवात केली. या कार्यक्रमादारे सर्व राज्याप्रमाणेच महाराष्ट्रीतील खेडोपाडयातील सर्वसामान्य जनतेला लाभ व्हावा या स्तुत्य हेतूने या कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यातही अंमलबजावणी राज्यातही सुरू करण्यात आली. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.१४९३.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये १४९३.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. सन २०१४-१५ चा केंद्र हिश्श्याचा प्रस्ताव PHD कडे सादर करण्यात आला होता. परंतु मार्च २०१५ अखेर अनुदान वितरीत होऊ शकले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१०	पृष्ठ क्र. ६३३ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९ अनुसूचित जातीकरिता विशेष घटक योजना ७८९(०१)(०६) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (केंद्रीय हिस्सा) (२२१० एफ ५१३) पूरक १३३१.३० पुनर्विनियोजन (-) १३३१.३०	०	०	०	सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्रशासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा प्रसार करण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सन १९९८-९९ पासून टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ७९ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत सेवा देण्याच्या कामामध्ये झपाटयाने प्रगती केली आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. १३३१.३० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. केंद्रशासनाकडून सन २०१४-१५ मध्ये अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना अंतर्गत मार्च २०१५ अखेर अनुदान प्राप्त होऊ शकले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
११	पृष्ठ क्र. ६३३ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(३३) वयस्कर व्यक्तिंच्या जोपासनेसंबंधी राष्ट्रीय कार्यक्रम (२२१० एफ ३०८) (केंद्र हिस्सा) मूळ १४६३.०० पूनर्विनियोजन (-) १३१५.००	रु. १४८ (एक कोटी अठ्ठेचाळीस लक्ष)	रु. १४८ (एक कोटी अठ्ठेचाळीस लक्ष)	०	२००१ च्या जनगणनेनूसार भारतात सुमारे ७.५९३ कोटी लोक ६० वर्षावरील होते, २००१ च्या जनगणनेनूसार वृध्दाचे प्रमाणे ७.७ एवढे होते. ते २०११ मध्ये ८.१४ एवढे झाले व २०१६ मध्ये हे प्रमाण ८.९४ एवढे राहील. पुढील ५ वर्षाच्या अशाप्रकारे भारतात ६० वर्षावरील व्यक्तिंची संख्या दिवसेंदिवस वाढत असुन वृध्दपकाळातील असंसर्गजन्य रोगांचे प्रमाण सुदधा वाढत आहे. म्हणून केंद्र शासन व राज्य शासनामार्फत ८०.२० या प्रमाणत राष्ट्रीय वृदधपकाळ आरोग्य शुश्रृषा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.१४६३.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये १३१५.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा हिस्सा रु.१४८.०० लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१२	पृष्ठ क्र. ६३३ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(१८) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रम (२२१० एफ १५७) (केंद्र हिस्सा) मूळ १६२०२७.०० पुनर्विनियोजन (-) ११४७३२.०० रु.४७२९५ चारशे बहात्तर कोटी पंच्याण्णव लक्ष	रु. ४७२९५ चारशे बहात्तर कोटी पंच्याण्णव लक्ष	०	गरीब दुर्लक्षित तसेच गरजु ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणा-या महत्वाच्या घटकांच्या (उदा.आहार,परिसर स्वच्छता , सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी) बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला विशेषत : ग्रामीण जनता, गरीब, महिला व मुले यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे या अभियानाचे ध्येय आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मुळ मंजूर अनुदान १६२०२७.०० लाख मंजुर करण्यात आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ११४७३२.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा हिस्सा रु.४७२९५.०० लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

प्रशासकिय मान्यता प्राप्त न झाल्यामुळे मार्च २०१५ मध्ये वर नमुद केलेल्या शीर्षांतर्गत रु. १३९६६२.९८ लाख एवढी तरतूद परत करण्यात आली.

१२

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१३	पृष्ठ क्र. ६३३ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा ७८९ अनुसूचित जातींकरिता विशेष घटक योजना ७८९(०१)(०३) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रम (केंद्रीय हिस्सा) (२२१० एफ ४८९) पूरक २५८१०.०० पुनर्विनियोजन (-) १९०३९.६४	रु. ६७७०.३६ (सदुसष्ट कोटी सत्तर लक्ष छत्तीस हजार)	रु. ६७७०.३६ (सदुसष्ट कोटी सत्तर लक्ष छत्तीस हजार)	०	गरीब दुर्लक्षित तसेच गरजु ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणा-या महत्वाच्या घटकांच्या (उदा.आहार,परिसर स्वच्छता , सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी) बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला विशेषत : ग्रामीण जनता, गरीब, महिला व मुले यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे या अभियानाचे ध्येय आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. २५८१०.०० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये १९०३९.६४ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा हिस्सा रु.६७७०.३६ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१४	**पृष्ठ क्र. ६३३** २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा ७८९ अनुसूचित जातींकरिता विशेष घटक योजना ७८९(०१)(०५) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (राज्य हिस्सा) (२२१० एफ ५०४) पूरक २१४१.५३ पुनर्विनियोजन (-) १२२७.५३	रु.९१४.०० (नउ कोटी चौदा लक्ष)	रु.९१३.५८ (नउ कोटी तेरा लक्ष अठ्ठावन हजार)	(-०.४२)	सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या २६ महानगरपालिका,६४ नगरपरिषद,४ कटक मंडळे व १ जिल्हा मुख्यालय (अलिबाग) अशा ९५ शहरांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांमर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत. परंतु नागरी भागातील गरीब व दुर्लक्षित घटक आरोग्य सुविधांपासून वंचित राहत आहे. त्यासाठी केंद्रसरकारने २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान सुरु करण्यात मंजूरी दिली आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. २१४१.५३ लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये १२२७.५३ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा समरुप राज्य हिस्सा रु.९१३.५८ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

उवर्रीत रकमेकरिता प्रशासकिय मान्यता न मिळाल्यामुळे, मार्च २०१५ मध्ये वर नमूद केलेल्या शीर्षाखाली रु. २०२६७.१७ लाख एवढी तरतूद परत करण्यात आली.
प्रशाकीय मान्यता न मिळण्याची कारणे सादर करण्यात आली नाहीत (ऑगस्ट २०१५)

९४

सहसंचालक, आरोग्य सेवा
(सार्वजनिक व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) घचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१५	पान क्र.६३४ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९ अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना (०१)(५६) राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम (२२१० जी ००१) पुरवणी ३०३९.४४ पुनर्विनियोजन (-) १६४७.८२	१३९१.६२ (रु. तेरा कोटी एक्याण्णव लाख बासष्ठ हजार)	१३९१.६२ (रु. तेरा कोटी एक्याण्णव लाख बासष्ठ हजार)	०	ही योजना राज्यातील एड्स नियंत्रणासाठी राबविली जाते. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ३०३९.४४ लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात वित्त विभाग क्र. अंदाज-२०१३/ प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि. ९.२.१५ अन्वये २५ टक्के कपात केल्यामुळे रु. ७६० लाख व अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधी न दिल्यामुळे रुपये ८८७.८२ लाख असे एकूण रु.१६४७.८२ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. प्रत्यक्ष बीडीएस प्रणालीवर रु. १३९१.६२ लाख वितरीत करण्यांत आले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. याबाबत सहसंचालक एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांचे पत्र क्र. मराएनिसो-वित्त/२०१६-१७/११८७६, दिनांक २२.६.२०१६ ची छायांकित प्रत जोडली आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१६	<u>पान क्र. ६३४</u> २२१० वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण १०१(०१)(५५) राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम (केंद्र हिस्सा) (२२१० एफ १४८) मूळ १३०१२.०० पुनर्विनियोजन (-) १३२७.४९	११६८४.५१ (एकशे सोळा कोटी चौऱ्याऐंशी लाख एक्कावन्न हजार)	११६८४.५१ (एकशे सोळा कोटी चौऱ्याऐंशी लाख एक्कावन्न हजार)		ही योजना राज्यातील एड्स नियंत्रणासाठी राबविली जाते. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर रु.१३०१२ लाख इतके मंजूर होते. योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधी न दिल्यामुळे रु.१३२७.४९ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. प्रत्यक्ष बीडीएस प्रणालीवर रु. ११६८४.५१ लाख वितरीत करण्यांत आले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. याबाबत सहसंचालक एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांचे पत्र क्र. मराएनिसो-वित्त/२०१६-१७/११८७६, दिनांक २२.६.२०१६ ची छायांकित प्रत जोडली आहे.
	अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधीन दिल्यामुळे वर नमूद केलेल्या शीर्षाखाली मार्च २०१५ मध्ये रु. २९७५.३१ लाख एवढी तरतूद परत करण्यांत आली. निधी न देण्याची कारणे सादर करण्यांत आली नाहीत. (ऑगस्ट २०१५)				

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१७	पृष्ठ क्र. ६३४ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(१५) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (राज्य हिस्सा) केंद्र पुरस्कृत योजना (२२१० ५२४६) मूळ १००००.०० पूरक ४६१९२.०० पुनर्विनियोजन (-) २८९८१.००	रु.२७२११ (दोनशे बहात्तर कोटी अकरा लक्ष)	रु.२७७९७ (दोनशे सत्याहत्तर कोटी सत्याण्णव लक्ष)	(+) ५८६	गरीब दुर्लक्षित तसेच गरजु ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणा-या महत्वाच्या घटकांच्या (उदा.आहार,परिसर स्वच्छता , सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास इत्यादी) बाबींचा या अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाची उद्दिष्टे - राज्यातील जनतेला विशेषत : ग्रामीण जनता, गरीब, महिला व मुले यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे हे या अभियानाचे ध्येय आहे. केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु. १००००.०० लाख मंजूर करण्यांत आले. मंजूर झालेला निधी कमी असल्यामुळे रु. ४६१९२.०० लाख इतकी पुरवणी मागणी मंजूर करुन घेण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये २८९८१.०० लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा समरुप राज्य हिस्सा रु.२७२११.०० लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून रु.२७७९८.०० लाख तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. तसेच रु.५८६.०० लाख इतक्या अधिक खर्च झाला. आहे.

उर्वरित निधी देण्यासाठी प्रशासकिय मान्यता न मिळाल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. २८९८१ लाख एवढी तरतूद परत करण्यात आली.
उर्वरित निधीसाठी प्रशासकीय मान्यता न मिळण्याची व रु ५८६ लाख इतक्या अंतिम अधिक खर्चाची कारणे सादर करण्यात आली नाहीत (ऑगस्ट २०१५)

७७

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

५८१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१८	पान क्र. ६३४ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा-अलोपॅथी ११० शासकीय रुग्णालये व दवाखाने ११० (०१)(०१) व (०६)(०१) मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने(२२१००१५६) (२२१० ०२२६) मूळ ५९१०७.२९ पूरवणी १९३९.०२ पुनर्विनियोजन (-) ४९३९.१५	५६१०७.१६ (पांचशे एकसष्ठ कोटी सात लाख सोळा हजार)	५५८८३.२७ (पांचशे अट्ठावन्न कोटी त्रयाऐंशी लाख सत्तावीस हजार)	(-) २२३.८९ (दोन कोटी तेवीस लाख एकोणनव्वद हजार)	२२१० ०१४६ ही योजना योजनेतर योजना असून मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालयासाठी व २२१० ०२२६ ही योजना योजनांतर्गत योजना असून मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये व दवाखाने या कार्यक्रमासाठी राबविली जाते. या दोन्ही योजना मिळून एकूण मंजूर पदे १३७२४ भरलेली १०३३४ व रिक्त पदे ३३७६ इतकी आहेत. दोन्ही योजनांतर्गत वेतन, मंजूरी, अतिकालीक भत्ता, करिता एकूण मूळ अनुदान रु. ५९१०७.२९लाख इतके मंजूर करण्यांत आले होते. परंतु प्रस्तावित सामग्री पुरवठा, यंत्रसामग्री तसेच मजूरी व कंत्राटी याबाबीसाठी प्रलंबित देयके देण्यासाठी रु. १९३९. ०२ लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी मंजूर करुन घेण्यांत आली होती. परंतु या आर्थिक वर्षात वित्त विभागाने कपात लादली. त्यमुळे रु. ४९३९.१५ लाख इतक्या रकमेचे पुनिर्वनियोजन करण्यांत आले. प्रत्यक्ष बीडीएस प्रणालीवर रु. ५६१०७.१६ लाख इतके अनुदान प्राप्त झाले. प्रत्यक्ष खर्च रु. ५५८८३.२७ लाख इतका झाला आहे. यंत्रसामग्रीची खरेदीची प्रक्रिया विहीत वेळेत झाली नाही. तसेच पदे रिक्त असल्यामुळे वेतन या बाबीमध्ये बचत झाली आहे. प्रवास भत्ता देयके, सामग्री पुरवठा कार्यालयीन खर्च वाहन दुरुस्ती यांच्या देयकांवर कोषागाराकडून आक्षेप घेण्यांत आल्यामुळे रु. २२३.८९ लाख इतक्या रकमेची बचत झाली आहे. झालेली बचत ही मुख्यत्वे वेतन व त्या अनुषंगिक बाबींवर असल्यामुळे क्षमापित करण्यांत यावी.	
	वेतन, दूरध्वनी देयके, विद्युत, पाणी खर्च व भाडे आणि कर यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. ४९३९.१५ लाख एवढी तरतूद काढून घेण्यांत आली. रु. २२३.८९ लाख एवढया अंतिम बचतीची कारणे सादर करण्यांत आली नाहीत. (ऑगस्ट २०१५)				

विनियोजन लेखे २०१४-१५
सार्वजनिक आरोग्य विभाग (राज्य कामगार विमा योजना, मुंबई, महाराष्ट्र)

(रुपये लाखात)

लेखाशीर्षाचा बाबवार तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष झालेला खर्च	अधिक खर्च (+) / बचत (-)	स्पष्टीकरण
पृष्ठ क्र. ६३४ मागणी क्र. आर- १ प्रधान शिर्ष : २२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा विषम चिकित्सा ~~१०२ बृहन्मुंबईतील व मुफस्सल क्षेत्रातील योजना~~ १०२(०१) (०३) - राज्य कामगार विमा योजना रुग्णालये व (०२) (०३) (२२१० १४०२) मुळ :- १५४३५.४७ पुरक :- १८५६.५८ पुनर्विनियोजन :- (-) ३८३९.१९	१३४५२.८६	१३४३५.६४	(-) १७.२२	सदरच्या लेखाशिर्षाखाली रु. १३४५२.८६ लाख एवढ्या एकूण प्राप्त झालेल्या अनुदानापैकी रु. १३४३५.६४ लाख एवढा प्रत्यक्ष खर्च झाला असून रु. १७.२२ लाख एवढी बचत झाली आहे. सदर बचत ही एकूण प्राप्त अनुदानाच्या ०.१३% एवढी अल्प आहे. वेतन व भत्ते, दुरध्वनी, विद्युत व पाणी खर्च आणि भाडे, पटटी व कर यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च तसेच वित्त विभागामार्फत कपात झाल्यामुळे रु. ३८३९.१९ लाख एवढी तरतूद परत करण्यात आली . तरी सदर बचत क्षमापित करण्यात यावी. यास्तव सदर अनुपालन मान्य करण्यात यावे.

वेतन व भत्ते, दुरध्वनी, विद्युत व पाणी खर्च आणि भाडे, पटटी व कर यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे रु. ३८३९.१९ लाख एवढी तरतूद परत करण्यात आली . रु. १७.२२ लाख एवढया अंतिम बचतीची कारणे सादर करण्यात आली नाहीत.

प्रभारी सहाय्यक संचालक (लेखा),
आयुक्तालय, रा. का .वि. योजना, मुंबई- १३

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
१९	पान क्र. ६३५ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण १०१ (०१)(५२) हिवताप नियंत्रण कार्यक्रम (स्थानिक क्षेत्र) (२२१० ५२१९) मूळ १४३४२.८१ पुनर्विनियोजन (-) २७८९.१८	११५५३.६३ (एकशे पंधरा कोटी त्रेपन्न लाख त्रेसष्ट हजार)	११५३३.०५ (एकशे पंधरा कोटी तेहतीस लाख पांच हजार)	(-) २०.५८ (वीस लाख अठ्ठावन्न हजार)	सदर योजना राज्यातील हिवताप नियंत्रणासाठी राबविली जाते. त्यामध्ये रोगाचे निदान, उपचार, नियंत्रण इ. कामे केली जातात. या योजनेसाठी एकूण मंजूर पदे ४१६९, भरलेली ३०४० व रिक्त पदे ११२९ आहेत. सन २०१४-१५ या वर्षात सुधारीत अंदाजात वित्त विभाग क्र. अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-८५, दि. ९.२.१५ अन्वये १५ टक्के कपात लादली. त्यामुळे रु. २१५१ लाख परत केले. या योजनेत रिक्त पदे असल्यामुळे, तसेच पेट्रोल तेल वंगण, वीज व पाणीपुरवठा यांच्या देयकाला कोषागार कार्यालयाने आक्षेप घेतले, त्यामुळे देयके मंजूर झाली नाहीत. यास्तव रु. ६३८.१८ लाख +कपात रु.२१५१ लाख अशी एकूण रु. २७८९.१८ लाख एवढी तरतूद मार्च २०१५ अखेर परत करण्यांत आली. अंतिम सुधारीत अनुदान रु.११५५३.६३ लाख इतके अनुदान मंजूर झाले. प्रत्यक्ष खर्च रु. ११५३३.०५ लाख इतका झाला आहे. झालेली बचत रु. २०.५८ ही मुख्यत्वे वेतन व त्या अनुषंगिक प्रवास भत्ता, दूरध्वनी, वीज पाणी याबाबीवर झाली असल्यामुळे क्षमापित करण्यांत यावी.
	रिक्त पदे, दूरध्वनी, विद्युत पाणी खर्चाचे, अतिकालीक भत्ते, तेल व पेट्रोल यांच्या देयकांवर कोषागार कार्यालयाने आक्षेप घेतल्यामुळे देयके मंजूर न झाल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. २७८९.१८ लाख एवढी तरतूद परत करण्यांत आली. रु. २०.५८ लाख एवढया अंतिम बचतीची कारणे सादर करण्यांत आली नाहीत. (ऑगस्ट २०१५)				

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२०	पान क्र.६३५ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ यांच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनांकरिता अनुदान (२२१० ३०६५) मूळ ४९९९.९८ पुरवणी १४२८.५६ पुनर्विनियोजन (-) २५८४.४१	३८४४.१३ (अडोतीस कोटी चौव्वेचाळीस लाख तेरा हजार)	३८४४.१३ (अडोतीस कोटी चौव्वेचाळीस लाख तेरा हजार)	०	अनुशेषांतर्गत मंजूर होणाऱ्या प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांच्या बांधकामाकरिता सदर लेखाशीर्षातंर्गत अनुदान मंजूर होते. या उपशीर्षात रु. ७१४२.८३ लाख इतका निधी प्रस्तावित करण्यांत आला होता. परंतु श्वेतपुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु. ४९९९.९८ लाख मंजूर करण्यांत आले. मंजूर झालेला निधी कमी असल्यामुळे रु. १४२८.५६ लाख इतकी पुरवणी मागणी मंजूर करुन घेण्यांत आली. सहाय्यक अनुदान वितरीत करण्यास मार्च २०१५ अखेरपर्यत मान्यता न मिळाली नाही. वित्त विभाग पत्र क्र. अंदाज-२०१३/प.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि.९.२.१५ अन्वये सुधारीत अंदाजात कपात लादली. तसेच सहाय्यक अनुदान देण्यास मान्यता मिळाली नाही. जिल्हा आरोग्य अधिकारी, कोल्हापूर व ठाणे यांची देयके मार्च अखेर अनुदान उशीरा प्राप्त झाल्यामुळे देयके कोषागारात पारीत करण्यांत आली नाही. त्यामुळे रु. २५८४.४१ लाख इतकी रक्कम वेळीच पुनर्विनियोजित करण्यांत आली. अंतिम सुधारीत अनुदान रु. ३८४४.१३ लाख जेवढे प्राप्त झाले आहे तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.
	सहाय्यक अनुदान देण्यास मान्यता न मिळाल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. २५८४.४१ लाख एवढी तरतूद परत करण्यांत आली.				

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशिर्ष २२११ कुटूंब कल्याण

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्रमांक आर १

रुपये लाखांत

अ.क्र.	शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा(+) /बचत(-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२	मागणी क्रं. आर १ पान क्र. ६३५ १०१ ग्रामीण कुटूंब कल्याण सेवा ००१ (०१) (०१) ग्रामीण कुटूंब कल्याण केंद्रे व आरोग्य उपकेंद्रे (२२११०१४९) मूळ ४८६२१.१८ पुनर्विनियोजन (-) २४५१.९२ सुधारित	४६१६९.२६ (चारशे एकसष्ठ कोटी एकोणसत्तर लाख सव्वीस हजार)	४५६३२.१३ (चारशे छप्पन कोटी बत्तीस लाख तेरा हजार)	(-) ५३७.१३ (पाच कोटी सतोतीस लाख तेरा हजार)	सदरचे योजनेतंर्गत अर्थसंकल्पीय अनुदान रु. ४८६२१.१८ लाख श्वेतपुस्किेत मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी रक्कम रु. २४५१.९२ लाखाचे पुनर्विनियोजन शासनस्तरावर करण्यात आले. अंतिम अनुदान रु. ४६१६९.२६ लाखाचे अनुषंगाने प्रत्यक्ष खर्च रु. ४५६३२.१३ लाख झालेला आहे. जिल्हा परिषदेकडील १३२९ पदे रिक्त असल्याने वेतनावरील खर्च कमी झाला, तसेच ३१ सहाय्यक अनुदान (वेतनेत्तर)या बाबी खालील खर्चासाठी शासनाकडून अनौपचारिक संदर्भ प्राप्त न झाल्याने रु.२४५१.९२ लाखाची बचत ३१ मार्च रोजी समर्पित करण्यांत आलेली आहे. जिल्हा परिषद, बीड यांचेकडे ३६ सहा.अनुदाने (वेतन) या बाबीवरील शिल्लक त्यांनी समर्पित न केल्याने तसेच शासनाकडून ३१ सहा. अनुदाने (वेतनेत्तर) या बाबी अनौपचारीक संदर्भ प्राप्त न झाल्याने कोषागारातून आक्षेप लावून मार्चअखेर परत करण्यांत आली. ते शिल्लक अनुदान जिल्हा परिषदांनी समर्पित न केल्याने रु.५३७.१३ लाखाची बचत दिसून येत आहे.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
कुटुंबकल्याण, मातामाल संगोपन व शालेय आरोग्य
पुणे ४११ ००१

(डॉ. अर्चना पाटील)
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा
कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे १

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्यलेखाशीर्ष २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्र. आर- १					रु. लाखात
अ. क्र	उपशीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा (+) बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२१	पान क्र.६३५ २२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ००१ संचालन व प्रशासन ००१(०१)(०४) गट वैद्यकीय अधिकारी (२२५० ०३७१) मूळ २४८४५.०७ पुनर्विनियोजन (-) २०४०.२३	२२८०४.८४ (दोनशे अठठावीस कोटी चार लाख चौऱ्याऐंशी हजार)	२२२५२.८४ (दोनशे बावीस कोटी बावन्न लाख चौ-याऐंशी हजार)	(-) ५५२.०० (पांच कोटी बावन्न लाख)	सदर योजनेमधून ८ परिमंडळांतर्गत गट वैद्यकीय अधिकारी यांचे वेतन व भत्ते प्रवास इत्यादींचा खर्च केला जातो. या योजनेसाठी सन २०१४-१५ साठी मूळ तरतूद रु.२४८४५.०७ लाख इतकी आहे. या योजनेमध्ये ३४१३ मंजूर पदे असून २३४ पदे रिक्त आहेत. या योजनेत वेतन, अतिकालीक भत्ता, दूरध्वनी,वीज पाणी, प्रवास खर्च व कार्यालयीन खर्च या बाबींसाठी अनुदान मंजूर करण्यांत येते. वित्त विभाग पत्र क्र. अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३, दि. ९.२.१५ अन्वये सुधारीत अंदाजात कपात लादली. तसेच रिक्त पदे आर्थिक वर्षाअखेर भरली गेली नाहीत. दूरध्वनी, विद्युत व पाणी खर्च यांच्या देयकांबाबत कोषागार कार्यालयाकडून आक्षेप घेण्यांत आल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. २०४०.२३ लाख इतकी रक्कम पुनर्विनियोजित करण्यांत आली. बीडीएस वर अंतिम सुधारीत अनुदान रु. २२८०४.८४ लाख प्राप्त झाले. झालेली बचत रु. ५५२.०० लाख ही मुख्यत्वे वेतन व त्या अनुषंगिक कार्यालयीन खर्च व प्रवास खर्च या बाबींवर झाली आहे. तरी झालेली बचत क्षमापित करण्यांत यावी. सोबत बाबनिहाय खर्चाचा तपशील जोडला आहे.
	रिक्त पदे आणि दूरध्वनी, विद्युत व पाणी खर्च यांच्या देयकांबाबत कोषागार कार्यालयाकडून आक्षेप घेण्यांत आल्यामुळे मार्च २०१५ मध्ये रु. २०४०.२३ लाख एवढी तरतूद परत करण्यांत आली. रु. ५५२ लाख इतक्या अंतिम बचतीची कारणे सादर करण्यांत आली नाहीत. (ऑगस्ट २०१५)				

अपर संचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग
मुख्यलेखाशिर्ष २२११ कुटूंब कल्याण
विनियोजन लेखे अहवाल २०१४-१५

मागणी क्रमांक आर १					रुपये लाखांत
अ.क्र.	शीर्ष	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	जादा(+)/ बचत(-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२	मागणी क्र. आर १ पान क्र. ६३६ ००१ संचालन व प्रशासन ००१ (०१) (०३) जिल्हा कुटूंब कल्याण केंद्र (२२११००५१) मूळ २१५०.३५ पुनर्विनियोजन (-)१९४२.७०	२०७.६५ (दोन कोटी सात लाख पासष्ट हजार)	१९७२.९३ (एकोणीस कोटी बहात्तर लाख त्र्याण्णव हजार)	(+) १७६५.२८ (सतरा कोटी पासष्ट लाख अठठावीस हजार)	सदरचे योजनेतंर्गत अर्थसंकल्पीय अनुदान रु.२१५०.३५ लाख श्वेतपुस्किेत मंजूर करण्यात आले आहे. सुधारित अंदाजात रक्कम रु.२१५६.०१ लाख मंजूर करण्यात आले आहे. अंतिम सुधारित अनुदान रक्कम रु.१९४८.३६ लाखाचे निश्चित करण्यांत आलेले होते. त्याअनुषंगाने प्रत्यक्ष खर्च रु.१९७२.९३ लाख झालेला आहे. परंतु विनियोजन लेख्यामध्ये शासनस्तरा- वरुन चुकीचा खर्च दर्शविला असून अंतिम सुधारित अनुदान रक्कम रु.१९४८.३६ लाख मंजूर असून रु.१९७२.९३लाख प्रत्यक्ष खर्च झालेला असून रु.२०७.६५ लाख अनुदान समर्पित केलेले असून तसे या कार्यालयाचे पत्र क्र.राकुकका/ कक्ष- ४/अनुदान मागणी/नस्ती क्र.६०/२७९६२/१५, दि.७.५.२०१५ नुसार शासनास कळविले आहे.सोबत खर्चाचे विवरण पत्र जोडले आहे. जिल्हा परिषदांकडील पदे रिक्त असल्यामुळे, देयके प्राप्त न झाल्याने दूरध्वनी वीज व पाणी, अधिकारी वर्गाकडून प्रवास भत्ता देयके सादर न झाल्यामुळे, कार्यालयीन खर्च इ.बाबीवरील खर्च अपेक्षापेक्षा कमी झाल्यामुळे तसेच ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) याबाबी खालील खर्चासाठी शासनाकडून अनौपचारिक संदर्भ प्राप्त न झाल्याने सदर नमूद केलेल्या उपशिर्षाखाली मार्च २०१५ मध्ये रु.२०७.६५ लाख एवढा निधी परत करण्यांत आला. परंतु अनाबधनाने महागाई भत्त्यातील वाढीमुळे वेतनावरील जादा खर्च सामायोजित न करता अनुदान समर्पित करण्यांत आले.त्यामुळे वेतनावर रु.२४.५७ लाख जादा खर्च झालेला दिसून येत आहे. तो क्षमापित करण्यांत यावा.

अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा
कुटूंबकल्याण, मातबाल संगोपन व शालेय आरोग्य
पुणे ४११ ००१

(डॉ.अर्चना पाटील)
अतिरिक्त संचालक आरोग्य सेवा
कुटूंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे १

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र.R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२२	**पृष्ठ क्र. ६३६** २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०१ नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा ७८९ अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना ७८९(०१)(०४) राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कार्यक्रम (केंद्रीय हिस्सा) (२२१० एफ ४९८) पूरक ६४२४.०० पुनर्विनियोजन (-) ३६८३.२७	रु.२७४०.७३ (रुपये सत्तावीस कोटी चाळीस लक्ष त्राहत्तर हजार)	रु.२७४०.७३ (रुपये सत्तावीस कोटी चाळीस लक्ष त्राहत्तर हजार)	०	सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या २६ महानगरपालिका,६४ नगरपरिषद,४ कटक मंडळे व १ जिल्हा मुख्यालय (अलिबाग) अशा ९५ शहरांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांमर्गत ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य विषयक सेवा सुविधा पुरविण्यात येत आहेत. परंतु नागरी भागातील गरीब व दुर्लक्षित घटक आरोग्य सुविधांपासून वंचित राहत आहे. त्यासाठी केंद्रसरकारने २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान सुरु करण्यात मंजूरी दिली आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ६४२४.०० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ३६८३.२७ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा हिस्सा रु.२७४०.७३ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. मार्च २०१५ अखर केंद्र शासनाकडून योजनेस अनुदानाचा दुसरा हप्ता प्राप्त होऊ शकला नाही.

२५

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन)पुणे-१

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२३	पृष्ठ क्र. ६३६ २२१० वैद्यकिय संवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८०० इतर खर्च ८००(०१)(२७) राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम (२२१० एफ २४६) (केंद्र हिस्सा) मूळ ९१२.०० पुनर्विनियोजन (-) ६७४.७७	२३७.२३ दोन कोटी सदोतीस लक्ष तेवीस हजार)	२३७.२३ दोन कोटी सदोतीस लक्ष तेवीस हजार)	०	हा कार्यक्रम केंद्रशासन अनुदानीत असून काग्रक्रमाचे सर्वसाधारण आरोग्य सेवेमध्ये एकत्रिकरण झाले आहे. महाराष्ट्र राज्यात हा कार्यक्रम राज्य शासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका आणि स्वयंसेवी संस्था यांचे मार्फत राबविण्यात येत आहे. राज्याने जागतिक आरोगय संघटनेनेठरवून दिलेल कुष्ठरोग इलिमिनेशनचे ध्येय माहे सप्टेंबर ०५ अखेर साध्य केले आहे. (इलिमिनेशन म्हणजे कुष्ठरोगाचे दर दहा हजारी प्रमाण १ पेक्षा कमी आसल्यास कुष्ठरोग ही सार्वजनिक आरोग्य समस्या समस्या रहाणार नाही.) केंद्र शासनाने मंजूर केलेल्या PIP पैकी श्वेत पुस्तिकेनुसार मूळ मंजूर अनुदान रु.९१२.०० लाख मंजूर करण्यांत आले. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात रुपये ६७४.७७ लाख इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानानुसार सन २०१४-१५ चा हिस्सा रु.२३७.२३ लक्ष इतकेच अनुदान वितरीत झाले असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

२६

५१०

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२४	पृष्ठ क्र. ६३६ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९ अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना ७८९(०१)(०७) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (राज्य हिस्सा) (२२१० एफ ५२२) पूरक ४४३.८७ पुनर्विनियोजन (-) ४४३.८७	०	०	०	सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्रशासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा प्रसार करण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सन १९९८-९९ पासून टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ७९ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत सेवा देण्याच्या कामामध्ये झपाटयाने प्रगती केली आहे. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ४४३.८७ लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना अंतर्गत मार्च २०१५ अखेर अनुदान प्राप्त न झाल्याने रु. ४४३.८७ रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले.

२७

(अर्थसंकल्प व प्रकाशन) कक्ष-२

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२५	पृष्ठ क्र. ६३६ २२१० वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ७८९ अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना ७८९(०१)(०८) राष्ट्रीय संसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम (केंद्राचा हिस्सा) (२२१० एफ ५३१) पूरक ३९८.८० पुनर्विनियोजन (-) ३९८.८०	०	०	०	राज्यात डासामार्फत प्रसारित होणाऱ्या हिवताप, हत्तीरोग, डेंगीताप, जापनीज,चिकनगुनिया व मार्फत प्रसारित होणारा चंडीपुरा तसेच पिसवां मार्फत प्रसारित होणारया प्लेग या रोगाच्या नियंत्रणासाठी शासन स्तरावरून उपाययोजना राबविण्यात येतात. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत राज्य आरोग्य सोसायटीस थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ३९८.८० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुसूचित जातींसाठी विशेष घटक योजना अंतर्गत मार्च २०१५ अखेर अनुदान प्राप्त न झाल्याने रु. ३९८.८० लक्ष रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले. विभागाकडे दिनांक २९ सप्टेंबर २०१४ रोजी अनुदानासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतू माहे मार्च २०१५ अखेर सदर अनुदान प्राप्त झाले नाही.

सहसंचालक, आरोग्य सेवा
(अर्थसंकल्प व प्रशासन) पुणे-१

२८

सार्वजनिक आरोग्य विभाग

मुख्य लेखाशिर्ष २२१० - वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य

विनियोजन सन २०१४-१५

अनुदान क्र. R - १ सार्वजनिक आरोग्य विभाग (रु. लाखांत)

अ.क्र.	लेखाशीर्ष तपशील	एकूण अनुदान	प्रत्यक्ष खर्च	अधिक (+)/ बचत (-)	स्पष्टीकरण
१	२	३	४	५	६
२६	पृष्ठ क्र. ६३७ २२१० वैदयकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६ सार्वजनिक आरोग्य ८००- इतर,खर्च ८००(०१)(२१) सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम (२२१० एफ ५१३) (राज्य हिस्सा) पूरक ३१३.०० पुनर्विनियोजन (-) ३१३.०० /	०	०	०	सन १९६२ पासून देशात राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. पथदर्शी प्रकल्पाच्या उत्साहवर्धक कामगिरीवरुन सन १९९८ पासून केंद्रशासनाने सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा पसार करण्याचे ठरविले. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्रामध्ये सन १९९८-९९ पासून टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी व ७९ जिल्हा/शहर क्षयरोग नियंत्रण केंद्रांची स्थापना करण्यात आली आहे. कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करण्यात आली. या योजनेसाठी श्वेत पुस्तिकेमध्ये मूळ मंजूर अनुदान नव्हते. या योजनेसाठी यापूर्वी केंद्र शासनामार्फत थेट अनुदान प्राप्त होत होते. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात अनुदान थेट न देता ते राज्य शासनामार्फत देण्याचा निर्णय घेण्यांत आला. यास्तव रु. ३१३.०० लाख इतक्या रकमेची पुरवणी मागणी करण्यांत आली. परंतु सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात मार्च २०१५ अखेर अनुदान प्राप्त न झाल्याने रु. ३१३.०० लक्ष रकमेचे पुनर्विनियोजन करण्यांत आले.

२e

(कार्यासन अधिकारी)पृष्ठे-१

साक्ष :-

अनुदान क्रमांक आर-१ – सार्वजनिक आरोग्य विभाग

५.२ समितीने दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी सन २०१४-१५ या वर्षाच्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्रमांक आर-१ संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव व इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

सन २०१४-१५ च्या विनियोजन लेख्या संबंधी बरीच रक्कम प्रत्यार्पित झालेली आहे. १ हजार ३६९ कोटी ९० लाख ६८ हजार रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली. मात्र मूळ रक्कम देखील खर्च झालेली नाही. जून २०१४ ते मार्च, २०१५ पर्यंत रक्कम घेण्यात आली. मूळ तरतूद ७ हजार २८३ कोटी ५० लाख ९४ हजार रुपयांची होती. जून व डिसेंबर या महिन्यातील पावसाळी व हिवाळी अधिवेशनात १,३६९ कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली. दुर्दैवाने मूळ तरतूद देखील खर्च होऊ शकली नाही. प्रत्यक्ष खर्च ६ हजार १०० कोटी रुपयांचा झाला. तसेच २ हजार ५९९ कोटी रुपये प्रत्यार्पित करण्यात आले. ही रक्कम अन्य विकास कामामध्ये नियोजित करता आली नाही. यामुळे शासनाचे नुकसान झाले. याबाबत विभागाने खुलासा करावा असे समितीने सूचित केले असता, सन २०१४ मध्ये पहिल्यांदाच एनआरएचएमचा निधी कोषागारमध्ये आला. यापूर्वी हा निधी बँक खात्यात केंद्र शासनाकडून जमा केला जात असे. राज्य शासनाचा अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर केंद्र शासनाने कळवले की, यावर्षी सर्व निधी कोषागारामधून दिला जाईल. यानंतर लेखाशीर्ष तयार केले. केंद्रीय हिस्सा पुरवणी मागण्यांमधून घ्यावा लागला यामुळे पुरवणी मागण्यांचे आकारमान वाढले. पुरवणी मागण्या मंजूर झाल्या असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

समितीने विभागाच्या अहवालाचे अवलोकन केले आहे. फेब्रुवारी, मार्च महिन्यात केंद्र शासनाकडे निधीची मागणी केली जाते, मग पैसे वेळेवर मिळत नाहीत त्यामुळे ते प्रत्यार्पित केले जातात, असे अनियोजनबद्ध कामकाज विभागात सुरू आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, केंद्र शासनाकडून निधी कोषागारामध्ये येणार असल्यामुळे लेखाशीर्ष तयार करण्यास उशीर झाला. काही ठिकाणी अर्थसंकल्पामध्ये निधी आला नाही. तसेच निधीमध्ये २० ते ४० टक्के कपात झाल्यामुळे १,४०९ कोटी रुपये कमी आले. अन्यथा प्रत्येक लेखाशीर्षनिहाय पाहिले तर अधिक रक्कम प्रत्यार्पित झालेली नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कपात झाल्यामुळे किती निधी प्राप्त झाला व केंद्र शासनाने केलेल्या तरतुदीनुसार किती रक्कम उपलब्ध झाली नाही, निधी उपलब्धतेबाबत केंद्र शासनाकडे प्रशासकीय मान्यतेकरिता प्रस्ताव कधी पाठविण्यात आला? याची माहिती देण्यात यावी. प्रत्येक पृष्ठावर विभागाने असेच उत्तर दिले आहे की, रकमेची तरतूद केली, रक्कम प्राप्त झाली नाही, ती रक्कम प्रत्यार्पित करण्यात आली. विभागाला केंद्र शासनाने ८ ते १० महिन्यापूर्वी माहिती दिली होती. विभागाला लेखाशीर्ष तयार करण्यासाठी ८ ते १० महिने कालावधी लागला. सन २०१२-१३ मध्येच याबाबत विभागाला पूर्वकल्पना दिली होती. मे महिन्यात ते आदेश निर्गमित करण्यात आले. लेखाशीर्ष तयार करण्याकरिता नमुना विभागाला दिलेला होता. दुसऱ्या राज्याची माहिती घेतली असता १३ ते २० दिवसात त्यांनी लेखाशिर्ष तयार केलेले आहेत. एप्रिल – मे महिन्यात गोषवारा केंद्र शासनाने दिल्यानंतर लेखाशीर्ष तयार करण्यास एवढा उशीर का झाला ? अशी विचारणा समितीने केली असता, लेखाशीर्ष तयार केल्यानंतर पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून रक्कम मिळाली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

रक्कम प्राप्त झाली नाही. खरे तर लेखाशीर्ष तयार करण्याचे काम एका दिवसाचे आहे. केंद्र शासनाकडून निधी आणणे महत्वाचे आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये राज्य शासनाचे काही आर्थिक नुकसान झालेले नाही. सन २०१४-१५ पासून केंद्र शासनाने निधी कोषागारामधून देण्याचा निर्णय घेतला. पुढील आर्थिक वर्षासाठी जानेवारी – फेब्रुवारी पासून कार्यवाही सुरू केली जाते. पीआयपी केंद्र शासनाला पाठवले जाते त्यानंतर त्यांच्याकडून अंदाजे आकारमान कळवले जाते. संपूर्ण स्त्रोत सांगितल्यानंतर विभागाकडून प्रस्ताव तयार करून केंद्र शासनाकडे पाठवला जातो. सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्यांनी असा निर्णय घेतला की, ही रक्कम कोषागारामध्ये जमा करावी. केंद्र शासन त्यांचा हिस्सा ३ भागात देते. राज्याचा हिस्सा देखील प्रत्येक योजनेनुसार येत असतो. एस.इ.पी, टी.एस.पी, मलेरिया, टी.बी निवारण असे अनेक कार्यक्रम आहेत. त्या प्रत्येकामध्ये ३ -३ लेखाशीर्ष तयार केले जातात. केंद्र शासनाने अंदाजे रक्कम सांगितल्यानंतर विभागाने अंदाजे टीआयपी पाठवला. यानंतर केंद्र शासनाकडून अंदाजे अमुक रक्कम येणार असून राज्य शासनाकडून अमुक अंदाजे रक्कम अपेक्षित आहे असे कळवण्यात आले. जोपर्यंत केंद्र शासनाचा हिस्सा बँक खात्यात जमा होत होता तोपर्यंत मान्यतेचा विषय नव्हता. मात्र नियोजन विभागाचे असे म्हणणे होते की, कोषागारामधून निधी काढताना योजनेला मान्यतेची आवश्यकता आहे. वित्त विभागाचे असे म्हणणे होते की, सन २००५ पासून योजना सुरू असल्यामुळे त्याला नवीन मान्यतेची आवश्यकता नाही. यामुळे काही अंशी संभ्रम निर्माण झाला. केंद्र शासनाने कमी पैसे वितरित केले, तेवढे पैसे मिळाले उर्वरित रक्कम प्रत्यार्पित केली. विनियोजन लेख्या मध्ये पुनर्विनियोजन असा शब्दप्रयोग महालेखाकार यांनी केला आहे. ते पुनर्विनियोजन नसून सदर रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे, तसेच रक्कम कपात देखील झालेली आहे. सुरू वातीला विभागाने सांगितले की शासनाचे नुकसान झालेले नाही ते चुकीचे आहे. विभागाने घेतलेली रक्कम खर्च झाली पाहिजे. ती रक्कम खर्च का झाली नाही याची समिती विचारणा करते. नियोजन करून रक्कम मागितली जाते. असे असताना ती अखर्चित राहता कामा नये. राज्याच्या तिजोरीतील २ हजार ५०० कोटी रुपये अडवून ठेवण्यात आले. ही रक्कम इतर कोणत्याही कामाकरिता वापरता आली नाही. या करिता विनियोजन लेख्याची तपासणी केली जाते. विभागाने पुनर्विनियोजन केले नाही. बीडीएसवर जी रक्कम प्राप्त झाली, त्याची तरतूद केली व उर्वरित सर्व रक्कम पुनर्विनियोजनात समाविष्ट केली व जी रक्कम बीडीएसमधून उपलब्ध झाली ती दि. ३१ मार्च रोजी प्रत्यार्पित केली. यातून किती रक्कम शिल्लक राहिली, याबाबत खुलासा दिलेला आहे. कपातीमुळे बचत दिसत असेल तर त्या बाबत समितीचे काही म्हणणे नाही. मात्र रक्कम वापरली गेली नसेल तर त्याबाबत विभागाने समितीला खुलासा सादर केला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, ही शॅडो प्रोव्हीजन असल्याचे विभागाचे मत असून, केंद्र शासनाकडून कोषागारामध्ये रक्कम जमा झाली तर ती वितरित होते. जर त्यांच्याकडून निधी आला नाही तर तेवढाच निधी जमा होतो व उर्वरित निधी प्रत्यार्पित होतो. विभागाने पुनर्विनियोजन केलेले नाही. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागच्या वर्षी उपयोगिता प्रमाणपत्र पाठवले होते काय ? ते वेळेवर पाठविले नसल्यास केंद्र शासनाकडून निधी मिळत नाही, सन २०१४-१५ मध्ये निधी प्राप्त झाला नाही. एनआरएचएमचा निधी वेळेवर मिळाला नाही म्हणून निधी प्रत्यार्पित करावा लागला असे मत समितीने व्यक्त केले असता, तशी काही शक्यता नाही. निधी देताना केंद्र शासनाकडून दोनच अटी घातल्या जातात. राज्य शासनाने खात्याचे लेखापरीक्षण करून १ तारखेपर्यंत पाठविण्यात यावे असे सांगितले जाते. यावर्षी देशात महाराष्ट्र राज्य प्रथम होते ज्याने सन २०१६-१७ चे खात्यांचे लेखापरीक्षण करून पाठविले. महाराष्ट्र राज्यामधून दरवर्षी विभागाचे अकाऊंट वेळेवर जातात. केंद्र शासनाने जो निधी वितरित केलेला आहे, तो राज्य शासनाने पुढे वितरित त केला की, नाही हे महत्वाचे आहे. काही वेळा राज्य शासनाकडून सोसायटीच्या बँक खात्यामध्ये निधी प्राप्त होतो, असा एक आक्षेप असतो. केंद्र शासनाच्या हिश्शानुसार राज्याकडून रक्कम मिळाली की नाही अशा काही अटी केंद्र शासनाकडून निधी देताना घातलेल्या असतात. दरवर्षी राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये आरोग्याकरिता कमीत कमी १० टक्के वाढ अपेक्षित आहे. एनआरएचएमचा निधी केवळ आधार म्हणून आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. मूळ अर्थसंकल्पामध्ये १० टक्के वाढ होत नाही. म्हणून अतिरिक्त पुरवणी मागण्यांमध्ये केंद्र शासनाला दाखवण्यासाठी वाढ केली जाते काय? अशी विचारणा समितीने केली असता, अनेकदा वाढ होते. एनआरएचएमची पुरवणी मागणी केली जाते, त्यावेळी आधार लागतो. ६०:४० च्या प्रमाणानुसार जी रक्कम येईल ती राज्य शासनाकडून प्राप्त होते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१२-१३ व सन २०१३-१४ मधील लेख्यांची चर्चा झाली त्यावेळी हाच प्रश्न होता व आता देखील तोच प्रश्न आहे. केंद्र शासनाच्या डोळयात धूळफेक होत आहे. रक्कम खर्च होत नाही, पुरवणी मागणीच्या माध्यमातून रक्कम घेतली जाते. तरतूद केलेली रक्कम लोकांसाठी खर्च करावयाची आहे ती होत नाही त्यामुळे लोकांना सुविधा मिळू शकत नाहीत. आरोग्य विभागाच्या बाबतीत हे सहन होऊ शकत नाही. पुनर्विनियोजनाची रक्कम विभागाकडे वर्गच झालेली नाही. त्याबाबत वित्त विभागाला सांगितले आहे की, रक्कम प्रत्यार्पित केली असे शब्द वापरू नये, कारण ती रक्कम प्राप्त झालेलीच नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, हा अपॉर्च्युनिटी लॉस आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१२-१३, सन २०१३-१४ मध्ये पुनर्विनियोजन केलेले नसून रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे. काही रकमेची कपात आहे तर काही रक्कम प्रत्यार्पित केलेली आहे. असे मत व्यक्त समितीने केले असता, रक्कम प्रत्यार्पित करण्याचे कारण हे आहे की, केंद्र शासनाकडून जेवढी रक्कम प्राप्त झाली तेवढी राज्य शासनाने वितरित केली. तरतूद जास्त असल्यास उर्वरित निधी प्रत्यार्पित केला जातो. जेव्हा विभाग अर्थसंकल्पीय तरतूद करतो तेव्हा केंद्र शासनाचे तंतोतंत किती पैसे प्राप्त होणार हे विभागाला माहिती नसते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखाकारांचे मत आहे की, केंद्र शासनाचे पैसे आले नाही म्हणून राज्य शासनाने ते वितरित केले नाहीत. दुसरा मुद्दा असा आहे की, सचिवांनी म्हटल्याप्रमाणे पूर्वी ही रक्कम त्या त्या सोसायटीच्या खात्यात प्रत्यक्षपणे जमा होत असे. आता हा निधी विभागामार्फत खर्च करायचा असेल तर त्याला नियोजन विभागाची मान्यता तसेच कॅबिनेटची मंजुरी लागणार आहे. राज्य शासनाचा यामध्ये मोठा हिस्सा असतो आणि केंद्र शासन केवळ प्रोत्साहनात्मक हिस्सा देत असते. असे असेल तर या आरोग्य विभागाच्या प्रकरणात कॅबिनेटची मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव नियोजन समिती आणि कॅबिनेटकडे जातो तेव्हा त्यासाठी किती वेळ लागतो. प्रत्येक प्रस्तावाला ही मान्यता घ्यावी लागते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, it is co-terminus with 5 Year Plan. सुरू वातीला ज्या पंचवार्षिक योजना होत्या त्या कालावधीची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सन २०१४-१५ आणि सन २०१५-१६ ची मान्यता शेवटी डिसेंबर, २०१६ मध्ये कॅबिनेटपुढे ठेवून तांत्रिकरित्या घेतलेली आहे. सन २०१२-१७ या कालावधीची प्रशासकीय मान्यता राष्ट्रीय आरोग्य अभियानाला (N.H.M.) मिळालेली आहे. सन २०१७-१८ ची प्रशासकीय मान्यता अजूनही मिळालेली नाही पण त्यामुळे विभागाचा खर्च किंवा रिलिजस थांबत नाही. कारण तेव्हा ते प्रथमच वर्ष होते म्हणून ती अडचण निर्माण झालेली होती. समितीचा दुसरा मुद्दा होता की, सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाचा हिस्सा ७५ टक्के आणि राज्य शासनाचा २५ टक्के होता. हे प्रमाण बदलत राहते आणि आज ते ६० टक्के केंद्र शासनाचे आणि ४० टक्के राज्य शासनाचे आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाचे मत आहे की, ते पुनर्विनियोजन नाही तर ते प्रत्यार्पण आहे. Surrender is mainly due to non release of grant from the Central Government or by cut. असे मत समितीने व्यक्त केले असता, महालेखाकारांचे मत आहे की, केंद्र शासनाने जर पैसे वितरित नाही केले तर त्याच्या समरुप राज्य शासनाची जी तरतूद करण्यात आली होती ती पण वितरित झाली नाही आणि ती प्रत्यार्पित झाली, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान-

या लेखाशीर्षाखाली राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत विभागाने यामध्ये २९३ कोटी १० लाख रुपयाचे प्रत्यार्पण केलेले आहे. यात पूर्ण केंद्र शासनाचा हिस्सा आहे काय ? केंद्र पुरस्कृत योजनेचा जो सर्व निधी प्रत्यार्पित केला. त्यामध्ये मुलत: because of non receipt of funds you surrendered the amount, असे गृहित धरावे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाच्या सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व सदरील लेखाशीर्षाचे नावच केंद्र हिस्सा आहे असे सांगितले.

केंद्र शासनाकडून निधी न येण्याच्या कारणामध्ये विभागाच्या कुठे त्रुटी आहेत काय? वेळेवर प्रशासकीय मान्यता देणे शक्य झाले नाही किंवा वेळेवर त्यांचे खाते सुरू करता आले नाही काय? कारण विभागाकडे सर्व निधी उपलब्ध होता आणि आता दोनच लॅपसेस आहेत की, मागच्या वर्षीची उपयोगिता प्रमाणपत्र दिले काय किंवा त्यांच्याकडे वेळेवर प्रस्ताव पाठविला काय? तसेच विभागाला त्याची प्रशासकीय मान्यता वेळेवर मिळाली होती काय? अशी विचारणा समितीने केली असता, तिसरा मुद्दा हा प्रशासकीय मान्यतेचा होता पण उपयोगिता प्रमाणपत्र हा खात्याचा विषय आहे. त्यांनी एक नमुना दिलेला आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे खाते जेव्हा लेखापरीक्षण करून पाठवतो तर U.C. is a part of that audited Account. सुरू वातीला नमूद केल्याप्रमाणे आर्थिक वर्ष सुरू होण्यापूर्वीच विभागाचे प्रस्ताव जात असतात म्हणजे प्रस्ताव वेळेवर होते आणि अकाऊँट पण वेळेवर होते. राज्य स्तरावर प्रशासकीय मान्यतेचा प्रश्न उपस्थित झाला कारण तेव्हा ते प्रथमच वर्ष होते. केंद्र शासनाचा एक कॉम्प्लेक्स फॉर्मुला आहे म्हणजे त्यांनी सुरू वातीला १ किंवा २ हजार कोटी रुपये देऊत असे नमूद केले असले तरी नंतर त्याचे इन्सेटिव्ह किंवा डिसइन्सेटिव्ह म्हणून बरेच पॉइंट आहेत. जसे राज्य शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये १० टक्के वाढ हा एक पॉइंट आहे आणि दुसरा मुद्दा असा की, प्राथमिक आरोग्य केंद्राची रेटींग काय आहे, तिथे प्रसुती किती होतात असे त्यांचे सुत्र हे दरवर्षी बदलत जाते. सन २०१७-१८ साठी निती आयोगाने अनेक प्रकारचे मापदंड लावलेले आहेत. त्या अनुषंगाने त्यांनी सुरू वातीला ठराविक रक्कम नमूद केली असली तरी तेवढी रक्कम ते वितरित करीत नाहीत. त्यामध्ये कमी-जास्त करून ते पैसे वितरित केले जातात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केंद्र शासन जी, पी.आय.पी. मंजूर करते तर त्याचा आणि विभागाच्या बजेटचा काय संबंध आहे म्हणजे साधारणपणे त्या पी.आय.पी.च्या किती अर्थसंकल्पीय तरतुद प्रस्तावित करण्यात येते ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीचा माध्यमातून केली असता, केंद्र शासन एक ठराविक ग्रॉस रिसोर्स इन्व्हलप सांगते. सन २०१७-१८ चे उदाहरण घेतले तर त्यांनी सुरू वातीला सांगितले की, २९०० करोड रुपये हे तुमचे रिसोर्स इन्व्हलप आहे. तर त्या आधारे ३१०० किंवा ३२०० कोटी रुपयाचा प्रस्ताव तयार करून त्यांच्याकडे पाठविला आहे. तिथे एक एन.पी.सी.सी. असते तिथे सर्व सचिव असतात आणि विभागाला पण बोलावले जाते, तिथे विभाग सादरीकरण करतो आणि योजनेनुसार ती प्रक्रिया होत असते. त्यांनी या वर्षासाठी ३१०० कोटी रुपयाची मान्यता दिलेली आहे. जेवढा पी.आय.पी. विभाग पाठवतो त्या अनुषंगाने त्याच्या ६० आणि ४० टक्के करून विभाग राज्य शासनाला अर्थसंकल्प तयार करण्यासाठी तो प्रस्ताव पाठविण्यात येतो. कारण त्यामध्ये पूर्वीचे पैसे पण विभागाला प्राप्त असतात आणि ते समाविष्ट करण्यात येतात. जसे की, सन २०१७-१८ मध्ये बरेच पैसे जे की, सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ साली केंद्र शासनाने वितरित केले होते पण विभागाला ते वितरित झालेले नव्हते ते राज्य शासनाकडे आता वितरित झालेले आहेत. यामुळे सन २०१७-१८ साठी विभागाने जी तरतूद केलेली होती ती तरतूद सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ साठी उपलब्ध झालेला केंद्राचा हिस्सा वितरित करण्यामध्ये वापर झालेला आहे तर विभागाने परत पुरवणी मागणी मागितली आहे. विभागाला जेवढा पी.आय.पी. मान्य होण्याची अपेक्षा असते त्यानुसार ६० आणि ४० प्रमाणे विभाग प्रस्ताव पाठवतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ या वर्षांमध्ये राज्याचा असणारा ४० टक्के हिस्सा पूर्णपणे विभागाला मिळालेला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यापैकी काही आदिवासी क्षेत्राचा हिस्सा आणखी शिल्लक आहे. वित्त विभागाकडे हा विषय वारंवार मांडण्यात येत आहे. आता केंद्राचा हिस्सा जसा जनरल एसीपी, टीएसपी अंतर्गत तीन भागामध्ये येतो तसाच केंद्राचा हिस्सा जनरल एसीपी, टीएसपी अंतर्गतच येतो. समितीने सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ चा प्रश्न विचारला आहे त्यामध्ये विभागाला जो राज्याचा हिस्सा अपेक्षित होता त्यामध्ये अजूनही जवळपास ट्रायबलचे ८० कोटी रुपये विभागाला अपेक्षित आहेत. जो समरुप हिस्सा राज्याच्या टीएसपी अंतर्गत येणे आवश्यक होते त्यापैकी सन २०१४-१५ चे १७.७९ कोटी रुपये आणि सन २०१५-१६ चे ६३.६९ कोटी रुपये होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाने जर ४० टक्के पैसे दिले नाही आणि केंद्राने ६० टक्के पैसे दिले तर ते रि-ॲडजेस्ट केले जातात काय ? अशी विचारणा समितीने केली असता, असे न करता ते पुढची रिलिज थांबवतात. त्यामुळे सन २०१७-१८ मध्ये ऑगस्ट-सप्टेंबर पर्यंतचा एकही पैसा प्राप्त झाला नाही. कारण वारंवार ते मुख्य सचिवांना पत्र लिहित होते की, सन २०१५-१६ आणि सन २०१६-१७ मध्ये दिलेले पैसे त्यांना पासआऊट केलेले नाहीत तर ते पैसे पासआऊट करा तरच विभागाला पहिला हफ्ता वितरित करु असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये असे नमूद आहे की, २०,६३८ कोटी रुपयांचा प्रस्ताव पी.एच.डी.कडे सादर केला होता परंतु सुधारित अंदाज पत्रकानुसार केंद्र हिश्याची रक्कम ११,४४४ कोटी रुपये इतकाच निधी वितरित करण्यात आला असून तेवढाच प्रत्यक्ष खर्च झाला आहे. २०६ कोटी रुपयांचा एवढा मोठा प्रस्ताव होता पण ११४ कोटी रुपये एवढाच निधी वितरित झाला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाला सांगितले आहे की, जितका पैसा तिथून आला तितका वितरित केला आहे, अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासन जेव्हा पैसे वितरित करते तेव्हा त्याची एक प्रत संबंधित विभागाकडे येते त्याप्रमाणे संबंधित विभाग वित्त विभागाकडे मागणी करतो. तेव्हा ते पैसे प्राप्त झालेत की नाही असे वित्त विभाग तपासणी करतो नंतर उपलब्धतेप्रमाणे ते पैसे वितरित करतात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वित्त विभागाला केंद्र शासनाकडून जेवढे पैसे मिळाले तेवढे त्यांनी विभागाला रिलिज केले आहेत, असे विभागाचे म्हणणे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाचे म्हणणे आहे की, त्यांनी तेवढे पैसे रिलिज केले नाहीत. विभागाने २०६ कोटी रुपयांची मागणी केली होती तर त्यांनी ११४ कोटी रुपये रिलिज केले आणि तेवढे पैसे विभागाने खर्च केले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले. मग राज्य शासनाचा हिस्सा देण्यात आला काय ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, राज्य शासनाचा हिस्सा आला कारण तो याच सी.आर.सी.मध्ये पुढे दिसून येईल. प्रत्येक सी.आर.सी. ला राज्य शासन आणि केंद्र शासनाचे तीन-तीन लेखाशीर्ष आहेत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अर्भकाच्या मृत्युदरात घट करण्यासाठी तरतूद केलेल्या रकमेतील २५ कोटी रुपये विभागाने प्रत्यार्पित केले आहेत कारण ही काही केंद्र शासनाची योजना नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, This is not a NHM scheme. This is a 13th Finance Commission Grant. We sent the proposal, they released this amount and we have spent that much amount. जेवढी रक्कम वितरित झाली तेवढाच खर्च झालेला आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा केंद्र शासनाचा विषय नसून राज्य शासनाचा विषय आहे तर यामध्ये कोणी रक्कम वितरित केली नाही. विभागाकडे तरतूद असताना राज्य शासनाकडून पैसे प्राप्त करून घेण्यासाठी विभाग कुठे कमी पडला आहे ? कारण २५ कोटी रुपये विभागाला खर्च करता आले नाहीत तर विभागाने ते प्रत्यार्पित केले असल्याचे दाखवले आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, १३ व्या वित्त आयोगाचे काही पैसे आज सुद्धा राज्य शासनाने विभागाच्या सोसायटीकडे प्रत्यार्पित केलेले नाहीत. त्यासाठीचा प्रस्ताव विभाग वारंवार पाठवतो पण विभागाला सांगण्यात येते की, ते नंतर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासन म्हणजे नेमके वित्त विभाग की सार्वजनिक आरोग्य विभाग ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, वित्त विभाग असे विभागीय सचिवांनी सांगितले.

तरतूद असताना सुद्धा वित्त विभागाने पैसे वितरित केलेले नाहीत. सन २०१५-१६ या वर्षामधील ८० कोटी रुपये येणे बाकी आहेत. यामध्ये असे स्पष्ट दिसून येते की, त्यांनी तरतुद केली आणि १३ व्या वित्त आयोगाचे जे पैसे यांनी देय होते त्याची तरतूद केली पण वित्त विभागाने ते वितरित केले नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता, हा विषय खूप सोपा आहे नंतर याचे ब्रिफ पण आहे. आता आपण १५ व्या वित्त आयोगाची चर्चा करण्यात येत आहे तर १३ व्या वित्त आयोगामध्ये त्यांनी ठरवून दिलेले होते की, कोणत्या राज्याला कोणत्या कामासाठी किती पैसे उपलब्ध करून देणार आणि त्याचे टप्पे कसे असणार. त्याप्रमाणे त्यांनी राज्य शासनाचे पैसे वितरित केले आणि राज्य शासनाच्या कोषागारामध्ये ते जमा झाले, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाला किती पैसे द्यायचे हे वित्त विभागाने ठरवले तितकी विभागाने तरतुद केली आहे. त्यानुसार तेवढे पैसे आले पण शासनाने विभागाला ते वितरित केले नाही. तर समिती तेच म्हणत आहे की, अर्भकांसाठी १३१ कोटी रुपयांची तरतूद विभागाकडे होती आणि ते पैसे केंद्र शासनाने या विशेष कामासाठी नियोजित करून राज्य शासनाला पाठवले परंतु ते पैसे त्यांनी विभागाला वितरित केले नाहीत, असे मत समितीने व्यक्त केले असता, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती आहे. त्या समितीपुढे विभाग प्रस्ताव सादर करतो त्यानुसार समिती त्याला प्रशासकीय मान्यता देते. त्या दिवशी यासाठी किती रुपयाची प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती हे आता सांगणे शक्य नाही. पण आज प्रशासकीय मान्यता प्राप्त असून राज्य शासनाकडे विभागाने पैशाची मागणी केली तरी ते अप्राप्त आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वित्त विभागाने हा निधी त्याला प्रशासकीय मान्यता नव्हती म्हणून वितरित केला नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, हा विषय कोणालाही दोष देण्याचा नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या पुनर्विनियोजनातील बाबी समितीला निदर्शनास आणावयाच्या आहेत. What is the reason behind this? If it is not received from the Central Government, then we are agreeable. If it is not received by you due to cut, then also we are agreeable. But, if the Government is making any provision and they are not releasing the fund for any reason, then it cannot be. विभागाने त्याची प्रशासकीय मान्यता घेतली नाही किंवा त्याच्यासाठी तरतूद नव्हती यापैकी काहितरी कारण समितीला स्पष्टपणे सांगावे, असे समितीने सूचित केले असता, याची आणखी खोलपर्यंत विभागाला तपासणी करावी लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे सर्व केंद्र शासनाच्या निधीमुळे मिळाले तर विभागाला काही करता येत नाही, अशा प्रकारचे बायपास विभागाने दिले आहेत, असे मत समितीने व्यक्त केले असता, या लेखाशीर्षावर विभाग तसे म्हणणार नाही कारण हे लेखाशीर्ष पूर्णपणे राज्य शासनाचे आहे. पण राज्य शासनाकडे हा निधी असूनही विभागाला प्राप्त झालेला नाही. याबाबतची कारणमीमांसा करण्यासाठी याची माहिती समितीला नंतर सादर करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याची पूर्ण माहिती समितीला द्यावी. कारण विभागाने दिलेले उत्तर काही समाधानकारक वाटत नाही. अर्भकासंबंधी विभागाने २५ कोटी रुपये पुनर्विनियोजित केले असे मत समितीने व्यक्त केले असता हा निधी पुनर्विनियोजित नसून प्रत्यार्पित केला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाला १३ व्या वित्त आयोगाचा जो निधी येतो तो पूर्णपणे एकत्रित निधीमध्ये जातो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

या निधीमध्ये जर विभागासाठी तरतूद असेल आणि त्या प्रकारचा प्रस्ताव वेळेवर सादर केला असेल तर ही कपात लावण्याचे कोणतेही कारण नाही आणि १३ व्या वित्त आयोगाला कोणतीही कपात लागत नाही कारण सर्व निधी तिथून येतो. विभागाकडे काही प्रशासकीय मान्यता नसेल किंवा काही पाठपुरावा केला नसेल किंवा विभागाने ३१ मार्चला निधीची मागणी केली असेल तर त्यांनी तो दिला नसेल. यानंतर ५७ कोटी २६ लाख रुपयांची मागणी आणि ५७ कोटी रुपयांचे प्रत्यार्पण हे केंद्र शासनाचे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, तो निधी केंद्र शासनाचा नसून यामध्ये समरूप हिस्सा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

५६ कोटी रुपयांपैकी ३८ कोटी रुपये केंद्र शासनाचे आहेत क्षयरोग, हृदयरोग केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय अंधत्व निवारण या खाली आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रत्येक योजनेसाठी राज्य हिस्सा आणि केंद्र हिस्सा असे सी.आर.सी.एस. आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम-

या लेखाशीर्षाखाली विभागाने ३८२४.०० लाख रुपयांची पूरक मागणी केली होती. मग ती विभागाने प्रत्यार्पित केली, असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, यामध्ये ५६ कोटी रुपयांची मूळ तरतूद होती आणि १८ कोटी रुपये विभागाला प्राप्त झाले आहेत. ते खर्च केले आणि बाकी प्रत्यार्पित झाले आहेत. यामध्ये विभागाने काही पूरक मागणी केलेली नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पण यामध्ये विभागाने पूरक मागणी केली असे दाखवण्यात आले आहे. यात पूरक मागणी आहे का पुनर्विनियोजन आहे ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, This is all surrendered amount. 'पुनर्विनियोजन' is a wrong word used. In English, you have used word 'surrender', however, in Marathi, it is shown as 'पुनर्विनियोजन', असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एका पुस्तकामध्ये पूरक आणि एकामध्ये पुनर्विनियोजन आहे म्हणून यात शंका आहे. यामध्ये प्रश्न हाच आहे की, ते पी.आय.पी.प्रमाणे अर्थसंकल्पीय तरतूद करतात पण नियमाप्रमाणे तेवढा पैसा येतच नाही. Don't you think that you are demanding excess funds? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, No. It is a shadow provision only, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मागच्या वर्षी पण केंद्र शासनाने पी.आय.पी.प्रमाणे तेवढे पैसे विभागाला वितरित केले होते काय ? It is all notional budgeting. We feel that you are not taking into account the reality, You can be hopeful for 10%-20% and not for 100%. 500 is the

PIP, you make provision for 600 is acceptable. You made provision for 900 that is unacceptable. असे मत महालेखाकरांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, We are always hopeful. Just to give you an example. Suddenly, our Hon. Prime Minister thinks that all our sub-centres converted into health and wellness centre. When we made PIP there was no such scheme then, suddenly something comes during the year and then it gets adjusted. इसलिए तो हमें प्रोव्हीजन पुरी करनी पड़ती है, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने पी.आय.पी. सादर केलेला आहे, तो मंजूर झालेला नाही. विभागाने सर्व प्रथम पी.आय.पी. सादर करावे. असे मत समितीने व्यक्त केले असता, याचा राज्य शासनाला आणि विशेषत: सार्वजनिक आरोग्य विभागाला फार मोठया प्रमाणात तोटा सहन करावा लागेल. The amount is huge and it affects the fiscal deficit. That calculation gets difficult. Since I was having the charge of Finance Department for four years, I will tell you that if you don't take that into account intially that there is budgetting of Rs.3000 crore, then anticipating that we don't have to incur this particular expenditure, we will provide Rs.3000 crore somewhere else. It affects the mid-term fiscal discipline. Particularly, regarding Central Government Schemes, it is always better to add it on higher side, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ११० रुग्णालये व दवाखाने, मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये-

या लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद ही ५९१०७.२९ लाख रुपयांची होती. त्यामध्ये पूरक मागणी ही १९३९.०२ लाख रुपयांची घेण्यात आलेली आहे आणि पुनर्विनियोजन ४९३९.१५ लाख रुपये आहेत. सदर योजना ही राज्य सरकारची आहे. तसेच यामध्ये खर्च झालेली रक्कम ५५८८३.२७ लाख रुपये आहे. मूळ तरतुदीपेक्षा कमी खर्च करण्यात आलेला आहे, अशी विचारणा समितीने केली असता, सदर विषय हा कपातीचा आहे. पुरवणी मागणी मंजूर केल्यानंतर माहे जानेवारी मध्ये याबाबतचा आदेश प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामुळे पैसे मिळालेले नाहीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

किती टक्के कपात करण्यात आलेली होती, अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक २ जानेवारी, २०१५ च्या परिपत्रकानुसार ४० टक्के कपात प्लॅनसाठी आणि २० टक्के नॉन-प्लॅनसाठी आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

प्लॅन आणि नॉन-प्लॅन म्हणजे काय ? प्लॅनच्या किती टक्के कपात करण्यात आलेली आहे. अशी विचारणा समितीने केली असता, प्लॅनच्या ४० टक्के कपात आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

४० टक्के विभागाने समर्पित केलेले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, दोन कोटी २३ लाख रुपये विभागाचे अखर्चित राहिलेले आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मूळ तरतूद ५९१ कोटी, अतिरिक्त तरतूद १९ कोटी असे मिळून ६१० कोटी रुपये झाले. त्यापैकी ४० टक्के कपात झाली तर २४९ कोटी रुपयांची कपात झाली पाहिजे. विभागाने ४९ कोटी रुपयांची कपात लावलेली आहे. अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये असलेल्या लेखाशीर्षाखाली काही लेखाशीर्ष हे वेतनाचे असतात. विभागीय सचिवांनी सांगितले.

वेतन हे नॉन-प्लॅनमध्ये येते, असे समितीने निदर्शनास आणले असता, वेतन प्लॅनमध्ये समाविष्ट होत असते. ॲक्चुअल परसेंटेज उतना नहीं आएगा, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इसका मतलब यह है कि ४० प्रतिशत के बारे में हमने कुछ देखना ही नहीं चाहिए. कहीं पर वेतन रहेगा, कहीं पर वेतन नहीं रहेगा, तो फिर यह सब जादुगरी चलते रहेगी. If it is cut then, let us go for 40%. If it is Central Government then, we are agreeable. राज्य सरकारच्या योजनांमध्ये कोणत्याही प्रकारची स्पष्टता दिसून येत नाही. यामध्ये वेतन, दूरध्वनी देयके, विद्युत, पाणी खर्च यावर कमी खर्च झालेला आहे, असे कारण सांगितले आहे. वेतनावर कशा प्रकारे कमी खर्च होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, जर काही ठिकाणी डॉक्टर, टेक्निशिअन यांची पदे भरलेली नसल्यास त्यावरील खर्च कमी होतो, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वित्त विभागाला समितीने अशी सूचना केली आहे की, यासाठी एकत्रित निधी देण्यात यावा. विभागाकडे अनेक ठिकाणी रिक्त पदे आहेत. प्रत्येक ठिकाणी जेवढी पदे मंजूर आहेत तेवढी विभागामार्फत तरतूद करण्यात येते. गोंदिया जिल्ह्यामध्ये ५० टक्के सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये (R.H.C) मध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत. तरीही त्या ठिकाणी वेतनाचे नियोजन करण्यात येते. राज्य सरकारचा निधी तसाच न ठेवता शक्य असेल तर तो खर्च करण्यात यावा. विभाग वारंवार रिक्त पदांचे कारण सांगत आहे. यामध्ये एकत्रित निधी ठेवण्यात यावा, असे समितीने सूचित केले असता, काही वर्षापूर्वी वित्त विभाग असा विचार करीत होता की, a consolidated amount will be put in the Demands of Finance

Department against the Salary Head. जसे की, महागाई भत्त्यासाठीची तरतुद ही वित्त विभागाकडे असते. तशाच प्रकारचा तो प्रस्ताव होता. त्याबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली, हे माहिती नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागामध्ये असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांची १६०३ पदे रिक्त आहेत. एकूण मंजूर पदे ही ७५२४ आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दोन ते तीन महिन्यापूर्वी याबाबत बैठक घेण्यात आलेली होती. त्यामध्ये विभागाने सांगितलेले होते की, एक महिन्यामध्ये सदर पदे भरण्यात येतील. असे समितीने निदर्शनास आणले असता, मागील आठवडयामध्ये ३०८ डॉक्टरांची बंधपत्रे मिळालेले आहेत. डिसेंबरच्या पहिल्या आठवडयामध्ये ३०० पेक्षा जास्त पदे भरण्यात आलेली आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सध्या नवीन झालेल्या दवाखान्यामध्ये, ग्रामीण रुग्णालयामध्ये, ट्रॉमा केअरमध्ये पदे भरण्यात येतील काय ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये ट्रॉमा केअरसाठी मंजुरी मिळालेली आहे. तसेच, चार महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये पदे भरण्याची मंजुरी मिळालेली आहे. याबाबतचे शासन निर्णय प्रसारित झाल्यानंतर पदे भरण्यात येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

भुसावळ येथील वरणगाव येथे डॉक्टरचे पद भरण्यासंदर्भात एक बैठक आयोजित करण्यात आलेली होती, याबाबत समितीने विचारणा केली असता, जळगाव जिल्ह्यामध्ये सहा डॉक्टर पाठविण्यात आलेले आहेत. त्यापैकी एक डॉक्टर रुजू झालेले आहेत. त्यामध्ये पी.जी. केलेले चार डॉक्टर आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जी नवीन ग्रामीण रुग्णालये सुरू करण्यात आलेली आहेत त्यामध्ये डॉक्टरांची पदे भरण्यात येणार आहेत की नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, ग्रामीण रुग्णालयाचा आराखडा अजून मंजूर झालेला नाही, काल याबाबत बैठक घेण्यात आलेली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने एन.यु.एच.एम.साठी प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, असे सांगितलेले आहे. त्यामध्ये कोणाची प्रशासकीय मान्यता मिळावयाची आहे ? अनुसूचित जातीसाठी केंद्र सरकारची विशेष घटक योजना आहे, असे मत समितीने व्यक्त केले तसेच, The comment of A.G. was "Surrender of provision of Rs. 20267.17 lakhs under the Head mentioned above in March, 2015 was attributed to non-receipt of administrative approval for the remaining amount". याबाबतची कारणे लोकलेखा समितीला सांगण्यात यावी, असे कळविले होते. असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाने वितरित केलेले पैसे प्राप्त झालेले आहेत व ते खर्च करण्यात आलेले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वित्तीय लेखे तयार करताना महालेखापालांना सांगितले होते की, विभागाला प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही, असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, This administrative approval is of whole NHM, it is of the State Government. Planning Department had suggested that we should take approval of NHM from Cabinet. At that time, NHM was co-terminus with Five Year Plan. Therefore, that period was over in 2012. They were saying that from 2012 onwards you have not taken the approval of the Cabinet. The issue of NHM came into light when NUHM was not there in the initial part of NHM. NUHM started in 2013-14. The Planning was clearing the scheme of NRHM because earlier they were having the administrative approval. It was the first year of NUHM, therefore, they didn't clear that component, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

It means State Government didn't give the approval, अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, The Planning Department raised certain issues and subsequently it was released. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ सार्वजनिक आरोग्य, १०१ रोगप्रतिबंधक व नियंत्रण, हिवताप नियंत्रण कार्यक्रम (स्थानिक क्षेत्र)-

या लेखाशीर्षाखाली मूळ रक्कम १४३ कोटी ४२ लाख रुपयांची आहे. सदरहू योजना ही राज्य सरकारची आहे. यामध्ये २७ कोटी रुपये प्रत्यार्पित करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये २० लाख रुपये अजून बचत झालेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, सैलरी हेड में सेविंग है. वैसे देखा जाए तो यह रकम ज्यादा नहीं है. जितना कट है वह उसी प्रपोर्शन में है, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागीय प्रतिनिधीने कहा है कि कई जगह पर ट्रेजरी के ऑब्जेक्शन के कारण बिल पास नहीं हुए है तो विभागके बिल पर ट्रेजरी क्या ऑब्जेक्शन लेती है ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, यह पूरे महाराष्ट्र के बारे में है. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

निधी उपलब्ध असताना धनादेश पास होत नसेल तर त्यामध्ये प्रतिपूर्ती करीत असताना सर्व कागदपत्रे व्यवस्थित असली पाहिजेत, असे मत समितीने व्यक्त केले.

२२११ कुटुंब कल्याण, १०१ ग्रामीण कुटुंब कल्याण सेवा, ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्र व आरोग्य उपकेंद्रे-

या लेखाशीर्षाखाली ४८६२१.१८ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच, २४५१.९२ लाख रुपये समर्पित केलेले आहेत. त्यानंतर पुन्हा ५ कोटी ३७ लाख रुपये समर्पित केलेले आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये पाच ते सहा टक्के बचत करण्यात आलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाच्या उत्तरामध्ये नमूद आहे की, शासन स्तरावर नियोजन करण्यात आलेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, जिल्हा परिषदेकडे १३२९ पदे रिक्त आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले तसेच सदर बाब ही जिल्हा परिषदेच्या दिलेल्या वेतनामध्ये अंतर्भूत होत आहे. यामध्ये सबसेंटरच्या एनएम चे वेतन देण्यात येते. यामध्ये जवळपास १० हजार सबसेंटर आहेत. त्यामध्ये १३२९ पदे रिक्त होती, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शासनाकडून ३१ सहायक अनुदानाचे अनौपचारीक संदर्भ मिळालेले नाहीत. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, यामध्ये दोन ते तीन कारणे एकत्रित करण्यात आलेली आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये ३१ बाबीमध्ये अर्थोपाय संदर्भ मिळालेला नाही. म्हणून ५०५ कोटी रुपयांची बचत झालेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, याबाबत विभागाकडून प्रस्ताव दाखल करण्यात येऊन त्याचा पाठपुरावा देखील करण्यात आलेला आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

जर वित्त विभागाकडे २९ मार्च रोजी प्रस्ताव सादर केला तर तो निकाली निघणार नाही. विभागाने वेळेवर प्रस्ताव सादर केलेला होता का ? अशी विचारणा समितीने केली असता, प्रस्ताव वेळेवर सादर करण्यात आलेला होता कारण त्यामध्ये वेतनाचा संबंध येतो. परंतु केव्हा सादर केला याची तारीख सध्या उपलब्ध नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

असे असेल तर प्रस्ताव मंजूर न होण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मंजुरी मिळालेली नसल्यामुळे तो निधी खर्च करण्यात आलेला नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

Give us reason in at least one case. Non-release of Grant by whom, PHD or Finance? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाचा प्रश्न नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाने वित्त विभागाला वेळेवर प्रस्ताव पाठविला होता काय? रिक्त पदांमुळे पैसे वाचलेले आहेत, हे समिती समजू शकते परंतु अर्थोपाय नसल्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये पाच कोटी रुपयांची बचत दिसण्याचे कारण असे की, प्रत्येक जिल्हा परिषदेला ठराविक रक्कम देण्यात येते. त्यांच्याकडे जर काही पदे रिक्त असतील तर तेवढी रक्कम जिल्हापरिषदेने समर्पित केली पाहिजे. जर तशा प्रकारची रक्कम समर्पित केली नसेल आणि पदेही रिक्त असतील तर शिल्लक दिसते. त्यामुळे पाच कोटीची बचत दिसण्याचे हे कारण आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. यामध्ये शासनाने असे उत्तर दिलेले आहे की, शासनाकडून ३१ सहाय्यक अनुदाने वेतनेत्तर आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये केवळ बीड जिल्ह्याचा हा विषय आहे. जिल्हा परिषद बीड यांनी निधी वेळेवर समर्पित केलेला नाही, विभागीय सचिवांनी सांगितले.

Are we saying that all this is because vacant posts? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, More than 90% of this is due to vacant posts. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला असंबद्ध उत्तरे देऊ नयेत. जिल्हा परिषदेमध्ये निधी विखुरलेला होता. ३१ सहाय्यक अनुदाने अनौपचारिक संदर्भ प्राप्त न झाल्यामुळे लेखा व कोषागाराने आक्षेप घेऊन मार्च अखेर परत केली. ते शिल्लक अनुदान जिल्हा परिषदेने समर्पित न केल्यामुळे ५ कोटी ३७ लाख रुपयांची बचत दिसून येत आहे. जिल्हा परिषदेला अर्थोपाय देणे शक्य झाले नाही. म्हणून तो निधी शिल्लक आहे, ती रक्कम अखर्चित दिसत आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, अर्थोपाय न मिळण्याबाबत केवळ बीड जिल्ह्याचा मुद्दा आहे. इतर जिल्ह्यांमध्ये असे नाही. संपूर्ण राज्यात १३३९ म्हणजे १० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त आहेत.हा विषय केवळ बीड जिल्ह्यापुरता मर्यादित आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आरोग्य विभागात सध्या किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, गट अ मध्ये सिनिअर कॅडरमधील ७० टक्के पदे रिक्त आहेत. ६६०० पेक्षा अधिक ग्रेड पे असणारी ७० टक्के पदे रिक्त आहेत. ५४०० ग्रेड पे असणारी वैद्यकीय अधिकाऱ्यांची २० टक्के पदे

रिक्त आहेत. गट क मध्ये टेक्निकल स्टाफची २० टक्के पदे रिक्त आहेत. गट ड मधील पदे भरण्याची विभागाला परवानगी असून ती ९० टक्के पदे भरलेली आहेत. रुग्ण सेवेशी संबंधित नसलेली पदे भरण्याची परवानगी नाही. एमपीएससी मार्फत ही पदे भरली जातात. पदोन्नतीने भरावयाच्या पदांकरिता स्पेशालिटी असणारे डॉक्टर्स उपलब्ध नाहीत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याबाबत पूर्वी बैठक झाली होती त्यावेळी विभागाने सांगितले होते की, २-३ महिन्यांत पदे भरली जाणार आहेत. या पदांचा चार्ट समितीला द्यावा. हा अतिशय गंभीर विषय आहे. पदे भरण्याबाबत सध्या विभागाचे काय नियोजन आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, वैद्यकीय अधिकाऱ्यांची बरीचशी पदे भरली आहेत. राज्यात ६६०० पेक्षा अधिक ग्रेड पे असणारी एकूण १६५४ पदे असून त्यातील ६०८ पदे भरली आहेत १००८ पदे रिक्त आहेत. स्पेशालिटीमध्ये जास्त पदे रिक्त आहेत. एमबीबीएस डॉक्टर्स मागील ६ महिन्यांत मिळण्यास सुरू वात झाली आहे. बंधपत्राच्या माध्यमातून ६०० डॉक्टर्स मिळाले आहेत. मागील २-३ महिन्यांत मुलाखत घेण्यात आली होती त्यावेळी ३०० डॉक्टर्स प्राप्त झाले. एमबीबीएस डॉक्टर्स आता मिळत आहेत. स्पेशालिस्ट डॉक्टर्स उपलब्ध नाहीत. ॲनास्थेटीस्ट डॉक्टर्सची पदे अधिक रिक्त आहेत. लहान मुलांचे स्पेशालिस्ट, गायनॉकॉलॉजिस्ट व मेडीसीन, सर्जरी यांची मोठया प्रमाणात पदे रिक्त आहेत. एनएचएम मधून १७५ डॉक्टर्स उपलब्ध झाले आहेत. इव्हेन्ट बेसीसवर त्यांना पगार दिला जातो, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ००१ संचालन व प्रशासन, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई-

या लेखाशीर्षाखाली ५ लाख ३२ हजार रुपयांचा अधिक खर्च झालेला आहे, याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, वेतन व मोटारवाहन याबाबीखाली कपात या पूर्वीच करण्यात आली होती. कपात करण्यापूर्वीच खर्च जास्त झालेला होता. जी.आर निघण्यापूर्वीच रक्कम खर्च झालेली होती, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, अनुसूचित जातींकरिता विशेष घटक योजना, राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम या लेखाशीर्षाखाली एवढया मोठया प्रमाणात पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून रक्कम घेतली व नंतर ती प्रत्यार्पित केली असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये केंद्र शासनाचा हिस्सा आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सर्व ठिकाणी असे नमूद केले आहे की, जेवढे अनुदान मिळाले तेवढी रक्कम खर्च करण्यात आली आहे. विनियोजन लेखे करतानाच विभागाने असे नमूद करावे की, एवढा निधी केंद्र शासनाकडे मागितला होता व तेवढा मिळाला नाही त्यामुळे रक्कम प्रत्यार्पित करावी लागली. अशी सूचना महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली.

वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, जनरल, आरोग्य सांख्यिकी व मूल्यमापन, जीवनविषयक आकडेवारी आणि आरोग्यविषयक माहिती केंद्रे या लेखाशीर्षाखाली ८०० कपाटांची ऑर्डर दिली, त्यापैकी २०० कपाट प्राप्त झाले. याबाबत खुलासा करावा, असे समितीने सूचित केले असता, ८९८ कपाटांकरिता तरतूद केलेली होती. केंद्रीय खरेदी समितीने ६५१ कपाटांकरिता मंजुरी दिली. त्यानुसार दि.१३ फेब्रुवारी २०१५ रोजी कपाटांची खरेदीची ऑर्डर देण्यात आली, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दि. ३१ मार्च, २०१५ पर्यंत ९०० कपाट तयार करून प्राप्त कशी होणार ? दीड महिन्यात हे कसे शक्य होईल ? अशी विचारणा समितीने केली असता, निविदा प्रक्रिया होण्यास वेळ लागतो. एमएसआरडीसीने विभागाला कळवले की, २०० कपाटे देता येतील, त्यानुसार तेवढी कपाटे त्यांनी दिली, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांनी २०० कपाटे देण्याचे कळवले असता ९०० कपाटांची तरतूद का केली? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी २५ तारखेला असे कळवले की, २०० कपाटे देता येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

फेब्रुवारी महिन्यात ९०० कपाटांची ऑर्डर दिली, नंतर ती रक्कम प्रत्यार्पित केली जाते. यामुळे समितीमध्ये चर्चा होते. रिक्त पदे असोत किंवा खरेदीचा विषय असो. त्या वर्षात वस्तू प्राप्त होणार असतील तर त्याकरिता तरतूद करावी, त्याबाबत लोकलेखा समितीची काहीही हरकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, दि. १३ फेब्रुवारी रोजी ऑर्डर देताना डिलीव्हरी देण्याची त्यांची तयारी होती. दि.२५ मार्च रोजी त्यांनी पत्र दिले की, केवळ २०० कपाटे देऊ शकतो. त्यावेळी त्यांनी ऑर्डर मंजूर केली होती. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पुरवठा करण्याचा कालावधी किती असतो ? त्याकरिता दंड आकारण्यात आला होता काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ४५ दिवस पुरवठयाचा कालावधी असतो. कपाटे वेळेत प्राप्त झाल्यामुळे दंडाचा विषय आला नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ऑर्डर मंजूर केली असताना ४५ दिवसांत त्यांनी सर्व कपाटे द्यायलाच हवी होती. विभागाने ते कसे स्वीकार केले ? अशी विचारणा समितीने केली असता, संपूर्ण ऑर्डर दिली जाईल, अशी विभागाची देखील अपेक्षा होती. मात्र त्यापैकी २०० कपाटे त्यांनी दिल्यामुळे पुढील वर्षी त्यांना दिलेली ऑर्डर रद्द केली. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एवढया कपाटांची आवश्यकता होती काय? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, पुढील वर्षी प्रक्रिया केली तसेच यावर्षीदेखील काही कपाटे खरेदी करण्यात आली, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दि. ३१ मार्चपर्यंत पदे भरली जातील याची वाट पाहिली जाते काय ? नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात पदे भरण्याची कार्यवाही का केली जात नाही ? Do you keep waiting till 31st March for these vacant posts to be filled up? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, if you take this particular CRC, the total provision was Rs.9.4 crore. विभागीय सचिवांनी सांगितले.

I am not talking about any particular CRC. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, I will explain you. Henceforth, we are very transparent. we are mentioning you as what has happened. In a particular CRC, saving is of Rs.34 lakhs of which Rs. 28 lakhs is because of the problem of purchase of almirahs. But, the remaining amount is not even 1% of the total provision. Therefore, error in estimation is not even 1%. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

I am not talking about any particular CRC. In every paras comments are regarding vacant posts. असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, In every paras, there is surrender in advance. There are very few CRCs where surrender has not happened and therefore, it has resulted in savings. विभागीय सचिवांनी सांगितले.

जी रक्कम प्रत्यार्पित केली त्याचे पुनर्विनियोजन केले. ३४ लाख रुपयांची बचत झालेली आहे. त्या बद्दल या ठिकाणी चर्चा केली जात आहे. असे समितीने निर्देशनास आणले असता, यामध्ये १ टक्का एरर ऑफ एस्टीमेशन आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, संचालन व प्रशासन, प्राथमिक आरोग्य प पथकांची स्थापना या लेखाशीर्षाखाली एकूण रकमेच्या ०.५ टक्के रकमेची बचत झालेली आहे. हा रिक्त पदांचा विषय आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. त्यास समितीने सहमती दर्शविली.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ सार्वजनिक आरोग्य, १०१ रोग प्रतिबंध व नियंत्रण, मलेरिया नियंत्रण कार्यक्रम (राज्यक्षेत्र)-

या लेखाशीर्षाखाली १०८ लाख रुपयांची बचत झालेली आहे. कोषागाराने आक्षेप घेतल्यामुळे देयके पारीत झालेली नाहीत, असे नमूद केलेले आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, १७२ कोटी रुपयांची तरतूद होती. ऐनवेळी काही अडचणी आल्यामुळे १ कोटी रुपयांची देयके पारीत झालेली नाहीत. ही रक्कमदेखील एकूण रकमेच्या १ टक्क्यापेक्षा कमी आहे. शेवटची देयके आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे हे सर्व कमेंटस मार्च महिन्याच्या बचतीवर आहेत काय ? अशी विचारणा समितीच्या माध्यमातून महालेखाकारांनी केली असता, शेवटच्या एक-दोन महिन्यांचे किंवा एका महिन्याचे असे आहेत कारण त्याची टक्केवारी खूप कमी आहे म्हणजे सर्व १० महिन्यांची देयके हे एकदाच राहिले असते तर त्याची टक्केवारी जास्त राहिली असती, कारण ही सर्व राज्यभराची देयके आहेत, विभागीय सचिवांनी सांगितले.

वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य इतर खर्च या अंतर्गत कर्करोग, मधुमेह, ह्दयरोग, आणि मस्तिष्कघात यांसारख्या रोगांचे प्रतिबंध व नियंत्रण यासाठी राष्ट्रीय कार्यक्रम या लेखाशीर्षाखाली विविध योजनांच्या हिश्श्याबाबत समितीने अवगत करण्यास सांगितले असता, राज्य सरकार का जो हिस्सा केंद्र सरकार से मिलना चाहिए था, वह केंद्र सरकार से रिलीज नहीं हुआ असे विभागीय सचिवांनी सांगितले. अशा बऱ्याच छोट्या-छोट्या योजना आहेत की, त्यांचा हिस्सा केंद्र शासनाच्या निधीमध्ये येतच नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी निदर्शनास आणले मग त्या योजना चालू राहतात की, बंद पडतात ? अशी विचारणा समितीने केली असता, केंद्र शासनाने जर यासाठी ५ कोटी रुपये मंजूर केले असतील आणि ते या वर्षी नाही आले तर पुढच्या वर्षी येतात, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने यासाठी मागणी केली तरीदेखील हे पैसे आले नाहीत काय? अशी विचारणा समितीने केली असता, याचा पी.आय.पी. मंजूर होता, मागणी केली होती तरी देखील हे पैसे आलेले नाहीत. एका योजनेअंतर्गत १२ ते १३ कार्यक्रम येत असतात पण त्यामध्ये एखाद्या कार्यक्रमाचे पैसे येतच नाहीत. मग उर्वरित पैशातून तो कार्यक्रम सुरू ठेवतो आणि नंतर आलेले पैसे त्यामध्ये समाविष्ट करण्यात येतात असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, ट्रामा केअर युनिटची स्थापना- महाराष्ट्र तातडीची वैद्यकीय सेवा-

या लेखाशीर्षाखाली १४ कोटी रुपयांपैकी फक्त १७ लाख रुपये समर्पित केले आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये जे कारण सांगितले आहे त्याबद्दल १५ नवीन ट्रामा केअर सेंटर कार्यान्वित झाली त्यामुळे नवीन पदे भरली गेली नाहीत. मार्च महिन्याअखेरपर्यंत साहित्य सामग्रीची प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे रक्कम प्रत्यार्पित केली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग बऱ्याच निविदा काढतो त्यामुळे त्यापैकी एखादे मागे राहिले तर त्याचे पैसे मागे राहून जातात, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ट्रामा केअर सेंटरची सद्य:स्थिती काय आहे म्हणजे किती ठिकाणी ते मंजूर झालेले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, एकूण ६५ ट्रामा केअर सेंटर आहेत पण सध्या ४० ते ४१ कार्यरत आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बाकीचे जे ट्रामा केअर सेंटर कार्यरत नाहीत तर यामध्ये जागा कधी भरल्या जाणार आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ८ ट्रामा केअर सेंटरच्या संदर्भात परवा शासन निर्णय निघालेला आहे त्यामध्ये पदे भरता येतील, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एवढी रक्कम खर्च करूनदेखील जिल्हा उप रुग्णालयामध्ये डॉक्टरांची व्यवस्था होत नाही तर याकरिता काहीतरी योजना बनवायला पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, आता एकही नवीन संस्था सुरू करण्यात येऊ नये, कारण आहेत त्याच संस्थांमध्ये आधी पद भरती करण्यात यावी, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आता जी ट्रामा केअर सेंटर अर्धवट अवस्थेत आहेत तर ती कधीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्धारित केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, भुलतज्ञ उपलब्धतेची अडचण ही पुढच्या १० वर्षांपर्यंत सुटणार नाही. ८ इमारती तयार झालेल्या आहेत आणि त्याचा स्टाफ मंजूर झालेला आहे आणखी १२ इमारतींचा पुढचा लॉट आहे. तर ७५ टक्केपर्यंत काम पूर्ण झाल्यानंतर पुढचे काम हाती घेण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

भुसावळ येथील पूर्ण इमारत तयार झालेली आहे पण तिथे एक ही उपकरण नाही. तसेच डॉक्टरची पदेही मंजूर नाहीत, असे समितीने निदर्शनास आणले असता, उपकरणांच्या खरेदीचा प्रस्ताव निघाला आहे. जर पूर्ण झालेल्या इमारतींमध्ये नाव असेल तर ते लवकरच मिळेल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२२१० वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ नागरी आरोग्य सेवा-विषमचिकित्सा, ११० रुग्णालये व दवाखाने, क्षयरोग रुग्णालये व आरोग्य धामे-

या लेखा शिर्षाखाली चर्चेअंतर्गत If the Department could give a presentation to the PAC on Manpower Management in the Public Health Department, the major health programmes which are funded by the Central Government and how the State has been affected due to non filling up of posts. अशी सूचना महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, we are doing very well. I want to remove some misconceptions. We are doing very well in the health sector. IIM-Ahmedabad has rated State of Maharashtra as No.1 State as far as input-output matrix is concerned. विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला त्याबद्दल काही संशय नाही पण त्याचबरोबर आरोग्य सेवेमध्ये अनेक अडचणी पण आहेत. गोंदिया जिल्ह्याची परिस्थिती सर्वांना माहित आहे त्यावर अनेकदा चर्चा झालेली आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाला ज्या शिफारशी प्राप्त झाल्या आहेत त्या अनुषंगाने याचे सादरीकरण करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले, त्यावर फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवडयामध्ये समितीला हे सादरीकरण दाखवा, असे समितीने सूचित केले.

हे सर्व पुस्तकी समायोजन आहे जसे की, भारत सरकार वस्तुस्वरुपात जे देते त्याची प्रदान विभागाकडून करण्यात येते. भारत शासनाकडून टी.बी.च्या रुग्णांच्या वाढीमुळे नवीन योजना आल्यामुळे जास्तीच्या गोष्टी वस्तूस्वरुपात आल्या आहेत. त्यामुळे जास्तीचा निधी त्यांना दिला गेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभाग काही गोष्टी खरेदी करीत नाही. तसेच विभाग एक ही लस खरेदी करीत नाही तर केंद्र शासनाकडून त्या प्राप्त होतात. त्याचप्रमाणे टी.बी.ची औषधी देखील प्राप्त होतात. They don't give in money, they give in kind. असे विभागाच्या प्रधान सचिवांनी सांगितले, तसेच या सर्वांचे पैसे बुक ॲडजेस्टमेंटने जातात, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

वैद्यकीय सेवा व सार्वजनिक या लेखाशीर्षाअंतर्गत फक्त रिक्त पदांचा विषय आहे की आणखी काही विषय आहे, अशी विचारणा समितीने केली असता, हा फक्त रिक्त पदांचा विषय आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जेव्हा मनुष्यबळ व्यवस्थापनावर विभाग सादरीकरण करेल तेव्हा the presentation on Manpower Management cannot be in isolation without considering the kind of infrastructure we are creating. त्याच्या निकषाप्रमाणे काय व्हायला पाहिजे and what

we are doing must come before the Committee. असे मत वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी व्यक्त केले असता, It is a good idea. As the Hon. Member was mentioning regarding trauma care centre, we also don't want these centres without any facilities to proliferate. विभागीय सचिवांनी सांगितले.

क्षमतेच्या पुढे जाऊन मुले जन्माला आणायची आणि नंतर निकषांच्या बाहेर जाऊन त्याला काही पायाभूत सुविधा किंवा पैसे देऊ शकत नाही. सादरीकरण करताना जे नॅशनल ग्लोबल स्टँडर्ड आहेत त्या अनुषंगाने आरोग्यामध्ये शेवटी काय पायाभूत सुविधा पाहिजे याचे चित्र जर समोर ठेवले तर समितीचा चांगल्या प्रकारे फायदा होईल, असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी पुन्हा विभागीय सचिव व प्रतिनिधींची पुन्हा साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सादरीकरण करीत असताना आकडेवारी वस्तुस्थितीला धरुन देण्यात यावी, त्यामुळे सादरीकरण चांगले होते, असे समितीने सूचित केले असता, महाराष्ट्र राज्याची लाईफ एक्स्पेक्टन्सी ६९.९ आहे. संपूर्ण देशाची ६६.१ आहे. २०३० पर्यंत हे ७७ पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. महाराष्ट्र राज्याचा अर्भक मृत्यू दर १९ आहे. देशामध्ये यात राज्याचा तिसरा क्रमांक आहे. पहिले राज्य केरळ आहे. दुसरे राज्य तामिळनाडू आहे. केरळचा दर १२ आहे. तामिळनाडूचा दर १७ आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लाईफ एक्स्पेक्टन्सीमध्ये राज्याची काय स्थिती आहे ? राज्याचे सरासरी वयोमान किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, देशात राज्य पाचव्या-सहाव्या क्रमांकावर आहे, राज्याचे सरासरी वयोमान ७० इतके आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महाराष्ट्र हा सहाव्या क्रमांकावर राहण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, अनुवांशिक बाबी यामध्ये आहेत. पंजाब, हरयाणा, केरळ या राज्यातील अनुवांशिक बाबी वेगळ्या आहेत. ते महाराष्ट्राच्या पुढे आहेत. आयएमआरमध्ये ते पुढे आहेत. मॅटर्नल मॉर्टेलिटीमध्ये ते महाराष्ट्राच्या पुढे आहेत. गरोदर मातांचे मृत्यू किंवा बाळंत होतांना मातेचा मृत्यू ६८ प्रति लाख असा लाईव्ह बर्थ आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यात कोणते रँकिंग आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये तामिळनाडू महाराष्ट्राच्या पुढे आहे. देशात महाराष्ट्राचा १६७ वा क्रमांक आहे, पाच वर्षाच्या आतील मृत्यू दर २३ आहे. देशात हा दर ४५ आहे. राज्याचा न्यूनेटल मॉर्टेलिटी दर १३ आहे. नुकत्याच झालेल्या सर्व्हेप्रमाणे हा दर १३ आहे. २८ दिवसांच्या आत पहिल्या महिन्यातील मॉर्टेलिटीचे प्रमाण १३ आहे. स्टील बर्थ ४ आहेत. नॅशनल लेव्हलमध्ये आयएमआर, मॉर्टेलिटी मॅटर्नल रेट, टीएफआर टोटल फर्टिलिटी रेट मोजतात. त्यात महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक आहे. त्यात कर्नाटक, आंध्र हे राज्य महाराष्ट्राच्या पुढे आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आरोग्यामध्ये महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर कधी येईल ? अशी विचारणा समितीने केली असता, आयआयएम,अहमदाबाद यांनी सन २०१६-२०१७ मध्ये पाहणी केली होती. त्याच्यामध्ये त्यांनी पाहणीसाठी इन्फ्रास्ट्रक्चर आणि राज्याचा प्रोग्रेस या सर्व गोष्टी पाच मुख्य क्षेत्रामधील घेतल्या होत्या. महाराष्ट्र कोणत्याच क्षेत्रात पहिला नाही. दुसरा,तिसरा आहे. पण संपूर्ण क्षेत्रांचा एकत्रित विचार केला तर देशात महाराष्ट्र राज्य पाच क्षेत्रांमध्ये देशात पहिल्या क्रमांकावर आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यात शासकीय रुग्णालयाचा किती वाटा आहे ? खाजगी रुग्णालयाचा किती वाटा आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ज्या सेवा विचारात घेण्यात येत आहेत, ज्यांची दर्शक आता मोजण्यात येत आहेत, त्यातील ५५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रसुती शासकीय रुग्णालयात केल्या जातात. ८०% च्या वर मुलांचे इम्यून्यजायशेन शासकीय रुग्णालयात केले जाते. राज्यात सर्वात जास्त स्पेशल न्यू बॉर्न केअर युनिट्स सार्वजनिक आरोग्य विभागाकडे आहेत. ५५,००० मुलांना मागील वर्षी उपचार केले होते. न्यूबॉर्न डेथ रेट लोअर दॅन टेन पर्सेंट आहे. सर्दी पडसे रूग्ण ७५ टक्के खाजगी रुग्णालयात जातात. ते क्लियर आहे. पण प्रिव्हेंटिव्ह सर्व्हिसेसमध्ये राज्य शासन पहिल्या क्रमांकावर आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

क्षयरोग रुग्णांमध्ये राज्य देशाच्या कोणत्या पातळीवर आहे, अशी विचारणा समितीने केली असता, राज्य जवळपास १३ वे १४ वे आहे. यात उपचाराचे प्रमाण कमी आहे. मुंबईमध्ये खूप मोठया समस्या आहे. मुंबई शहरामध्ये एक्सडीआर टयूबर क्लोसिस, एक्स्ट्रीम टयूबर क्लोसिसच्या केसेस आहेत. मुंबईत रुग्ण खाजगी रूग्णालयामध्ये जातात. खाजगी डॉक्टर्स भारत सरकारचा रेजीम फॉलो करीत नाहीत. रुग्णांचे पैसे संपून जातात, मग ते शासकिय रूग्णालयात येतात. तोपर्यंत त्याला रेझिस्टन्स झालेला असतो. हा खूप मोठा गंभीर मुद्दा आहे. झोपडपट्टीमध्ये मोठया प्रमाणात गर्दी असते. अति गर्दी आहे. प्रि-डिस्पोजिंग फॅक्टर, स्लम पॉप्यूलेशन, ओव्हर क्राऊडेड ,कन्जेस्टेड ,पॉवर्टी ही प्रमुख कारणे आहेत. मुंबई ही मेट्रोपोलिटियन शहर आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

राज्य शासन यातून बाहेर पडण्यासाठी झोपडपट्यांमध्ये जाऊन काम करु शकत नाही का ? अशी विचारणा समितीने केली असता, मुंबईमध्ये खाजगी रुग्णालयामध्ये मागच्या काही वर्षामध्ये रुग्ण होते, त्यांना यंत्रणेमध्ये आणता येईल. मागच्या दीड वर्षामध्ये ४५,००० केसेस मुंबई व नागपूर मध्येही होत्या. मुंबई आणि नागपूरचे मॉडेल हे पूर्ण देशामध्ये आहे. नवी मुंबई, मुंबई आणि नागपूरचा मॉडेल जे आहे, तो खरे आहे. समस्या आहे, ती खूप जटील व गंभीर आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आज मुंबईच्या माणसाला महानगरपालिकेच्या रुग्णालयांवर, वैद्यकीय महाविद्यालयांवर जेवढा विश्वास आहे, तेवढा राज्य शासनाच्या रुग्णालयांवर नाही. सायन, केईम, नायर ही जी महानगरपालिकेची रुग्णालये आहेत,त्याच्यावर सामान्य माणूस जास्त विश्वास ठेवतो. असे मत समितीने व्यक्त केले.

काही प्रमाणात समिती म्हणते ही गोष्ट खरी आहे. मुंबई महापालिकेमध्ये ज्या अनेक गोष्टी आहेत, त्या कदाचित करता येणे शक्य नाही. याचे एक प्रामुख्याने कारण असे आहे की, मुंबईमध्ये आता जी तीन वैद्यकीय महाविद्यालये आहेत व आता जे चौथे झालेले आहे, तेथे फॅकल्टी डेव्हलपमेंटचा जो ॲस्पेक्ट आहे, तो विभागाच्या महाविद्यालयापेक्षा चांगला आहे. तेथे असलेल्या डॉक्टरांच्या सहसा बदल्या होत नाहीत. समजा एखादा डॉक्टर कोणत्याही फॅकल्टीमध्ये पाठविला तर डिपार्टमेंट डेव्हलप करायला किमान आठ-दहा वर्षे लागतात. कंटिन्यूटी व स्टेबिलिटी ऑफ टेन्यूअर तेथे आहे, येथे तो तीन वर्षांच्या बदलीच्या नियमामुळे शक्य होत नाही. बीएमसीच्या रुग्णालयांमध्ये डॉक्टरांचे वास्तव्य पंधरा वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आहे. काही प्रमाणात धोरणात बदल केले तर फॅकल्टी संदर्भात सात-दहा वर्षांपर्यंत डॉक्टरांचा कालावधी ठेवणे शक्य आहे. तीन वैद्यकीय महाविद्यालय मिळून बृहन्मुंबईच्या ७७ सुपर स्पेशालिटी पोस्ट आहेत. १६ महाविद्यालयामध्ये १७ पोस्ट आहेत. एक मुद्दा प्रामुख्याने असा निघाला की, स्टेबिलिटी ऑफ टेन्युअर आहे, त्याच्यामुळे विभाग विकसित होत जातात. हे धोरण जे आहे, त्यामध्ये अपवाद करून वैद्यकीय शिक्षणाचा संबंध आहे, तेथे स्टेबिलिटी ऑफ टेन्यूअर प्रस्ताव शासनाला सादर करण्यात येणार आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग हा प्रस्ताव किती दिवसात सादर करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रस्ताव मसुदा अवस्थेमध्ये असून त्याकरिता आणखी एक महिना कालावधी लागेल. त्याकरिता सांख्यिकीय माहिती द्यावी लागेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीला त्याची एक प्रत देण्याबाबत समितीने सूचित केले, ते झाले पाहिजे. कारण असे आहे की, राज्य शासनापेक्षा महानगरपालिका चांगली सेवा देते हे म्हणजे सर्वांना साजेसे नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, दुसरे कारण असे आहे की, मुंबईत बदली असल्यामुळे जेव्हा पदभरतीची जाहिरात येते, त्यावेळी सहसा तेथे एकही पद रिक्त रहात नाही. विभागाकडे अशी परिस्थिती आहे की, जर एखाद्या ठिकाणी ४० जागांची जाहिरात दिली तर अर्जच २५ येतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

क्षयरोगाच्या दराबाबत समितीला माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, मुंबईमध्ये दोन वर्षापूर्वी एक्सडीआर आणि एमडीआर टीबी प्रमाण ३.५ हजार रुग्ण होते. प्रामुख्याने याचे कारण आहे की, गरिबी, दाटीवाटीने राहणे आहे. विशेषत: लोकलने प्रवास करणे आहे. गर्दीच्या ठिकाणी बसने प्रवास करणे आहे. तेथे जे पॅटर्न नेमलेले आहे, एक तर जवळपास १२०० खाटांचे एक डेडिकेटेड टीबी रुग्णालय तेथे आहे. एक्सडीआर एमडीआर टीबीकरिता २०० वॉर्डची विशेष व्यवस्था आहे. या व्यतिरिक्त मुंबई शहरामध्ये जे मॉडेल देशाने स्वीकारलेले आहे, त्यामध्ये अशी कार्यपध्दती आहे. ज्यावेळी एखाद्या टीबी रुग्णाचे निदान होते, त्याच्यासाठी अशी कार्यपध्दती केलेली आहे, त्यालाही दूरध्वनी क्रमांक दिला जातो, त्याला आणखी एक डॉक्टर दिला जातो. दर महिन्यामध्ये रुग्णाला त्या डॉक्टरकडून कोड नंबर दिला जातो, त्याला डेसिग्नेटेड केमिस्ट दिला जातो, त्या केमिस्टकडे जाऊन त्याने कोड नंबर सांगायचा केमिस्ट त्याला कोणताही प्रश्न न विचारता एक महिन्याचे औषधी देतो. काही कारणांमुळे रुग्ण बाहेर गावाचा असेल किंवा भारतात कुठेही राहणारा असेल तर त्याला कुरियरने घरपोच एक महिन्याचे औषधे दिली जाते, त्याच्या कुटुंबातील सदस्यांचे दूरध्वनी क्रमांक नोंदवून घेतले जातात. महापालिकेमध्ये अशी व्यवस्था असते पाच-सहा लोकांना हेच काम आहे. दिवसभर ते कुटुंबातील सदस्याला दूरध्वनी करून विचारायचे की, आता किती गोळ्या शिल्लक आहेत ? त्यावरुन त्यांना हे कळते की, ही औषधे घेतल्या जात आहेत की, घेतल्या जात नाही. दोन वर्षापूर्वी १४ हजार लोक नोंदणीकृत होते. कदाचित आता या आकडयामध्ये वाढ झाली असेल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रुग्णांचे प्रमाण कमी झाले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, हा डाटा उपलब्ध नाही. साधारणत: क्षयरोगावरील उपचार दीड ते तीन वर्षापर्यंत चालतो, त्याचा खर्च तीन ते पाच लाख रुपयांपर्यंत आहे. साधा टीबी असेल आणि पूर्ण उपचार घेतले तर शासन त्याचा पूर्ण खर्च करीत आहे. एक्सडीआर एमडीआर टीबीचा शासन पूर्ण खर्च करीत आहे. परंतु किमान चांगले दोन – तीन महिने ही औषधे एक्सडीआर-एमडीआर टीबीची संपूर्ण देखरेखीखाली दिली जातात. घरी तशी देखरेख मिळेल किंवा नाही सांपत्तिक स्थितीवरही हे ब-याच वेळा अवलंबून असते तसेच सामाजिक स्थितीवरही अवलंबून असते. अशा वेळी रुग्णास दाखल करून घेतले जाते. आता या रुग्णांना दुपारचे जेवणही देण्यात येते. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्यामध्ये अडीच लाख टीबी रुग्ण आहेत. १,७०,००० रुग्ण यंत्रणेमध्ये आहेत. ७० हजार रुग्ण यंत्रणेच्या बाहेर आहेत. हे असे रुग्ण आहेत ते सामाजिक कलंक लागेल म्हणून क्षयरोग असल्याचे सांगत नाहीत. खाजगी डॉक्टरकडून जाऊन उपचार घेतात. उपचार पूर्ण करीत नाही म्हणून एएक्सडीआर एमडीआर क्षयरोगाचे रुग्ण रेसिस्टंटमध्ये जातात. प्रत्येक जिल्हयामध्ये जवळपास एक-एक हजार केमिस्टकडून एच-१ इश्यूड ड्रग्स आहेत, त्यांचा रेकॉर्ड ठेवणे करणे केमिस्टवर बंधनकारक आहे. केमिस्टकडून ही माहिती गोळा करण्याचे काम सुरू आहे, रुग्ण कोणकोण आहेत, ज्यांनी ॲण्टि टयूबरक्लोसिस ट्रीटमेंट घेतलेली आहे. जवळपास ५०० रुग्णांची माहिती पंधरा दिवसांमध्ये मिळालेली आहे. ७० हजार शिल्लक प्रकरणे यंत्रणेमध्ये आणणे यामुळे सोपे झालेले आहे. यातून मोफत उपचार मिळणार आहेत व या वर्षापासून प्रत्येक टीबी रुग्णाला दर

महिन्याला पाचशे रुपये अनुदान मिळणार आहे. डीबीटीच्या माध्यमातून ५०० रुपये अनुदान आणि मोफत उपचार मिळणार आहे. यामध्ये महत्त्वाचे उपचाराचे निरीक्षणही केले जाणार आहे. त्यांचा टीबी एमडीआर एक्सडीआरमध्ये जाणार नाही, असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

पाचशे रुपये देऊन काय फायदा होणार आहे ? त्याच्यापेक्षा त्याच्या पाठपुराव्यावर त्याच्या सिस्टम अपग्रेडेशनवर खर्च केला तर फायद्याचे आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यामुळे टीबी रुग्ण उपचार घेण्याकरिता येतील आणि ते यंत्रणेमध्ये येतील. पूर्ण देशाचे हे धोरण आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आयआयएमचा अहवाल विभागाच्या संकेतस्थळावर आहे का ? जे काही त्यांनी हे केलेले आहे, त्याची माहिती संकेतस्थळावर टाकण्यात यावी. यावर विभागाचे जर कोणते आक्षेप असतील तर ते संकेतस्थळावर नोंदविण्यात यावे. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, तो सार्वजनिक अहवाल आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मलेरियामध्ये ॲन्यूअल पॅरासाईट इन्सिडन्स म्हणून असतो, तो महाराष्ट्राचा दोन पेक्षा कमी आहे. दोन पेक्षा कमी असणे भारत सरकारचे लक्ष्य आहे. महाराष्ट्रातही गडचिरोली, चंद्रपूरचा गडचिरोलीला लागून असलेला भाग, मुंबई आणि मुंबईच्या आसपासचे दोन जिल्हे रायगड आणि ठाणे एवढयाच ठिकाणी आता केवळ मलेरिया आहे. बाकी सगळीकडे मलेरियाचे रुग्ण सर्रास सापडत नाहीत. मलेरियाचे ९००० रुग्ण सापडले. ६००० रुग्ण गडचिरोली व आसपासच्या भागातील दर ३००० रुग्ण मुंबई, रायगड व ठाणे येथील आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ब्रेन मलेरियाची काय स्थिती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ब्रेन मलेरिया हा जवळपास गडचिरोलीमध्येच आहे. थॅल्सिपरे मलेरिया असे त्याला म्हणतात. राज्याचा दरवर्षाचा मलेरियाचा ॲव्हरेज सतरा हजार आहे. ५००० गडचिरोलीचा आहे. ९० पर्सेंट थॅल्सिपरे मलेरियाचा आहे. हे सर्व पॅथीचे डॉक्टर्स एकत्र केल्यानंतर एका डॉक्टरला किती लोकसंख्या आहे, हे त्यात दाखविलेले आहे. ७८९ त्यामध्ये डिस्पॅरिटी आहे. त्यामध्ये शहरात अधिकतम येतात, खेडयामध्ये कमी आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यामध्ये ॲलोपथी व्यतिरिक्त किती डॉक्टर आहेत ? ५५,००० डॉक्टर ॲलोपथीचे आहेत, बाकी फॅकल्टीचे डॉक्टर्स ७,००,००० च्या वर आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, राज्यामध्ये दीड लाखाच्या वर डॉक्टर आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एमबीबीएस डॉक्टर्स खूप कमी आहेत. काही तालुक्याच्या ठिकाणी एमबीबीएस डॉक्टर्स काम करायला तयार असतात. त्या एमबीबीएस डॉक्टरांना ग्रामीण भागामध्ये पाठविण्यात येते, मग तो राजीनामा देतो. जेथे जेथे ते काम करायला तयार आहेत, तेथे तरी त्यांना काम करु द्यावे. बदल्यांच्या धोरणांतर्गत त्याची ग्रामीण भागांमध्ये बदली केल्याने ते राजीनामा देतात. मुंबई महापालिका, राज्य शासनाचा जो प्रश्न आहे, तसा तो विषय आहे. किमान ज्या तालुक्याच्या व जिल्हयाच्या ठिकाणी जे डॉक्टर काम करायला तयार आहेत, त्यांना तरी ग्रामीण भागांमध्ये बदली देऊ नये, असे समितीने सूचित केले असता, मागील दोन महिन्यात भरती घेतली होती. सगळया डॉक्टर्सला बोलावून बसवून त्यांची काय मेरिट आहे, त्यांना कुठे जायचे आहे, असे विचारुन हे सर्व पारदर्शकपणे केले. भरतीचा निकाल जिल्हाधिकारी यांना दिलेला आहे, अंतर्गत बदली कुठे करायची हे निश्चित करण्यात येईल. त्यामध्ये लवचिकता आणलेली आहे. समितीचे म्हणणे खरे आहे की, एमबीबीएस डॉक्टर्सची कमतरता आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांकडे जे दिले ते पूर्णत: चुकीचे आहे, त्याची पूर्ण कागदपत्रे समितीकडे आहेत, त्या डॉक्टर्सना मुख्यालयाला का घेत नाहीत? अशी विचारणा समितीने केली असता, मुख्यालय आहे, तेथे विभाग जिल्हाधिका-यावर निर्भर राहत नाही. तेथे काही होणार नाही, ही लवचिकता जिल्हाधिका-याकडे आहे. ही एक निरंतर प्रक्रिया आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जिल्हाधिकारी तीन वर्ष झाले की बदली करतात, वास्तविकत: एमबीबीएस डॉक्टर चांगल्या ठिकाणी काम करायला तयार असेल तर त्यास बदलीचा तीन वर्षाचा, निकष लावला तर ते डॉक्टर राजीनामा देतात, असे समितीने निदर्शनास आणले असता, जो डॉक्टर दुर्गम भागामध्ये आहे, तो दुर्गम भागातच राहतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डॉक्टरना फार आग्रह करून पाठविले तर तो डॉक्टर तेथे राहत नाही. तो तेथे जात नाही. कागदावरती तर तो तेथे आहे नंतर तो राजीनामा देतो. त्याच्यामुळे जेथे सेवा मिळते तीही मिळत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, याला दोन बाजू आहेत. पूर्वी १०० डॉक्टरांना जर ऑर्डर दिली तर साधारणत: २० डॉक्टर रुजु होत होते. आता त्या डॉक्टर्सना बोलाविण्यात येते सर्व राज्यातील रिक्त जागा दाखविण्यात येतात तेथेच ऑर्डर घेऊन जातो, तो जागा पाहतो कौन्सिलिंग करतो आणि ऑर्डर घेऊन जातो. आता शंभरपैकी ५०-५५ डॉक्टर रुजु व्हायला लागलेले आहेत. त्याचा तोटा काय झाला की, मुलाखतीला कोणीही जायला तयार नाही. सर्व मोठया गावाची पोस्टींग घ्यायला बघतात, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचे म्हणणे एकदम योग्य आहे.ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय यांचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. मागील दहा-वीस वर्षामध्ये ग्रामीण पायाभूत संरचना, रस्ते, १०८ रुग्णवाहिका, लोकांकडे जे वाहनांचे प्रमाण वाढलेले आहे. यावरुन असे वाटते की, प्रत्येक पीएचसीला २४/७ करण्याची गरज आहे की नाही ? तालुक्यामध्ये ७, ८ ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रांची वेळ सकाळी ८.०० वाजल्यापासून ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत केली तर आणि त्यानंतर ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयामधील डॉक्टरांसाठी सुद्धा सोयीचे राहील. अत्यावश्यक सेवा मिळतील. स्त्रोत वाया जाणार नाहीत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे असे मत आहे की, पायाभूत सुविधा बळकट करण्यात येत आहेत. वाशिमचे स्त्री रुग्णालय, कारंजा येथील उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी बांधण्यात आलेल्या इमारती मागील सहा महिन्यापासून सर्व प्रकारे तयार आहेत. पण त्या ठिकाणी आतापर्यंत कर्मचारी वर्ग पुरविण्यात आलेला नाही त्यामुळे रुग्णालये सुरू झालेली नाहीत. सदर कामासाठी २५-२५ कोटी रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. ज्यावेळेस इमारत मंजूर करण्यात येते त्यावेळेस तेथे आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग सुद्धा मंजूर करायला हवा, असे समितीने सूचित केले असता, शासनाचे धोरण बदलण्यात आले आहे. विभागाने शासनाकडे पुन्हा विनंती केली आहे. इमारत मंजूर करतानाच इतर सर्व आवश्यक असणाऱ्या मंजुऱ्या देण्यात याव्यात अशी विनंती केली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

राज्यभरामध्ये ज्या ठिकाणी इमारती बांधून पूर्ण झालेल्या आहेत त्या ठिकाणी कर्मचारी वर्ग कधी देण्यात येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर प्रकरणी दोन बैठका झालेल्या आहेत त्यामध्ये सर्व स्त्री रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपजिल्हा रुग्णालये मंजूर झालेली आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हजार लोकसंख्येमागे खाटांची किती संख्या आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, १ लाख लोकसंख्येला १०८ खाटा आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

१ हजार लोकसंख्येसाठी फक्त १ खाट आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, १५० खाटा कराव्यात असा विभागाचा आराखडा आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. सदर प्रमाण हे खूप कमी आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, त्याकरिता खूप मोठ्ठया प्रमाणावर निधी लागतो. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

खाजगी रुग्णालयांची काय स्थिती आहे ? विभागाकडे याबाबतची काही माहिती असेल तर याबाबत समितीला अवगत करण्यात यावे, असे समितीने सूचित केले असता, सध्याची राष्ट्रीय पातळीवरची जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार सन १९४७ या वर्षाची जी आकडेवारी देण्यात आलेली आहे ती अशी की, ९० टक्के वैद्यकीय सेवा ही सार्वजनिक क्षेत्रात होती आणि १० टक्के वैद्यकीय सेवा ही खाजगी क्षेत्रात होती. सन २००४-०५ ची माहिती देण्यात आलेली आहे त्यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील वैद्यकीय सेवेचा हिस्सा घटून ३२ टक्क्यांपर्यंत खाली आलेला आहे आणि उर्वरित सर्व हिस्सा हा खाजगी क्षेत्रातील वैद्यकीय क्षेत्राचा आहे. ६८ टक्के वैद्यकीय सेवा ही खाजगी क्षेत्रातील वैद्यकीय सेवेमार्फत पुरविली जाते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशी परिस्थिती निर्माण होण्याची काय कारणे आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वी खाजगी क्षेत्र विकसित झालेले नव्हते ते आज विकसित झालेले आहे. बऱ्याच कंपन्यांचे विमा योजनांचे फायदे वगैरेमुळे त्यात वाढ झालेली आहे. खाजगी क्षेत्रातील वैद्यकीय सेवांचा विस्तार हा प्रामुख्याने नागरी भागांमध्ये झालेला आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

खाजगी क्षेत्रातील वैद्यकीय सेवांचा हिस्सा वाढला, त्यांच्या सोयीसुविधा वाढल्या. पण राज्य सरकारच्या वैद्यकीय सेवा मागे का पडल्या आहेत ? जिल्हा परिषद, नगर पालिकेच्या शाळा आणि विभागाची वैद्यकीय सेवा यांची सारखीच अवस्था झाल्याचे दिसत आहे. येणाऱ्या भविष्यकाळात खाजगी क्षेत्राचा हिस्सा वाढत राहिला तर जशी जिल्हा परिषद आणि नगर पालिकांच्या शाळांची स्थिती झाली आहे तशी सार्वजनिक आरोग्य सेवेची होणार असे दिसते आहे. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

ग्रामीण भागात खाजगी वैद्यकीय क्षेत्राचा काही हिस्सा नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, शासन आदर्श रीतीने असे म्हणते की १ हजार व्यक्तीमागे १ डॉक्टर पाहिजे. महाराष्ट्रामध्ये साधारणत: १५०० ते १५५० व्यक्तींमागे १ डॉक्टर असे प्रमाण आहे. यामध्ये ८० हजाराच्या आसपास आयुर्वेदिक आणि जवळपास ६० ते ६५ हजाराच्या आसपास होमिओपॅथी डॉक्टर्स यांचे नियमित महाविद्यालय आहेत. पण सदर संख्या ही शासनाच्या अहवालाच्या संख्येत मिळविण्यात येत नाही. ग्रामीण भागामध्ये BAMS डॉक्टर सुद्धा प्राथमिक आरोग्य सेवा देऊ शकतील किंवा BHMS डॉक्टर प्राथमिक आरोग्य सेवा देऊ शकतील. ही संख्या जर विचारात घेण्यात आली तर विभागाकडे जे प्रमाण आहे हे १ हजाराच्या खाली निश्चित येईल. शासन फक्त MBBS डॉक्टरचा विचार करते म्हणून सदर संख्या जास्त असल्याचे दिसते आहे. शासनाचे धोरण आहे, शासनाकडे जवळपास ८० आयुर्वेदिक महाविद्यालये आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

BAMS डॉक्टरांच्या बाबतीत, खाजगी रुग्णालयांची अशी अवस्था आहे की, त्या ठिकाणी दहा रुग्ण सुद्धा येत नाहीत, नुसते नावाला BAMS चे फलक लावलेले असतात. महाविद्यालयातून फक्त पदव्या घेऊन जातात. अशा प्रकारची वाईट स्थिती आहे. असे समितीने निदर्शनास आणले.

मंजूर पदे, भरण्यात आलेली पदे आणि रिक्त पदे याबाबत माहिती देण्यात यावी. गट अ ते ड पर्यंतची १६ हजार पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची टक्केवारी ३१ टक्के अशी आहे. गट अ च्या रिक्त पदांची टक्केवारी ६३ टक्के अशी आहे. BAMS डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे जे तात्पुरते डॉक्टर्स आहेत त्यांना कायम करण्यासाठी मंत्री मंडळाने मंजुरी दिलेली आहे. यामुळे रिक्त असणारी सर्व पदे भरली जातील. सा.रा.से. म्हणजे सामान्य राज्य सेवा. यामध्ये प्रशासकीय अधिकारी, दंतवैद्यक यांचा समावेश होतो. दंतवैद्यकची १८० पदे मंजूर करण्यात आली होती. संबंधितांना नियुक्ती आदेश दिल्यानंतर त्यापैकी ११० डॉक्टर्स कामावर हजर झालेले आहेत. ही संख्या वाढलेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

गट अ ची जी ६३ टक्के पदे रिक्त आहेत याबाबत विभागाचे काय धोरण आहे ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, ५० टक्के पदे ही नामनिर्देशनाने आणि ५० टक्के पदे ही पदोन्नतीने भरावयाची आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये सर्वात पहिला आक्षेप असा आहे की, सेवा प्रवेश नियम मंजूर नाहीत. सदर बाबीला कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली, तसेच वैद्यकीय अधिकारी २६ पैकी ० आहेत. असे समितीने निदर्शनास आणले असता, जी नवीन पदे मंजूर झालेली आहेत ती रुग्णालयातील प्रशिक्षणासाठी मंजूर करून घेण्यात आलेली आहेत. सदर पदांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रक्रिया ही कधीपर्यंत पूर्ण होईल. सदर पदे ही वैद्यकीय महाविद्यालयासाठी आहेत काय? सदर पदांना मंजुरी कधी मिळालेली आहे ? अशी महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून विचारणा केली असता, येत्या सहा महिन्यापर्यंत सदर प्रक्रिया पूर्ण होईल. सदर पदे वैद्यकीय महाविद्यालयासाठी नाहीत. सदर पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाची जी जिल्हा रुग्णालये आहेत त्या ठिकाणी दवाखान्याशी संबंधित डॉक्टर, नर्सेस, इतर सर्व कर्मचारी यांना जी प्रशिक्षण दिली जातात त्यांच्यासाठी हे नवीन कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. सदर पदांना जवळपास दोन वर्षापूर्वी मंजुरी मिळालेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आतापर्यंत सदर पदांचे सेवा प्रवेश नियम तयार का करण्यात आलेले नाहीत? अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, सेवा प्रवेश नियम तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभाग आता भरलेल्या पदांची जी माहिती देत आहे यापैकी राज्यभरात अद्याप हजर झाले नाहीत असे किती डॉक्टर्स आहेत ? यापूर्वीच तयार करण्यात आलेले सेवा प्रवेश नियम आहेत तर सदर पदांसाठी वेगळे नियम का आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर पदे ही वेगळ्या स्वरूपाची आहेत म्हणून वेगळे नियम आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दोन वर्षे झाली आहेत आणि अजूनही सदर सेवा प्रवेश नियम तयार करण्याची प्रक्रिया चालू आहे असे सांगण्यात येत आहे. ही बाब योग्य आहे काय ? या बाबीशी विभाग सहमत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने यासंदर्भात कोणतेही भाष्य केले नाही.

सेवा प्रवेश नियम तयारच नसतील तर प्रशिक्षणाचे कामकाज कोणत्या पद्धतीने चालविण्यात येत आहे ? शासनाकडे यापूर्वीचे सेवा प्रवेश नियम तयार आहेत यासाठी काही वेगळे नियम आवश्यक नाहीत.असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले तसेच, सदर बाबीत अशी काय अडचण आहे की दोन वर्षापासून विभाग सेवा प्रवेश नियम तयार करू शकलेला नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, सेवाप्रवेश नियम करण्यासाठी खूप ठिकाणी पाठविण्यात येतात. सध्या शासनाच्या कोणत्या स्तरावर सदर बाबतची प्रक्रिया चालू आहे याबाबत निश्चित माहिती नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

मूळ मुद्दा हा पद भरण्याचा होता. त्यासाठी हे सादरीकरण चालू आहे. यामध्ये सेवा प्रवेश नियम तयार झालेले नाहीत म्हणून सदर प्रक्रिया थांबलेली आहे, बिंदूनामावली तयार नाही म्हणून सदर प्रक्रिया थांबलेली आहे असे सांगण्यात येते. आरक्षणाचा मुद्दा आता संपलेला असल्यामुळे बिंदूनामावलीची काय गरज आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सेवेमध्ये प्रथम प्रवेश ज्यावेळेला होतो त्यावेळेला बिंदूनामावलीची आवश्यकता पडते. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सदर बाबीसाठी किती वेळ लागणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वी सदर पदाचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले डॉक्टर उपलब्ध नव्हते. आता मागील दोन वर्षात परिस्थिती बदललेली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्या संवर्गाचे डॉक्टर मिळाले नाहीत तर संवर्ग बदल करण्याची सोय उपलब्ध नाही काय ? त्यासाठी विभागाने कॅबिनेटकडे जाऊन काही प्रयत्न केले आहेत काय ? जर दुसऱ्या संवर्गाचे डॉक्टर उपलब्ध असतील तर संबंधित संवर्गाची तीन वेळा जाहिरात काढण्यात यावी त्या संवर्गाचे डॉक्टर मिळत नसतील तर दुसऱ्या संवर्गातून ती पदे भरण्यात यावीत. पदे रिक्त ठेवण्यात येऊ नयेत. पदे रिक्त राहिल्यामुळे समाजाला त्रास सोसावा लागतो आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, सदरची जी पदे आहेत ती सर्व पदे पदव्युत्तर स्तरावरची असून त्या त्या विभागातील विशेषज्ञ असलेल्यांची आहेत. पण Gynecologist, Orthopedics, Surgeon असेल तर ती पदे त्याच संवर्गातून भरावी लागतील आणि त्याच अर्हतेची भरावी लागतील. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संबंधित डॉक्टर हे विशिष्ट संवर्गाचे असावे लागतील हे मान्य आहे पण त्यांच्या बाबतीत इतर कोणते आरक्षण आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांच्यासाठी सामाजिक आरक्षणही लागू आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर आरक्षणामुळे किती पदे भरण्याचे अडून राहिले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर बाबीच्या प्रक्रियेचे काम चालू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

प्रक्रिया हाच मूळात गंभीर विषय आहे. तो तीन वर्षे, पाच वर्षे चालू ठेवणे योग्य नाही. निर्णय झाले पाहिजेत. सामान्य माणसाला या पद्धतीमुळे त्रास सहन करावा लागतो आहे. ग्रामीण भागात काम करताना १०० लोकांपैकी २५, ५० लोक हाच विषय घेऊन येतात. या सर्व प्रकाराला विभागाचा निष्काळजीपणा किंवा सदर काम गांभीर्याने घेतले नाही असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, सदर बाबीची प्रक्रिया ही खूपच जटील स्वरूपाची आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागच सदर बाबी करू शकतो. याबाबीत, समितीने काही शिफारस करावी असे वाटत असेल तर समिती शिफारस करायला तयार आहे. समितीला परिणाम हवा आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता,विभागाकडे एकूण विशेषज्ञ असलेले ५३० डॉक्टर आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर बाबीवर विभाग काय करणार आहे याची माहिती द्यावी. केवळ सादरीकरण करून कार्यवाही होत नाही सदर काम विभाग करत नाही तर समितीने काय करावे ? अशी विचारणा समितीने केली असता, ५५० पदांपैकी मुख्यत्वाने ९० टक्के ही विशेषज्ञ असलेली पदे आहेत. या पदांपैकी १४० पदे भरण्यात आलेली आहेत. ३९० पदे ही रिक्त आहेत. रिक्त पदापैकी मोठी संख्या ही विशेषज्ञ असलेल्या पदांची आहे. वैद्यकीय अधिकारी आणि मोठ्या संख्येने असलेले विशेषज्ञ हे सार्वजनिक आरोग्य विभागात काम करीत नाहीत कारण त्यांना खाजगी क्षेत्रात खूप संधी आहेत, आणि वेतनाची जी पद्धत आहे ती आकर्षक अशा स्वरूपाची नाही. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

This is a general reply. We are talking with reference to the sanctioned posts. विभागाकडून जी कारणे देण्यात आलेली आहेत जसे शासनाकडून बिंदूनामावली प्रसिद्ध होणे बाकी आहे या बाबींवर चर्चा होणे गरजेचे आहे. बिंदूनामावली कोणी प्रसिद्ध करावयाची आहे. अशी विचारणा महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून केली असता, बिंदूनामावली ही शासनाकडून प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीने शासनाची व्याख्या विचारली असता, The Government means the Department including Hon'ble Minister असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाला पदे भरून पाहिजे असतील आणि ते फक्त बिंदूनामावलीमुळे भरता येत नसतील, सेवा नियमांमुळे भरता येत नसतील तर हा विषय विवेकाचा वापर करून हाताळला पाहिजे. एका बाजूला अशी काळजी घेतली जाते की, सर्व पदे ही भरली गेली पाहिजेत आणि त्यामुळे ज्या काही बाबी नियमानुसार करणे आवश्यक आहेत त्या पूर्ण करून घेण्यात याव्यात, असे समितीने सूचित केले असता, ही जी सर्व पदे आहेत ती वर्गवारीनुसार विविध टप्प्यांवर आहेत. सदर पदांपैकी काहींची कार्यवाही पूर्ण होऊन ती बाब महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आलेली आहे. काही पदांच्या जाहिराती सुद्धा आलेल्या आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाला एकूण जी अ वर्गाची ३९० पदे भरावयाची आहेत. रिक्त असणारी पदे सेवा प्रवेश नियम मंजूर झाले नाहीत, बिंदूनामावली प्रसिद्ध झाली नाही म्हणून रिक्त राहीली असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले नाहीत म्हणून भरावयाची राहिलेली पदे ही फक्त २६ आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१०० व्यक्ती बिंदूनामावलीसाठी थांबलेल्या आहेत. स्त्री रोग तज्ज्ञ, बधिरीकरण तज्ज्ञ, नेत्र शल्य चिकित्सक यांच्यासाठी बिंदूनामावली पाहिजे. ज्या बाबी लगेच करणे शक्य आहे त्या करण्यात आल्या पाहिजेत. पदोन्नतीबाबतची कार्यवाही आणि कारणे पाहिली तर असे दिसून येईल की यातील ७५ टक्के कार्यवाही ही शासनाच्या दिरंगाईमुळे प्रलंबित आहे. दंतवैद्यक भरती सुद्धा सदरच्या सेवा प्रवेश नियमासाठी थांबलेली आहे. सर्व स्टेरिओटाईप आहे, विभाग नवीन त्यामध्ये काय सांगणार आहे ? सध्या प्रचलित जे सेवा प्रवेश नियम आहेत त्यात भर घालण्यात यावी किंवा काही बाबी वगळावयाच्या असतील त्या वगळाव्यात. १५० व्यक्ती, ५०, ५२ व्यक्ती फक्त सेवा प्रवेश नियमांसाठी अडलेले आहेत. ९८ व्याक्ती फक्त बिंदूनामावलीसाठी अडलेले आहेत. ३९० व्यक्तीपैकी १५० व्यक्तींची नियुक्ती सदरच्या दोन्ही कामांमुळे अडलेली आहे. विभागाने समितीला जो तक्ता सादर केला आहे त्यातील ही माहिती आहे ते विभागाला आहेत हे विभागाच्या कार्यवाहीतून दिसायला हवे. विभागाची कार्यवाही अशी आहे की फक्त नियम सांगून आणि नियमावर बोट ठेवून वेळ मारून नेण्यात येते. असे मत समितीने व्यक्त केले असता, Of Course, there are vacancies. काही समस्या आहेत. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत विभागाला असे आढळून आलेले आहे की, जे डॉक्टर साधे MBBS आहेत त्यांना नियुक्ती आदेश देऊनही ते रूजू होत नाहीत, आणि तसाच प्रकार विशेषज्ञांच्या बाबतीतही दिसून येतो. We

have appointed these people on contract basis in National Health Mission. या ३०० डॉक्टरांना flexible salary incentive base करून हे विशेषज्ञ पूर्ण राज्यामध्ये जिल्हा रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये मागील ३ महिन्यांत घेण्यात आलेले आहेत. फ्लेक्झीबल सॅलरी असल्याने ते २ ते ३ लाखापर्यंत यामध्ये कमवू शकतात. पूर्ण राज्यामध्ये अशाप्रकारे डॉक्टरांची नियुक्ती केलेली आहे. विभागाची विनंती आहे की, The Doctors are not willing to work in the Government Salary structure. तसेच वेतन वाढविण्याचा विषय जो आहे तो थोडा अडचणीचा आहे. राष्ट्रपतींपेक्षा जास्त वेतन होऊन जाईल, उच्च शक्ती पेक्षा जास्त वेतन त्यांना होऊन जाईल. We want work base incentive to be given to the people who worked with the Government. It is not relevant for Tehsildar, BDO and also not relevant for IAS officer like me. Because Doctors are not available and they also have huge opportunities in private sector. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाकडून डॉक्टरांना नियुक्ती देण्यात यावी. दंतवैद्यकाचे एक पद होते त्यासाठी चौदा डॉक्टर आले होते. नियुक्तीसाठी दोन-दोन महिन्यांचा वेळ लावला जातो. विभागाने थोडा कार्यस्थळावरील विचार करावा. BDS चे पद आहे त्यासाठी MDS चे उमेदवार उपलब्ध आहेत तरी त्यांना नियुक्त्या दिल्या जात नाहीत. निर्णय लवकर घ्यायला हवेत, असे समितीने सूचित केले असता, संबंधित विभागाकडून लवकर निर्णय घेतले जात नाहीत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

काही ठिकाणी उपसंचालक यांनी यापूर्वी दंतवैद्यक पदे भरलेली आहेत. विभागाची कनिष्ठ पातळीवरील निर्णय प्रक्रिया वाढवावी, तिला गती देण्यात यावी. कोणतीही संचिका आल्यानंतर तिला प्रलंबित ठेवण्याची जी पद्धत आहे तिच्यामुळे राज्यामध्ये आरोग्य व्यवस्थेची बिकट अवस्था निर्माण झालेली आहे, असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता, उपसंचालक स्तरावर जे परिपत्रक आहे ते विभागामध्ये एक आहे. We have decentralise the powers. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाचे मत योग्य आहे पण सनियंत्रणाचे काय ? विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार दिलेले आहेत पण जिल्हाधिकारी सदर काम करत आहेत काय ? या बाबीची कोण पाहणी करणार आहे ? अधिकार देऊन टाकले म्हणजे विभागाची जबाबदारी संपत नाही. There are no results. मुद्दा असा आहे की वैद्यकीय शिक्षण आणि सार्वजनिक आरोग्य या दोन बाबींच्या वेतनात फरक आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी या दोन बाबीच्या वेतनात फरक असल्याचे मान्य केले.

सदर बाबतीत असलेला भेदभाव संपला पाहिजे. याबाबत आम्ही अनेकदा सभागृहामध्ये सुद्धा चर्चा झाली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागापेक्षा वैद्यकीय शिक्षण विभागाकेडे जास्त लोक जातात वेतनश्रेणी हे याचे कारण आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता, संबंधितांना मिळणाऱ्या वेतनश्रेण्या ह्या UGC च्या आहेत. तसेच त्यांचे सेवेच्या अटी सुद्धा वेगळ्या प्रकारच्या आहेत. व्याख्यात्यामधून जर सहाय्यक प्राध्यापक किंवा प्राध्यापक व्हायचे असेल तर अमुक एक संशोधन अभिलेख प्रसिद्ध होणे वगैरे वगैरे हे निकष तर आहेत. केवळ सेवाज्येष्ठता आहे म्हणून त्यांना पदोन्नती देण्यात येत नाही. सेवाज्येष्ठतेबरोबरच संशोधनाचे कामही केलेले असणे गरजेचे आहे. त्याप्रमाणे टप्पे देण्यात आलेले आहेत, आणि त्यांना UGC च्या शिकवणीच्या वेतनश्रेण्या आहेत, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

In Maharashtra, Doctors prefer to go to Medical Education Department rather than the Public Health Department. असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रवेश स्तरावर थोड्या फार फरकाने काही विद्याशाखा सोडल्या तर दोन्ही ठिकाणी एकसारखीच परिस्थिती असल्याचे दिसून येते. MD किंवा MS व्यक्ती साधारणत: ६५ हजार रुपये वेतनावर काम करायला फारशी इच्छूक नसते. वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये तर डॉक्टर्स यासाठी येतात की साधारणत: चार किंवा पाच वर्षामध्ये त्यांच्याकडे पहिले पेपर्स असतील तर त्यांना पहिली पदोन्नती मिळण्याची संधी आहे. काही अपवादात्मक ठिकाणी ती मिळत नाही. पण सहसा चार ते पाच वर्षांमध्ये त्यांना पदोन्नतीची संधी मिळते. ही जी संधी मिळते त्यावर त्यांचे वेतन जवळ जवळ ८० टक्क्यांनी वाढते. अशी परिस्थिती सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये दिसत नाही. वैद्यकीय क्षेत्रात व्याख्यातााचा सहाय्यक प्राध्यापक झाला तर तो एकदम १५६०० वरून ३७००० श्रेणीमध्ये जातो. या विभागाच्या वेतनाची रचना वेगळी आहे. दोघांच्या जबाबदारीमध्ये सुद्धा फरक आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु सदरचा भेदभाव नाहीसा झाला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरच्या वैद्यकीय शिक्षण विभागात शिक्षण आणि सेवा अशी दोन्ही कामे आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निवासी डॉक्टरांचे वेतन जास्त आहे, वैद्यकीय अधिकाऱ्यापेक्षा निवासी डॉक्टरचे वेतन जास्त आहे. ते काही शिकविण्याचे काम करीत नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, निवासी डॉक्टरांचे वेतन जास्त आहे असे म्हणण्यापेक्षा ५०, ५२ आणि ५४ प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष निवासी जो असेल त्याप्रमाणे वेतन आहे, आणि त्यामध्ये महागाई भत्त्याचा भाग आहे. सदरचे पद हे MBBS पदवीचे आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचा जो निवासी डॉक्टर आहे तो पदव्युत्तर पदवीचा विद्यार्थी आहे आणि २४ तास निवासी राहून सेवा देण्याचे काम करतो. तसे पाहिले तर त्याला मिळणारे वेतन हे विद्यावेतन आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जो विसंगतीचा विषय आहे. It may not be feasibile to give same pay to everybody. कारण राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये विभागाचा असा अनुभव आहे की, विदर्भ-मराठवाड्यामध्ये डॉक्टर ४५००० ते ५०००० रुपये इतक्या वेतनमध्ये काम करतात आणि परिचारिका १५००० रुपये वेतनावर काम करतात. But we don't get Doctors in Mumbai. Because cost of living in Mumbai is very high. त्यामुळे राष्ट्रीय आरोग्य अभियानामध्ये नागरी भागात जास्त समस्या आहे. The only solution is to increase salaries in Urban Areas. त्याप्रमाणे ग्रामीण भागामध्ये करता येणार नाही. Because the cost will go very very high. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

As per your submission, the Doctors will suffer in both ways. They have to serve in rural areas and they will also get lesser salary. असे मत समितीने व्यक्त केले असता, This is the complexity of this problem. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून बंधपत्राबाबतच्या सद्य:स्थितीबाबत समितीला अवगत करण्यास सूचित केले असता, एम.डी. किंवा एम.एस. झालेल्यांच्या बंधपत्राबाबत पूर्वी त्यांना पोस्टींग देण्यात येत होती त्यामध्ये काही लोक उच्च न्यायालयामध्ये गेले. त्याच्या बऱ्याचशा याचिका दाखल झाल्या. त्या याचिका उच्च न्यायालयाने एकत्रित केल्या व एक मार्गदर्शक निदेश दिले. ज्यामुळे प्रत्यक्षात कामकाज चालविताना अतिशय अडचणीचे जात आहे. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशामध्ये असे म्हटले आहे की, "The bonded doctors with superspeciality degrees such as DM and MCH shall be appointed as Assistant Professor with the Medical Colleges run by the State Government or the Municipal Corporations or as Medical Officers to the Hospitals attach to such colleges. They shall not be appointed as Medical Officers with the Civil Hospitals, Rural Hospitals or Primary Health Centers." असे विभागीय सचिवांनी अवागत केले.

But it is for superspeciality, it is ok. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, Now I come to broad speciality. It is further stated in order as follows, "The Doctors with Broad Speciality M.D., M.S., shall be appointed as far as possible as Assistant Professors, Medical Officers with the Medical Colleges or the Hospitals attach thereto and run by the State Government or the Municipal Corporations. Such Doctors shall not be appointed posted at Rural Hospitals and Primary Health Centers. We also make it clear that when a broad speciality Doctor is posted or sought to be posted at Civil Hospital or a General Hospital at the District level, it must be ensured that the infrastructure for his broad speciality is available." या प्रकरणामध्ये असे होते की, ज्यावेळेस वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये वगैरे सर्व जागा भरल्या जातात त्यानंतर हे डॉक्टर पसंती देऊन ते खाली जातात. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

This is for Specialist Doctors. What about the M.B.B.S. Doctors? अशी विचारणा समितीने केली तसेच, They are also saying that if there is no facility, don't post the doctor. They are not saying that you should not post at all. असे मत महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून व्यक्त केले असता, The Court had taken an independent view by sending Court Commissioners to certain hospitals in the same case and enquire that, whether the Doctors posted in hospitals do have the concerned speciality medical facility or not, and the report of it came into negative.

Suppose there is a Doctor having qualification of M.D. Medicine, he will require except otherwise may be one ECG Machine, he do not require anything else. These facilities are available in every hospital. But for this or some other reasons, there are several court cases. When a Doctor is posted in a place which is not comfortable to him, he will go in court. As a result it is very difficult to actually post a Doctor. The Doctors are willing to go where they want to go. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एम.बी.बी.एस. डॉक्टरांच्या बंधपत्राबाबत समितीला अवगत करण्यास सांगितले असता, एम.बी.बी.एस. च्या डॉक्टरांबाबत, त्यांना बंधपत्र दिल्यानंतर १ वर्षाची सेवा देणे आवश्यक आहे. परंतु, पूर्वी, एम.बी.बी.एस. झाल्यानंतर त्याला पुढे पदव्युत्तर पदवीची संधी नाकारली जाऊ नये याकरिता दोन वर्षांचा बफर देण्यात येत होता. या दोन वर्षांच्या बफरचा फायदा घेऊन बरेच विद्यार्थी येथे रुजु होत नव्हते. त्यामुळे यावर्षीपासून विभागाने असा धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, सन २०२०-२०२१ पासून यांना समुपदेशन प्रक्रियेसाठी दाखलच करणार नाही. त्यांना असे सांगण्यात येणार की, आधी त्यांनी बंधपत्र करावे व नंतर पी.जी. ला समुपदेशनासाठी यावे. विभागाने अगोदरच हे निर्देश निगमीत केलेले आहेत. सन २०१९-२०२० पासून जी बॅच येईल म्हणजे साधारणत: त्याची इंटर्नशिप ज्यावेळेस संपते तो कालावधी गृहीत धरण्यात येतो. ज्या विद्यार्थ्यांचे इंटर्नशिप मार्च, २०१९ मध्ये पूर्ण होईल त्या विद्यार्थ्यांनी एम.बी.बी.एस.चा बंधपत्र केल्याशिवाय त्याला पी.जी. समुपदेशनाला अपिअर होऊ देणार नाही, असे धोरणात्मक मार्गदर्शक निर्देश यापूर्वीच निर्गमीत झाले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

But he can take the entrance exam. असे महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, He can take the entrance exam but he will not be called for counselling. It means, we will not allow him to even appear for PG Exam. He should complete the bond. The Bond is always of one year. Whether M.D. M.S. or superspeciality, the only thing is if he does not complete the bond, the amount of penalty depends for instance for MBBS, it is 20 lakh, for M.D. it is 50 lakh for superspeciality it is 2Cr. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

चीनचा अभ्यास केला तर हे दिसून येईल की, मागच्या १५ वर्षांमध्ये त्यांनी डॉक्टरांची संख्या ४ पटीने महाविद्यालये वाढवून वाढविली. विभाग बंधपत्र घेणार, त्यांना कम्प्लसरी बाईडिंग करणार हा एक तात्पुरता मार्ग आहे तो कायमचा मार्ग होऊ शकत नाही. डिमांड-सप्लाय गॅप विभागाला भरावी लागेल. त्यामुळे केंद्र सरकारने असे एक धोरण स्वीकारले होते की, प्रत्येक जिल्ह्यात एक वैद्यकिय महाविद्यालय काढले पाहिजे. विभागाची याबाबत काय भूमिका आहे? अशी विचारणा समितीने केली असता, आजमितीस १६ वैद्यकिय महाविद्यालये आहेत. एक वैद्यकिय महाविद्यालय यावर्षी जळगाव येथे सुरू करण्यात येणार आहे. परंतु, वैद्यकिय महाविद्यालय उभे करणे यामध्ये फक्त पायाभुत संरचना व साहित्य सामग्री देणे या दोनच बाबी समाविष्ट नाहीत. तेथे ते-ते पात्रता असलेले असोसिएट प्रोफेसर्स, प्रोफेसर्स व लेक्चरर असले पाहिजेत. लेक्चरर ही एंट्री लेव्हल पोस्ट आहे व त्यामध्ये जो क्रायटेरिया आहे त्यामध्ये रिसर्च पेपर पब्लिश असणे वगैरे बाबी नसल्याने विभागाला फक्त एंट्री लेव्हल मिळतात. पुढे ज्या फॅकल्टी द्यायच्या असतात त्या लवकर मिळत नाहीत. जळगाव किंवा अलीकडच्या काळात गोंदिया व चंद्रपूर हे दोन वैद्यकिय महाविद्यालय सुरू केले आहेत. तेथे फॅकल्टी शोधताना अडचणी उदभवतात. या परिणाम मग या महाविद्यालया मधून बदलून त्या महाविद्यालयाला फॅकल्टी द्याव्या लागतात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने एच.ओ.डी. व या सर्व डॉक्टरांच्या वेतनाबाबतीत चांगले निर्णय घेतले तरच, विभागाला डॉक्टर मिळतील. वैद्यकीय महाविद्यालय बांधण्याकरिता ५०० कोटी रुपये खर्च केला मात्र जर एच.ओ.डी.ला, डॉक्टरला पगार दिला नाही तर ही समस्या सुटणार नाही. आज नाही तर २० वर्षांनी देखील हेच उत्तर असेल. मात्र हे काही उत्तर होऊ शकत नाही. विभागाने चीन येथील मॉडेल पाहून यावे. शांघायमध्ये भारतातील ६०० मुले शिकत आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, समिती म्हणते ते बरोबर आहे. परंतु, विभागाला एंट्री लेव्हल पोस्ट मिळतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समस्यांचे निराकरण करून पुढे जाणे विभागाचे काम आहे. चीन सारखा देश ४ पट डॉक्टरांची निर्मिती १५ वर्षांत वाढवू शकला आहे. ६०० मुले शिकण्याकरिता चीनमध्ये जातात, रशियामध्ये जातात आणि भारतात त्यांना सुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, विभाग अशी कारणे देतो? असे मत समितीने व्यक्त केले असता, आपल्या पद्धतीमध्येही विभागाने जागा वाढविलेल्या आहेत. महाविद्यालयेही वाढविलेली आहेत. एम.बी.बी.एस.च्या २९०० जागा आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जळगाव येथे अगोदरच खाजगी वैद्यकिय महाविद्यालय आहे विभागाने तेथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू केले, मात्र जेथे खाजगी किंवा शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नाही तेथे विभाग वैद्यकीय माहाविद्यालय देत नाही. विभागाचे प्रमुख म्हणून ही डिस्पॅरिटी योग्य वाटते काय ? नागपूर येथे ५ वैद्यकिय महाविद्यालये आहेत, विभाग तेथे सहावे शासकीय वैद्यकिय महाविद्यालय सुरू करेल आणि ज्या गावात, जिल्ह्यात एकही वैद्यकिय महाविद्यालय नाही तेथे विभाग प्राधान्यक्रम देत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, उत्तर महाराष्ट्रामध्ये दोनच वैद्यकीय महाविद्यालय होती. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीने उत्तर महाराष्ट्रात जळगाव आहे म्हणून हे सांगितलेले नाही. जळगावमध्ये अगोदरच खाजगी वैद्यकिय महाविद्यालय आहे. मात्र काही जिल्हे असे आहेत की, जेथे खाजगी आणि शासकीय वैद्यकिय महाविद्यालय नाहीत जेथे वैद्यकिय महाविद्यालय आहे तेथे म्हणजे अमरावती असो की अकोला असो तेथे मोठा ड्रेन आहे. कारण तेथे विद्यार्थी शिकायला असतात, तेथे डॉक्टर्स असतात त्यामुळे तेथे थोड्याफार सुविधा तरी मिळतात. सिव्हील हॉस्पिटलमध्ये त्या मिळत नाहीत. त्यामुळे जेथे जेथे वैद्यकिय महाविद्यालय होईल तेथे विद्यार्थी, डॉक्टर्स वाढतील व तेथील सेवाही चांगल्या प्रकारे होईल. असे समितीने सूचित केले असता, जागतिक पातळीवर चायना, थायलंड, श्रीलंका इत्यादी देशात ज्या सुविधा आहेत, ते भारतीयांसाठी हायली रिलेव्हंट आहेत. त्यामुळे ३ पॉलीसी डायरेक्शन्स आहेत, The China and Thailand has invested heavily in Primary Health Care level at the level of village. देश व राज्यात प्रायमरी दीड लाख सब सेंटर्स आहेत. विभागाकडे १० हजार सब सेंटर्स आहेत. या १० हजार सबसेंटर्स स्ट्रेंथन करून १२ प्रकारची कॉम्प्रहेन्सीव्ह प्रायमरी हेल्थ सर्व्हीसेस ज्यामध्ये noncommunicable disease, ENT, Opthamology, बाकी मटेरिअल चार्ज आणि सर्व्हिसेस ला स्ट्रेग्दन करण्याचे धोरण आहे. यावर्षी सबसेंटर पातळीवर एम.बी.बी.एस. डॉक्टर लगेच मिळणार नाहीत परंतु, बी.ए.एम.एस. डॉक्टरला ६ महिन्यांचा ब्रिज कोर्स करून १० हजार सबसेंटर्स मध्ये द्यायचे आहेत प्रत्येक कुटुंबाचे हेल्थ कार्ड तयार करून यावर्षी विभागाने जवळपास ४ जिल्ह्यातील ३० प्लस पॉप्युलेशनची १०० टक्के स्क्रीनिंग करइयात येणर आहे. This is one policy direction. केंद्रिय आरोग्य मंत्री महोदयांचे असे वक्तव्य आहे की, "८५००० doctors will produce every year". विभागाला असे वाटते की ८५ हजारपैकी १० हजार एवढा महाराष्ट्राचा वाटा राहील. त्यानंतर जिल्हा

रुग्णालये व मोठमोठे रुग्णालये आहेत. नॅशनल हेल्थ प्रोटेक्शन स्कीममध्ये असे आहे की, we will buy from the Private Sector. महात्मा फुले आरोग्य योजनेला मोठे स्वरुप देऊन आता जे दीड लाख रुपयाचे कव्हर आहे ते ५ लाख रुपयांचे करून Instead of we providing everything and landing into problems, we will purchase it from the private sector. This is how the directions at the national level and state level. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे लगेच होणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्याची अंमलबजावणी १५ ऑगस्ट पासून केली जाणार आहे असे सांगितले जात आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पहिल्या स्टेजमध्ये ते फक्त ३ राज्यांकरिता करण्यात येणर आहे. it will take lot of time. तोपर्यंत काय करायचे ? अशी विचारणा समितीने केली असता, शासनाची जीवनदायी योजना आहे. विभागाने ३०० स्पेशालिस्ट हायर केलेले आहेत. We will go upto 700 to 1000 specialists depending upon the availability. We are requesting the Medical Colleges. We are personally in contact with the Medical Colleges, मागच्या ५ वर्षांमध्ये पास झालेले जे स्पेशालिस्ट आहेत, त्यांची यादी द्या. We are in constant touch with them. कारण विभाग पायाभुत संरचना, औषधांचा पुरवठा करतो. Even in Private sector it is not easy to establish practice in ten years. It is very difficult for them also. Now, we are getting the response. सर्वच असे म्हणतात की, केंद्राचेही असे म्हणणे आहे की, 85000 MBBS Doctors we are going to produce. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जी सर्व पदे रिक्त आहेत, त्यामध्ये प्रशासकीय दिरंगाई खूप दिसते. कारण सेवा नियम त्याच बरोबर बिंदू नामावली तसेच चर्मरोगाबाबतच्या डॉक्टरांच्या पदांच्या प्रश्नावर विभागाने असे सांगितले की, ज्येष्ठता यादी तयार नाही. ३९० पैकी अर्धी पदे तर विभागाच्या प्रशासकीय दिरंगाई मुळेच रिक्त आहेत. विभाग हे किती दिवसांत पूर्ण करणार आहे ? गट ब ची पदेही मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. विभागाची अशी-अशी परिस्थिती आहे व बिंदू नामावली वगैरे गोष्टी इतक्या-इतक्या दिवसांत करण्यात येतील असा एक तक्ता करावा अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

प्रशासकीय कारणामुळे जे काम थांबलेले आहे तो विषय एक महिन्याच्या आत संपवावा. बिंदू नामावली, सेवानियम, ज्येष्ठता यादी ही सर्व मंत्रालयीन स्तरावरील कामे आहेत. या कारणामुळे जर पद भरली जात नसतील तर ते चुकीचेच आहे. या सर्व विषयाकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे व ही सर्व पदे भरण्याकरिता आवश्यक ती कारवाई करावी. विभाग किती महिन्यांत ही पद भरण्याची कारवाई करणार, त्याची माहिती समितीला द्यावी, असे समितीने सूचित केले. (**विभागाकडून प्राप्त झालेले माहिती विवरण क्रमांक १ मध्ये जोडण्यात आलेली आहे.**)

अभिप्राय व शिफारशी :---

मागणी क्रमांक आर-१ :-

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य,

अभिप्राय :-

५.३ सार्वजनिक विभागाच्या मागणी क्रमांक आर-१ संदर्भात समितीने सन २०१४-१५ या विनियोजन लेख्यासंदर्भात समितीने साक्ष घेतली होती. विभागाची मूळ तरतूद रुपये ७२,८३,५०,९४ हजार एवढी होती. विभागाने रुपये १३,६९,८९,६७ हजार एवढ्या रक्कमेची पुरवणी मागणी घेतली होती. परंतू विभागाकडून मूळ तरतूदी एवढा खर्च देखील होऊ शकला नाही. विभागाने वर्षाखेरीज रुपये २५,५१,८५,६४ हजार एवढी रक्कम शासनास प्रत्यार्पित केली आहे. विभागाने परत केलेली रक्कम फार मोठी असल्याने ही रक्कम अन्य विकास कामांकरीता नियोजित करता आली नाही. त्यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे अभिप्राय समितीने व्यक्त केले. याबाबत माहिती देताना विभागाने खुलासा केला की, सन २०१४ मध्ये पहिल्यांदाच राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) चा निधी कोषागारामध्ये प्राप्त झाला. राज्य शासनाचा अर्थसंकल्प तयार झाल्यानंतर केंद्र शासनाने सर्व निधी कोषागारामधून दिला जाईल असे कळविले. त्यामुळे केंद्रीय हिस्सा पुरवणी मागण्यांमधून घ्यावा लागल्यामुळे पुरवणी मागण्यांचे आकारमान वाढले, असा खुलासा विभागाने केला.

५.४ समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली होती त्यावेळेस माहिती देताना महाराष्ट्र राज्याची लाईफ एक्पेटन्सी ६९.९ आहे तर संपूर्ण देशाची ६६.१ आहे सन २०३० पर्यंत ही मर्यादा ७७ पर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याचा अर्भक मृत्युदर १९ असून राज्याचे सरासरी वयोमान हे ७० इतके आहे तर गरोदर मातांच्या मृत्युचे प्रमाण प्रतिलाख ६८ असे आहे. राज्यामध्ये ५५ टक्क्यांपेक्षा जास्त प्रसुती शासकीय रुग्णालयात केल्या जातात.

५.५ समितीने विभागाच्या अहवालाचे अवलोकन केले असता, फेब्रुवारी-मार्च महिन्यात केंद्र शासनाकडे निधीची मागणी केली जाते. त्यामुळे वेळेवर पैसे मिळत नाहीत व पुरवणी मागणीद्वारे उभी केलेली रक्कम ही प्रत्यार्पित केली जाते, असे अनियोजनबध्द काम विभागात सुरु आहे, असे समितीने मत व्यक्त केले. विभागाने देखील केंद्र शासनाकडून निधी कोषागारामध्ये येणार असल्यामुळे लेखाशीर्ष तयार करण्यास उशिर झाला. विभागाला केंद्र शासनाने ८-१० महिन्यांपूर्वी म्हणजेच सन २०१२-१३ मध्ये याबाबत पूर्व कल्पना दिली होती. असे असून देखील विभागास लेखाशीर्ष तयार करण्यासाठी ८-१० महिन्यांचा कालावधी लागला. इतर राज्यांची माहिती घेतली असता साधारणत: १५ ते २० दिवसात लेखाशीर्ष तयार केले जाते.

५.६ विभागाने मूळ अंदाजपत्रकात अथवा पुरवणी मागणीद्वारे घेतलेली रक्कम त्याच वित्तीय वर्षात खर्च करणे आवश्यक असते. ज्यावेळी निधीची मागणी करण्यात येते त्यावेळेस त्या बाबीचे नियोजन झालेले असते, अशी समितीची धारणा आहे. राज्याच्या तिजोरीतील अंदाजे रुपये ५०० कोटी रुपयांची तरतूद करुन ती वापरता फक्त ही रक्कम अडवून ठेवण्याचे काम विभागाने केले. ही रक्कम अन्य कोणत्याही बाबी करता वापरता आली नाही. सदरहू रक्कम ३१ मार्च रोजी प्रत्यार्पित केली. कपातीमुळे बचत झाली असल्यास समितीचे काही म्हणणे नाही मात्र रक्कम न वापरता व्यपगत झाली असेल तर विभागाचा खुलासा होणे आवश्यक आहे.

५.७ सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षाच्या लेख्यांची चर्चा झाली असता हाच मुद्दा उपस्थित झाला होता. विभागाकडून पुरवणी मागणीच्या माध्यमातून रक्कम घेतली जाते परंतू ती खर्च केली जात नाही. तरतूद केलेली रक्कम ही जनतेसाठी खर्च करावयाची असते परंतू ती खर्च न झाल्यामुळे नागरीकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होत नाहीत व ते सुविधेपासून वंचित राहतात.

शिफारस :-

५.८ समिती समोर प्राप्त झालेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, विभागाने मूळ अंदाजपत्रकात केलेली तरतूद संपूर्णपणे खर्च केली नाही. तसेच खर्च करण्याकरीता आणखी रक्कम पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन घेतली. मूळ तरतूदी इतकाही खर्च न करता पुरवणी मागणी घेणे म्हणजे प्राप्त अनुदानानुसार करावयाच्या कामाचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न केल्यामुळे हे घडले आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. आवश्यक नसताना पुरक मागणी घेतल्यामुळे जो निधी शासनाच्या इतर योजनांकरीता वापरला गेला असता तो विनाकारण अखर्चीत राहिला. तसेच सदर निधीची रक्कम विभागाने वेळीच शासनास परत केली असती तर अन्य एखाद्या सार्वजनिक योजनेकरीता वापरता आली असती ते देखील शक्य होऊ शकले नाही. या संदर्भात समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून यापुढील काळात विभागीय अधिकाऱ्यांनी शासनाकडे अनुदानाची मागणी करताना सर्व बाबींचा विचार करुन अंदाज अतिशय दक्षतापूर्वक तयार करणे आवश्यक आहे. प्राप्त झालेला निधी उद्दिष्ट साध्य करण्यासाठी खर्च होईल याचीही विभागाने दक्षता घ्यावी, अशीही समिती शिफारस करीत आहे.

५.९ याचप्रमाणे केंद्र शासनाकडून निधी कोषागारमध्ये प्राप्त होणार असल्याचे विभागास जवळजवळ १० महिन्यांपूर्वी कळविण्यात आले होते. असे असताना देखील विभागाने केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी कोणत्या लेखाशीर्षाखाली प्राप्त होणार आहे व हे लेखाशीर्ष विभागाकडे उपलब्ध आहे किंवा कसे याची माहिती घेण्याची देखील दक्षता विभागाने घेतली नसल्याचे दिसून येते. लेखाशीर्ष तयार करण्याकरीता नमूना देखील केंद्र शासनाकडून विभागास प्राप्त झाला होता. असे असून देखील लेखाशीर्ष तयार करण्याकरीता विभागाला ८-१० महिन्यांच्या कालावधी लागणे हे विभागाच्या कार्यतत्परतेचे लक्षण नाही असे समितीचे स्पष्ट मत आहे. यापुढील काळात विभागाच्या अधिकाऱ्यांनी केंद्र शासनाकडून येणारा निधी कोणत्या योजनेखाली प्राप्त होणार आहे त्या योजनेचे तपशिलवार लेखाशीर्ष विभागाकडे उपलब्ध आहे किंवा कसे व नसल्यास, ते उपलब्ध करुन घेण्याकरीता तत्परता व कार्यक्षमता दाखवावी जेणेकरुन भविष्यात अशा स्वरुपाचा प्रश्न उपस्थित होणार नाही, आणि या निधीचा वापर सार्वजनिक कामाकरीता होईल. अशी समिती आग्रहाची शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, १३ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार अर्भकांच्या मृत्युसंख्येत घट करण्यासाठी प्रोत्साहक सहायक अनुदान -

अभिप्राय :-

५.१० १३ व्या वित्त आयोगानुसार अर्भकांच्या मृत्युसंख्येत घट करण्यासाठी रुपये १३१,७४.९२ लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आली होती. याकरीता रुपये ९८,६६.५८ लक्ष इतक्या रक्कमेची पूरक मागणी करण्यात आली होती. परंतू अर्थसंकल्प वाटप प्रणालीवर निधी न दिल्यामुळे रुपये २५ कोटी इतक्या रक्कमेचे पुनर्विनियोजन करण्यात आले असे विभागाने सांगितले. केंद्र शासन जेव्हा निधी वितरीत करतो त्यानुसार संबंधित विभागाकडून वित्त विभागाकडे मागणी प्राप्त होते व वित्त विभाग निधी उपलब्धतेप्रमाणे निधी वितरीत करतो.

अर्भकाच्या मृत्युसंख्येत घट करणे हा विषय केंद्र शासनाचा नसून तो राज्य शासनाचा विषय आहे. विभागाकडे तरतूद असताना रुपये २५ कोटी एवढी रक्कम विभागाला खर्च करता आलेली नाही. अर्भकांसाठी रुपये १३१ कोटींची तरतूद विभागाकडे होती व केंद्र शासनाने या विशेष कामासाठी निधी राज्य शासनाकडे पाठविला. विभागाच्या साक्षीमध्ये या निधी संबंधात विभागाने दिलेले उत्तर व वित्त विभागाने केलेले स्पष्टीकरण यावर समितीचे समाधान झाले नाही. याबाबतची कारणमिमांसा करण्यासाठी समितीला संपूर्ण माहिती द्यावी असे समितीने सूचित केले.

शिफारस :-

५.११ वित्त आयोगाकडून अर्भकांच्या मृत्युसंख्येत घट करण्यासाठी राज्य शासनास निधी प्राप्त होत असतो. राज्यातील अर्भक मृत्युदर हा दर हजारी जिवित जन्मामागे सन २००५ साली ३६, सन २०१० साली २८, सन २०१५ साली २१ व सन २०१६ साली १९ असा आहे. हा मृत्युदर कमी करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन सतत प्रयत्नशील असते, याच उद्देशाने १३ व्या वित्त आयोगाने निधीची तरतूद केली होती. परंतू विभागातील अधिकाऱ्यांनी सदरहू बाब गांभीर्याने न घेतल्यामुळे प्राप्त झालेला निधी देखील पूर्णत्वाने खर्च न होता प्रत्यार्पित करावा लागला, असे खेदाने म्हणावे लागते. निधी असताना तो अर्भकांच्या मृत्यु दरात घट करण्यासाठी असलेल्या योजनांसाठी न वापरता विनावापर परत शासनास करावा लागणे ही अतिशय खेदजनक बाब असून समिती या संदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करते. राष्ट्रीय आरोग्य अभियान या योजनेअंतर्गत व्हिजन २०३० पर्यंत अर्भक मृत्युदर १० पर्यंत कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या अनुदानाचा ठराविक कालावधी व कार्यक्षमतेने व्यय होणे अपेक्षित आहे. त्यामुळे विभागाने या पुढील काळात सतर्क राहून प्राप्त होणाऱ्या निधीचा योग्य प्रकारे विनियोग करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम-

अभिप्राय :-

५.१२ या लेखाशीर्षाखाली विभागाने रुपये ३८.२४ कोटी एवढी रक्कम प्रत्यार्पित केली असल्याचे महालेखापालांनी समितीच्या निदर्शनास आणले होते. याकरीता मूळ तरतूद रुपये ५६.६७ कोटी एवढ्या रक्कमेची होती. विभागाने यापैकी रुपये १८ कोटीची रक्कम खर्च करुन बाकीची रक्कम प्रत्यार्पित केली आहे. विभागाने प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (पी.आय.पी.) तरतूद केली आहे किंवा कसे याबाबतचा मुद्दा

समितीच्या बैठकीत उपस्थित झाला होता. क्षयरोग रुग्णांमध्ये राज्य जवळपास १४ व्या क्रमांकावर आहे अशी माहिती प्राप्त झाली. क्षयरोगाची समस्या मुंबई शहरात जास्त प्रमाणात आहे. मुंबईमध्ये असलेली झोपडपट्टी, अतिगर्दी, प्रिडिस्पोजिंग फॅक्टर, प्रदुषण, झोपडपट्टीतील लोकसंख्या ही मुंबई शहरात क्षयरोगाचे प्रमाण जास्त असण्याची मुख्य कारणे आहेत.

५.१३ मुंबईतील नागरीक हे राज्य शासनाच्या रुग्णालयांपेक्षा महानगरपालिका रुग्णालयांमध्ये उपचारासाठी जास्त प्रमाणात दाखल होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. याची कारणमीमांसा समितीने विचारली असता. मुंबईमध्ये चार वैद्यकीय महाविद्यालये असून यामध्ये फॅकल्टी डेव्हलपमेंटचा मुद्दा विभागाच्या महाविद्यालयापेक्षा चांगला आहे. या महापालिकेच्या रुग्णालयांमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सहसा बदल्या होत नाहीत. वैद्यकीय अधिकाऱ्यास त्याच्या वैद्यकीय विभागाची अधिक माहिती होण्यास किमान ८-१० वर्षाचा कालावधी जातो. सदर वैद्यकीय अधिकारी एवढ्या मोठ्या कालावधीकरीता एकाच ठिकाणी राहत असल्याने त्याला सातत्य व स्थैर्य(कंन्टीन्युटी व स्टॅबिलीटी) मिळते. शासनाच्या नियमाप्रमाणे दर ३ वर्षांनी महापालिका रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदली होत नाही.

५.१४ क्षयरोगाच्या संदर्भात मुंबई शहरातील उपचार पध्दतीची कार्यपध्दती देशाने स्वीकारले आहे. या कार्यपध्दतीमध्ये क्षयरोग (टी.बी.) रुग्णाचे निदान झाल्यावर त्याला दूरध्वनी क्रमांक व एक डॉक्टर दिला जातो. या रुग्णाला दर महिन्यामध्ये डॉक्टरकडून कोड नंबर मिळाल्यावर त्याला विशिष्ट असा केमिस्ट देण्यात येता. या केमिस्टकडे जाऊन रुग्णाने कोडनंबर सांगितल्यावर केमिस्ट त्याला कोणताही प्रश्न न विचारता एक महिन्याचे औषध देतो. रुग्ण बाहेरगावचा किंवा भारताबाहेर कुठेही राहणारा असला तरी त्याला कुरिअरद्वारे घरपोच एक महिन्याचे औषध पोचविले जाते. तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे दूरध्वनी क्रमांक देखील नोंदवून घेतले जातात. महापालिकेतील काही कर्मचाऱ्यांकडे याकामाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. समितीस अशीही माहिती मिळाली की, राज्यामध्ये जवळपास अडीच लाख क्षयरोग (टी.बी.) रुग्ण आहेत त्यापैकी १,७० हजार रुग्ण यंत्रणेमध्ये आहेत. थेट लाभ हस्तांतरणाच्या (डीबीटी) माध्यमातून या रुग्णांना ५०० रुपयांचे अनुदान व मोफत उपचार मिळणार आहेत.

शिफारस :-

५.१५ क्षयरोग हा संसर्गजन्य रोग असल्याने क्षयरोग मुक्त भारत बनविणे हा राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाचा उद्देश आहे. क्षयरोग लागण झालेल्या रुग्णांची डायरेक्टली ऑब्झवर्ड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉट्स) द्वारे तपासणी करुन प्रभावीपणे उपचार देण्यात येतात. या संपूर्ण कालावधीसाठी औषधाचा खात्रीशीर पुरवठा व औषधोपचाराला रुग्णांचा नियमितपणे प्रतिसाद नोंदविण्याची यंत्रणा आहे. दर लाख लोकसंख्येमागे संशयीत क्षयरोग रुग्णांची संख्या सन २००३ मध्ये २०३ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८२ टक्के होते तर सन २०१७ मध्ये हेच प्रमाण अनुक्रमे २०३ व ८४ टक्के होते. राष्ट्रीय आरोग्य अभियान योजनेअंतर्गत क्षयरोग प्रार्दुभाव दर हजारी लोकसंख्येमागे ०.३३ टक्केपर्यंत कमी करणे हे व्हिजन २०३० अंतर्गत लक्ष निर्धारित केलेले आहे. त्यामुळे विभागाने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या / होणाऱ्या निधीचे योग्यप्रकारे विनियोग होण्याच्या दृष्टीने कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी आवश्यक असलेली सविस्तर आखणी राज्य व जिल्हा स्तरावर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

५.१६ राज्यामध्ये जवळपास अडीच लाख टी.बी. रुग्ण आहेत यातील १ लाख ७० हजार रुग्ण यंत्रणेच्या कक्षेत आहेत. क्षयरोगाच्या निवारणासंदर्भात मुंबई महानगरपालिकेने जी कार्यपध्दती अवलंबलेली आहे ती या देशामध्ये मॉडेल म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे. या कार्यपध्दतीचा सकारात्मक परिणाम देखील दिसून येत असल्याचे स्पष्ट होत आहे. राज्य शासनाकडे जिल्ह्यांमध्ये व तालुक्यांमध्ये ग्रामीण रुग्णालये व आरोग्य केंद्र आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवरच क्षयरोग निवारण्यासाठी यंत्रणा राबविल्यास त्याचा निश्चितच फायदा होईल असे समितीस वाटते. त्याचप्रमाणे डीबीटीच्या माध्यमातून प्रत्येक टी.बी. रुग्णाला दरमहा ५०० रुपये अनुदान देण्याची शासनाची योजना आहे. समितीचे असे मत आहे की, रुग्णांना ५०० रुपयाचे अनुदान देण्यावर होणारा खर्च करण्याऐवजी मुंबई महानगरपालिकेने जी कार्यपध्दती अवलंबिलेली आहे ज्यायोगे रुग्णाला कुरिअरद्वारे घरपोच एक महिन्याचे औषध मोफत मिळते तसेच टी.बी. झालेल्या रुग्णाची नोंदणी होत असल्यामुळे या रुग्णांना उपचार वेळेत मिळू शकतील व त्यांचा उपचाराचा देखील मागोवा (Follow Up) प्राप्त होऊ शकेल. यावर जर शासनाने खर्च केल्यास तो दुरगामी परिणाम साधणारा निर्णय होऊ शकेल, अशाच प्रकारे राज्यातील सर्व जिल्हा व तालुका स्तरावर सर्व शासकीय आरोग्य संस्थेच्या माध्यमातून टी.बी. रुग्णांसाठी योजना राबविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१-नागरी सेवा, ११०-रुग्णालये व दवाखाने, मुफसल क्षेत्रातील अध्यापनेतर शासकीय रुग्णालये

अभिप्राय :-

५.१७ या लेखाशीर्षाखाली मूळ तरतूद ही ५,९१,०७.२९ लक्ष रुपयांची होती. त्यामध्ये १९,३९.०२ लक्ष रुपयांची पूरक मागणी घेण्यात आली. विभागाने वेतन, दूरध्वनी देयके, विद्युत, पाणी खर्च व भाडे आणि कर यावर अपेक्षेपेक्षा कमी खर्च झाल्यामुळे रुपये ४९,३९.१५ एवढी रक्कम प्रत्यार्पित केली आहे. विभागाचा खर्च ५,५८,८३.२७ लक्ष एवढा झाला आहे. याबाबत साक्षीच्यावेळी वित्त विभागाने रुपये ४९ कोटींची कपात केल्याचे व यातील काही लेखाशीर्ष वेतनाचे असल्याचे तसेच काही रुग्णालयात डॉक्टर, टेक्नेशियन यांची पदे भरलेली नसल्याने त्यावरील वेतनाचा खर्च कमी होतो असे विभागाकडून समितीस सांगण्यात आले.

५.१८ विभागाकडे अनेक पदे रिक्त आहेत. जेवढी मंजूर पदे आहेत तेवढी तरतूद वेतनाखाली विभागाकडून करण्यात येते. गोंदिया जिल्ह्यामध्ये ५० टक्के सार्वजनिक आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत. राज्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची १६०३ पदे रिक्त आहेत. हे प्रमाण मंजूर पदांच्या जवळजवळ २१ टक्के होत आहे. सध्या नवीन झालेल्या दवाखान्यांमध्ये, ग्रामीण रुग्णालयामध्ये व ट्रॉमा केअरमध्ये रिक्त असलेल्या पदांसंदर्भात समितीने माहिती विचारली असता ट्रॉमा केअरसाठी तसेच चार महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये पदे भरण्यास मंजूरी मिळाली असल्याची माहिती समितीस प्राप्त झाली. तसेच जी नवीन ग्रामीण रुग्णालये सुरु करण्यात आलेली आहेत त्या रुग्णालयांचा आराखडा मंजूर झालेला नसल्यामुळे अद्याप डॉक्टरांची पदे भरण्यात आलेली नाहीत अशी माहिती विभागाकडून प्राप्त झाली.

शिफारस :-

५.१९ विभागामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची बरीच पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याची समितीस माहिती मिळाली. समाजाचे आरोग्य सांभाळण्याची जबाबदारी असणाऱ्या विभागामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांची पदे वर्षानुवर्षे रिक्त राहतात आरोग्य सेवा कशा पुरविण्यात येतात असा समितीसमोर प्रश्न आला. एकीकडे ग्रामीण व जिल्हा स्तरावर रुग्णालये बांधण्याची कार्यवाही केली जाते परंतू मंजूर असलेली पदे रिक्त राहतात नवीन बांधण्यात आलेल्या रुग्णालयांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्याकरीता वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसतील तर या सेवा कशा पुरविणार व त्याची ठोस उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले. सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याचा प्रश्न असल्यामुळे याप्रकरणी कोणत्याही प्रकारे हलगर्जीपणा करण्यात येऊ नये व विभागातील सर्व वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याबाबत आढावा घेवून भरण्याची कार्यवाही त्वरीत सुरु करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत कळविण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

५.२० राज्यामध्ये दिड लाखांचावर डॉक्टर्स असून त्यामध्ये एम.बी.बी.एस. डॉक्टरांची संख्या खूप कमी आहे. काही तालुक्यांच्या ठिकाणी एम.बी.बी.एस. डॉक्टर्स काम करण्यास तयार असतात त्यांना ग्रामीण भागात पाठविण्यात येते, त्यामुळे ते राजीनामा देतात. जिल्हाधिकारी हे तीन वर्षे झाले की शासन नियमाप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करतात. एम.बी.बी.एस. डॉक्टर्स चांगल्या ठिकाणी काम करण्यास तयार असतील व त्यास तीन वर्षांच्या बदलीचा निकष लावला तर ते डॉक्टर्स राजीनामा देतात त्यामुळे जे डॉक्टर्स ग्रामीण / दुर्गम भागात आहे ते ग्रामीण / दुर्गम भागातच राहतो. ज्या प्रमाणे मुंबई महानगरपालिकेमध्ये डॉक्टर्सची बदली एखाद्या रूग्णालयात झाल्यावर त्यास रुग्णालय विभागाची माहिती होण्यास ८-१० वर्षे लागतात. तो पर्यंत त्यांची बदली करण्यात येत नाही त्याच धर्तीवर राज्य शासनाने देखील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदलीच्या निकषामध्ये लवचिकता आणण्याबाबत विचार विनिमय करावा अशी समिती शिफारस करीत आहे.

५.२१ मंजूर पदे, भरण्यात आलेली पदे व रिक्त पदे या माहितीची समितीने विचारणा केली होती. गट-अ ते गट-ड पर्यंतची १६,००० पदे रिक्त असून या रिक्त पदांची टक्केवारी ३१ टक्के आहे. गट-अ च्या रिक्त पदांची टक्केवारी ६३ टक्के आहे त्यापैकी ५० टक्के पदे नामनिर्देशनाने व ५० टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. पदे रिक्त राहण्याबाबतचे मुख्य कारण हे त्या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार नाहीत. सदरहू पदांचे सेवाप्रवेश नियम करण्याची प्रक्रिया सुरु असल्याचे माहिती समितीस देण्यात आली. सेवाप्रवेश नियम नसल्यामुळे रिक्त पदे भरता येत नाहीत या एकाच कारणामुळे पदे रिक्त राहत असतील तर विभागाने तातडीने सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम करण्याची कार्यवाही सुरु करावी. याकरीता एक कालबध्द कार्यक्रम आखून सर्व पदांचे सेवाप्रवेश नियम लवकरात लवकर तयार होतील व या सेवाप्रवेश नियमानुसार रिक्त असलेली पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

५.२२ वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग या दोन्ही विभागात वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते. तथापि, या दोन्ही विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनामध्ये तफावत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागापेक्षा वैद्यकीय शिक्षण विभागात जास्त वेतनश्रेणी आहे. या वैद्यकीय शिक्षण विभागातील वेतनश्रेणी या युजीसी प्रमाणे निश्चित होतात. तसेच त्यांच्या सेवाशर्तीसुध्दा वेगळ्या असतात. राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांचा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे अधिकचा कल दिसून येतो. यामागे कारण असे की, या वैद्यकीय शिक्षण विभागात डॉक्टर्सना साधारणत: ५ वर्षात पदोन्नतीची पुढील संधी मिळते व त्यांच्या वेतनात जवळजवळ ८० टक्क्यांनी वाढ होते. अशी परिस्थिती सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागातील डॉक्टर्सना प्रत्यक्ष वैद्यकीय क्षेत्रात काम करावे लागते. या डॉक्टर्सना ग्रामीण विभागात देखील काम करावे लागते व ग्रामीण भागातील डॉक्टरांचे वेतन हे शहरी भागातील डॉक्टर्सच्या वेतनापेक्षा महागाईच्या मुद्यामुळे कमी असते. त्यामुळे ग्रामीण भागात डॉक्टर्स काम करण्यास देखील स्वखुशीने तयार होत नाहीत. सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या वेतनातील तफावत कमी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना करता येतील याबाबत वित्त विभागाशी विचार विनिमय करावा, अशी समिती शिफारस करीत आहे जेणेकरुन प्रत्यक्ष आरोग्य क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना आर्थिक स्थैर्य प्राप्त होईल व शासनास देखील ग्रामीण भागात काम करण्यास पुरेसे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होतील, अशी समिती शिफारस करीत आहे.

५.२३ राज्यामध्ये आजमीतीस १६ वैद्यकीय महाविद्यालये आहेत परंतू राज्यातील जिल्ह्यांची संख्या पाहता प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान एकतरी वैद्यकीय महाविद्यालय असणे आवश्यक आहे. चीनमध्ये सध्या ६०० भारतीय मुले वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. भारतामध्ये वैद्यकीय शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसल्यामुळे बरीचशी मुले सध्या चीन, रशिया व थायलंड येथे शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रात देखील वैद्यकीय महाविद्यालये आहेत परंतू सदरहू महाविद्यालयांचे प्रमाण हे जिल्ह्यांच्या व्यस्त प्रमाणात आहे. काही जिल्ह्यांमध्ये एकही वैद्यकीय महाविद्यालय नाही तर काही जिल्ह्यांमध्ये एकापेक्षा अधिक महाविद्यालये स्थापन झालेली आहेत. त्यामुळे त्या-त्या विभागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्या व्यतिरिक्त इतर ठिकाणी जाऊन शिक्षण घ्यावे लागते. प्रत्येक जिल्ह्यामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना केल्यास तेथे विद्यार्थी डॉक्टर्स वाढतील तसेच तेथील नागरीकांना चांगल्या वैद्यकीय सुविधाही प्राप्त होतील. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यांमध्ये किमान एक वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची कार्यवाही करावी ज्यायोगे त्या-त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना त्यांच्या जिल्ह्यातच वैद्यकीय शिक्षणाची सुविधा उपलब्ध होईल तसेच या महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय अधिकारी व इतर वैद्यकीय सुविधा स्थापित झाल्यास तेथील नागरीकांना देखील या वैद्यकीय सुविधेचा लाभ घेता येईल अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष २२११-कुटुंब कल्याण, १०१-ग्रामीण कुटुंब कल्याण सेवा, ग्रामीण कुटुंब कल्याण केंद्र व आरोग्य उपकेंद्र (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना)

अभिप्राय :-

५.२४ याखाली रुपये ४,८६,२१.१८ लक्ष एवढी मूळ तरतूद करण्यात आली होती. या तरतूदीपैकी ४,५६,३२.१३ लक्ष एवढा खर्च झाला असून रुपये २४,५१.९२ एवढी तरतूद शासनास प्रत्यार्पित करण्यात आली. तसेच रुपये ५,३७.१३ लक्ष एवढा निधी बचतीची कारणे देण्यात आलेली नाहीत. याबाबत साक्षीच्यावेळी माहिती देताना जिल्हा परिषदेमध्ये १३२९ म्हणजे १० टक्क्यांपेक्षा अधिक पदे रिक्त आहेत. सदरहू पदे ही महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्यात येतात. स्पेशालिस्ट डॉक्टर, ॲनास्थेटिस्ट, लहान मुलांचे स्पेशालिस्ट, गायनॉकोलॉजिस्ट व मेडीसीन, सर्जरी यांची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत.

शिफारस :-

५.२५ सार्वजनिक आरोग्य सेवेचा मुख्य उद्देश जबाबदार, समाधानकारक, प्रतिबंधात्मक व रोग निवारक सेवा पुरविणे हा आहे. परंतू सार्वजनिक आरोग्य विभागाकडील वैद्यकीय क्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांची संख्या पाहता राज्यातील व विशेषत: ग्रामीण भागातील नागरीकांना आरोग्य सेवा पुरविण्याबाबत शासनाकडून हलगर्जीपणाच होत आहे, असे समितीचे मत झाले. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त ठेऊन रुग्णालयांमध्ये रुग्णांना सेवा कशी उपलब्ध होते याबाबत समितीने आश्चर्यच व्यक्त केले. त्यामुळे रिक्त असलेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, अशी समिती पुन्हा एकदा शासनास शिफारस करीत आहे.

प्रधानशीर्ष २२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ८०० इतर खर्च, ट्रामा केअर युनिटची स्थापना - महाराष्ट्र तातडीची वैद्यकीय सेवा

अभिप्राय :-

५.२६ या लेखाशीर्षाखाली रुपये १४.६७ कोटी या रक्कमेपैकी फक्त १७ लाख एवढीच रक्कम शिल्लक राहिली आहे. समितीने राज्यामधील ट्रामा केअरची सद्य:स्थिती काय आहे याबाबत विचारणा केली. या संदर्भात माहिती देताना राज्यामध्ये एकूण ६५ ट्रामा केअर केंद्र (सेंटर) असून सध्या ४०-४१ केंद्रें (सेंटर्स) कार्यरत आहेत. या ट्रामा केअर केंद्रामधील (सेंटर) बऱ्याचशा जागा रिक्त असून त्या जागा भरणे कार्यवाहीत आहे. तसेच जी ट्रामा केअर सेंटर अर्धवट अवस्थेत आहेत ती ट्रामा केअर केंद्र (सेंटर्स) पूर्ण करण्याचे काय नियोजन आहे याबाबत समितीने विचारणा केली असता ८ इमारती तयार असून १२ इमारतींचे काम ७५ टक्के पूर्ण झाल्यानंतर कर्मचारी भरतीचे काम हाती घेण्यात येणार आहे, अशी माहिती समितीस प्राप्त झाली.


शिफारस :-

५.२७ ट्रामा केअर केंद्र (सेंटर्स) ही अत्यंत तातडीच्या प्रसंगी रुग्णांना सेवा देण्याकरीता बांधण्यात येतात. परंतू या ट्रामा केअर केंद्रामधील (सेंटर्स) वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्तपदे पाहता या केंद्रांमधून तातडीने वैद्यकीय सेवा रुग्णांना कशी उपलब्ध होऊ शकते याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. राज्यात एकूण ६५ ट्रामा केअर केंद्र (सेंटर्स) आहेत त्यापैकी ४१ सेंटर्स कार्यरत आहेत. त्यामुळे एवढी रक्कम खर्च करुन देखील या ट्रामा केंद्रामध्ये (सेंटर्स) वैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था होत नसल्यामुळे विभागाने ही ट्रामा केअर केंद्र (सेंटर्स) व्यवस्थित चालू राहतील व येथे वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध असतील या दृष्टीने योजना आखावी जेणेकरुन तातडीच्या वैद्यकीय सेवेकरीता उभारणी केलेल्या ट्रामा केअर केंद्रांची (सेंटर्स) उद्दिष्टपूर्ती होईल, अशी समिती शिफारस करीत आहे.

परिशिष्ट-अ

Meeting 14 Feb 2018
PAC Meeting

All citizens of Maharashtra
be ***happy, healthy,***
educated, empowered
leading to peaceful and
prosperous life



Direct

- Accessible and affordable healthcare to all

Indirect


- Ensure sufficient and nutritious food for all at an affordable cost
- Ensure affordable shelter with proper sanitation and safe drinking water to all
- Good & effective governance by responsive, accountable & transparent administration and extensive use of ICT

Indicator	Current Status	2020 (via)	2030	All India level
Life expectancy at birth (years)	69.9#	72	77	66.1
Infant Mortality Rate	19#	16	9	39
Maternal Mortality Ratio	68@	30	19	167
Under 5 Mortality Rate	23	22	10	45
Neonatal Mortality Rate	16	14	7	26
Still birth rate	4	<4	<4	4
Incidence rate of TB cases (per 1000 persons)	1.67	1.17	0.33	1.71


Note : * 2011 # 2016 @ 2011-13

Indicator	Current Status	2020 (via)	2030	All India level
Social				
Annual parasite (malaria) incidence rate (per 1000 persons)	<1	<1	0	N.A.
Doctor-Population ratio including Allopathic and Ayush doctors (NHP 2017)	1:789	1:600	1:500	1:1421
Beds per lakh of population	108	120	150	N.A.


Note : Current status for 2016-17



- Significant change is expected in disease profile and causes of deaths
- By 2030, Non Communicable Diseases including cancer will be leading cause of death
- Trauma will be leading cause of morbidity and second important cause of deaths
- Kidney and liver diseases (?) in increasing trend
- Large scale investments will be required in medical management of NCD and trauma.
- Need for palliative care of terminally ill patients will increase many fold because of increase in life expectancy and increase in incidence of NCD and trauma.
- Preventive services in the form of screening, immunization and IEC need to be on priority if we want to keep the expenditure on NCD and Trauma within the limit.




- Urban population of Maharashtra has already crossed 50% mark, it is expected to be around 70% at 2030 .
- Currently there is no systematic and population based infrastructure in urban areas.
- IMR and mortality in urban slums is higher than tribal areas and more than rural areas in border areas of cities
- Diseases like TB, chest diseases, etc. are more in urban areas
- Majority of communicable diseases are now endemic in urban areas and spreading to rural areas
- Less uptake for preventive services including screening of diseases and immunization
- Majority of corporations and almost all councils depend upon govt for health care delivery.
- NUHM not properly implemented by urban bodies




- Reducing Out of Pocket expenditure (OOP) from current level by 50% in 2025 and 70% in 2030
- Strategy to include NCDs and Trauma Care in Primary Health Care - immediate
- Emphasis on preventive care as it is more economical - immediate
- Reducing load of District Hospitals and Medical College Hospitals by making the RH SDH more functional - immediate
- Health statistics of tribal area at par with non-tribal areas by 2025
- IT based Health records of each family in State – 2020
- Strengthening of urban health infrastructure-2020
- Community based planning and monitoring (RKS/NGOs) for all health facilities - 2020

Service	Village	SC	PHC	RH/SDH	DH
Community based services	S/C	P	P		
Mother and child services including delivery	P	P	P	PT	PT
Curative services		P	P	T	T
Curative services 24 hours			P	T	T
Diabetes and hypertension			P	T	T
Screening and treatment of cancers			S	D	T
Specialty services			S	PT	DT
Cardiac emergencies			PT	PT	DT
Dialysis				T	T
Dental services				T	T
Trauma care			P	T	T

S-screening/C-Counseling/D-Diagnosis/T-Sp Treatment/P-Primary treatment



- Doctors not staying at HQ is major problem
- Strategy
  - Grievance redressed by 104 (short term)
  - Identifying 2-3 health facilities (preferably RH/SDH) which will provide guaranteed health care services 24 hours for 95% of emergencies
  - Other facilities will function between 8am to 6pm daily with availability of 102 ambulance 24 hours
  - Staff of all other facilities will be pulled to 24 hours facility to ensure availability of doctors, nurses, technicians and support structure 24 hours
  - Additional support by 108 ambulances
  - Patient can call toll-free 104 to get quick information. Free app will be developed for this purpose
  - Budget required for improvement in quarters



- New Health policy initiative
- AYUSH doctor at SC and PHC level
- Holistic approach
- More emphasis on preventive services

- Posting based on counseling for all doctors
- Remuneration to skilled doctors need to be increased – additional incentive based on work instead of increase in salary
- Self financed PG courses (CPS/DNB) to start in all DH/WH and MH (50% in-service 50% pvt students with fees)
- Classifying the health facilities in A/B/C category for PG and posting
- Fix + performance based incentive to contractual specialists
- Systematic monitoring of bonded candidates
- Improvement in living conditions with introduction of hostels (HRA will be paid if staying in hostel)
- Colony for staff in strategic places in tribal areas

परिशिष्ट

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

मंजूर आस्थापना

अ.क्र.	संवर्ग	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	रिक्त पदे टक्केवारी
१	गट अ (ग्रे.वे.६६०० व अधिक)	१६५३	६०७	१०४६	६३
२	गट अ (ग्रे.वे.५४००)	७६४१	६१५०	१४९१	१९
३	गट ब (बी.ए.एम.एस.)	१०६६	६३३	४३३	४०
४	गट ब (सा.रा.से)	९३१	१९४	७३७	७९
५	गट क	३०२८९	२१४९८	८७९१	२९
६	गट ड	१२५६७	८४८२	४०८५	३३
	एकुण	५४१४७	३७५६४	१६५८३	३१

वैद्यकीय सेवेतील महत्वाचे घटक

१) वैद्यकीय अधिकारी

२) औषधे

३) वैद्यकीय उपकरणे

४) तंत्रज्ञ (प्रयोगशाळा/क्ष-किरण/रक्तपेढी तंत्रज्ञ)

५) परिचारीका

६) प्रशासन

वैद्यकीय अधिकारी-विशेषज्ञ (ग्रे.पे.६६००)

अ.क्र	पदनाम	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	नामनिर्देशनाबाबतची कार्यवाही	पदोन्नतीबाबतची कार्यवाही
१	वैद्यकीय अधिकारी (रु.प्र.कें.)	२६	००	२६		सेवा प्रवेश नियम मंजूर नाही
२	बालरोग तज्ञ	४९	१९	३०	३ पदांचे मागणीपत्र शासनास सादर.	११ रिक्त पदाची विपसची बैठक घेण्यासाठी प्रस्ताव सादर.
३	स्त्रीरोग तज्ञ	४५	११	३४	१६ पदांचे सुधारीत मागणीपत्र सादर.	शासनाकडून बिंदूनामावली प्रसिध्द होणे बाकी.
४	बधिरीकरण शास्त्रज्ञ	५९	२४	३५	९ पदाचे मागणीपत्र शासनास सादर. यापैकी १० पदाची जाहिरात प्रसिध्द.	शासनाकडून बिंदूनामावली प्रसिध्द होणे बाकी.
५	नेत्र शल्य चिकित्सक	३९	११	२८	१६ पदांचे मागणीपत्र शासनास सादर.	शासनाकडून बिंदूनामावली प्रसिध्द होणे बाकी.
६	अस्थिव्यंगोपचारतज्ञ	३३	१९	१४	४ पदांचे मागणीपत्र शासनास सादर	५ रिक्त पदे भरण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर.
७	कान,नाक,घसा तज्ञ	३१	११	२०	१२ पदांचे मागणीपत्र शासनास सादर. यापैकी, ८ पदांची जाहिरात प्रसिध्द.	८ रिक्त पदे भरण्यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर.
८	क्ष-किरण तज्ञ	४०	१४	२६	७ पदांचे मागणीपत्र सादर.	९ रिक्त पदे भरण्यासाठीचा प्रस्ताव सादर.

वैद्यकीय अधिकारी-विशेषज्ञ (ग्रे.पे.६६००)

अ.क्र	पदनाम	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	नामनिर्देशनाबाबतची कार्यवाही	पदोन्तीबाबतची कार्यवाही
९	मनोविकृती चिकित्सक	९०	११	७९	३२ पदांचे मागणीपत्र सादर. यापैकी २० पदांची जाहिरात प्रसिध्द.	निम्नसंवर्गात अर्हताधारक अधिकारी प्राप्त नाहीत.
१०	शरिरविकृती शास्त्रज्ञ	३२	९	२३	८ पदांची जाहिरात प्रसिध्द पैकी ५ उमेदवाराच्या शिफारसी प्राप्त.	९ रिक्त पदे भरण्यासाठीचा प्रस्ताव सादर.
११	क्षयरोग चिकित्सक	३०	३	२७	१४ पदांचे मागणीपत्र सादर. सेवा प्रवेश मंजूर नाही.	५ पदांचे आदेश निर्गमित. यापैकी ३ अधिकारी रुजू.
१२	चर्मरोग चिकित्सक	३०	८	२२		निम्न संवर्गातील जेष्ठतासुची तयार नाही.
१३	दंत शल्य चिकित्सक	२६	०	२६	सेवा प्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.	
	एकुण	५३०	१४०	३९०		

वैद्यकीय अधिकारी व विशेषज्ञ गट- अ व ब (ग्रे.पे.५४०० व ४६००)

अ.क्र	पदनाम/विशेषज्ञ	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	नामनिर्देशनाबाबतची कार्यवाही	पदोन्नतीबाबतची कार्यवाही
१	भिषक	१५०	९१	५९	संचालनालयाचे दि.८/११/१७ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या रिक्त पदांची संख्या व रुग्णसेवेमध्ये येत असलेल्या बाधेचा विचार करुन सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या अधिनस्त रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरतीप्रक्रीया सुरु करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.	
२	बालरोगतज्ञ	५२५	३५५	१७०		
३	शल्यचिकीत्सक	१४८	७७	७१		
४	स्त्रीरोगतज्ञ	५५५	४२६	१२९		
५	भुलतज्ञ	५८४	२३३	३५१		
६	अस्थिव्यंगोपचारतज्ञ	१२६	१२६	००		
७	नेत्ररोगतज्ञ	१०९	१०९	००		
८	त्वचारोगतज्ञ	१५	१५	००		
९	शरीरविकृतीतज्ञ	३१	३१	००		
१०	क्ष-किरणतज्ञ	३०	२७	०३		

अ.क्र	पदनाम/विशेषज्ञ	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे	नामनिर्देशनाबाबतची कार्यवाही	पदोन्नतीबाबतची कार्यवाही
११	मानसोपचारतज्ञ	२३	२३	०	संचालनालयाचे दि.८/११/१७ रोजीच्या पत्रान्वये राज्यातील वैद्यकीय अधिकारी गट-अ यांच्या रिक्त पदांची संख्या व रुग्णसेवेमध्ये येत असलेल्या बाधेचा विचार करुन सर्व जिल्हाधिकारी यांना त्यांच्या अधिनस्त रिक्त असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांची भरतीप्रक्रीया सुरु करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत.	
१२	रक्तसंक्रमणअधिकारी	२५	१८	७		
१३	कान-नाक-घसा	२०	२०	०		
१४	पीएसएम	६२	४२	२०		
१५	एमबीबीएस	४४१०	४१४८	२६२		
	बीएएमएस गट-अ	७६६	४०९	३५७		
	बीयुएमएस	६२	०	६२		
१६	बीएएमएस गट-अ	३८२	२२८	१५४		
	एकूण	७६४१	६१५०	१४९१		
	वैदयकीय अधिकारी गट-ब	१०६६	६३३	४३३		

टिप -

* १) उपरोक्त दर्शविलेल्या १४९१ गट-अ वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त पदांपैकी ३८७ एमबीबीएस बंधपत्रित व १४६ एमबीबीएस अस्थायी वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. त्यामुळे निव्वळ रिक्त पदांची संख्या एकुण ९५८ एवढी आहे.
* २) उपरोक्त ९५८ वैद्यकीय अधिकारी यांचेपैकी २६२ निव्वळ एमबीबीएस, ३५७ बीएएमएस व ६२ बीयुएमएस अशी रिक्त पदे आहेत. रिक्त असलेल्या ३५७ बीएएमएस वैद्यकीय अधिकारी यांचेपैकी २१७ नामनिर्देशनाची पदे व १४० पदोन्नतीची पदे आहेत.

परिचारीका - गट - क

अ.क्र.	संवर्गाचे नांव	वेतनश्रेणी	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	अधिपरिचारीका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	८४३३	६८८३	१५५०
२	सहाय्यक परिचारीका/प्रसाविका	५२००-२०२०० (ग्रेड पे २४००)	५०	३५	१५
३	सहाययक अधिसेविका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००)	१३४	७४	६०
४	परिसेविका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	११००	५९८	५०२
५	अधिसेविका वर्ग ३	९३००-३४८०० (ग्रेड पे ४४००)	३१	१६	१५
६	बालरुग्ण तज्ञ परिचारीका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१११	५०	६१
७	मनोरुग्ण तज्ञ परिचारीका	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	१३७	७२	६५
एकुण			९९९६	७७२८	२२६८

तंत्रज्ञ - गट - क

अ.क्र.	संवर्गाचे नांव	वेतनश्रेणी	मंजूर पदे	भरलेली पदे	रिक्त पदे
१	प्रयोगशाळा तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	२४०२	१५९२	८१०
२	प्रयोगशाळा सहाय्यक	५२००-२०२०० (ग्रेड पे २०००)	५५३	४५९	९४
३	क्ष- किरण तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	७१६	४६२	२५४
४	क्ष- किरण सहाय्यक	५२००-२०२०० (ग्रेड पे २४००)	५	३	२
५	रक्तपेढी तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४२००)	१६६	१२०	४६
६	ईसीजी तंत्रज्ञ	५२००-२०२०० (ग्रेड पे २४००)	७९	६६	१३
७	डायलिसिस तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	८	२	६
८	न्युक्लीअर मेडी तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	३	०	३
९	हिस्टोपॅथो तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	३	०	३
१०	कॅथलॅब तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	२	०	२
११	मोल्ड रुम तंत्रज्ञ	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	२	०	२
१२	भौतिक शास्त्रवेत्ता	९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)	३	०	३
एकुण			३९४२	२७०४	१२३८

रिक्त पदांसाठी अर्थसंकल्पीय तरतुद

- प्रचलित शासन नियमानुसार रिक्त असलेल्या पदांसाठी रिक्त पदांच्या ५० टक्के इतकी पदे भरली जातील असे ग्रहित धरुन त्यांच्या वेतनासाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्याचे धोरण आहे. त्याप्रमाणे रिक्त पदाच्या ५० टक्के पदासाठी निधीची तरतुद करण्यात येते. तथापी सदरची पदे भरली न गेल्यास त्यासाठीची अर्थसंकल्पीय तरतुद वर्षाअखेर समर्पित करावी लागते.


८३ कि मागितलं विठ्ठला

१३व्या वित्तआयोगाकडून प्राप्त अनुदान

- अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी केंद्रशासनाकडून प्रोत्साहानात्मक निधी

वर्ष	निधी (रु कोटी)
२०१३-१४	१३३.०८
२०१४-१५	९८.२७
एकूण	**२३१.३५**

• महाराष्ट्रतील अर्भक मृत्यूदर व नवजात बाल मृत्यूदर



• सॅम्पल रजिष्ट्रेशन स्किमच्या पाहणीनुसार महाराष्ट्रातील अर्भक मृत्यू प्रमाण २०१३ ला २४ प्रती १००० जीवंत जन्म असून नवजात बाल मृत्यूचे प्रमाण १७ प्रती १००० जीवंत जन्म आहे.

• राष्ट्रीय आरोग्य अभियाना अतंर्गत २०१७ पर्यंत अर्भक मृत्यूदर १९ प्रती १००० जीवंत जन्मचे उददीष्ट देण्यात आले होते. राज्याचे अर्भक मृत्यूदर २०१६च्या एसआरएस प्रमाणे १९ प्रती १००० जीवंत जन्म साध्य झाले आहे, व नवजात बाल मृत्यूदर हे १३ प्रती १००० जीवंत जन्म साध्य झाले आहे,

उदिदष्टे

- केंद्र शासनाने इंडिया न्यूबॉर्न ॲक्शन प्लॅन (आयएनएपी) दि.१८ सप्टेंबर २०१४ ला घोषित केला.
- इंडिया न्यूबॉर्न ॲक्शन प्लॅन कार्यक्रमांतर्गत नवजात बाल मृत्यूदर (जन्मल्यापासून २८ दिवसातील मृत्यू) प्रमाण हे २०३० पर्यंत एकक संख्येमध्ये साध्य करणे अपेक्षित आहे.

अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी महत्वाचे हस्तक्षेप/ उपाय

- संस्थास्तरावर नवजात बालकांच्या सेवांचे बळकटीकरण
  - नवीन विशेष नवजात काळजी कक्ष स्थापन करणे
  - विशेष नवजात काळजी कक्षाचे विस्तारीकरण करणे
  - विशेष नवजात काळजी कक्षाचे नवजात बालक अतिदक्षता कक्षामध्ये श्रेणीवर्धन करणे
  - नवजात बालक स्थिरीकरण कक्षाची स्थापना करणे
  - रेडीऐन्ट वॉर्मर, फोटोथेरेपी युनिट, पल्सऑक्सिमीटर, वॉर्म स्लिपींग बॅग, व बॅटरी ऑपरेटेड वॉर्मरचा पुरवठा

- बाळंतपण कक्षाचे बळकटीकरण
  - सर्व लेव्हल २ व लेव्हल ३, डिलेव्हरी पॉईंटच्या ठिकाणी पाणीपुरवठा
  - बाळंतपण कक्षाचे एमएनएच टूल किटच्या मार्गदर्शक सूचनानुसार नुतनीकरण.
  - बाळंतपण कक्षासाठी मॅट्रेस व इतर उपकरणांचा पुरवठा
  - बाळंतपण कक्षासाठी फिटल मॉनिटरचा पुरवठा
  - लेव्हल ३च्या संस्थांना सोनोग्राफी मशीन पुरवठा
  - बाळंतपण कक्षासाठी आयपीडी केस कार्डसचा पुरवठा

अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी महत्वाचे हस्तक्षेप/ उपाय


- शितसाखळी व लसींचे व्यवस्थापन
  - राज्य स्तरीय लस भंडाराचे बांधकाम,
  - दर्गम व अदिवासी भागात क्लस्टर व्हॅक्सिन स्टोर्स स्थापना
  - लस पुरवठासाठी रेफरिजरेटेड व्हॅन राज्यस्तरीय व मुंबई मनपा
  - राज्यस्तरीय शितसाखळी व्यवस्थेचे विस्तारीकरण 3 वॉक-इन-कुलरचा पुरवठा
  - आयएलआर व डीपफ्रिजरचा पुरवठा
- राज्य व जिल्हास्तरीय अधिका-यांच्या कार्यक्षेत्र भेटीसाठी वाहतूक व्यवस्था
- कुपोषीत बालकांसाठी उपचार केंद्र स्थापन करणे

अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठी महत्वाचे हस्तक्षेप/ उपाय

- आशा मार्फत इंटेन्सीफाईड होम बेस्ड न्युबॉर्न केअर
- पारंपारिक दाई यांना प्रोत्साहानात्मक भत्ता
- प्रा.आ.केंद्र व रुग्णालयांसाठी स्टॅन्डर्ड ट्रीटमेंट प्रोटोकॉल्स पुरवठा
- २४ X ७ अखडीत विदयुतपुरवठासाठी सोलर हायब्रीड पॉवर सप्लाय पुरवठा

अर्भक मृत्यूदर कमी करण्यासाठीचे महत्वाचे हस्तक्षेप/ उपाय


- जिल्हा व स्त्रीरुग्णालय येथे विशेष नवजात काळजी कक्ष स्थापन करणे.





- निवडक जिल्हा व स्त्रीरुग्णालय येथील विशेष नवजात काळजी कक्षाचे लेव्हल २ मधुन लेव्हल १ मध्ये उन्नतीकरण करणे. ज्यामध्ये सीपॅप, न्यूओनेटल व्हेन्टीलेटर, एबीजी आणि एक्सरे मशीन यांचा समावेश आहे.


* कमी वजनाच्या व अपू-या दिवसाच्या जन्माला आलेल्या बालकांमध्ये हायपोथर्मीया (अंगाचे तपमान अगदी कमी असणे) हे मृत्यूचे महत्वाचे कारण आहे. त्या करीता वॉर्म स्लिपींग बॅग व ब्लँकेटचा पुरवठा.





* नवजात बालक स्थिरीकरण कक्षाची सर्व प्रथम संदर्भसेवा असलेल्या ग्रामीण रुग्णालय,उपजिल्हा रुग्णालय येथे स्थापना करणे, ज्यामध्ये रेडीऐंट वार्मर, फोटो थेरेपी युनिट, ग्लुकोमीटर, पल्स ऑक्सिमीटर, इन्फूजन पंपचा समावेश आहे.


* गरोदर स्त्रीयांसाठी प्रयोगशाळा चाचण्या करीता सेल काउंटर व सेमी ऑटोअनालायझार पुरवठा करणे, रक्तक्षयाच्या तपासणीसाठी हिमोग्लोबीनो मीटर पुरवठा करणे.

- प्रसुतीकक्षांचे नूतनीकरण व पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठयाची हमी. यामुळे नवजात बालकातील तसेच मातेला होणा-या जंतूदोष टाळण्यास मदत.









- प्रसुतीपूर्व, प्रसुतीदरम्यान, प्रसुतीपश्चात घ्यावयाच्या काळजीबाबत तसेच आकस्मिकतेचे व्यवस्थापना बाबत प्रोटोकॉल्सचे वितरण. तसेच बाळंतपणाच्या आलेखासाठी आयपीडी कार्डसचा पुरवठा

- राज्यस्तरीय केंद्रीय औषध भंडार व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करणे.

- परिचारीका, प्रसाविका यांना बाळंतपण व नवजात शिशुच्या व्यवस्थापना संदर्भात वेगवेगळया कौशल्य वृध्दीकरीता जिल्हा स्तरीय स्किल लॅबसची जिल्हा/ स्त्रीरुग्णालय, नर्सिंगस्कूल येथे स्थापना करणे.



- अदिवासी व दुर्गम भागात लसींच्या उपलब्धते करीता १२ क्लस्टर व्हॅक्सिन स्टोर्सची स्थापना.

Table Showing Expenditure under Major activities from 13th Finance Commission Budget

Sr. No.	Activity	Total Budget (In Lakhs)	Expenditure till date (In Lakhs)	%
1	Construction	11740.92	2299.97	**19.59**
2	Equipment	7987.72	150.78	**1.88**
3	Vehicle	752.77	238.91	**31.74**
4	Other	2596.12	674.97	**26.00**
	Total	**23077.53**	**3364.63**	**14.57**

Construction under 13th Finance commission

SN	Name of the activity	Budget (In lakhs)	Exp. (In Lakhs)	%	Remarks
1	Expansion of SNCU in selected WH/DH	840	152.56	18.16	2 completed 5 in progress, 3 not started at AA stage, 2 cancelled (Nashik, Thane)
2	Establishment of New SNCU	420	0		Work not started. Tender Stage. Sanctioned was given for 4 SNCUs at GMC Dhule, Yavatmal, Sangali & SDH Achalpur. sanctioned required for new 4 SNCU proposed at SDH Aheri, SDH Dharni, SDH Kalwan and SDH Dhadgaon 2016-17,
3	Establishment of New SNCU	105			
4	Renovation of Labor Room. Civil Work to prepare pre delivery room and recovery room, in LR to make at par with OT,	1315	695.04	52.85	69 completed 13 in progress, 13 at Tender stage, 15 cancelled.
5	Water Supply to Delivery Points PHC	840	585.39	69.69	395 completed, 4 in process, 21 Cancelled work
6	Water Supply to Delivery Points Hospitals	607.5	346.25	57.00	110 completed, 5 in progress, 20 cancelled.

Construction under 13th Finance commission					
SN	Name of the activity	Budget (In lakhs)	Exp. (In Lakhs)	%	Remarks
7	Skill Laboratory in each district. Constuction renovation	85	10.33	12.15	6 completed, 15 not started works at in AA stage, 13 cancelled.
8	State Central Drug Warehouse and Training Center	3500	488.31	13.95	Phase II work Estimate of Rs. 30.12 Cr. Submitted for AA by PWD
9	Cluster vaccine store	216	22.09	10.23	8 completed, 4 cancelled.
10	State Vaccine store construction	108			Administrative approval as per GR dt.21-11-2017. With IDW
11	Repairs to Health buildings from Melghat	2303.32			Administrative approval dt. 28/09/2017. Work in estimate stage. 17 works at Tender Stage and 5 works taken from DPDC so cancelled
12	Repairs to Health buildings from Gadchiroli	1401			Administrative approval dt. 28/09/2017. Work in estimate stage
	Total	11740.80	2299.97	19.59	

Equipment under 13th Finance commission.

SN	Name of the activity	Total Budget (In lakhs)	Total Exp. (In lakhs)	%	Remarks
13	Expansion of SNCU in selected WH/DH Equipments for 12 SNCUs @ Rs.8 lakhs and Establishment of New SNCU	96			The requirement is included under equipments for SNCUs
		48			Equipment cost for 4 New SNCUs at Medical Colleges in Dhule, Yavatmal and Sangali and SDH Achalpur
		48			Equipment cost for 4 New SNCUs SDH Dharni, RH Dhadgaon & SDH Aheri. SDH Kalwan

Equipment under 13th Finance commission.

SN	Name of the activity	Total Budget (In lakhs)	Total Exp. (In lakhs)	%	Remarks
14	Upgradation of 16 SNCUs to NICU. CPAP, Neonatal Ventilator	412			Open after 2nd Extention. Awaited for authentication of certificates of quality standard.
15	Upgradation of 16 SNCUs to NICU 1. ABG machin 2. Mobile Xray Machine	460			Tender cancelled. Revised proposal submitted to Haffkin

Equipment under 13th Finance commission.

SN	Name of the activity	Total Budget (In lakhs)	Total Exp. (In lakhs)	%	Remarks
16	Neonatal Stabilization Unit. Rediant Warmer, Phototherapy unit	587.85			Tender of rediant warmer, Phototherapy unit cancelled. Revised proposal submitted to Haffkin
17	Neonatal Stabilization Unit. Pulse oxymeter with neonatal probe	316			Tender of Pulse Oxymeter cancelled. Revised proposal submitted to Haffkin
18	Warm sleeping bag & Blanket for neonate	835	142.31	17.04	supply completed. Payment under process
19	Battery operated baby warmer	92.4			Order & Payment done to M/s Phoenix.

Equipment under 13th Finance commission.					
SN	Name of the activity	Total Budget (In lakhs)	Total Exp. (In lakhs)	%	Remarks
20	Procurement of Fetal Monitor	1700			Tender cancelled
21	Ultra Sound Sonography machin	208			approved in CPC. Awaited for orders at Haffkin.
22	Anemia Control of Pregnant Women Digital Haemoglobino meter	1610			Tender Cancelled
23	Renovation of Labor Room mattress and small articles	1015.47			
24	Skill Laboratory in each district. Furniture, Model Mannequine, Computer Projector, Laptop	238	8.47	3.55	
25	ILR Deepfrizer	216			Kept in CPC
26	Expanding Cold Chain Facility at State Vaccine Store - 3WIC	105			Submitted to Procurement cell for tender
	Total	7987.72	150.78	1.88	

Vehicle under 13th Finance

SN	Name of the activity	Total Budget (In lakhs)	Total Exp. (In lakhs)	%	Remarks
27	Mobility Support	312	192.07	61.56	Vehicle supplied to 35 THOs
28	Mobility Support	44	46.84	106.45	Approval as per GR dt.16/10/2015. Purchase 4 cars and repaires charges, advertisment charges
29	Transport of vaccine from state to regional stores - Refrigerated Van at SVC & BMC	80		0.00	Submitted to Procurement cell for tender
30	Transport of drugs and consumables from regional to district stores. 8 LCU	64.766		0.00	Proposal approved by CPC order being placed
31	Supply of vehicles to officers from SFWB	30		0.00	Proposal approved by CPC order being placed
32	Vehicles to 16 Tribal districts for DRCHO and RMO (OR)	192		0.00	Proposal approved by CPC order issued
33	Conversion of 102 Ambulances in Vatsalya vehicle for drop back	20		0.00	DD Transport Pune has submitted proposal to NHM for advance
34	Transport of Newborn babies	10		0.00	Administrative approval dt. 09/11/2017.
	Total	752.8	238.91	31.74	

Other activities under 13th Finance commission

SN	Name of the activity	Particular	Budget (In lakhs)	Exp. (In lakhs)	%	Remarks
35	Monitoring of infant for 6months infants by ASHA. Incentive, Stationery card	Remuneration to ASHAs, Stationery and Card	**1068.46**	**395.32**	**36.99**	on going activity 2016-18
37	Incentives to TTBA in tribal areas. Delivery Kit	Delivery Kit, Sensitization, Remuneration	**66.96**	**22.75**	**33.98**	On going activity , revised sanctioned due to increase in TTBA from 350 to 600

Other activities under 13th Finance commission						
SN	Name of the activity	Particular	Budget (In lakhs)	Exp. (In lakhs)	%	Remarks
38	Child treatment centers at Taluka level.	Establishment, Operational Cost and HR	60	46.25	77.08	on going activity 2016-18
		Operational cost	420	147.81	35.19	
		HR	129.6	62.84	48.48	
39	IPD Card	Printing	100		0.00	
40	Protocols in PHCs/ Hospitals	Printing	17.1		0.00	
41	To ensure 24X7 availability of electricity		734			Tender canclled due to technical reason . 23/11/2017
	Total		2596.12	674.97	26.00	

परिशिष्ट-ब

बुधवार, दिनांक १७ जानेवारी २०१८
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरु होऊन दुपारी ३.४० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(८) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(१०) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(११) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. विजय कुमार गौतम, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

सार्वजनिक आरोग्य विभाग :

(१) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव
(२) डॉ. संजीव कुमार, आयुक्त

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. आर-१ संदर्भात आयुक्त, सार्वजनिक आरोग्य विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २२ जानेवारी २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २२ जानेवारी २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५.२० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(७) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(८) सत्यजित पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अरुण कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

श्री. उदय मा.शिंदे, उप महालेखाकार

वित्त विभाग

श्री. अनुदीप दिघे, उप सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

कृषि व पदुम विभाग :-

(१) श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (कृषी) विभाग

(२) श्री. क.य.वंजारे, उप सचिव, कृषी व पदुम (कृषी) विभाग

गृहनिर्माण विभाग :-

(१) श्री. संजय कुमार, अपर मुख्य सचिव,गृहनिर्माण विभाग

(२) श्री. मिलिंद म्हैसकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा, गृहनिर्माण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. डी-३ संदर्भात प्रधान सचिव, कृषि व पदुम विभाग व अनुदान क्र. क्यू-३ संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०१८
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(४) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(६) श्री. अजय चौधरी, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(९) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.
(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(११) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :---

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय,
(२) श्री. दिनेश मोरे,उप महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

सार्वजनिक आरोग्य विभाग :-

डॉ. संजीव कुमार, आयुक्त,

विभागीय प्रतिनिधी :-,

वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

(१) श्री. संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग
(२) डॉ. प्रवीण शिनगारे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. आर-१ संदर्भात सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०१८
लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी ३.२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.
(६) श्री. अब्दुल सत्तार, वि.स.स.
(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.
(८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित:-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई कार्यालय
(२) श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर कार्यालय

वित्त विभाग :-

श्री. अनुदिप दिघे, उप सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

(१) श्री. विकास खारगे, सचिव, वन विभाग
(२) श्री. नितीन काकोडकर, अपर प्रधान मुख्य संरक्षक (अर्थसंकल्प), वन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. सी-७ संदर्भात सचिव, वन विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ११ एप्रिल २०१८
लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ११ एप्रिल २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.४५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.
(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.
(१०) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव
(२) श्री. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :

श्री. टि.एस.आर.गुप्ता, उप महालेखाकार, प्रधान महालेखाकार कार्यालय

वित्त विभाग :-

(१) श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव वित्त विभाग (ले.व.को.)

विभागीय प्रतिनिधी :-

(१) श्री. देबाशिष चक्रवर्ती, अपर मुख्य सचिव., नियोजन विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. ओ-१७, ओ-२१ व ओ-३८ यासंदर्भात अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली.

गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.
(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.
(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.
(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.
(८) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्री. अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.
(२) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :-

महालेखाकार कार्यालय :-

(१) श्री. एस.एस.सरफरे, वरिष्ठ उपमहालेखाकार
(२) श्री. करन वोहरा, उप महालेखाकार
(३) श्री. के.जी.होमी, उप महालेखाकार

वित्त विभाग :-

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :-

(१) श्री देबाशिष चक्रवर्ती, अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, पुणे
(2) श्री. नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील अनुदान क्र. ओ-२० संदर्भात अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३५ वाजता स्थगित झाली.

समितीप्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.
(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.
(४) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.
(५) श्री. संजय केळकर, वि.स.स.
(६) श्री. सुरेश धानोरकर, वि.स.स.
(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्री.अ.चां.कोल्हे, उ.स.तथा नि.अ.
(२) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या विनियोजन लेखे अहवालातील महसूल व वन (वन), कृषी व पदूम (कृषी), नियोजन, गृहनिर्माण आणि सार्वजनिक आरोग्य विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.